म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्र/९०१
ग्रंथालय

पिता पुत्र

अनु. प्रा. व. वि. बडवे

भाषांतर माला क्र. २०

पिता-पुत्र

इवान तुर्गेनेव लिखित

FATHERS AND SONS

या कांदबरीचा मराठी अनुवाद

अनुवादक

प्रा. व. वि. बडवे

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
मुंबई.

अनुक्रमणिका

प्रथम आवृत्ती : १९७३, (शके १८९५)

प्रकाशक :

© सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य -संस्कृती मंडळ,
सचिवालय, मुंबई — ३२.

© मूळ प्रकाशक :
Random House Inc.
201, East, 50th Street,
New York, N. Y. 10022.

मुद्रक :
दि. दा. गांगल
लोकसंग्रह मुद्रणालय,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे ३०.

मूल्य ७ रुपये

अनुक्रमणिका

निवेदन

१. मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा; इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे; इंग्रजी भाषेला व साहित्याला आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे प्रमुख स्थान आहे तसे स्थान, महाराष्ट्रामधील विद्यापीठांत मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने साहित्य आणि संस्कृति मंडळाने वाङमय-निर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. विश्वकोश, मराठी महाकोश, वाङमयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत आहेत.

२. संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटीन इत्यादी पश्चिमी अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा भाषांतरमालेचा उद्देश आहे.

३. भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्त्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस्, ॲरिस्टोफेनीस्, युरिपिडिस्, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस्, ॲक्वाइनस, न्यूटन, डार्विन, रुसो, कांट, हेगेल्, जॉन् स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉलस्टॉय्, दोस्तएवस्की, स्तानिस्लाव्स्की, बर्ट्रान्ड रसेल, रूथ बेनेडिक्ट, रायशेन्बाख, व्हाइटहेड, क्रोचे, मालिनाव्स्की, कॅसेरेर्, गॉर्डन्, व्ही. चाइल्ड इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे नाट्यशास्त्र, संगीत रत्नाकर, ध्वन्यालोक, प्राकृतातील गाथासप्तशती, त्रिपिटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

४. भाषांतर योजनेखाली मंडळाने आतापर्यंत २० अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिलचे, “ऑन लिबर्टी”, रुसोचे “सोशल कॅान्ट्रॅक्ट”, स्तानिस्लाव्स्कीचे, “ॲन ॲक्टर प्रिपेअर्स”, एम्. एन्. रॅायचे “रीझन, रोमँटिसिझम् ॲन्ड रिव्होल्यूशन”, कै. पां. वा. काणे यांचे “हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र” इत्यादी पुस्तकांची भाषांतरे व सारानुवाद प्रकाशित झाले आहेत.

५. तुर्गेनेव लिखित “Fathers & Sons” या प्रसिद्ध रशियन कादंबरीचा मराठी अनुवाद प्रा. व. वि. बडवे यांनी केला असून तो “पिता-पुत्र” या शीर्षकाने मंडळाच्या भाषांतरयोजनेत प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

६. या कादंबरीचे मराठी भाषांतर प्रकाशित करण्यास साहित्य-संस्कृति मंडळास परवानगी दिल्याबद्दल मूळ ग्रंथाचे प्रकाशक रॅन्डम् हाउस इन्क., न्यूयॅार्क या प्रकाशन संस्थेचे मनःपूर्वक आभार मानतो.

लक्ष्मणशास्त्री जोशी,
अध्यक्ष,

वाई :

अनुक्रमणिका

(कार्तिक ३, १८९५)
२५ ऑक्टोबर, १९७३.

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

निवेदन ४
प्रास्ताविक ८
१ .... १०
२ .... १३
३ .... १५
४ .... २१
५ .... २५
६ .... ३२
७ .... ३६
८ .... ४१
९ .... ४८
१० .... ५३
११ .... ६५
१२ .... ६९
१३ .... ७४
१४ .... ८१
१५ .... ८६
१६ .... ९०
१७ .... १००
१८ .... १११
१९ .... ११६
२० .... १२४
२१ .... १३३
२२ .... १५०
२३ .... १५५

२४ ....१६३
२५ .... १८१
२६ ....१९३
२७ ....२०१
२८ ....२१६

प्रास्ताविक

इवान सगएविच् तुर्गेनेवचा जन्म २८ आक्टोबर १८१८ रोजी एका सधन कुटुंबात झाला. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे सरंजामी कुटुंबातील मुलांना जर्मन व फ्रेंच शिकविण्यासाठी शिक्षक नेमले जात; अशा शिक्षकांकडून तुर्गेनेवने या पाश्चिमात्त्य भाषा आत्मसात केल्या. रशियन भाषा मात्र तो नोकरांच्या सहवासातूनच शिकला. त्याचे पुढील उच्च शिक्षण मॅास्को व सेंट पिट्स्बर्गमधील विद्यापीठांत पार पडले. शेवटी बर्लिन येथे विद्याभ्यास करीत असताना पाश्चिमात्य तत्त्वज्ञान व विशेषतः जर्मन सौंदर्यवाद यांचा तो चाहता झाला. तुर्गेनेवच्या आयुष्यात तसे उल्लेखनीय असे फारसे काही घडले नाही. त्याचे बरेचसे उत्तरायुष्य युरोपात गेले. पॅरिसला असताना तत्कालीन सुप्रसिद्ध साहित्यिक ‘मॅग्नी’ नावाच्या विश्रामगृहात जमत असत. या साहित्यिकांत झोला, फ्लॅाबेर, मोपासाँ इत्यादी मातब्बर मंडळी होती. तुर्गेनेवही त्यांच्या सहवासात व गप्पागोष्टींत सामील होत असे. नाही म्हणायला, तरुणपणी तो पॅालीन गार्शिया वेरदाँ नावाच्या एका सुप्रसिद्ध गायिकेच्या प्रेमात पडला. पण तिचे सुखी वैवाहिक जीवन पाहून, तिच्या कुटुंबाचा एक स्नेही म्हणूनच राहाण्यात त्याने अखेरपर्यंत समाधान मानले. तिच्याच घरी तो २२ ऑगस्ट १८८३ रोजी मरण पावला.

“Fathers & Sons” ही कादंबरी १८६२ मध्ये प्रसिद्ध झाली. एकोणिसाव्या शतकात कर्तुमकर्तुम झारच्या हुकूमशाहीचा रशियन जनतेच्या बौद्धिक जीवनावर विलक्षण पगडा होता. झारची ही सत्ता म्हणजे बैझान्टाईन साम्राज्यकालापासून जनतेला आदरणीय वाटत असलेली पवित्र अनियंत्रित राज्यसंस्था होय. झारच्या या सत्तेबरोबरच आर्थोडॅाक्स चर्चचेही विलक्षण प्राबल्य होते. पण युरोपशी संपर्क झालेल्या बुद्धिवंताना मात्र झार व चर्च या दोन्हीही संस्थांची सत्ता म्हणजे अपवित्र हुकूमशाही वाटत होती. या दोन शक्तिमान संस्थाना विरोध करणे बेकायदेशीर समजले जाई. वृत्तपत्रस्वातंत्र्यावर कडक नियंत्रण होते. त्यामुळे सामाजिक व राजकीय विचारमंथनाचे एकमेव साधन म्हणून साहित्याकडे पाहाण्याचा लोकांचा दृष्टिकोण होता. कलाकृतींचे मूल्यमापन करताना मुख्यत्वेकरून त्यातील सामाजिक आशय विचारात घेतला जात असे. गुलामगिरी व झारशाही या दोन विषयानीच अनेक लेखकांची विचारधारा बनलेली होती. अनेक लेखकाना त्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांकडून छळवाद सहन करावा लागला. या कालात युरोपातील ध्येयवाद, उदारमतवाद व क्रांतिकारक विचार यानी प्रभावित झालेला रशियन विचारवंतांचा एक गट होता. या नवीन पाश्चिमात्य विचारांचा स्वीकार केल्याखेरीज रशियाचा अभ्युदय होणार नाही अशी या गटाची धारणा होती. तर प्रतिगामी विचारांच्या दुसऱ्या गटाची पाश्चिमात्यांच्या भ्रष्टाचाराला विरोध करूनच रशियाचा उद्धार होईल अशी धारणा होती. रशियन शेतकऱ्याचा सच्छील स्वभाव म्हणजेच रशियन आत्मा असे या लोकांना वाटत असे. या आत्म्यावर त्यांची गूढरम्य अशी श्रद्धा होती. स्थूलमानाने तत्कालीन राजकीय व सामाजिक जीवनातील या दोन विचारधारा होत्या.

“पिता-पुत्र” ही कादंबरी या पार्श्वभूमीवर लिहिली गेली आहे. यातील जुनी पिढी ही मृतप्राय होत असलेल्या स्वप्नाळू, सौंदर्यवादी आणि प्रतिगामी विचारसरणीची प्रतिनिधी आहे; तर नवी पिढी कार्ल मार्क्सच्या विचारांची गंधवार्ताही नसलेली क्रांतिकारक व आवेशयुक्त पिढी आहे. तुर्गेनेवने या कादंबरीत कमीतकमी पात्रे आणि प्रसंग यांच्या साह्याने, गुप्त कारस्थाने किंवा सनसनाटी प्रसंग यांना पूर्णपणे फाटा देऊन, तत्कालीन महत्त्वाच्या समस्यांचे नाट्यपूर्ण चित्रण केले असून भावी कालात होणाऱ्या क्रांतीचे दिग्दर्शन केले आहे. काटकसरीने वापरलेली साधनसामुग्री व प्रसादपूर्ण शैली यामुळे ही कथा कलापूर्ण झालेली आहे.

अनुक्रमणिका

“पिता-पुत्र” प्रसिद्ध झाल्याबरोबर रशियात अभूतपूर्ण असे टीकेचे मोहोळ उठले. प्रतिगामी व पुरोगामी अशा दोन्हीही टीकाकारांनी तीवर हल्ला चढविला. कादंबरीतील जुनी पिढी निष्प्रभ दाखविल्याबद्दल, कादंबरीचा नायक बझारव्‌पुढे कुणाचाच टिकाव लागला नाही याबद्दल प्रतिगाम्यानी तुर्गेनेववर टीका केली; नव्या पिढीने बझारव्‌चे विडंबन केले आहे, त्याच्या ध्येयवादाचा अवमान झाला आहे असे वाटून तुर्गेनेववर टीका केली. वरवर पाहता या दोन्ही पक्षांची टीका समजण्यासारखी होती. कादंबरीतील “पिता” म्हणजे जुनी पिढी ही कनवाळू, प्रेमळ अशी चित्रित केली आहे; पण त्याचबरोबर ती निश्चितपणे निष्प्रभ झालेली दर्शविली आहे; आणि नवी पिढी आहे, बझारव्‌चा अपवाद सोडून, उथळ आणि मूर्ख दाखविलेली आहे. आणि बझारव्‌ची व्यक्तिरेखा आदरणीय वाटत असली, तरी तो राकट, उद्धट आणि निर्दय म्हणण्याइतका कठोर आहे.

बझारव्‌ हा शून्यवादी आहे. त्याची कुठल्याच रूढ तत्त्वांवर, मूल्यांवर श्रद्धा नाही. पण तो सर्वच गोष्टी निषिद्ध मानत नाही. निखळ बुद्धिवाद व शास्त्र यांवर त्याची अढळ श्रद्धा आहे. जुन्या पिढीच्या सरंजामी सवयी, सौंदर्यवादी कल्पना, त्यांची देशभक्ती, त्यांचा धर्म, हे सारे त्याला थोतांड वाटते. “एक चांगला केमिस्ट कुठल्याही कवीपेक्षा वीसपटीने अधिक उपयुक्त आहे”, असे तो म्हणतो. सदहेतू असलेला उदारमतवाद व मानवतावाद या दोन्हीही गोष्टींबद्दल त्याला तिटकारा आहे.

पण कालांतराने लोकांना तुर्गेनेवच्या या कादंबरीची महती उमगू लागली. दोन विरुद्ध विचारसरणींच्या पक्षांनी तीवर हल्ला केला होता ही गोष्टच तुर्गेनेवच्या सत्यान्वेषी वृत्तीचा प्रत्यय देण्यास पुरेशी होती. बझारव्‌चे अनुकरण करण्यात तरुणांना अभिमान वाटू लागला. विद्यापीठांतून शून्यवादाचे वारे वाहू लागले. अशा रीतीने बझारव्‌नेच तुर्गेनेवला न्याय दिला असे म्हटले पाहिजे. याच अवधीत टॉलस्टॉय, दोस्तएवस्की इत्यादी थोर रशियन लेखक रशियाबाहेर लोकप्रिय होत असता, तुर्गेनेव रशियात अधिकाधिक लोकप्रिय होत गेला. अजूनही रशियातील श्रेष्ठ लेखकांत त्याची गणना होत असते. लाल क्रांतीनंतर काही अतिउत्साही लोकानी तुर्गेनेव सरंजामदार, हतबल वृत्तीचा आहे इत्यादी आरोप करून त्याला बदनाम करण्याचा प्रयत्न केला; पण तो अयशस्वी झाला. तुर्गेनेव हा खुद्द लेनिनचा आवडता लेखक. झारशाहीविरुद्ध त्याने दिलेल्या झगड्याची आज वाहवा केली जाते. या विरोधामुळे तुर्गेनेवची सार्वजनिक प्रेतयात्रासुद्धा झारच्या हस्तकांनी काढू दिली नव्हती. मध्यमवर्गीय ध्येयवादाची निष्फळता तुर्गेनेवने दाखविली आहे. कदाचित त्याबद्दलही आज रशियात तो मानला जात असावा. पण त्याहीपेक्षा तुर्गेनेवच्या लिखाणात “रशियन मातृभूमीची”, “पवित्र रशियन भूमीची” काव्यात्म स्मृती जागृत करण्याचे सामर्थ्य आहे. यामुळे तो अधिक लोकप्रिय आहे. आज तुर्गेनेव हयात असता तर त्याला हद्दपारच राहावे लागले असते. पण आजच्या बझारव्‌च्या देशात तुर्गेनेवने लिहिलेल्या कादंबऱ्यांच्या बारा दशलक्ष प्रति क्रांतिकालानंतर खपल्या आहेत, ही गोष्ट तुर्गेनेवची स्मृती अमर राहील याची ग्वाही देते.

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाने मला या कादंबरीचा अनुवाद करण्याची संधि दिली या बद्दल मंडळाचा मी ऋणी आहे. विशेषतः मंडळाच्या भाषांतर योजनेचे मानसेवी संपादक श्री. बा. रं. सुंठणकर यांनी अनुवाद करण्याच्या कामी जे उत्तेजन व सहाय्य दिले त्याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहे.

व. वि. बडवे

अनुक्रमणिका

१

"प्योत्र, अजून नाही का कुणी दिसत?" हा प्रश्न विचारणारे गृहस्थ चाळिशी उलटलेले होते. वीस मे, अठराशे एकोणसाठ हा दिवस होता. राखी रंगाचा कोट व चौकड्याची पाटलोण त्यांनी परिधान केली होती. एस्–या गावाजवळच्या चौकीच्या पायऱ्या उतरून ते खाली आले. त्यांनी हॅट काढलेली होती. वरील उद्गार त्यांनी आपल्या नोकराला उद्देशून काढले. लहान, निस्तेज डोळे असलेला तो नोकर तरुण व गबदूल होता. त्याच्या हनुवटीवर पांढुरकी जवानी दिसत होती.

त्याच्या कानातील निळसर खड्याची रिंग, तेल चोपडलेली केसांची वलये आणि त्याच्या हालचालीतील शिष्टपणा–या लक्षणांवरून तो सुधारलेल्या नव्या पिढीतील आहे असे दिसत होते. दूरवर न्याहाळत असल्याचा बहाणा करीत त्याने काही क्षण घालविले, आणि नंतर उत्तर दिले,

"नाही, साहेब; अजून नाही कुणी दिसत."
"अजून नाही?"
"नाही." त्याने दुसऱ्यांदा उत्तर दिले.

त्याच्या धन्याने निःश्वास सोडला आणि तिथेच एका छोट्या बाकावर ते बसले. विचारमग्न, पाय दुमडून बसलेल्या स्थितीत ते सभोवार पाहात आहेत, तोपर्यंत वाचकांना त्यांचा परिचय करून द्यायला हरकत नाही.

त्यांचे नाव निकालाय पित्रोविच् किरसानव्. या चौकीपासून बारा मैलांवर त्यांची पाच हजार एकरांची शेतीवाडी किंवा, ते म्हणत त्याप्रमाणे, दोनेकशे जीवांची मालमत्ता होती. कारण त्यांनी आपली जमीन कुळांमध्ये वाटली होती; आणि एक 'फार्म' सुरू केले होते. त्यांचे वडील सैन्यात जनरल होते. १८१२ च्या लढाईत त्यांनी मर्दुमकी गाजविली होती. अर्धशिक्षित, करडे वाटले तरी स्वभावाने ते वाईट नव्हते. अगदी पक्के रशियन. प्रथम ब्रिगेडचे व नंतर एका डिव्हिजनचे नेतृत्व त्यांनी केले होते. अशा तऱ्हेने आयुष्यभर त्यांनी सैन्यात सेवा केली. प्रांतातच नेहमी राहिल्यामुळे आणि वरचा हुद्दा मिळाल्यामुळे त्यांनी महत्त्वाची कामगिरी करून दाखविली. आपले ज्येष्ठ बंधू पावेलप्रमाणे निकालाय पित्रोविच् सुद्धा दक्षिण रशियात जन्मले. पण पावेलसंबंधी अधिक नंतर. वयाच्या चौदा वर्षांपर्यंत त्यांचे शिक्षण घरीच झाले. सवंग शिक्षक, स्वच्छंदी पण हांजीखोर वृत्तीचे अॅडज्यूटांट आणि सैन्यातले नेहमीचे अलबते गलबते यांची घरात वर्दळ होती. त्यांची आई कल्याझिन घराण्यातील. अगाथे हे तिचे नाव; पण जनरलची पत्नी झाल्यामुळे अगाथक्लिया कुज्मिनिश्ना किरसानव असे भरघोस नाव तिने धारण केले. सैन्यातल्या इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पत्नींप्रमाणेच आपल्या पतीचा गौरव व तदनुषंगिक कर्तव्ये यांत ती सहभागी होई. भपकेदार शिरोभूषणे व सिल्कचे झुळझुळीत कपडे ती वापरत असे. प्रार्थनामंदिरात तीच प्रथम क्रूसासमोर जाई. ती खूप बोलायची आणि तेही मोठ्याने. सुप्रभाती मुलांच्या अभिवादनाचा स्वीकार ती करायची आणि रात्री त्यांना आशिर्वाद द्यायची. थोडक्यात सांगायचे म्हणजे, जीवनाचा ती पुरेपूर उपभोग घेत होती. निकालाय पित्रोविच् हा जनरलचा मुलगा. तेव्हा त्याने आपल्या भावाप्रमाणे सैन्यात जावे अशी अपेक्षा होती. पण निकालाय हा मोठा धैर्यवान होता असे नाही; किंबहुना, त्याला "भ्याड" म्हणणे सुद्धा शोभून दिसले असते. ज्या दिवशी त्याला कमिशन मिळाल्याचे जाहीर झाले त्याच दिवशी एका अपघातात त्याच्या पायाला दुखापत झाली आणि त्यानंतर दोन महिने त्याला अंथरुणात पडून राहावे लागले. शेवटपर्यंत तो किंचितसा

लंगडतच चालत असे. त्याच्या वडिलांनी त्याच्याबद्दलची आशा सोडली आणि दिवाणी नोकरीत त्याला लावून दिले. अठराव्या वर्षी त्यांनी त्याला पिट्स्बर्ग येथे विद्यापीठात शिक्षणासाठी पाठविले. त्याच वेळी त्याचा भाऊ गार्डस्मध्ये मोठा अधिकारी झाला. ते दोघे एकत्र, स्वतंत्र खोल्यात राहात. या दोन तरुणांवर दुरून देखरेख ठेवण्याचे काम इल्या कल्याझिन् नावाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याकडे होते. आईकडून तो त्यांचा नातेवाईक होता. त्यांचे वडील आपल्या डिव्हिजनकडे व पत्नीकडे परतले. आणि मग मुलांना करड्या रंगाच्या कागदावर मोठी, गिचमिड, कारकुनी अक्षरांत लिहिलेली पत्रे मधून मधून येऊ लागली. या पत्रांशेवटी मरगोलात काळजीपूर्वक कोरलेली "प्योत्र किर्सानव्: जनरल मेजर" हे शब्द असत. १८३५ मध्ये निकालाय पित्रोविच् पदवीधर होऊन विद्यापीठातून बाहेर पडले. आणि त्याच वर्षी जनरल किर्सानव्चे नाव एका असमाधानकारक कवायतीच्या पाहणीवरून निवृत्त लोकांच्या यादीत घातले गेले. त्यानंतर ते पिट्स्बर्गला पत्नीसह राहायला परतले. तावरीचेस्की गार्डन्सच्या भागात एक घर घ्यायचा त्यांचा विचार होता; इंग्लिश क्लबमध्ये त्यांनी सभासद म्हणून नावही नोंदविले होते; पण आकस्मिकपणे मस्तकातील रक्तस्रावाने त्यांचे देहावसान झाले. अगाथक्लिया कुज्मिनिश्नाही त्यांच्या पाठोपाठ गेली. विषण्ण मनःस्थितीत राजधानीतील नीरस जीवनाशी तिला जुळवून घेता आले नाही. तिचे मन सैनिकी जीवनात रुळले होते. भकास जीवन जगण्याच्या कल्पनेने तिने हाय खाल्ली. मध्यंतरी निकालाय पित्रोविच् आपल्या घरमालकाच्या, प्रिप्लवेन्स्कीच्या, मुलीच्या प्रेमात पडले. ही गोष्ट त्यांच्या मातापित्यांना आवडणारी नव्हती. कारण प्रिप्लवेन्स्की हा कनिष्ठ अधिकारी होता. ती देखणी होती, तशी "पुरोगामीही" होती. नियतकालिकांतील "शास्त्रीय" लेख ती वाचत असे. सुतक संपल्याबरोबर त्यांनी तिच्याशी लग्न केले. वडिलांनी वशिल्याने त्यांच्यासाठी मिळवलेली दिवाणी नोकरी सोडून दिली, आणि आपल्या लाडक्या माषाबरोबर प्रथम त्यांनी लेस्नीइन्स्तितूत् जवळच्या एका बंगल्यात सुखाचा संसार थाटला. नंतर शहरातील एका सुरेख नि हवेशीर दिवाणखाना असलेल्या फ्लॅटमध्ये काही दिवस ते राहिले आणि नंतर आपल्या खेड्यात जाऊन स्थाईक झाले. आणि तिथेच अल्पावधीत अर्कादी हा सुपुत्र जन्मला. ते तरुण जोडपे सुखाने आणि समाधानाने कालक्रमणा करीत होते. विरहाचे प्रसंग क्वचितच येत. दोघे एकत्र वाचन करीत, एकत्र गात आणि पियानोवर एकत्र द्वंद्वगीत वाजवीत. तिने बागेतील फुलांची देखभाल करावी व कुक्कुट पालनाकडे लक्ष द्यावे; तर निकालाय पित्रोविच्नी कधी शिकारीला जावे आणि शेतीवाडीच्या कामात मग्न राहावे. या आनंदी आणि शांत वातावरणात अर्कादी लहानाचा मोठा झाला. दहा वर्षे कशी स्वप्नासारखी उडून गेली. १८४७ त किरसानव्ची पत्नी निवर्तली. या धक्क्याने त्यांचे मनोधैर्यच खचले; काही आठवड्यांतच त्यांचे केस पांढरे झाले. त्यातून विरंगुळा वाटावा म्हणून परदेश प्रवासाची त्यांनी तयारी केली. पण तेवढ्यातच १८४८ साल उजाडले. ते खेड्याकडे परतले ते अनिच्छेनेच. काही काल असीम निष्क्रिय अवस्थेत गेला. नंतर हळूहळू त्यांनी शेतीवाडीकडे लक्ष देऊन त्यात सुधारणा करण्यात रस घ्यायला सुरवात केली. १८५५ त त्यांनी अर्कादीला विद्यापीठात घातले आणि पिट्स्बर्गमध्ये ते स्वतःही हिवाळ्यात सतत तीन वर्षे राहिले. ते सहसा कुठे बाहेर जात नसत. अर्कादीच्या तरुण मित्रांबरोबर ओळख वाढविण्याचा प्रयत्न करीत. या वर्षी हिवाळ्यात मात्र ते तिकडे गेले नाहीत; आणि म्हणून १८५९ च्या मे महिन्यात आपण त्यांना पाहिले, तेव्हा त्यांचे काळ्याचे पूर्ण पांढरे झाले. अंगाने भरदार पण किंचित पोक आलेले. त्यांचा मुलगा पदवीधर होऊन परतत होता. एके काळी त्यांनीही अशीच पदवी मिळविली होती; आणि आता आपल्या पदवीधर मुलाची ते मार्गप्रतीक्षा करीत होते.

अशा स्थितीत त्या नोकराला त्यांच्याजवळ उभे राहाणे प्रशस्त वाटले नसेल म्हणून तो धन्याच्या नजरेआड गेटजवळ जाऊन पाईप ओढत उभा राहिला. कदाचित, धन्याच्या नजरेसमोर सारखे उभे राहणे नको, असेही त्याला वाटले असावे. निकालाय पित्रोविच्नी मान खाली वळविली आणि पडझड झालेल्या

अनुक्रमणिका

पायऱ्यांकडे पाहिले. ठिपक्या ठिपक्यांची एक मोठी कोंबडी त्यांच्या दिशेने अगदी मख्खपणे येत होती. आपली काळी-पिवळी पावले ती ठामपणे टाकत होती. चिखलाने बरबटलेल्या एका मांजरीने त्यांच्याकडे शत्रुत्वाने पाहिले आणि कठड्याभोवती आडोशाला जाऊन ते मांजर मुरकेखोरपणे आळोखे पिळोखे देऊ लागले. ऊन तापत होते; आणि चौकीच्या अर्धवट अंधाऱ्या पॅसेजमधून रायब्रेडचा गंध येत होता. निकालाय पित्रोविच्चे मन स्वप्नात तरंगत होते. "माझा मुलगा......पदवीधर......अर्काशा......" अशा कल्पना डोक्यात राहून राहून रूंजी घालत होत्या. त्यांनी अन्य गोष्टींचा विचार करण्यात मन गुंतविण्याचा प्रयत्न केला; पण तेच विचार पुनःपुन्हा परत येत होते. आपल्या मृत पत्नीचे स्मरण त्यांना झाले. "हे पाहायला ती जगली नाही!" व्यथित होऊन ते स्वतःशीच पुटपुटले. एका गुबगुबीत काळ्यानिळ्या कबुतराने रस्त्यावर झेप घेतली आणि तितक्याच वेगाने विहिरीजवळच्या डबक्यात पाणी पिण्यासाठी ते तिकडे उडाले. निकालाय पित्रोविच्नी त्याच्याकडे पाहिले. पण तेवढ्यात जवळ येत असलेल्या गाडीच्या चाकांचा आवाज त्यांच्या कानावर पडला.

"साहेब, या आवाजावरून ते येत असावेत असे वाटते," असे म्हणत नोकर गेटपासून पळत आला. निकालाय पित्रोविच्नी उडी मारली आणि रस्त्याकडे डोळे लावले. एक तीन घोड्यांची गाडी येत होती. ते घोडे एका रांगेत जुंपलेले होते. गाडीत त्यांना विद्यार्थ्यांच्या टोपीला असतो तसला ठराविक निळा पट्टा पुसटसा दिसला. प्रिय पुत्राचे मुखमंडलही पुसटसे दिसले.

"अर्काशा! अर्काशा!" असे हाका मारीत किरसानव् बाहू पसरून त्याच्याकडे धावले......काही मिनिटांतच आपल्या पदवीधर पुत्राच्या गुळगुळीत, धुळीने माखलेल्या आणि उन्हाने झळाळलेल्या गालावर त्यांनी आपले ओठ टेकले.

अनुक्रमणिका

२

"प्रथम मला माझ्या अंगावरची धूळ झटकू दे, डॅडी," अर्कादीच्या आवाजात प्रवासाचा शीण जाणवत होता. त्याचा आवाज बालीश पण खणखणीत घंटानादासारखा होता. आनंदातिशयाने त्याने आपल्या पित्याच्या आलिंगनास प्रतिसाद दिला. "पहा, मी तुम्हाला धुळीने माखून टाकले आहे." तो म्हणाला.

"जाऊ दे रे, जाऊ दे," निकालाय पित्रोविच् म्हणाले. त्यांच्या चेहऱ्यावर प्रेमळ हास्य विलसत होते. अर्कादीच्या कोटाची कॉलर त्यांनी दोनदा झाडली; आपलाही कोट हातांनी झटकला. "मला तुझ्याकडे डोळे भरून पाहू दे." ते थोडे मागे सरकले आणि म्हणाले. पण लगेच धांदलीने चौकीच्या आवारात येऊन त्यांनी हाका मारल्या, "इकडेच या सर्वजण; आणि घोडे सज्ज करा."

निकालाय पित्रोविच् आपल्या मुलापेक्षाही स्वतःच आनंदाने फुलून गेले होते. त्यांचा गोंधळ उडाला होता आणि म्हणून ते संकोचलेही होते. अर्कादीने त्यांना थांबविले.

"डॅडी," तो म्हणाला. "माझ्या मित्राची, बझारव्‌ची ओळख करून देतो. त्याच्याविषयी मी तुम्हाला पत्रांतून बरेच वेळा लिहिले आहे. विशेष म्हणजे, आपल्या घरी राहायचे त्याने कबूल केले आहे."

निकालाय पित्रोविच् ताबडतोब मागे वळून गाडीकडे गेले. आपला लांब, ढगळ आणि जाडाभरडा कोट सावरत एक उंच तरुण गाडीतून उतरला. निकालाय पित्रोविच्‌नी त्याचा मोजे नसलेला तांबूस हात प्रेमाने दाबला. त्या तरुणाने मात्र आपला हात काही ताबडतोब पुढे केला नाही.

"तुम्ही आमच्याकडे राहायला येणार याबद्दल मला अंतःकरणपूर्वक आनंद आहे......तुमचे आणि तुमच्या वडिलांचे नाव.......?"

"एव्‌गेनी वासिलिएव्," बझारव्‌ने उत्तर दिले. त्याचा आवाज मंद पण मर्दानी होता. आपल्या जाड्याभरड्या कोटाची कॉलर त्याने वर केली आणि निकालाय पित्रोविच्‌ना त्याचा पूर्ण चेहरा दिसला. त्याचा चेहरा लांबट आणि रोड होता; विशाल भालप्रदेश, टपोरे हिरवट डोळे, आणि मातकट रंगाचे झुबकेदार कल्ले प्रशांत स्मित त्याच्या चेहऱ्यावर झळकत होते. आत्मविश्वास आणि बौद्धिक तेज यांचा प्रत्यय येत होता.

"एव्‌गेनी वासिलिइच्. आमच्याकडे राहायला कंटाळवाणे होणार नाही ना !" निकालाय पित्रोविच् म्हणाले.

बझारव्‌ने उत्तर देण्याऐवजी आपल्या पातळ ओठांची नुसतीच ओझरती हालचाल केली आणि आपली टोपी काढली. त्याचे केस लांब दाट होते; पण तेवढ्याने त्याच्या डोक्यावरची टेंगुळे काही झाकली गेली नाहीत.

अनुक्रमणिका

"अर्कादी," निकालाय पित्रोविच् आपल्या चिरंजीवाकडे वळून म्हणाले, "मग लगेच घोडे जुंपायचे की, इथेच थोडी विश्रांती घेणार?"

"घरीच विश्रांती घेऊ, डॅडी; घोडे जुंपायला सांगा."

"ताबडतोब, लगेच," त्याच्या वडिलांनी संमती दिली. "अरे प्योत्र, ऐकलस का? तयारी कर. त्वरा कर."

प्योत्र हा आधुनिक नोकर असल्याने आपल्या तरुण धन्याच्या हाताचे चुबंन न घेता, दुरूनच त्याने अभिवादन केले; आणि गेटमधून तो बाहेर पडला.

"मी गाडी घेऊन आलोच आहे; पण तुमचाही तीन घोड्यांचा कोच दिसतो," निकालाय पित्रोविच् म्हणाले. अकारण अस्वस्थतेने त्यांना ग्रासले होते. चौकीत चाकरीला असलेल्या बाईने आणलेल्या स्टीलच्या ओगराळ्याने अर्कादी पाणी पीत होता; तर बझारव्ने आपला पाईप शिलगावला व तो घोडे घेऊन येत असलेल्या कोचमनकडे वळला. "आपल्या गाडीत तर दोनच जागा आहेत; मग तुझा मित्र...... "

"तो येईल कोचात बसून" अर्कादी मध्येच हलक्या आवाजात म्हणाला. "बझारव्संबंधी औपचारिकपणे वागण्याची जरुरी नाही. मोठा उमदा माणूस आहे तो . फारच साधा......पण तुम्ही पाहालच आता."

निकालाय पित्रोविच्च्या कोचमनने घोडे आणून जुंपायला सुरवात केली. "आटपा, आटपा, अहो दाढीवाले!" बझारव् कोचमनला उद्देशून उद्गारला.

"अरे मित्यूह," जवळच उभा असलेला दुसरा एक ड्रायव्हर ओरडला. त्याने आपले हात मागे चामड्याच्या कोटाच्या फटीत अडकविले होते, "हे साहेब तुला काय म्हणाले ऐकलस का ? तू आहेसच म्हणा दाढीवाला! "

मित्यूहने फक्त आपली हॅट मागे उडविली आणि जूजवळ धापा टाकत बसलेल्या घोड्यांचे कासरे ओढले.

"त्वरा करा रे, पोराने," निकालाय पित्रोविच् ओरडले. "शुभेच्छादर्शक मद्यपान करण्याची संधी आहे. आटपा."

कही मिनिटांतच घोडे जुंपले गेले. पितापुत्र एका कोचात स्थानापन्न झाले. प्योत्र ड्रायव्हरच्या जागेवर बसला. बझारव्ने दुसऱ्या कोचात उडी मारली आणि कातडी उशीवर आपले डोके घुसळले. आणि दोन्ही कोच दौडू लागले.

अनुक्रमणिका

३

“हं! शेवटी आलास बाबा तू इथं—पदवीधर होऊन; बरं झालं, घरी आलास एकदाचा!” निकालाय पित्रोविच् म्हणाले. बोलताना त्यांनी अर्कादीच्या खांद्यावर, तर कधी गुडघ्यावर हात ठेवला.

“आणि काकांचे कसे आहे? ठीक ना? ” संभाषण शक्यतो भावनेच्या आहारी जाऊ नये म्हणून औपचारिकपणे अर्कादीने विचारले. वास्तविकरीत्या स्वाभाविक, किंबहुना बालिश आनंदाने त्याचेही अंतःकरण भरून गेले होते.

“ठीक आहे. ते येणारच होते तुला भेटण्यासाठी माझ्याबरोबरच. पण काही कारणास्तव रहित केले असे दिसते.”

“आणि माझी वाट पाहण्यात तुमचा किती वेळ गेला?” अर्कादीने विचारले.

“पाच एक तास.”

“ओऽऽ डॅड!” असे म्हणत अर्कादीने त्यांच्या गालाचे कडकडून चुंबन घेतले. निकालाय पित्रोविच् गालातल्या गालात हसले.

“तुझ्यासाठी एक असा उमदा घोडा आणला आहे!” ते म्हणाले. “तू पाहाशीलच आणि तुझ्या खोलीला नवीन कागद लावले आहेत.”

“पण बझारव्‌साठी खोली आहे ना? ”

“त्याचीही सोय करू दुसऱ्या खोलीत.”

“डॅड, कृपा करून त्याची चांगली बडदास्त ठेवा. त्याची मैत्री मला किती मोलाची वाटते ते मला तुम्हाला सांगताच येणार नाही.”

“अलिकडेच त्याच्याशी मैत्री जमली आहे वाटतं?”

“होय, अगदी अलिकडे.”

“म्हणूनच, गेल्या हिवाळ्यात तो कुठे दिसला नव्हता. त्याचा विषय कुठला?”

“त्याचा मुख्य विषय प्राकृतिक विज्ञान. पण प्रत्येक गोष्टीसंबंधी त्याला माहिती आहे. पुढच्या वर्षी तो डॉक्टर होईल.”

अनुक्रमणिका

“म्हणजे तो वैद्यक शाखेचा विद्यार्थी आहे तर,” निकालाय पित्रोविच् म्हणाले; आणि किंचित्काल स्तब्ध झाले. “काय रे प्योत्र,” बाहेर हात काढून ते पुढे म्हणाले, “आपल्या बरोबर चालले आहेत ते आपलेच कुळवाले ना रे?”

प्योत्रने त्या दिशेकडे पाहिले. बाजूच्याच एका लहान वाटेने काही गाड्या धावत होत्या. त्यांच्या घोड्यांना लगामसुद्धा नव्हते. प्रत्येक गाडीत एकदोन शेतकरी बसले होते. त्यांच्या अंगावर मेंढीच्या कातडीचे कोट होते आणि त्यांना गुंड्या नव्हत्या.

“होय, साहेब,” प्योत्र उत्तरला.

“कुठे निघाले आहेत ते? —शहराकडे?”

“शहराकडेच बहुतेक. जिनच्या गुत्त्याकडे.” कोचमनकडे वळून प्योत्र तिरस्काराने म्हणाला. जणू तो कोचमनकडून संमतीची अपेक्षा करीत होता. पण कोचमन मात्र निर्विकार होता. तो जुन्या पठडीतला. तरुण पिढीची मते त्याला पसंत नव्हती.

“यावर्षी या कुळांनी बराच मनस्ताप दिला.” चिरंजीवाकडे वळून निकालाय पित्रोविच् म्हणाले, “खंडच देईनात! काय करायचं?”

“मग रोजगारीने लावलेले कामकरी तुम्हाला बरे वाटतात?”

“होय,” दातांच्या फटीतून निकालाय पित्रोविच् उद्गारले. “माझ्या विरुद्ध त्यांना खोडसाळपणाने कुणीतरी फितवत आहे आणि मग ते वेठबिगार कामे करीत नाहीत. अवजारं खराब करतात. जमिनीची मशागत मात्र त्यांनी बरी केली आहे एकदा स्थिरस्थावर झाल्यावर होईल व्यवस्थित. आता तुला शेतीकामात रस वाटतो की नाही?”

“तुम्ही एखादी छपरी वगैरे बांधली नाही,” तक्रारीच्या सुरात अर्कादी म्हणाला. प्रश्नाचे उत्तर त्याने अर्थातच टाळले.

“आपल्या घराच्या सज्जावर उत्तरेकडच्या बाजूला एक कापडी छत बसवून घेतले आहे.” निकालाय पित्रोविच्नी माहिती पुरविली. “आपण आता उघड्यावर सुद्धा भोजन घेऊ शकतो.”

“म्हणजे एखाद्या समरव्हिला सारखेच......त्यात काय अर्थ आहे? ......तरीही इथे हवा किती आल्हाददायक आहे! सुगंध कसा भरून राहिला आहे. या हिरव्यागार कुरणांवरून येणाऱ्या सुगंधासारखा सुगंध जगात इतरत्र कुठेही नसेल! आणि हे आकाशसुद्धा!”

पण अर्कादी मधेच थांबला. त्याने मागे एक कटाक्ष टाकला आणि तो स्वस्थ बसला.

“खरेच,” निकालाय पित्रोविच् म्हणाले, “ही तुझी जन्मभूमीच असल्याने प्रत्येक गोष्ट तुला विशेष.......”

अनुक्रमणिका

“नाही अं; मनुष्य कुठेही जन्मला तर त्यात काय फरक पडणार आहे?”

“तरीही...... ”

“नाही. काहीसुद्धा फरक पडणार नाही.”

निकालाय पित्रोविच्नी आपल्या पुत्राकडे एकदा वळून पाहिले. आणि मग मात्र गाडी अर्धा मैल धावून गेली, तरी कुणीच तोंड उघडले नाही.

“तुला लिहिले होते की नाही, आठवत नाही.” निकालाय पित्रोविच्नीच सुरवात केली. “तुझी बालपणातील दाई, एग्रोवना वारली.”

“खरेच? बिचारी! प्रकोफिच् अजून आहे का?”

“आहे; आणि अगदी आहे तसा आहे. नेहमीचीच कुरबूर. खरे म्हणजे मॅरिअॅनोमध्ये तुला काहीच फरक आढळणार नाही.”

“तुमचा बेलीफ पूर्वीचाच आहे का?”

“इथे मात्र बदल झाला आहे. स्वतंत्र झालेले पण घरगुती काम करणारे कृषक मजदूर असतात ना—? त्यांना आपल्याकडे ठेवायचे नाही, असे मी ठरविले. निदान त्यांच्यावर जोखमीची कामे तरी सोपवायची नाहीत.” (अर्कादीने प्योत्रकडे एक कटाक्ष टाकला,) त्याच्या पाहण्याचा रोख ओळखून निकालाय पित्रोविच् खालच्या आवाजात उद्गारले, “प्योत्र हा माझा व्यक्तिगत नोकर आहे. तो स्वतंत्र आहे. सध्या माझ्याकडे जो बेलीफ आहे तो शहरातला आहे. फार व्यवहारी मनुष्य. त्याला मी सालीना अडीचशे रूबल्स देतो.” हे बोलत असताना निकालाय पित्रोविच् आपले कपाळ व भुवया चेपू लागले. त्यांच्या मनात गोंधळ निर्माण झाला होता, त्याचे ते निदर्शक होते. “पण मी तुला आताच म्हणालो की, मॅरिअॅनोमध्ये तुला काहीच बदलेले आढळणार नाही......ते काही पूर्ण खरे नाही. मला वाटते, मी तुझे मन तयार करणे आवश्यक आहे; जरी......”

ते क्षणभर अडखळले; आणि मग फ्रेंचचा आश्रय घेऊन, म्हणाले “माझे स्पष्ट बोलणे एखाद्या नीतिमार्तंडाला कदाचित अनुचित वाटेल; पण एकतर ते लपून राहणार नाही, व दुसरे म्हणजे पिता-पुत्रांत कसे संबंध असावेत याबद्दलची माझी विशिष्ट मतप्रणाली तुला ठाऊक आहेच. तू मला दोष देणे हेही कदाचित बरोबर असेल. माझ्या या वयात......थोडक्यात सांगायचं म्हणजे......” ती......ती मुलगी......तू कदाचित तिच्याबद्दल ऐकलही असशील......”

“फिनिच्कासंबंधी?” अर्कादीने निर्व्याज स्वरात विचारले.

अनुक्रमणिका

निकालाय पित्रोविच् शरमले. “कृपा करून मोठ्याने तिचे नाव उच्चारू नको......ती सध्या माझ्याजवळ राहाते. तिला मी घरीच ठेवून घेतले आहे...... घरात त्या दोन लहान खोल्या होत्या. पण आता काही तरी बदल करावा लागेल. ”

“पण का, डॅडी?”

“तुझा मित्र आपल्याकडे राहायला येणार आहे......त्याला......थोडे विचित्र वाटेल......”

“बझारव्बद्दल काहीच फिकीर नको. तो या सगळ्यापलीकडे गेला आहे.”

“पण......तुलासुद्धा,” निकालाय पित्रोविच् म्हणाले, “आपलं छोटं घर फार गैरसोईचं आहे......तेच भयंकर वाटतं.”

“डॅडी,” अर्कादी त्यांना मध्येच थांबवून म्हणाला, “तुम्ही जणू क्षमायाचनाच करता आहात; आपण काही लाजिरवाणे कृत्य केले, असे तर तुम्हाला वाटत नाही ना?”
“अर्थात मला शरम वाटली पाहिजे,” निकालाय पित्रोविच् उद्गारले; त्यांचा चेहेरा शरमेने अधिकच लाल झाला होता.

“नॉन्सेन्स, डॅड......तसे वाटण्याचे काही कारण नाही.” अर्कादीने स्निग्ध स्मित केले. “ही काय क्षमायाचना करण्यासारखी का गोष्ट आहे!” तो स्वतःशीच म्हणाला. कृपाळू, हळव्या हृदयाच्या आपल्या पित्याबद्दल क्षमाशील मृदू भावनेने त्यांचे अंतःकरण भरून गेले. त्यात सुप्त अहंपणाचा अंश असावा. आपण किती सुधारलेलो, पुढारलेलो आहे, या जाणिवेने प्रभावित होऊन तो सुखावला होता. या मनःस्थितीत तो वडिलांना पुन्हा म्हणाला, “नको; कृपा करून तुम्ही बोलू नका.”

निकालाय पित्रोविच् अजूनही आपले कपाळ चोळत होते. बोटांआडून त्यांनी त्याच्याकडे एकदा पाहिले. आणि त्यांच्या अंतःकरणात एक कळ उठली......पण त्याबद्दल त्यांनी स्वतःलाच दोष दिला.

“ही पहा, आपली शेतीवाडी आलीच,” निकालाय पित्रोविच्नी दीर्घ शांततेचा भंग केला.

“आणि समोर दिसते ते आपलेच वन, नाही का?” अर्कादीने विचारले.

“होय, पण मी लाकूड विकून टाकलं. यावर्षी कापतील ते झाडं.”

“पण तुम्ही ते का विकलं?”

“पैशाची निकड होती. शिवाय ती जमीन आता शेतकऱ्यांकडेच.जाणार आहे. ”

“जे तुम्हाला खंड देत नाहीत त्यांच्याकडे?”

अनुक्रमणिका

“तो त्यांचा प्रश्न आहे. शिवाय, ते कधीतरी देतीलच.”

“त्या वनाबद्दल वाईट वाटते.” अर्कादी म्हणाला आणि त्याने आजूबाजूला नजर टाकली.

ज्या प्रदेशातून त्यांची गाडी धावत होती, तो काही मोठा सृष्टिसौंदर्याने नटलेला प्रदेश नव्हता. क्षितिजापर्यंत शेतेच शेते पसरलेली. चढउताराची. काही ठिकाणी वृक्षांचे झुबके दिसत होते. नागमोडी वळणाच्या घळीत खुजी, तुरळक झुडुपे दिसत होती. हे दृश्य कॅथरिनच्या काळातल्या जुन्या प्रकारच्या नकाशावर चित्रित केलेल्या प्रतिकृतीची आठवण करून देत होते. तीरावर रिकामे खळगे असलेले लहान लहान प्रवाह; बांध घातलेली लहान तळी; लहान खेडी, काळपट, धाब्याची छपरे असलेल्या झोपड्या, उतरती छपरे असलेली आणि ब्रशवुडच्या चिवट्यांनी विणलेल्या भिंतींची कोठारे; मळणी करण्याच्या ओसाड जागेजवळ दिसणारे त्यांचे रुंद पसरलेले दरवाजे. विटकामाची प्रार्थनामंदिरे; त्यांच्या भिंतीवरचे पोपडे उडालेले. काही प्रार्थनामंदिरे लाकूडकामाची होती; त्यांच्यावरचे क्रूस कललेले होते. आणि उंचउंच गवतात बुजून गेलेले कबरस्तान. अर्कादीचा अपेक्षाभंग झाला. लक्तरे नेसलेल्या आणि रोडक्या तट्टांवर बसलेल्या शेतकऱ्यांनी हे चित्र पूर्ण केले. रस्त्याच्या बाजूने विलोची झाडे उभी होती. त्यांच्या बुंध्याजवळची साल काढलेली आणि फांद्या तोडलेल्या होत्या. त्यामुळे दीनवाण्या भिकाऱ्याप्रमाणे ती दिसत होती. रोडक्या आणि भुकेकंगाल गाई डबक्याच्या जवळपासचे गवत कुरतडत होत्या. एखाद्या भयानक प्राण्याच्या मगरमिठीतून सुटल्यासारख्या त्या वाटत होत्या. वसंतऋतूतील सुंदर वातावरणात त्या कृश, भुकेकंगाल, केविलवाण्या प्राण्यांचे दृश्य विसंगत वाटत होते. अखंड, अतित्रासदायक हिवाळ्यातील बर्फ, वादळे, हिमसेक यांची एकसमयावच्छेदेकरून भुतासारखी शुभ्र आकृती डोळ्यांसमोर येत होती. “छेः, छेः!” अर्कादीच्या मनात विचार आले. “हा काही समृद्ध प्रदेश म्हणता येणार नाही. इथे समृद्धीही नाही आणि उद्योग-धंदेही नाहीत. हे असे फार काळ चालणे शक्य नाही. सुधारणा आवश्यक आहेत. पण सुधारणा अंमलात कशा आणायच्या आणि सुरवात कशी करायची!”

अर्कादीच्या मनात असे विचार चालले होते; पण वसंतऋतूचा पगडा त्याच्या मनावर पडलाच. सभोताली सुवर्ण-हरित प्रभा उजळत होती.. झाडे झुडपे, गवत चमकत होते; आणि उबदार वाऱ्याच्या झुळुकीने त्याच्यावर लाटा पसरल्या होत्या. लार्कच्या सुरांनी आसमंत भरून गेला होता. पीविट पक्षी कुरणावर झेपावताना आवाज करीत होते. कधी आवाज न करता गवताच्या शेंड्यावरून सुळकन् वर उडून जात होते. खुरट्या पिकाच्या लोंब्यामध्ये रेव्हन पक्षी मोठ्या डौलाने चालत होते; नाजूक हिरव्या पिकात त्यांचा कृष्णवर्ण आकर्षक दिसत होता. कधी पिकून पांढऱ्या होत असलेल्या रायच्या पिकात ते दिसेनासे होत; तर कधी त्यांच्या करड्या लाटांतून त्यांची डोकी तेवढीच वर दिसत. ते दृश्य पाहण्यात अर्कादीची समाधी लागली. त्या समाधीत त्याचे विचार मंद होत होत विरघळून गेले. त्याने कोट काढला व तो आपल्या पित्याकडे वळला. फुलून गेलेल्या त्याच्या चेहेऱ्यावर बालिश छटा दिसत होती. वडिलांना न राहावून त्यांनी त्याला पुन्हा एकदा आलिंगन दिले.

“काही फार दूर नाही आता,” निकालाय पित्रोविच् म्हणाले, “एव्हढी टेकडी पार केली की आपले घर दृष्टीपथात आलेच. अर्काशा, आपले झकास जमेल सर्वांचे! तुला कंटाळवाणे होणार नसेल तर शेतीवाडीत तू मला मदत कर. आपण एकमेकांच्या निकट आले पाहिजे व एकमेकाला पूर्णपणे समजून घेतले पाहिजे, नाही का ?”

अनुक्रमणिका

“अर्थात,” अर्कादी म्हणाला. “किती बहारदार दिवस आहे!”

“तुझ्या स्वागतासाठीच जणू वसंतऋतू पूर्ण बहरला आहे. पुश्किन म्हणतो ते बरोबर आहे……तुला एवगेनी अनिगिनमधील ओळी आठवतात का ?

‘उदासवाणे तुझे आगमन्,
वसंत फुलला, मधुरमीलन।
कोण……’

“अर्कादी,” आपल्या कोचातून बझारव् हाक मारत होता, “एक काडी पाठव; पाईप पेटवायला माझ्याजवळ काहीच नाही.”

निकालाय पित्रोविच् मधेच थांबले. अर्कादी त्यांचे बोलणे साश्चर्य पण सहानुभूतीने ऐकत होता. तातडीने त्याने आपल्या खिशातील चांदीची काडेपेटी काढली आणि प्योत्रबरोबर पाठवून दिली.

“तुला पाहिजे का एक सिगार?” बझारव् पुन्हा ओरडला.

“थॅन्क्स,” अर्कादी उत्तरला.

प्योत्र गाडीकडे परत आला. त्याने ती काडेपेटी व एक लठ्ठ, काळी सिगार त्याच्याकडे दिली. अर्कादीने ताबडतोब सिगार फुंकायला सुरवात केली. स्वस्त तंबाखूचा तीव्र व तिखट धूर दरवळू लागला. निकालाय पित्रोविच्नी धुम्रपान तरुणपणीच सोडले होते. आपल्या मुलाला वाईट वाट नये, आणि त्याच्या ध्यानीमनी येऊ नये अशा तऱ्हेने त्यांनी तोंड फिरविले.

पंधरा मिनिटांनी त्या दोन गाड्या एका नव्या, लाकूडकाम असलेल्या घराजवळ येऊन थांबल्या. घराला करडा रंग दिलेला होता, आणि वर तांबड्या रंगाचे लोखंडी छप्पर होते. हेच ते “मॅरिऑनो,” किंवा “न्यू विक्” शेतकरी. कुळांनी त्याचे “पॉव्हर्टी फार्म ” असे टोपण नाव ठेवले होते.

अनुक्रमणिका

४

ते सर्वजण घरी पोचले तेव्हा नोकरचाकरांचा घोळका काही त्यांना सामोरा आला नाही. एक बारा वर्षांची छोटी मुलगी मात्र सामोरी आली. तिच्या मागोमाग भुरकट रंगाचा गणवेश घातलेला प्योत्रसारखा दिसणारा एक तरुण मुलगा आला. त्याच्यावर सैनिकांच्या गणवेशावर असतात तसली बटने होती. पावेल पित्रोविच् किर्सानवचा तो नोकर. काही न बोलताच त्याने कोचाचे दार उघडले आणि कोचाच्या पडद्याची बटने सोडली. निकालाय पित्रोविच्, त्यांचा मुलगा आणि बझारव् एका अंधाऱ्या व प्रशस्त हॅालमधून दिवाणखान्यात आले. हॅालच्या दरवाज्यामागे एका तरूणीचा चेहेरा त्यांना पुसटसा दिसला. दिवाणखाना आधुनिक पद्धतीने सजविलेला होता.

“घरी तरी एकदा पोचलो बुवा!” निकालाय पित्रोविच् म्हणाले; त्यांनी टोपी काढली आणि केस मागे सारले. “हेही काही कमी नाही! आता आपल्याला भोजन व विश्रांती पाहिजे.”

“हो भोजन घ्यायला काहीच हरकत नाही,” बझारव् म्हणाला आणि एका कोचात बसून त्याने पाय लांब केले.

“अलबत्. भोजन ताबडतोब घेऊ,” निकालाय पित्रोविच् म्हणाले आणि अकारणच त्यांनी आपल्या पायाने जमिनीवर थाप मारली. “आणि हा प्रकोफिचही अगदी वेळेवर इकडे येतो आहे.”

साठीच्या वयाच्या एका शिडशिडीत अंगयष्टीच्या इसमाने प्रवेश केला. त्याचे केस पांढरे होते, तर चेहरा काळा होता. दालचिनी रंगाचा त्याचा ड्रेस-कोट होता आणि त्यावर पितळेची बटने होती. त्याने गळ्याभोवती एक गुलाबी रंगाचा रुमाल गुंडाळला होता. चेहेऱ्यावर बळेच हास्य आणत तो पुढे झाला; अर्कादीच्या हाताचे त्याने चुंबन घेतले आणि इतरांना दुरूनच अभिवादन करून दरवाजाजवळ मागे हात बांधून तो उभा राहिला.

“प्रकोफिच, हा पाहा तो आला आहे,” निकालाय पित्रोविच्नी सुरवात केली व ते पुढे म्हणाले, “तो आपल्याकडे पुन्हा येतो आहे. कसा काय वाटतो तो तुला आता?”

“जसा असायला हवा अगदी तसा,” म्हातारा किंचित हसून म्हणाला. पण तात्काळ त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. “भोजनाची तयारी ताबडतोब करायची का?” त्याने रुबाबात विचारले.

“होय......पण एव्गेनी वासिलिइच तुम्हाला तुमची खोली पहायची आहे का आधी.?”

“थँक्स्, पण त्याची काही जरुरी नाही. कृपा करून गाडीतील माझे सामान आणि हे ‘महावस्त्र’ ठेवायला कुणाला तरी सांगा”, आपला लोकरीचा वरकोट काढून तो म्हणाला.

“अलबत. प्रकोफिच त्यांचा कोट तेव्हढा घे.” (प्रकोफिच क्षणभर बुचकळ्यात पडला; पण नंतर बझारव्चे ‘महावस्त्र’ डोक्यावर धरून, तो आवाज न करता मागे वळला.)

अनुक्रमणिका

“आणि अर्कादी, तुला जायचे आहे का खोलीकडे मिनिटभर?”

“होय. मला वॉश घ्यायचा आहे,” म्हणून अर्कादी आता दरवाजाकडे वळणार, इतक्यात एका मध्यम उंचीच्या गृहस्थांनी दिवाणखान्यात प्रवेश केला. ते पावेल पित्रोविच् किर्‌सानव् होते. त्यांनी काळा, इंग्लिश पद्धतीचा सूट परिधान केला होता; आखूड, रूढ पद्धतीचा टाय लावला होता; आणि मेंढ्याच्या चामडीची पादत्राणे घातली होती. त्यांचे वय पंचेचाळीस असावे. आखूड कापलेले त्यांचे पांढरे केस काळ्या झिलईने चमकत होते; घासून उजाळा दिलेल्या नव्या चांदीसारखे. त्यांचा चेहरा पीतवर्णी, रेखीव व सुरकत्याविरहित होता. प्रमाणबद्ध आणि रेखीव. लहान आणि नाजूक छिन्नीने कोरल्यासारखा. असाधारण सौंदर्याच्या खुणा त्यांच्याचेहऱ्यावर दिसत होत्या. विशेषतः त्यांचे डोळे काळेशार, स्वच्छ आशि बदामी आकाराचे होते. अर्कादीच्या काकांच्या व्यक्तिमत्वात खानदानी डौल आणि यौवनाची कांती अजूनही प्रत्ययास येत होती. ऐन विशीच्या अस्तकालानंतर सहसा न आढळणारी अशी झुंझार महत्त्वाकांक्षी आणि स्वप्नदर्शी वृत्ती अजूनही त्यांच्यात जोपासलेली आढळत होती.

पावेल पित्रोविच्‌नी आपला नखरेबाज हात पाटलोणीच्या खिशातून बाहेर काढला आणि आपल्या पुतण्याच्या हातात दिला. लांब, निमूळती तांबूस नखे असलेला तो हात शुभ्र अशा शर्टच्या कफमुळे अधिकच आकर्षक दिसत होता. त्या कफला एक लंबगोलाकार, चमकदार असे बटन होते. प्रथमतः युरोपीयन पद्धतीने त्यांनी त्याच्याशी हस्तांदोलन केले आणि नंतर रशियन पद्धतीने त्याचे तीन वेळा चुंबन घेतले; म्हणजे काय—की, त्यांच्या सुगंधित मिशांनीच त्याच्या गालाचे चुंबन घेतले; आणि ते म्हणाले, “सुस्वागतम्.”

निकालाय पित्रोविच्‌नी मग त्यांची बझारव्‌शी ओळख करून दिली. पावेल पित्रोविच्‌नी आपला लवचिक बांधा किंचित झुकविला आणि स्मित केले. पण त्यांनी आपला हात पुढे केला नाही; इतकेच नव्हे तर त्यांनी तो परत खिशात घातला. “म्हटले येतोस की नाही आज,” त्यांनी आपल्या नादमय आवाजात बोलायला सुरवात केली. बोलताना त्यांनी प्रेमाने खांदे उडविले; आणि त्यांचे पांढरेशुभ्र दात मोत्यासारखे चमकले. “रस्त्यात काही झाले तर नाही?”

“काही नाही” अर्कादी उत्तरला. “आम्हीच रमतगमत आलो. पण आता पोटात कोल्हेकुई सुरू झाली आहे. प्रकोफिच्, डॅड, आटपा; मी एव्हढ्यात परत येतो.”

“थांब, मीही येतो तुझ्याबरोबर.” बझारव्‌ने कोचातून ताडकन उडी मारली. आणि ते दोघे तरुण बाहेर पडले.

“तो दुसरा कोण?” पावेल पित्रोविच्‌नी विचारले.

“अर्कादीचा मित्र; आणि त्याच्या म्हणण्याप्रमाणे एक अती हुशार माणूस.”

“आपल्या इथे तो राहणार आहे?”

“होय.”

अनुक्रमणिका

"तो गधडा प्राणी?"

"होय ना!"

पावेल पित्रोविच्नी आपल्या बोटांच्या टोकांनी टेबलावर ताल धरत फ्रेंचमध्ये म्हटले. "अर्कादी आपल्या मुग्धअवस्थेतून बाहेर पडला असावा." पुढे ते म्हणाले, "तो परत आला याचा मला आनंद आहे."

भोजनाच्या वेळी कुणीच फारसे बोलले नाही. बझारव् तर मुळीच बोलत नव्हता; मात्र तो भरपूर खात होता. निकालाय पित्रोविच्नी आपल्या शेतकरी पेशातील अनुभव विदीत केले. सरकारी धोरण, समित्या, शिष्टमंडळे, यंत्रांचा उपयोग इत्यांदीविषयी ते बोलत होते. पावेल पित्रोविच् भोजनगृहात शतपावली करीत होते. (संध्याकाळचे जेवन ते कधीच घेत नसत.) मधून मधून ते तांबड्या मद्याचे घुटके घेत होते; आणि फारतर "वा! असे का!" असा एखादा आश्चर्योद्‌गार काढीत होते. अर्कादीने पिट्स्बर्गच्या काही घडामोडी सांगितल्या. पण वातावरण अवघडल्यासारखे झाले होते याची जाणीव त्याला झाली होती. पौगंडावस्थेतून तारुण्यात पदार्पण केलेल्या, पण तरीही आपल्या घरी परतल्यावर मुलाप्रमाणेच वागविल्या जाणाऱ्या तरुणाला ही कुचंबणा नेहमीच जाणवते. बोलताना अकारणच तो लांबलचक वाक्ये वापरत होता; "डॅडी" हे संबोधन वापरायचे त्याने टाळले; आणि "फादर" हे संबोधन तो तोंडातल्या तोंडात पुटपुटला. थोड्या फाजील बेपर्वाईनेच त्याने प्याल्यात मद्य ओतले आणि ते पिऊन टाकले. प्रकोफिच् त्याच्याकडे एकाग्रचित्त पाहात होता आणि आपलेच ओठ चावत होता. भोजनानंतर ते सर्व तडक आपापल्या खोलीत गेले.

"तुझे काका म्हणजे एक वल्लीच आहेत." आपला ड्रेसिंग गाऊन चढवून बिछान्याजवळ बसत, पाईपचे झुरके घेत बझारव् अर्कादीला म्हणाला, "खेड्यात राहूनसुद्धा त्यांची ऐट पाहा ना! उदाहरणार्थ, त्यांची नखे: त्यांची नखे म्हणजे प्रदर्शनातच ठेवायला पाहिजेत!"

"तुला ठाऊक नाही म्हणून", अर्कादी उत्तरला. "तरुणपणी त्यांनी खूप गाजविले आहे. तुला सांगेन एखादे दिवशी त्यांची गोष्ट . दिसायला ते देखणे होते आणि बायका त्यांच्यावर फिदा असत."

"असे का! वाटलेच मला! तरीच ते भूतकालाची स्मृती म्हणून अशी नखे ठेवतात. इथे अर्थात त्यांच्यावर फिदा व्हायला कुणीच नाही. त्यांच्या कडक कॅालर्सकडे मी सारखा पाहात होतो. अगदी संगमरवरासारखे पांढरे कॅालर्स. दाढी तर त्यांनी हनुवटी गुळगुळीत होईपर्यंत घोटून केली होती. आता सांग, अर्कादी निकालाइच्, हे सगळं हास्यास्पद नाही का ?"

"कदाचित. पण खरेच सांगतो, काका म्हणजे एक उमदे व्यक्तिमत्व आहे."

"आहे खरा पुराणपुरुष! ......पण तुझे वडील मात्र थोर माणूस. आता काव्यवाचनात ते आपला वेळ दवडतात आणि शेतकीचे त्यांना ज्ञान नाही, हे खरे. पण माणूस मोठा दिलदार."

"माझे वडील सहस्रातले एक आहेत."

अनुक्रमणिका

“ते किती बुजरे आणि घाबरट आहेत......हे तुझ्या लक्षात आले का?”

अर्कादीने आपली मान हलविली; जणू आपण बुजरे व घाबरट नसल्याचे त्याला दर्शवावयाचे होते.

“ह्या जीर्ण आणि ध्येयवेड्या माणसांचे मला आश्चर्य वाटते. त्यांच्या नससंस्थेवर इतका ताण पडतो की, त्याचा शेवट कपाळमोक्षच—आणि मग मनाचा समतोल राहात नाही! पण गुडनाईट. माझ्या खोलीत एक वॉश-स्टँड आहे; पण दरवाजा मात्र घट्ट बसत नाही. इंग्लिश वॉश-स्टँड म्हणजे प्रगतीचे प्रतीक आहे. त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे.”

बझारव् गेल्यानंतर अर्कादीचे अंतःकरण सुखद भावनेने भरून गेले. आपल्या मालकीच्या घरात, परिचित बिछान्यात, प्रेमळ हातांनी विणलेल्या पांघरूणात......कदाचित ते प्रेमळ, कष्टाळू, मृदू हात त्याच्या दाईचे असतील......निद्रावश होणे किती सुखावह होते! अर्कादीला एगरोव्नाची, त्याच्या दाईची, आठवण झाली. स्वर्गात तिला सदगती लाभो असे त्याने मनोमन चिंतिले. स्वतःसाठी मात्र त्याने प्रार्थना केली नाही.

अर्कादी आणि बझारव्, दोघेही निद्राधीन झाले; पण घरातील इतर मंडळी बराच वेळ जागीच होती. मुलाच्या आगमनाने निकालाय पित्रोविच्चे मन गलबलून गेले होते. पलंगावर ते पसरले; पण त्यांनी मेणबत्त्या विझविल्या नाहीत. मानेखाली हात ठेवून ते पडून राहिले आणि त्यांचे मन स्वप्नविलासात गुंगून गेले. त्यांचे बंधू आपल्या अभ्यासिकेत एका रुंद आरामखुर्चीत शेकोटीजवळ मध्यरात्र उलटून गेली तरी बराच वेळ बसून होते. शेकोटीत कोळसे मंदपणे धुगधुगत होते. पावेल पित्रोविच्नी कपडे बदलले नव्हते; पण मेंढीच्या चामडीच्या पादत्राणाऐवजी, आता चिनी पद्धतीचे स्लिपर्स त्यांनी पायात घातले होते. हातात ‘गॅलिग्नॅनी’चा ताजा अंक होता; पण ते वाचत नव्हते. त्यांची नजर आगटीवर खिळलेली होती. तिथे एक निळसर ज्योत लुकलुकली, पण तात्काळ नष्ट झाली; आणि पुन्हा एकदा उफाळली......त्यांच्या डोक्यात कुठले विचार घोळत होते हे एक परमेश्वरच जाणे. पण केवळ भूतकाळातच त्यांचे मन रेंगाळत नसावे; त्यांच्या चेहेऱ्यावरचा भाव एकाग्रचित्त पण तुसडा होता. फक्त भूतकाळातल्या आठवणीतच ज्याचे मन रमले आहे, त्या व्यक्तीच्या चेहेऱ्यावर असा भाव दिसत नाही. घराच्या मागच्या बाजूस एका लहान खोलीत एक तरुण स्त्री एका मोठ्या पेटीवर बसली होती. तिने निळे ड्रेसिंग जॅकेट घातले होते आणि एक शुभ्र रूमाल तिच्या काळ्याभोर केसावर रूळत होता. तीच फिनिचका. अर्धवट झोपेत, अर्धवट ऐकण्याच्या मिषाने, ती बाजूला असलेल्या उघड्या दरवाज्यातून दिसणाऱ्या पाळण्याकडे मधून मधून पाहात होती. आणि गाढ निद्रासुख अनुभवीत असलेल्या मुलाचे नियमित श्वसन ऐकू येत होते.

अनुक्रमणिका

५

दुसऱ्या दिवशी सकाळी बझारव् सर्वांआधी उठला आणि घराबाहेर पडला. सभोवार नजर टाकून तो स्वतःशीच म्हणाला, “खरे म्हणजे गर्वाने छाती फुगून जावी असे या जागेत काहीच नाही.” निकालाय पित्रोविच्नी आपल्या कुळात सर्व जमिनीचे विभाजन केले होते. त्यामुळे त्यांना आपली देशमुखवाडी एका चार एकर सपाट व नापिक भागावर वसवावी लागली होती. निवासस्थान, कचेऱ्या, शेतकी कामासाठी लागणाऱ्या छोट्या इमारती त्यांनी बांधल्या होत्या. एका बागेची आखणी केली होती. एक तळे आणि दोन विहीरी खोदल्या होत्या. पण झाडांची ती कोवळी रोपे अजून मूळ धरत नव्हती; तळ्यात पाणी असे नव्हतेच; आणि विहीरींतील पाण्याला मचूळ चव होती. लिल्याक् आणि आकाशियाचा एक लताकुंज मात्र जोमाने वाढला होता. कधीकधी निकालाय पित्रोविच्ची कुटुंबीय मंडळी तिथे चहा, भोजन घेत. काही मिनिटांतच बझारव्ने बागेतील सगळ्या वाटा पायाखाली घातल्या; गोठ्यात आणि पागेत डोकावून पाहिले. तिथल्या दोन कुळवाडी पोरांना त्याने बाहेर काढले आणि त्यांना घेऊन एक मैलावर असलेल्या एका लहान दलदलीच्या जागेत बेडकांच्या शोधासाठी तो गेला.

“तुम्हाला बेडकं कशासाठी पाहिजेत, साहेब?” त्यांपैकी एका पोराने त्याला विचारले.

“सांगतो चल,” बझारव् उत्तरला. आपल्यापेक्षा खालच्या वर्गांतील लोकांत विश्वास निर्माण करण्याची विलक्षण हातोटी बझारव्कडे होती. पण त्यांच्यावर वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न त्याने केला नाही. तो त्यांच्याबरोबर औपचारिकपणे वागे. “पहिल्यांदा मी बेडकाचे विच्छेदन करीन; म्हणजे त्यांच्या अंतर्गत क्रिया अभ्यासता येतील. बेडकात आणि आपणांत बरेच साम्य आहे; फक्त आपण पायावर चालतो, एव्हढाच काय तो फरक. त्यामुळे त्यांच्या शारीरिक क्रियांचे ज्ञान झाले की, मग आपल्या शारीरिक क्रियांबद्दलचेही ज्ञान होईल.”

“आणि मग त्याचा काय उपयोग?”

“समज तू आजारी पडलास आणि मला तुला बरे करायचे असेल, तर मग त्यात काही चूक राहाणार नाही.”

“म्हणजे तुम्ही डॉक्टर आहात काय?”

“होय.”

“वास्का, हे साहेब काय म्हणतात ऐकलस का? म्हणे बेडूक आणि आपण सारखेच आहोत—गंमतच आहे!”

“बेडकाची मला भीती वाटते,” सात वर्षांचा वास्का म्हणाला. त्याचे डोके अंबाडीसारखे पांढरे होते आणि पाय अनवाणी. अंगात करड्या रंगाचे, ताठ कॉलरचे खमीस होते.

“त्यांना काय भ्यायचं रे? ते काय चावतात?”

अनुक्रमणिका

“अरे, तत्त्वज्ञान्यांनो, मारा उड्या त्या पाण्यात,” बझारव् ओरडला.

ह्या वेळेपर्यंत निकालाय पित्रोविच्‌ही उठले होते. ते अर्कादीकडे गेले; त्यावेळी अर्कादी कपडे चढवून तयार होता. पितापुत्र सज्जात गेले आणि छताच्या आश्रयाला उभे राहिले. कठड्याजवळच्या टेबलावर लिल्याकचा एक मोठा गुच्छ ठेवला होता. आणि सॅमोव्हरमध्ये चहाचे आधण उकळत होते एका लहान मुलीने प्रवेश केला. हीच मुलगी आधल्या दिवशी सायंकाळी त्यांच्या स्वागतासाठी प्रथम बाहेर आली होती. कर्कश आवाजात ती म्हणाली—

“फिदोस्या निकलाएव्‌ना थोड्या आजारी आहेत. त्या येऊ शकणार नाहीत. त्यांनी विचारले आहे की, तुम्हीच चहा ओतून घेता की, दुन्याशाला पाठवून देऊ? ”

“मी......मीच ओतून घेईन,” निकालाय पित्रोविच् तत्परतेने म्हणाले. “अर्कादी, तू चहा कसा घेणार—साईबरोबर का लिंबू रसात?”

“साय घालून,” अर्कादी उत्तरला. थोड्या स्तब्धतेनंतर त्याने प्रश्नार्थक हाक मारली. “डॅडी?”

निकालाय पित्रोविच्‌नी गोंधळून त्याच्याकडे पाहिले आणि विचारले, “काय?”

अर्कादीने मान खाली वळविली आणि तो म्हणाला, “माझा प्रश्न अप्रस्तुत वाटत असेल तर क्षमा करा, डॅड......पण तुम्हीच कालच्या तुमच्या प्रांजळ वागणुकीने मला मनमोकळेपणाने बोलायला उत्तेजन दिले आहे......तुम्हाला राग तर येणार नाही ना?”

पि. २

“बोल ना, काय बोलायचे ते.”

“तुम्हाला प्रश्न विचारायला आता मला धीर आला......चहा ओतून द्यायला फिन् ......ती इथे येत नाही याचे कारण मी इथे आहे हेच नाही का?”

निकालाय पित्रोविच्‌नी मान किंचित बाजूला वळविली.

“कदाचित,” ते अखेर म्हणाले. “तिला वाटते......तिला लाज वाटत असेल.”

अर्कादीने आपल्या पित्यांकडे चमकून पाहिले.

“तिला लाज वाटण्याचे काहीच कारण नाही. माझी मते तुम्ही जाणताच.” (हे शब्द उच्चारणे किती सुखद होते!) “आणि दुसरे असे की, तुमचे जीवन, तुमच्या सवयी यांत कुठल्याही प्रकारे मी अडथळा निर्माण करीन काय? शिवाय, तुमची निवड चुकणार नाही याबद्दल मला खात्री आहे. ज्याअर्थी ती या घरात तुमची सहचारिणी म्हणून राहाते, त्याअर्थी ती तुम्हाला सुयोग्य असलीच पाहिजे. काही झाले तरी कुठलाही

अनुक्रमणिका

पुत्र आपल्या वडिलांच्या कृत्यांची चिकित्सा करूच शकत नाही; कुठल्याही बाबतीत माझे स्वातंत्र्य हिरावून न घेणारे तुमच्यासारखे वडील असताना माझ्या हातून तर हे कदापीही होणार नाही."

प्रथम अर्कादीच्या आवाजात कंप होता; आपण विशाल अंतःकरणाचे आहोत, तरीही आपल्या पित्याला आपण एक व्याख्यानच सुनावत आहोत याची त्याला जाणीव झाली. आपण मोठ्या आवाजात बोलले म्हणजे कोणत्याही व्यक्तीवर त्याचा प्रभाव पडतो. आणि अर्कादीने आपले शेवटचे शब्द अगदी ठामपणे व जोर देऊन उच्चारले होते.

"थॅन्क्यू, अर्काशा," निकालाय पित्रोविच् म्हणाले. त्यांचा आवाज जड झाला होता; त्यांची बोटे सहजगत्या कपाळावर व भुवयांवर फिरू लागली. "तुझ म्हणणे अगदी खरे आहे. अर्थातच ही मुलगी मला योग्य वाटली नसती तर......हा काही लहरी छचोरपणा नव्हे. या विषयावर तुझ्याशी चर्चा करणे सोपे नाही. पण तुझ्या उपस्थितीत तुझ्या आगमनाच्या पहिल्याच दिवशी तरी तिला संकोच वाटणे साहजिक आहे.

"तसे असेल तर मीच तिच्याकडे जाईन," पुन्हा एकदा अर्कादीला त्या विशाल भावनेचा उमाळा आला; आणि चटकन तो आपल्या जागेवरून उठला. "माझ्या समोर तिला शरमिंदे वाटायला नको. मी तिला समजावून सांगेन."

निकालाय पित्रोविच्ही उठले. "अर्कादी," ते कसेतरी बोलले, "तुझा चांगूलपणा......कसे......पण मी अजून तुला काही सांगितलेच नाही."

पण अर्कादीने काहीच ऐकले नाही; आणि सज्ञातून तो बाहेर पडला देखील. निकालाय पित्रोविच् त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात राहिले. भांबावल्यासारखे होऊन ते खुर्चीतच कोसळले. त्यांच्या हृदयाचे स्पंदन जोरात होत होते भविष्यकाळात आपण व आपला पुत्र यांमध्ये निर्माण होणारा दुरावा अटळ आहे, याची जाणीव तर त्यांना यावेळी झाली नसेल? आपण हा विषयच काढला नसता तर अर्कादीने आपल्याला अधिक आदर दाखविला असता, याची खंत तर त्यांना वाटली नसेल? आपल्या कमकुवतपणाबद्दल स्वतःचीच निर्भर्त्सना तर ते करीत नसतील?......यावेळी कुठला विचार त्यांच्या डोक्यात घोळत होता हे सांगणे कठीण आहे. या सर्व भावना त्यांच्या मनात होत्या; पण अस्पष्ट संवेदनस्वरूपात. त्यांचा चेहेरा आरक्त झाला होता आणि हृदय धडधडत होतेच.

लगबग चालण्याचा आवाज त्यांच्या कानी पडला आणि दुसऱ्याच क्षणी अर्कादी सज्ञात दाखल झाला. "डॅड, आम्ही एकमेकांचा परिचय करून घेतला" तो ओरडला. त्याच्या मुद्रेवर एक प्रकारचा वात्सल्यपूर्ण आणि सात्त्विक स्वरूपाचा विजयानंद ओसंडत होता. "फिदोस्या निकलाएव्नाची तब्येत खरेच बरी नाही आज, थोड्या वेळाने ती येईल. पण मला एक भाऊ असल्याचे तुम्ही मला का सांगितले नाही? काल रात्रीच मी त्याचा पापा घ्यायला हवा होता. तो आता घेतला म्हणा !"

निकालाय पित्रोविच्च्या तोंडून शब्द फुटेना. त्यांनी उठून, बाहू पसरण्याचा प्रयत्न केला आणि त्याच क्षणी अर्कादीने त्यांना दृढालिंगन दिले.

अनुक्रमणिका

“काय चालले आहे......पुनर्भेट काय?” पावेल पित्रोविच् मागेच उभे होते, ते म्हणाले.

त्यांच्या आगमनाने पितापुत्र दोघेही हर्षभरीत झाले. असे काही प्रसंग असतात की, त्यांचा परिणाम खोलवर उमटतो; पण त्यांपासून वेगाने दूर पलायन करण्याचा प्रयत्नही आपण करतो.

“त्याचे तुम्हाला आश्चर्य का वाटावे?” निकालाय पित्रोविच् मजेने म्हणाले. “अर्कांशाची मी किती प्रदीर्घकाल प्रतीक्षा करतो आहे! कालपासून त्याला निरखून पाहायलाही मला वेळ मिळाला नाही.”

“मला मुळीच आश्चर्य वाटत नाही,” पावेल पित्रोविच् म्हणाले. “मला सुद्धा त्याला आलिंगन द्यावेसे वाटत नाही, असे नाही.”

अर्कादी आपल्या काकांकडे वळला आणि पुन्हा एकदा त्यांच्या सुगंधित मिशांनी त्याच्या गालाला अलिंगन दिले. नंतर पावेल पित्रोविच् टेबलाशी बसले. झोकदार, इंग्लिश पद्धतीचा मॉर्निंग सूट त्यांनी पेहेरला होता. डोक्यावर डौलदार फेझ होती. ही फेझ टोपी आणि बेफिकिरीने बांधलेला टाय ग्रामीण जीवनातील स्वातंत्र्याचे द्योतक होते. त्यांच्या शर्टची कडक कॉलर मात्र, सफेत नसली तरी सकाळच्या त्या पेहेरावाला शोभेशी, रेघारेघांची नेहमीप्रमाणेच त्याच्या गुळगुळीत हनुवटीवर उभी होती.

“तुझा तो नवीन मित्र कुठे आहे?” त्यांनी अर्कादीला विचारले.

“तो घरात नाही; तो सकाळी लवकरच उठतो आणि जातो कुठेतरी. महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच्याकडे आपण पूर्ण दुर्लक्ष करू शकतो. औपचारिकपणा त्याला आवडत नाही.”

“ते दिसतेच आहे,” पावावर मुद्दाम हळुवार लोणी चोपडीत ते म्हणाले. “आपल्या इथे तो बरेच दिवस राहाणार आहे का?”

“कदाचित. वडिलांकडे जाता जाता तो इथे राहातो आहे.”

“त्याचे वडील कुठे राहातात?”

“याच भागात, इथून चौसष्ट मैल ते ठिकाण आहे. त्याच्या वडिलांचा जमीनजुमला आहे. सैन्यात ते डॉक्टर होते पूर्वी.”

“तरीच, तरीच! मी बराच वेळ विचार करतो आहे की, बझारव् हे नाव ऐकल्यासारखे वाटते! निकालाय, आपल्या पिताजींच्या डिव्हिजनमध्ये एक बझारव् नावाचा डॉक्टर होता, आठवते का?”

“होय, होता.....खरा.”

“माझी खात्रीच आहे! ते सर्जन म्हणजे याचे वडील तर! अं !” पावेल पित्रोविच्नी मिशावरून बोट फिरविले. “आणि हे मिस्टर बझारव् काय करतात?” त्यांनी मुद्दाम लांबट सुरात विचारले.

“बझारव् काय करतो?” अर्कादीने हसत विचारले, “तो कोण आहे हे खरेच सांगू, काका?”

“मोठे उपकार होतील माझ्यावर, बाळ.”

“तो शून्यवादी आहे.”

“काय?” निकालाय पित्रोविच्नी विचारले. पावेल पित्रोविच्च्या हातातील चाकू तसाच अंतराळी राहिला. त्याच्या टोकावरचे लोणी तसेच राहिले. आणि पावेल पित्रोविच् निश्चल बसले.

“तो शून्यवादी आहे,” अर्कादी पुन्हा एकदा म्हणाला.

“निहिलिस्ट—शून्यवादी,” निकालाय पित्रोविच्नी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. “माझ्या समजुतीप्रमाणे लॅटीन-नथिंग पासून हा शब्द आला आहे. त्याचा अर्थ असा होईल की, ज्याला काहीच श्रद्धा नाही तो!”

“किंवा ‘ज्याला कुठल्याच मूल्यांविषयी आदर नाही तो’ असे म्हणा,” पावेल पित्रोविच् म्हणाले. आणि त्यांनी पावावर लोणी चोपडण्याचे काम चालू ठेवले.

“जो प्रत्येक गोष्ट चिकित्सक दृष्टिकोनातून पाहातो तो’” अर्कादीने खुलासा केला.

“त्याचा अर्थ तोच, नाही का?” पावेल पित्रोविच्नी विचारले.

“नाही. तुम्ही म्हणता तसा त्याचा अर्थ नाही. जो शून्यवादी आहे, तो कुठल्याही अधिकाऱ्यापुढे मान झुकवीत नाही. कुठलेही तत्त्व तो श्रद्धा म्हणून स्वीकारत नाही; मग ते तत्त्वज्ञान कितीही आदरणीय असो.”

“ठीक. पण असे करणे योग्य ठरेल काय?” पावेल पित्रोविच्नी मध्येच विचारले.

“ते सापेक्ष आहे, काका. काहींना त्यापासून फायदा होईल, तर काहींना त्यासाठी दुःख भोगावे लागेल.”

“खरेच. हे आमच्या विचार पद्धतीत बसत नाही तर! आम्ही काय जुन्या पद्धतीची माणसं! आमची अशी कल्पना की तात्त्विक आधाराशिवाय—मग तू म्हणतोस त्याप्रमाणे ती तत्त्वे श्रद्धा म्हणून स्वीकारलेली असोत—काहीही करता यायचं नाही; श्वासोच्छवास देखील करता येणे अशक्य. तुम्हाला हे सर्व बदललेले पाहायचे आहे. परमेश्वर तुम्हाला आयुरायोग्य देवो आणि जनरलचा हुद्दा तुम्हाला मिळो; तेच पाहाण्यात आणि तुमचा गौरव करण्यात आम्हाला आनंद आहे......बरं, कुठला शब्द म्हणालास तो?”

“शून्यवादी,” अर्कादीने तो शब्द अगदी स्पष्टपणे उच्चारला.

अनुक्रमणिका

“बरोबर. पूर्वी हेगेलचे चेले होते; आणि आता हे शून्यवादी. तत्त्वहीन पोकळीतं तुम्ही कसे जगणार, ते पाहायचेच आहे आम्हाला......आणि आता भाईसाहेब निकालाय पित्रोविच्, घंटा वाजवा; मला अजून कोको मिळाला नाही.”

निकालाय पित्रोविच्नी घंटा वाजविली; आणि दुन्याशाला हाक मारली. पण दुन्याशाऐवजी स्वतः फिनिच्काच सज्ञात आली. बावीस-तेवीस वयाची ती तरुण स्त्री होती. मृदू गौरकाय. काळेभोर केस आणि काळेशार डोळे. बालकासारखे पुढे. . . .. . आलेले लाललाल ओठ आणि लहान नाजूक हात. तिचा चिटाचिटाचा पेहेराव व्यवस्थित होता. नवा कोरा आभाळी रंगाचा रूमाल तिच्या गुबगुबीत स्कंधावर रूळत होता. हातातला कोकोचा मोठा कप पावेल पित्रोविच् पुढे ठेवताना मात्र तिचा पुरा गोंधळ उडाला. तिच्या सुंदर मुखकमलावर लज्जेने रक्तिमा चढला. अधोमुख अशी ती जणू केवळ बोटांच्या आधारावरच टेबलाला रेलून उभी होती. तिथे येण्यात आपली चूक झाली या विचाराने ती शरमली; पण आपल्याला तिथे यायचा अधिकार आहे असेही तिला वाटले.

पावेल पित्रोविच्च्या कपाळावर तीव्र आठ्या पडल्या, तर निकालाय पित्रोविच् सर्दच झाले.

“गुड मॉर्निंग, फिनिच्का,” ते अस्फुट म्हणाले.

“गुड मॉर्निंग,” मंद पण नादमय आवाजात तिने प्रत्युत्तर दिले. अर्कादीकडे एकवार तिने तिरक्या नजरेने पाहिले; त्यानेही स्नेहाळ स्मित केले; आणि संथपणे ती बाहेर गेली. तिची चाल किंचित डौलदार होती; पण तिला ती शोभून दिसत होती

काही काळ सज्ञात शांतता पसरली. पावेल पित्रोविच् कोकोचे घोट घेत होते. एकदम मान वर करून ते खालच्या आवाजात म्हणाले, “हे पाहा, ते शून्यवादी महाशय आपल्याकडेच येत आहेत.”

बझारव् खरेच बागेतून फुलांच्या वाफ्यांवरून उड्या मारीत येत होता. त्याचे सुती कोट—पाटलोण चिखलाने माखले होते. त्याच्या जीर्ण हॅटभोवती दलदलीच्या जागेतील तण वेटाळले होते. त्याच्या उजव्या हातात एक पिशवी होती. पिशवीत काहीतरी वळवळत होते. सज्ञाजवळ येऊन तो उभा राहिला आणि सर्वांना उद्देशून तो म्हणाला, “गुड मॉर्निंग, जंटलमेन; चहाला उशीर झाल्याबद्दल मी दिलगीर आहे. ह्या कैद्यांना ठेऊन आलोच मी लगेच.”

“कुठले प्राणी आहेत ते, लीचेस्?” पावेल पित्रोविच्नी विचारले.

“नाही, बेडूक आहेत.”

“तुम्ही बेडकं खाता की, पाळता?”

“प्रयोगासाठी आहेत ती,” बझारव् निर्विकारपणे म्हणाला आणि घरात सटकला.

“हे बेडूक तो कापणार आहे म्हणायचे,” पावेल पित्रोविच् म्हणाले, “तत्वांवर त्याचा विश्वास नाही, पण बेडकांवर आहे असे दिसते.”

अर्कादीने आपल्या चुलत्याकडे दयाळू नजरेने पाहिले. निकालाय पित्रोविच्नी कुणाला न कळत आपले खांदे उडविले. पावेल पित्रोविच्ना आपली कोटी फुकट गेल्याचे जाणवले. आणि पशुसंगोपन व नवा बेलीफ यांविषयी ते बोलू लागले. त्या बेलिफाने आधल्या दिवशीच फोमा नांवाच्या कामकऱ्यासंबंधी तक्रार आणली होती. तो म्हणे बाहेरख्याली होता आणि कुणाचे काही ऐकत नव्हता. ते सांगत होते, “तो कामगार म्हणजे एक इसाप आहे. कुचकामी म्हणून इतरत्र त्याची ख्याती आहे. तो कुठेही टिकायचा नाही. मुर्खासारखा आपल्याच गुर्मीत राहून आपले नुकसान मात्र करून घेईल.”

अनुक्रमणिका

६

बझारव् परत आला आणि टेबलाजवळ येऊन त्याने धांदलीने चहा प्यायला सुरवात केली. ते दोघे भाऊ त्याच्याकडे गप्प राहून पाहात होते; आणि अर्कादी प्रथम आपल्या पित्याकडे व नंतर काकांकडे चोरून पाहात बसला.

"फार दूर फिरायला गेला होता काय इथून?" निकालाय् पित्रोविच्नी शेवटी विचारले.

"ॲस्पन झाडीजवळ ते एक दलदलीचे तळे आहे ना, तिथपर्यंत गेलो होतो. पाचसहा स्नाइप्सना मी हुसकून बाहेर काढले आहे; अर्कादी, त्यांना मारता आले तर पाहा."

"म्हणजे तुम्ही शिकारी नाही तर?"

"नाही."

"तुमचा मुख्य विषय पदार्थ—विज्ञान आहे का?" पावेल पित्रोविच्नी मग विचारले.

"होय, पदार्थ —विज्ञान; पण सर्वसाधारणपणे प्राकृतिक शास्त्रे."

"ट्यूटॉनिक लोकांनी अलिकडे त्या प्रांतांत बरेच यश मिळविले आहे असे म्हणतात."

"होय, त्याबाबतीत जर्मन लोक आपले गुरू." बझारव्ने बेफिकीरपणे उत्तर दिले.

पावेल पित्रोविच्नी 'जर्मन' या शब्दाऐवजी 'ट्यूटॉन' हा शब्द मुद्दाम, उपरोधिक अर्थाने वापरला होता; पण बहुधा कुणाच्याही लक्षात ते आले नसावे.

"जर्मनांच्याविषयी तुम्हाला इतका आदर वाटतो?" पावेल पित्रोविच्नी विचारले. त्यांच्या स्वरात जरा जादा आदब होता. पण त्यांच्या मनात मात्र चिडचिडण्याची भावना होती. बझारव्च्या बिनदिक्कत निर्विकारपणामुळे त्यांच्या खानदानी स्वभावाला धक्का बसला होता. या सर्जनच्या पोराला दरारा तर कशाचाच वाटत नव्हता; इतकेच नव्हे तर, तो प्रश्नांची उत्तरे तात्काळ आणि निर्विकारपणे देत होता. त्याच्या आवाजात एक प्रकारचा तुसडेपणा, अगदी उद्धटपणा जाणवत होता.

"तिथले शास्त्रज्ञ मोठे हुशार लोक आहेत."

"हो तर. रशियन शास्त्रज्ञांविषयी तुमचे इतके उदार मत खात्रीने नसेल, होय ना?"

"ते शक्य आहे."

अनुक्रमणिका

"ही आत्मनिर्भर्त्सना कौतुकास्पदच आहे," पावेल पित्रोविच् म्हणाले. बोलताना थोडे ताठ बसत आणि मान मागे झुकवून पावेल पित्रोविच् बोलले, "पण असे कसे बुवा? अर्कादी तर आम्हाला थोड्या वेळापूर्वीच सांगत होता की, तुम्ही कुणाचाच अधिकार मानत नाही? जर्मनांच्यावर तुमची श्रद्धा नाही काय?"

"पण मी कुणाला मानण्याचा किंवा कुणावर माझी श्रद्धा असण्याचा प्रश्नच कुठे उपस्थित होतो? ते सत्य प्रतिपादन करतात; मला ते पटते, इतकेच."

"सगळे जर्मन लोक सत्य सांगतात?" पावेल पित्रोविच्नी विचारले आणि आता मात्र त्यांच्या चेहेऱ्यावर रागाची छटा दिसत होती. जणू पृथ्वीपासून दूर अंतराळातील कुठल्या तरी उच्च स्थानावरून ते बोलत होते.

"सगळे नव्हे," असे म्हणून बझारव्ने अंमळ जांभई दिली. ही चर्चा चालू ठेवण्यात त्याला रस नव्हता, हे स्पष्ट होते.

पावेल पित्रोविच्नी एकदा अर्कादीकडे पाहिले; त्यांना जणू म्हणायचे होते, "तुझा मित्र नम्र दिसतो खरा." "माझ्यापुरते म्हणाल तर," त्यांनी प्रयत्नपूर्वकच बोलायला सुरवात केली, "जर्मन न आवडण्याइतका मी मागासलो आहे, असे म्हणायला हरकत नाही. रशियातल्या जर्मनाविषयी नाही मी बोलत; आपण सर्वजण जाणतो कुठल्या प्रकारची माणसं आहेत ती. पण जर्मनीतले जर्मनसुद्धा मला आवडत नाहीत. पूर्वी इकडे तिकडे त्यांच्यात काहीजण होते—शिलर म्हणा, गटे, वगैरे...... आमच्या भाईसाहेबांचे त्यांच्याविषयी फारच अनुकूल मत आहे......पण आता हे जर्मन लोक केमिस्टस आणि भौतिकवादी झाले आहेत."

"एक चांगला केमिस्ट हा कुठल्याही कवीपेक्षा वीसपटींनी उपयोगी असतो," बझारव् मध्येच म्हणाला.

"खरेच का!" पावेल पित्रोविच् म्हणाले. त्यांनी आपल्या भुवया सूक्ष्मपणे उंचावल्या, जणू ते निद्राधीन होत होते. "मला वाटतं मग कलेला तुम्ही काहीच किंमत देत नाही?"

"कसली कला—पैसे कमावण्याची की औषधी गोळ्यांची जाहिरात करण्याची!" कुचेष्टेने हसत बझारव् उद्‌गारला.

"अरे वा! तुम्हाला तर गंमत वाटते, असे दिसते. तुम्ही ते सर्व झिडकारता, शंकाच नको? हरकत नाही. म्हणजे विज्ञानावरच फक्त तुमची श्रद्धा आहे ?"

"मी आधीच स्पष्ट केले आहे की, माझी कशावरच श्रद्धा नाही. विज्ञान म्हणजे तरी काय—अमूर्त स्वरूपातील विज्ञान म्हणजे तरी काय? ज्याप्रमाणे हस्तव्यवसाय व व्यापार अनेक प्रकारचे आहेत तद्वतच अनेक प्रकारची शास्त्रे आहेत. पण अमूर्त विज्ञान असूच शकत नाही. "

अनुक्रमणिका

“छान, छान. मानवी व्यवहारातील इतर रूढी वगैरे बाबतीतही तुमचा हाच नकारात्मक दृष्टिकोन आहे का?”

“हे काय मांडलय......माझी परीक्षा?” बझारव्ने विचारले.

पावेल पित्रोविच्चा चेहेरा किंचित पडला. निकालाय पित्रोविच्ना वाटले की, आपण या संवादात हस्तक्षेप केलाच पाहिजे.

“एव्गेनी वासिलिइच, या विषयावर तपशिलवार चर्चा आपण आणखी कधीतरी करू. आम्ही तुमचे विचार ऐकून घेऊ व आमचे विचार व्यक्त करू. व्यक्तिशः मला तुम्ही प्राकृतिक शास्त्रे अभ्यासता याचा मनापासून आनंद वाटतो. जमिनीची मशागत करण्याच्या बाबतीत लायबिगने बरेच क्रांतिकारी शोध लावले आहेत असे ऐकतो. शेतीविषयक कामांच्या बाबतीत तुमची मला बरीच मदत होईल; तुमचा सल्ला उपयुक्त ठरेल.”

“निकालाय पित्रोविच्, मी तुम्हाला मदत करायला केव्हाही तयार आहे; पण लायबिग् आपल्या डोक्यावरून जातो बुवा! प्रथम एखाद्या विषयाचा श्रीगणेशा आपण शिकले पाहिजे, आणि मगच वाचायला सुरवात केली पाहिजे; अद्याप तर आपल्याला मुळाक्षरांची ओळख नाही.”

“तू शून्यवादी आहेस हेच खरे,” निकालाय पित्रोविच् मनात म्हणाले. प्रकटपणे मात्र ते म्हणाले, “तरीही तुमच्याकडे मी कधीमधी तुमचा सल्ला घेण्यासाठी येईन, त्याला तुमची हरकत नसावी......आणि आता भाईसाहेब, मला वाटतं बेलीफशी आपल्याला बोलायचं आहे. तिकडे जाण्याची वेळ झाली आहे.”

पावेल पित्रोविच् आपल्या आसनावरून उठले.

“होय,” कुणाकडेही न पाहता ते म्हणाले; “थोर बुद्धिवाद्यांपासून दूर अशा खेड्यात पाच वर्षे अशा तऱ्हेने काढली, हे आमचे दुर्भाग्यच! आपली मूर्खांत गणना झालीच म्हणून समजा. आपण जे शिकलो, ते न विसरण्याचा कितीही प्रयत्न करा—पण ते सारे कुचकामी आहे असे ते क्षणात सिद्ध करून दाखवतील. ते सांगतील की, असल्या मूर्खपणाशी शहाणी माणसं काहीसुद्धा संबंध ठेवणार नाहीत; इतकेच नव्हे तर तुम्ही एक जीर्ण पुराणमतवादी आहात हेही तुम्हाला ते पटवून देतील काय करावे? तरुणपिढी ही आमच्यापेक्षा अधिक हुशार आहे यात शंकाच नाही !”

पावेल पित्रोविच् शांतपणे आपल्या टाचेवर वळले आणि हळूहळू चालू लागले. निकालाय पित्रोविच् त्यांच्या मागून गेले.

“हे गृहस्थ नेहमी असेच असतात का?” ते दोघे बंधू दरवाजाआड झाल्याबरोबर बझारव्ने अर्कादीला अगदी थंडपणे विचारले.

“एव्गेनी, मला तुला सांगितलंच पाहिजे की तू काही त्यांच्याशी चांगला वागला नाहीस. त्यांच्या भावना तू दुखवल्या आहेस.” अर्कादी म्हणाला.

“म्हणजे, या गांवढळ सरंजामदारांना मी संभाळून घ्यावे काय! तो पोकळ दिमाख, त्या नटव्या सवयी……खुळेपणा आहे झालं सगळा. असाच त्यांच्या स्वभावाचा कल असेल तर त्यांनी आपली सारी कारकीर्द पिट्स्बर्गमध्येच घालवायला हवी होती. पण जाऊं द्या, त्यांचा विषय पुरे! वॅाटर-बीटल्सची एक वेगळीच जात मला सापडली आहे—डायस्टिकस मार्जिनेटस् तुला माहीत आहे का ती जात? थांब, मी दाखवतो तुला.”

“तुला त्यांची कहाणी सांगायचे मी कबूल केले होते,” अर्कादीने सुरवात केली.
“वॅाटर-बीटल्सची कहाणी?”

“एव्गेनी, पुरे, थट्टा पुरे. माझ्या काकांची कहाणी. तुला वाटते तशी ती व्यक्ती नाही, हे तुला पटेल. कुणालाही त्यांच्याविषयी करुणा वाटेल—उपहास नव्हे,—असेच ते आहेत.”

“मी ते नाकारत नाही; पण त्यांच्याबद्दल तू का एव्हढा फिकिरीत पडला आहेस?”

“कुणाला अन्याय होऊ नये, एव्गेनी.”

“असे कसे तू अनुमान करतोस?”

“थांब, ऐकच……”

असे म्हणून अर्कादीने आपल्या काकांची हकिकत त्याला ऐकविली. वाचकांना ती पुढील प्रकरणात मिळेल.

पावेल पित्रोविच् किरसानव् यांचे शिक्षण त्यांच्या धाकट्या भावाप्रमाणेच प्रथम घरी आणि नंतर कोअर्स ऑफ पेजिस् मध्ये झाले. बालपणापासून आपल्या विलक्षण देखणेपणाने ते उठून दिसत; त्यातच त्यांच्या स्वभावात आत्मविश्वास व काहीसा उपरोधिकपणाही होता; आणि त्यांचा विनोद बोचरा होता. ते सर्वांना आवडत. ऑफिसरचा हुद्दा मिळाल्याबरोबर ते सर्वत्र दिसू लागले. प्रतिष्ठित समाजात त्यांची वाहवा होऊ लागली. ते स्वतःचेच कौतुक करीत. लोकांची कुचेष्टा करण्यात त्यांना आनंद वाटे. त्यांच्या वागण्यात उसनी ऐट होती; पण तेही त्यांना शोभून दिसे. स्त्रिया त्यांच्यावर बेहोष असत. पुरुष त्यांना 'रंगीला' म्हणत; पण मनात मात्र त्यांना त्यांच्याविषयी असूया वाटे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे आपल्या भावाबरोबर ते एकाच घरात राहात. त्यांच्यात आणि त्यांच्या भावात अजिबात साम्य नव्हते; पण त्यांच्यावर ते मनःपूर्वक प्रेम करीत. निकालाय पित्रोविच् थोडे लंगडत; त्यांचा तोंडावळा नाजूक आणि आकर्षक होता; पण त्यात थोडी उदासीनतेची छटा होती. बारीक काळे डोळे आणि विरळ मऊ केस. त्यांचा स्वभाव थोडा आळशी होता; पण त्यांना वाचायला आवडायचे. समाजात वावरताना ते बिचकत. पावेल पित्रोविच् संध्याकाळी घरी कधीच नसत आपला ऐषआराम व बेदरकारपणा यांची ते थोरवी मिरवीत. (प्रतिष्ठित समाजातील तरुण मुलात सर्वांगसुंदर व्यायामाचे प्रकार लोकप्रिय करण्यास अलिकडेच त्यांनी सुरवात केली होती.) आणि एकंदर पाच-सहा फ्रेंच कादंबऱ्या त्यांनी वाचल्या होत्या. वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षीच त्यांना कॅप्टनचा हुद्दा मिळाला; भविष्यातील उज्ज्वल कारकीर्द तर पुढेच होती. आणि एकाएकी सर्वच बदलून गेले.

त्याच सुमारास पिट्स्बर्गच्या प्रतिष्ठित समाजात प्रिन्सेस आर्—नावाच्या स्त्रीचा बराचा गवगवा झाला होता. अद्यापही लोकांना तिचा विसर पडलेला नाही. तिचा नवरा सुशिक्षित आणि उच्च घराण्यातला होता; पण तो थोडा बावळट असावा. ती निपुत्रिक होती. अकस्मात ती परदेश प्रवासाला निघायची; आणि तितक्याच अकस्मातरीत्या रशियाला परतायची; एकंदरीत ती तऱ्हेवाईक जीवन जगत होती. छचोर, स्वच्छंदी म्हणून तिची ख्याती होती. कुठल्याही प्रकारचे सुख भोगण्यासाठी ती स्वतःला झोकून देई. विकलांग होईपर्यंत ती नाचे, हसे आणि तरुणांशी मनोविनोदन करी. दिवाणखान्यातल्या अंधुक प्रकाशात जेवणाआधी ती त्यांच्यात रमे; पण रात्री मात्र ती शोकाकुल होई; प्रार्थना करी; पण कशातच तिला शांतता लाभत नसे. आणि मग व्याकुळ होऊन हातावर हात चोळत सकाळपर्यंत ती खोलीभर फेऱ्या मारत राही; किंवा म्लान आणि विमनस्क अशा स्थितीत प्रार्थनेचे पुस्तक घेऊन बसे. दिवस उजाडला की, पुन्हा ऐटबाज पुरंध्रीत तिचे रूपांतर होई. पुन्हा ती बाहेर पडे, हसे, मोठ्याने बडबड करी; आणि ज्यायोगे अल्पसुद्धा चित्तविभ्रम होण्याची शक्यता असे, त्यासाठी ती जीवाचा आटापिटा करी. तिचा बांधा कमालीचा प्रमाणबद्ध होता. तिचा पीतवर्णी केशसंभार सुवर्णलडीप्रमाणे जडपणे गुडघ्यापर्यंत रुळे. पण ती सौंदर्यवती आहे असे कुणालाच वाटले नसते. तिच्या सबंध चेहेऱ्यात तिचे डोळेच काय ते बरे होते; पण तेही फार चांगले होते असे नाही. घाऱ्या रंगाचे, बारीक डोळे. पण त्यांचा कटाक्ष मात्र शीघ्र आणि खोल होता. त्या कटाक्षात उद्धटपणा वाटावा इतकी बेपर्वाई, आणि घोर निराशेचा प्रत्यय यावा इतकी चिंताव्यग्रता दिसे. तिचा कटाक्ष म्हणजे एक कोडेच होते. तिच्या डोळ्यात एक वेगळीच असामान्य चमक दिसे—अगदी जेव्हा तिची वाणी अक्कलशून्य बडबड करत असे तेव्हासुद्धा. आपला पोषाख ती अतिशय काळजीपूर्वक करी. पावेल पित्रोविच् आणि तिची एका बॉलप्रसंगी भेट झाली. तिच्याबरोबर 'माझुर्का' नावाच्या नृत्यप्रकारात ते सहभागी झाले; त्या प्रसंगी तिच्या बडबडण्यात एक सुद्धा शहाणपणाचा शब्द नव्हता. आणि ते उत्कटपणे तिच्या प्रेमात पडले. यशप्राप्तीची सवय असल्याने याही बाबतीत त्यांनी आपला हेतू लौकरच साध्य केला. पण इतक्या लीलया प्राप्त झालेल्या यशाने त्यांचा प्रेमवेग ओसरला, असे मात्र झाले नाही. उलट या स्त्रीच्या

यातनाकारक बंधनात ते अधिकच गुरफटत गेले. स्वतःचे सर्वस्व स्वाधीन करतेवेळी सुद्धा, या स्त्रीत जे कुणालाही गवसणार नाही असे काहीतरी गूढ, अप्राप्य आहे याची जाणीव त्यांना होई. त्या रहस्याचा भेद करणे कुणालाही शक्य नव्हते. त्या आत्म्यात कुठले रहस्य दडले होते......हे एक परमेश्वरच जाणे! जणू कुठल्या गूढ शक्ती तिच्यावर ताबा चालवीत होत्या; ते तिलाही अनाकलनीय होते. त्या शक्ती आपल्या मर्जीप्रमाणे जणू तिला खेळवीत होत्या; त्यांच्या लहरीवर मात करणे तिच्या कमकुवत मतीबाहेरचेच होते. तिची सबंध वागणूक म्हणजे विसंवादी गोष्टींची एक मालिकाच होती. ज्या प्रेमपत्रांमुळे तिच्या नवऱ्याने तिच्याविषयी संशय घेणे योग्य ठरले असते, अशी पत्रे तिने ज्या इसमाला लिहिली होती तो तिला जवळजवळ अनोळखी होता! त्याचबरोबर तिच्या प्रेमात एक प्रकारची उदासीनतेची छटा असे. प्रियकर म्हणून निवडलेल्या पुरुषाबरोबर तिचे हसणे, विनोद करणे बंद होई. एकाग्रचित्त होऊन ती त्याचे बोलणे ऐकत असे; आणि डोळे विस्फारून भ्रमिष्टासारखी ती त्याच्याकडे पाहात राही. केव्हा केव्हा एकाएकीच या भ्रमाचे रूपांतर गारठून टाकणाऱ्या भीतिग्रस्त अवस्थेत होई आणि मग तिच्या चेहेऱ्यावर भयाण मृत्यूची अवकळा येई. मग ती स्वतःला आपल्या शयनगृहात कोंडून घेई; आणि दाराशी कान लावून ऐकणाऱ्या नौकराणीला आपल्या मालकिणीचे दबलेले हुंदके ऐकू येत. अशा नाजूक भेटीनंतर घराकडे परतताना अनेक वेळा, एखाद्या संपूर्ण अपयशापोटी निर्माण होणाऱ्या तीव्र विषादासारख्या भावनेने किरसानव्हचे अंतःकरण विदीर्ण होई.

"मला आणखी हवे आहे तरी काय?" जड अंतःकरणाने ते स्वतःलाच विचारत. एकदा त्यांनी तिला खड्यावर स्फिंक्सचे चित्र कोरलेली आंगठी भेट दिली.

"कसले चित्र हे?" तिने विचारले; "स्फिंक्सचे?"

"होय," त्यांनी उत्तर दिले, "आणि ते स्फिंक्स म्हणजे तूच आहेस."

"मी?" आपला गूढ कटाक्ष त्यांच्यावर फेकीत तिने विचारले, "आपण माझी भलतीच स्तुती करीत आहा, असे नाही आपणाला वाटत?" अर्थविहीन हास्य करीत ती म्हणाली; तिच्या नजरेत ती विलक्षण चमक तशीच होती.

प्रिन्सेस् आर—प्रेम करीत होती, तरीही पावेल पित्रोविच् मानसिक क्लेश भोगत होते. पण तिच्या प्रेमाला ओहोटी लागायला फार कालावधी लागला नाही; आणि हे जेव्हा घडले, तेव्हा मात्र ते जवळजवळ वेडेपिसे झाले. त्यांना अपार यातना होत नि ते मत्सरग्रस्त बनत. त्यांनी तिला स्वस्थता लाभू दिली नाही; ती जाईल तिकडे तिचा पिच्छा पुरविला. त्यांच्या पाठलागणीचा तिला अगदी वीट आला; आणि मग तिने देशाटन केले. मित्रांची विनवणी आणि वरिष्ठांचा उपदेश झिडकारून त्यांनी आपल्या कमिशनचा राजीनामा दिला; आणि ते प्रिन्सेसच्या मागे गेले. चार वर्षे त्यांनी परदेशात काढली—कधी तिचा पिच्छा करीत, तर कधी जाणीवपूर्वक तिला दृष्टीआड करीत. त्यांना स्वतःचीच शरम वाटू लागली. स्वतःच्याच अवसानघातकीपणाचा त्यांना वैताग वाटे. पण कशाचाच काही उपयोग नव्हता. तिची ती अनाकलनीय, प्रायः निरर्थक पण वेड लावणारी मुद्रा त्यांच्या हृदयात खोलवर रूजली होती. बेडन या शहरी पुन्हा एकदा तिच्याशी दिलजमाई करण्यात ते यशस्वी झाले. असे वाटले की, तिने या वेळेपर्यंत इतक्या आवेगाने त्यांच्यावर प्रेमच केले नव्हते........पण एक महिन्याच्या आतच या सर्व प्रकरणाचा शेवट झाला; ती ज्योत शेवटचीच फडफडली आणि कायमचीच लुप्त झाली. विरह अटळ आहे हे पाहून तिच्याशी निदान मैत्री तरी

अनुक्रमणिका

राहावी अशी त्यांनी अपेक्षा केली; जणू अशा स्त्रीशी मैत्री शक्य होती! तिने गुप्तपणे बेडन सोडले आणि त्या वेळेपासून किरसान्वना हळूहळू टाळायला सुरवात केली. ते रशियाला परतले; आणि पुन्हा एकदा पूर्वीप्रमाणे जीवन जगण्याचा त्यांनी प्रयत्न केला; पण काही केल्या त्यांना त्यापूर्वीच्या चाकोरीत जीवन जगणे जमले नाही. झपाटलेल्या माणसाप्रमाणे ते या ठिकाणाहून त्या ठिकाणाकडे असे भटकत राहिले. प्रतिष्ठित समाजात ते अजूनही मिसळत. भोगवादी माणसाच्या सवयी त्यांनी अजूनही टिकविल्या होत्या. दोन तीन नव्या भानगडीत त्यांनी विजयसुद्धा मिळविला; पण यापुढे स्वतःकडून अगर दुसऱ्याकडून कसलीच अपेक्षा करण्याचे त्यांनी सोडून दिले; आणि कुठलाही उपक्रम हाती घेतला नाही. वय वाढू लागले आणि केस पांढरे होऊ लागले. कलुषित आणि त्रासलेल्या मनःस्थितीत ते संध्याकाळी क्लबातच बसत. अविवाहित लोकांच्या सहवासात थंडपणे चर्चा करीत बसणे ही गोष्ट आवश्यक होऊन बसली; हे लक्षण काही ठीक नसते याची सर्वांना जाणीव आहेच. विवाहाचा ते अर्थातच विचारही करू शकत नव्हते. दहा वर्षे अशी गेली; कळाहीन आणि वांझोटा असा काळ गेला.

अगदी झपाट्याने, भयानक झपाट्याने रशियातल्या इतका झपाट्याने काळ इतरत्र कुठेच जात नसेल. तुरुंगात तर म्हणे तो अधिक झपाट्याने उडतो असे म्हणतात. एके दिवशी क्लबात, संध्याकाळच्या जेवणाच्या वेळेला, पावेल पित्रोविच्ना प्रिन्सेस आरच्या मृत्यूची वार्ता समजली. पॅरिसमध्ये ती वारली त्यावेळी तिला जवळ जवळ वेड लागले होते. जेवण सोडून ते तसेच उठले; आणि बराच वेळ क्लबातल्या खोल्यांतून येरझारा घालीत राहिले; किंवा पत्ते खेळत असलेल्या व्यक्तीजवळ मुखस्तंभासारखे उभे राहून पाहात राहिले; पण नेहमीपेक्षा आधी मात्र ते घरी परतले नाहीत. काही वेळानंतर त्यांच्या नावाचा एक लिफाफा त्यांना मिळाला; त्यात त्यांनी प्रिन्सेसला दिलेली अंगठी होती. त्यावरच्या स्फिंक्सवर तिने क्रॉससारख्या रेषा ओरखडल्या होत्या आणि त्यांना कळविले होते की, त्या कोड्याचे उत्तर म्हणजे तो क्रॉस.

अठराशे अठ्ठेचाळीसच्या सुरवातीला हे सारे घडले; त्याचवेळी निकालाय पित्रोविच् आपल्या पत्नीच्या मृत्यूनंतर पिट्स्बर्गला आले होते. पावेल पित्रोविच्नी आपला भाऊ खेड्यात राहायला गेल्यापासून त्याची क्वचितच भेट घेतली होती. निकालाय पित्रोविच्चा विवाह व पावेल पित्रोविच्चा प्रिन्सेसशी झालेल्या परिचयाची सुरवात या दोन्ही गोष्टी जवळ जवळ एकाच वेळी घडल्या. परदेश पर्यटन करून ते परत आल्यानंतर एकदोन महिने त्यांच्याबरोबर राहाण्यासाठी गेले होते. त्यांच्या सुखात मजेने सहभागी होण्यासाठी. पण एक आठवड्यापेक्षा जास्त काळ ते तेथे राहू शकले नाहीत. त्या दोघा भावांच्या दर्जात खूप फरक होता. अठराशे अठ्ठेचाळीसमध्ये हे दोघातील अंतर कमी झाले. निकालाय पित्रोविच् आपल्या पत्नीला अंतरले होते, तर पावेल पित्रोविच् आपल्या स्मृतींना; प्रिन्सेसच्या मृत्यूनंतर तिचा विचार टाळण्याचा त्यांनी खूपच प्रयत्न केला. निकालायना मात्र आयुष्याची कृतकृत्यता वाटत होती; त्यांच्या देखरेखीखाली त्यांचा मुलगा लहानाचा मोठा होत होता. याउलट पावेल पित्रोविच् एकलकोंडे, अविवाहीत होते. जीवनाच्या अशा अनिश्चित संधिकालात ते प्रवेश करीत होते की, जेव्हा खेदजनक अनुभव आशा निर्माण करतात आणि आशायुक्त अनुभव खेदजनक होतात. जेव्हा तारुण्य संपलेले असते पण वृद्धत्वही अजून प्राप्त झालेले नसते.

इतर कुणाहीपेक्षा पावेल पित्रोविच्ना हा काळ कठीण होता; गतकाल गमावल्यामुळे यांचे सर्वस्वच हरवले होते.

“मॅरिॲनोला येण्याचा आग्रह मी आता तुम्हाला करणार नाही,” निकालाय पित्रोविच् त्यांना एके दिवशी म्हणाले. (आपल्या मृत पत्नीच्या स्मृत्यर्थ त्यांनी आपल्या दौलतीला ते नाव ठेवले होते); “माझी पत्नी हयात असताना तुम्हाला तिथे करमले नाही; आणि आता तर तिथे राहाण्यापेक्षा मरण बरे, असे तुम्हाला वाटेल.”

“त्यावेळी मी अप्रबुद्ध आणि अस्वस्थ होतो,” पावेल पित्रोविच्नी उत्तर दिले, “त्यावेळेपासून मी बराचसा शहाण नसलो तरी, शांत झालो आहे. उलट, आता तुमची परवानगी असेल तर मी कायमचेच तुमच्याकडे राहायचे ठरविले आहे.”

निकालाय पित्रोविच्नी त्यांना आलिंगन देऊनच उत्तर दिले; पण तरीही आपला बेत प्रत्यक्षात आणायला त्यांना वर्षा-दीड वर्षाचा अवधी लागला. खेड्यांत एकदा स्थायिक झाल्यावर मात्र त्यांनी ते कधीच सोडले नाही. निकालाय पित्रोविच् पिट्स्बर्गला आपला मुलाकडे हिवाळ्यात तीन वर्षे गेले होते, त्याकाळात सुद्धा त्यांनी वाचण्याचा, विशेषकरून इंग्रजी वाचण्याचा सपाटा लावला; सर्वसाधारणपणे आपला सबंध जीवनक्रम इंग्रजीपद्धतीने आखला. शेजाऱ्यांना ते क्वचित भेटत. मार्शल्सच्या निवडणुकीखेरीज ते बाहेरसुद्धा पडले नाहीत; अशावेळी ते अबोल असत. फक्त कधी कधी जुन्या प्रवृत्तीच्या जमिनदारांवर स्वैर शेरे मारून ते त्यांना चकित आणि हैराण करत. तरुण पिढीतल्या लोकांशी त्यांनी आपला संबंध येऊ दिला नाही. जुने जमीनदार काय किंवा तरुणपिढी काय, दोघेही त्यांना “ताठ माणूस” समजत; पण दोन्हीही पक्षांना त्यांच्या सुरेख, खानदानी रीतीरिवाजांविषयी, त्यांच्या प्रणयप्रकरणातील यश-कीर्तीविषयी आदर वाटे.त्यांच्या उत्कृष्ट पोशाखाबद्दल, सर्वोत्तम हॅाटेलात सर्वोत्कृष्ट खोलीत राहण्याच्या त्यांच्या सवयीबद्दल, त्यांना त्यांचा आदर वाटे. त्यांच्या भोजन घेण्याच्या आकर्षक पद्धतीबद्दल, लुई फिलिपाच्या घरी ड्यूक ऑफ् वेलिंगटनबरोबर त्यांनी घेतलेल्या भोजनाच्या कीर्तीबद्दल, त्यांना त्यांचे कौतुक वाटे. कुठेही जायचे झाले तर चांदीची ‘ड्रेसिंग केस’ व एक ‘पोर्टेबल बाथ’ त्यांच्याबरोबर असे. त्यांच्याभोवती कुठल्यातरी अप्रतिम अत्तराचा सुगंध सदोदित दरवळे. ते गंजीफाचा खेळ अतिशय प्रभावीपणे खेळत व नेहमीच पराभव पत्करत या सर्वांबद्दल, आणि शेवटी त्यांच्या विशुद्ध प्रामाणिक वृत्तीचे त्यांना फार कौतुक वाटे. स्त्रिया त्यांच्यावर रंगेलपणाने मोहून जात. पण स्त्रियांशी त्यांनी परिचय वाढविला नाही......

“तेव्हा तुझ्या लक्षात येईल, एव्गेनी,” आपल्या कथेचा शेवट करीत अर्कादी म्हणाला, “माझ्या काकांबद्दलचे तुझे मत किती अन्यायकारक आहे! माझ्या वडिलांना तर त्यांनी त्यांच्या विपत्कालात अनेकवेळा मदत केली, हे तर सांगायलाच नको. त्यांना त्यांनी आपली सर्व संपत्ती, इतकेच नव्हे तर मालमत्तासुद्धा देऊन टाकली. तुला कदाचित् ठाऊक नसेल, पण दौलतीच्या वाटण्या कधीच झाल्या नाहीत. कुणालाही ते आनंदाने मदत करतात. विशेषतः शेतकऱ्यांच्या पाठीशी ते सदैव उभे राहातात. आता या शेतकऱ्यांशी बोलताना त्यांच्या चेहेऱ्यावर तुसडेपणाचा भाव असतो आणि ऊ—द—कलोनचा वास दरवळत राहतो, हे मात्र खरे...... ”

“त्यांची हिंमत, अं,” बझारव् मध्येच उद्‌गारला.

“कदाचित; पण अंतःकरणाचे भले आहेत. ते निर्बुद्ध तर मुळीच नाहीत. किती उपयुक्त सल्ला मला त्यांनी दिला आहे, विशेषतः ......विशेषतः स्त्रियांसंबंधी!”

अनुक्रमणिका

“अस्स! ‘पोळलेला कुत्रा गार पाण्याला भितो’ ठाऊक आहे मला !”

“थोडक्यात सांगायचे म्हणजे,” अर्कादीने आपले बोलणे चालूच ठेवले “ते कमालीचे दुःखी आहेत, माझ्यावर विश्वास ठेव; त्यांचा तिरस्कार करणे पाप आहे.”

“कोण करतो त्यांचा तिरस्कार?” बझारव्ने प्रत्युत्तर दिले. “पण तरीही एक गोष्ट स्पष्ट आहे; जो मनुष्य एकाच पत्त्यावर—एका स्त्रीचे प्रेम—आपल्या आयुष्याची बाजी लावतो; आणि त्यात अपेक्षी ठरल्यावर कडवट वृत्ती धारण करून स्वतःला वाहावत सोडतो आणि शेवटी कुचकामी बनतो, अशा माणसाला पुरुष तरी कसे म्हणायचे? त्याला फार तर ‘नर’ म्हणता येईल. ते दुःखी आहेत असे तू म्हणतोस, ते तुलाच जास्त ठाऊक म्हणा; पण त्यांनी आपले नखरे काही सोडले नाहीत. तो फडतूस “गिऑग्न्यानी” वाचणे, आणि महिन्यातून एकाद्या कामगाराला मार खाण्यापासून वाचविणे, एवढ्या भांडवलावर ते स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजतात, याबद्दल मला तरी शंका वाटत नाही.”

“पण त्यांचे शिक्षण आणि ज्या काळात वाढले तो काळ यांचा तरी विचार कर,” अर्कादी उद्गारला.

“शिक्षण?” बझारव् मध्येच म्हणाला. “प्रत्येकाने स्वतःचे प्रबोधन केले पाहिजे; उदाहरणच हवे असेल तर, माझ्यासारखे. ......आणि काळाबाबत म्हणशील तर काळावर अवलंबून राहायचे मला काही कारण नाही; उलट काळच माझ्यावर अवलंबून रहावा. नाही; मित्रा, हा सगळा उथळपणा आहे, कणखरपणाच्या अभावाचा परिणाम आहे! आणि स्त्री-पुरूषांमधील ते गूढ नाते म्हणे......ही काय, चीज आहे तरी काय? हे संबंध म्हणजे काय, हे आम्ही शरीरवैज्ञानिक जाणतो. डोळा हा एक अवयव म्हणून त्याचा अभ्यास करता येतो; त्यात तो, तू म्हणतोस तो गूढ कटाक्ष येतोच कुठे? हा सगळा स्वच्छंदी, निरर्थक, सौंदर्यवादी भोंगळपणा आहे. त्यापेक्षा आपण ते वॅाटर-बीटल्स पाहायला जाऊ.”

आणि नंतर ते दोघे मित्र बझारव्च्या खोलीकडे गेले. शस्त्रक्रिया व औषधे यांचा एक प्रकारचा वास खोलीभर आधीच भरून राहिला होता; त्यातच सस्त्या तंबाखूचा वास मिसळला होता.

अनुक्रमणिका

८

निकालाय पित्रोविच्चे आपल्या बेलिफाबरोबर बोलणे चालले होते, तिथे पावेल पित्रोविच् काही फार वेळ थांबले नाहीत. तो बेलीफ उंचापुरा आणि कृश होता. त्याच्या आवाजात गोडवा होता आणि त्याचे डोळे लबाड होते. निकालाय पित्रोवि च्च्या प्रत्येक वाक्याला तो "होय साहेब, खात्रीने," असे उत्तर देत होता; आणि शेतमजूर चोर, दारूखस आहेत हे पटवून देण्याचा प्रयत्न करीत होता. नवीन सुधारलेल्या कार्यपद्धतीने शेतीवाडीची व्यवस्था केली गेली होती; ही नवी यंत्रणा कार्यान्वित होत असता वंगणरहित चाकाप्रमाणे मध्येच करकरत होती; न मुरलेल्या लाकडाचे घरी बनवलेल्या फर्निचरप्रमाणे ती हिरवट होती; तिला तडे जात होते. निकालाय पित्रोविच्नी धीर सोडला नाही; पण अनेकवेळा उसासे टाकत, ते खिन्न होत; पैशाखेरीज हे गाडे पुढे जाऊ शकणार नाही हे त्यांना माहीत होते; आणि त्यांच्या जवळचे पैसे तर जवळ जवळ संपले होते; अर्कादी म्हणाला ते खरेच होते; पावेल पित्रोविच्नी आपल्या बंधूंना अनेक वेळा मदत केली होती. एकदा नव्हे अनेकदा, किंकर्तव्यमूढ अशा स्थितीत तडफडताना, डोके धरून बसलेले असतांना आपल्या बंधूना त्यांनी पाहिले होते; अशा वेळी ते बुध्द्याच खिडकीकडे वळत, खिशात हात खुपसून पुटपुटत, "पण मी तुम्हाला काही रक्कम देईन," आणि त्यांना पैसे देत. पण आज त्यांच्याकडे कपर्दीकही नव्हती; आणि म्हणून तिथून अंग काढून घेण्याचा मार्ग त्यांनी पत्करला. शेतीच्या व्यवहारातील क्षुद्र गोष्टींचा विचार करणे त्यांना त्रासदायक वाटे; शिवाय निकालाय पित्रोविच् उत्साही आणि उद्योगी असले तरी सगळे व्यवहार त्यांना योग्य प्रकारे हाताळता आले नाहीत याचा प्रत्यय त्यांना आलेला होता; अर्थात निकालाय पित्रोविच् निश्चित कुठे चुकतात हे त्यांना सांगता आले नसते. "आमचे बंधू पुरेसे व्यवहारी नाहीत, लोकांचा त्यांच्यावर दबाव येतो." अशी त्यांनी स्वतःशीच त्याची मीमांसा केली; उलट निकालाय पित्रोविच्ना पावेल पित्रोविच्च्या व्यवहारकुशलतेबद्दल आदर होता; आणि ते त्यांचा वारंवार सल्ला घेत. "मी हळवा, दुबळा आहे; माझे सगळे आयुष्य विजनवासात गेले आहे," ते त्यांना म्हणत; "या उलट तुम्ही इतके जग पाहिले आहे, ते काही उगाच नाही; माणसांची चांगली पारख आहे तुम्हाला; तुमची दृष्टी गरुडासारखी तीक्ष्ण आहे." याला उत्तरादाखल पावेल पित्रोविच् फक्त वळून बाजूला होत; पण आपल्या बंधूच्या मताचे ते खंडन करीत नसत.

निकालाय पित्रोविच्ना अभ्यासिकेत सोडून, ते घराच्या पुढचा भाग व मागचा भाग यांना विभागणाऱ्या सज्जातून चालू लागले. एका खुज्या दरवाजाजवळ आल्यावर ते थोडे घुटमळले; आणि मिशांना पीळ देत त्यांनी दरवाजावर थाप मारली.

"कोण आहे? आत या," फिनिच्काचा आवाज आला.

"मी आहे," असे म्हणत पावेल पित्रोविच्नी दरवाजा उघडला.

फिनिच्काने बसलेल्या खुर्चीतून उडीच मारली; हातातले मूल तिने जवळच उभ्या असलेल्या मुलीकडे दिले आणि धांदलगडबडीने आपला रुमाल सारखा केला; ती मुलगी मुलाला घेऊन पटकन खोलीबाहेर पळाली.

अनुक्रमणिका

"माफ कर, मी तुला त्रास तर नाही ना दिला?" तिच्याकडे न पाहाता ते म्हणाले. "मला एवढेच विचारायचे होते...... गावात सामान आणण्यासाठी कुणीतरी जात आहे......तेव्हा माझ्यासाठी चहाची हिरवी पत्ती आणायला सांग."

"अलबत," फिनिच्का उत्तरली; "किती आणायची म्हणून त्यांना सांगायचं?"

"मला वाटते अर्धा पौंड पुरे होईल. तुझ्यामुळे इथे बराच बदल झालेला दिसतो आहे," ते पुढे म्हणाले. बोलताना त्यांनी सभोवार जलद दृष्टिक्षेप टाकला; तिच्या चेहऱ्यावरूनही त्यांची नजर फिरली. "हे इथले पडदे," तिच्या ध्यानात आले नसावे असे पाहून त्यांनी स्पष्टीकरण केले.

पि. ३

"होय, खरेच की, पडदे बदललेत: निकालाय पित्रोविच्नी मला ते भेट दिले होते; पण ते इथे लावून आता बरेच दिवस झाले."

"होय, तुला भेटायला येऊनही मला बरेच दिवस झाले. आता कसे प्रसन्न वाटते इथे."

"निकालाय पित्रोविच्ची कृपा," पुटपुटली.

"तू पूर्वी ज्या खोलीत राहायचीस, त्यापेक्षा इथे अधिक आराम वाटत असेल, नाही?" त्यांनी थोड्या शिष्टपणे विचारले; पण त्यांच्या चेहेऱ्यावर स्मितरेषासुद्धा उमटली नाही.

"अलबत. इथे अधिक आराम आहे."

"मग तुझ्या जुन्या जागेत आता कुणाला ठेवले आहे?"

"धुणे धुणाऱ्या बाया तिथे राहातात."

"अस्स!"

पावेल पित्रोविच् काही बोलले नाहीत. आता ते निघतील, फिनिच्काला वाटले; पण ते काही बाहेर गेले नाहीत. फिनिच्का त्यांच्यासमोर निस्तब्ध उभी होती.

"तुझ्या छोकऱ्याला तू बाहेर का पिटाळलेस?" पावेल पित्रोविच्नी शेवटी विचारले. "मला मुले आवडतात; मला पाहायचे आहे त्याला."

आनंदातिशयाने आणि भांबावल्याने फिनिच्का अतिशय लाजली. पावेल पित्रोविच्ची तिला भीती वाटली; पूर्वी ते तिच्याशी क्वचितच बोलत.

अनुक्रमणिका

“दुन्याशा,” तिने हाक मारली. “कृपा करून मित्याला इकडे आण.” (घरातल्या कुणाशीही फिनिच्का सलगीने वागत नसे.) “पण थांब, त्याला झबले घातले पाहिजे,” फिनिच्का दरवाजाकडे वळली.

“त्याची काही जरुरी नाही,” पावेल पित्रोविच् म्हणाले.

“आलेच मी पटकन,” फिनिच्काने उत्तर दिले आणि ती चटकन बाहेर पडली.
पावेल पित्रोविच् खोलीत एकटेच राहिले; आणि यावेळी मात्र त्यांनी सभोवार काळजीपूर्वक न्याहाळून पाहिले. छत बरेच खाली असलेली ती खोली त्यांना स्वच्छ व उबदार वाटली. तक्तपोशीला नुकत्याच दिलेल्या रंगाचा व कॅमोमाईल फुलांचा सुगंध येत होता. भिंतीकडेला खुर्च्या लावून ठेवल्या होत्या; लायर या तंतूवाद्यासारखे नक्षीकाम खुर्च्यांच्या पाठीवर कोरलेले होते; ख्रिस्तवासी जनरलनी त्या खुर्च्या पोलंडच्या मोहिमेत एका सेलमध्ये विकत घेतल्या होत्या; एका कोपऱ्यात लहानगा पलंग होता; त्यावर मलमलीचे छत होते; त्याच्या शेजारी जस्ती पट्ट्यांनी आवळलेली एक पेटी होती; तिच्यावर बहिर्गोल आकाराचे झाकण होते. त्याच्या पुढच्या कोपऱ्यातच दैवी चमत्कार करणाऱ्या सेंट निकालायच्या एका मोठ्या पण धूसर तसबिरीसमोर एक लहानसा दिवा तेवत होता. या संताच्या छातीवर, सोनेरी परिवेषांवर उठून दिसणारे तांबड्या फितीने बांधलेले चिनीमातीचे अंडे रुळत होते; गतवर्षी ज्यामने भरलेल्या हिरवट रंगाच्या बरण्या खिडकीपाशी काळजीपूर्वक ठेवलेल्या दिसत होत्या; त्यावरच्या कागदी वेष्टनावर फिनिच्काने स्वतः “गुजबेरी” अशी मोठी अक्षरे लिहिली होती; निकालाय पित्रोविच्ना असल्या मुरंब्यांची विशेष आवड होती. छतातून लांब दोरीला अडकविलेला एक पिंजरा होता; त्यात आखूड शेपटीचा सिस्किन नावाचा पक्षी होता; त्याची चिवचिव अव्याहत चाललेली होती; आणि तो सारख्या उड्या मारत होता; त्यामुळे तो पिंजरा सारखा हलत होता, झुलत होता आणि तागाचे बी जमिनीवर टपटप पडत होते. भिंतीलगत एक खणांचे कपाट होते; त्यावरच निकालाय पित्रोविच्चे निरनिराळ्या स्थितीतले फोटो लावलेले होते; फोटो फारसे आकर्षक नव्हते; एका अशाच भटक्या फोटोग्राफरने ते काढलेले होते. तिथेच फिनिच्काचाही फोटो होता; तो अगदीच वाईट होता; चेहेऱ्यावर बळेच हसू आणल्यासारखे दिसत होते; आणि डोळ्यांचा तर पत्ताच नव्हता. एका कळकट चौकटीत तो फोटो बसविलेला होता; याहून अधिक त्यात काहीच दिसत नव्हते. फिनिच्काच्या फोटोवरच जनरल यारमलवचा फोटो होता. त्यांच्या अंगावर सर्क्याशियन पद्धतीचा वरकोट होता. फोटोच्या खिळ्याला अडकविलेला एक चिमुकला, सिल्कचा बूट लोंबत होता; तो बरोबर त्यांच्या भुवयांवर पडला होता; आणि या बुटाखालून दूरवर असलेल्या कॉकेशियन पर्वताकडे ते डोळे वटारून पाहात असावेत असे वाटत होते.

पाच मिनिटे झाली. बाजूच्या खोलीतून धांदल-गडबड व कुजबूज ऐकू येत होती. पावेल पित्रोविच्नी कपाटातील खणातून एक तेलकट रंगाचे पुस्तक बाहेर काढले; ते त्याची पाने चाळत राहिले. मसाल्स्कीने लिहिलेल्या “मस्केटीअर्सचा” तो मधलाच एक खंड होता......दरवाजा उघडला आणि फिनिच्का मित्याला घेऊन आत आली. तिने त्याला चिमुकले लाल रंगाचे खमीस घातले होते; त्याच्या कॉलरवर कशिदा काढलेली होती; तोंड स्वच्छ धुतले होते; आणि केस विंचरलेले होते. त्याचे श्वसन वेगाने होत होते; आणि त्याचे सगळे अंग घुसळून निघत होते. सर्व निरोगी बालकाप्रमाणे तो आपले चिमुकले हात हवेत नाचवत होता; पण स्वारी आपल्या नव्या खमिसावर खूष दिसत होती; त्याच्या छोट्या गुबगुबीत शरीरातून आनंद ओसंडत होता. फिनिच्कानेही आपले केस व्यवस्थित केले होते; आणि आपला रुमाल

सावरला होता. पण तिने काहीच केले नसते, तरी चालले असते. खरेच, एक तरुण, सुंदर माता आणि तिच्या हातातील निरोगी बालक, यासारखे मोहून टाकणारे दुसरे कुठले दृश्य असू शकेल?

"कसा गुबगुबीत आहे बेटा!" पावेल पित्रोविच् प्रेमाने म्हणाले; आणि त्यांनी आपल्या तर्जनीच्या निमुळत्या नखाने मित्याच्या दुबार हनुवटीला गुदगुल्या केल्या. त्याची नजर सिस्किन पक्ष्यावर खिळलेली होती ; तो खुदकन हसला.

"हे काका, बरे का," आपले तोंड त्याच्यावर झुकवून आणि त्याला किंचित् जोजवून फिनिच्का म्हणाली. दुन्याशाने तडतडणारी सुगंधी उदबत्ती खिडकीत लावली; आणि अर्ध्या पेनीचे नाणे त्याखाली ठेवले.

"किती महिने झाले याला?" पावेल पित्रोविच्नी विचारले.

"सहा; लवकरच येत्या अकरा तारखेला सात होतील."

"आठ महिने नव्हे का, फिदोस्या निकलाएवना?" दुन्याशाने मध्येच भीतभीत विचारले.

"नाही; सातच; काही तरीच!" बाळ पुन्हा एकदा खुदकन हसले; एकदा कपाटाकडे पाहिले; आणि एकदम आपल्या चिमुकल्या पाच बोटांनी त्याने आईचे नाक व तोंड पकडले. "लबाड कुठला," आपले तोंड दूर न करता फिनिच्का म्हणाली.

"आमच्या बंधूसारखा झाला आहे," पावेल पित्रोविच् म्हणाले.

"दुसऱ्या कुणासारखा होईल?" फिनिच्काला वाटले.

"होय," पावेल पित्रोविच् जणू स्वतःशीच बोलत होते; "दोघात अचूक साम्य आहे." त्यानी फिनिच्काकडे एकाग्रचित्त नि काहीशा खिन्न नजरेने पाहिले.

"हे काका बरे का," ती पुन्हा म्हणाली, नव्हे कुजबुजली.

"ओऽहो! पावेल! तुम्ही इकडे आला आहात होय!" आकस्मिकपणे तिथे आलेल्या निकालाय पित्रोविच्चा आवाज आला.

पावेल पित्रोविच् नाखुशीनेच मागे वळले; पण त्यांचे बंधू त्यांच्याकडे अशा आनंदाने नि कृतज्ञतेने पाहात होते की, त्यांना स्मित करून प्रतिसाद देण्याखेरीज गत्यंतर नव्हते.

"किती सुंदर चेरब्-देव पुत्र आहे तुमचा," ते म्हणाले; आणि घड्याळाकडे पाहात ते पुढे म्हणाले, "चहाची पत्ती आणायला सांगण्यासाठी मी आलो होतो इथे."

अनुक्रमणिका

आणि चेहेऱ्यावर शक्य तो निर्विकारपणा दाखवत, ते खोलीबाहेर पडले.

“स्वतः होऊनच ते आले होते?” निकालाय पित्रोविच्‌नी फिनिच्‌काला विचारले.

“होय; त्यानी दारावर थाप मारली आणि ते आत आले.”

“अस्स आणि अर्काशा आला होता काय पुन्हा?”

“नाही. निकालाय पित्रोविच्, मी माझ्या जुन्या खोलीत राहायाला जाणे बरे नाही का?”

“ते कसे?”

“आपल्या पहिल्याच्या दृष्टीने तसे करणे योग्य आहे असे मला वाटते.”

“न......नाही,” निकालाय पित्रोविच् कसेतरी अडखळत, कपाळावर बोटे चेपत बोलले. “आपण तसे पूर्वीच करायला हवे होते. . . . . . कसे काय गोट्या?” एकदम प्रफुल्लित होऊन ते म्हणाले; आपल्या मुलाकडे जात त्यांनी त्याच्या गालाचा मुका घेतला; नंतर मित्याच्या लालभडक झबल्यावर विसावलेल्या फिनिच्‌काच्या दुधाळ शुभ्र हातावर त्यांनी आपले ओठ टेकले.

“निकालाय पित्रोविच्! हे काय?” ती कुजबुजली; तिची नजर खाली वळली नि मग हळुवारपणे तिने वर पाहिले. पापण्यांखालून डोकावून पाहाणाऱ्या तिच्या डोळ्यांतील भाव, किंचित बावळट वाटणारे पण मृदू असे तिचे स्मित किती सुरेख दिसत होते.

निकालाय पित्रोविच् व फिनिच्‌का यांचा परिचय पुढीलप्रमाणे झाला होता. तीन-एक वर्षांपूर्वी ते एका दूरच्या भागातील गावात एका विश्रामगृहात मुक्कामाला उतरले होते. त्याना दिलेल्या खोलीतील स्वच्छता आणि पलंगपोसाची टापटीप पाहून ते प्रभावित झाले होते. या विश्रामगृहाची मालकीण जर्मन असली पाहिजे असा त्यांचा कयास होता; पण ती रशियन होती. पन्नाशीला आलेली, ठाकठीक कपडे पेहेरलेली, दिसायला समंजस, देखणी आणि सुज्ञपणे बोलणारी. चहाच्या वेळी त्यांनी तिच्याशी बोलणे काढले; त्यांना ती फार आवडली. निकालाय पित्रोविच् त्यावेळी नुकतेच आपल्या नव्या घरात राहायला गेले होते; आणि कृषकमजदूरांना घरी कामाला ठेवायचे नाही असे ठरविल्यामुळे रोजगार करणाऱ्या नोकरांच्या ते शोधात होते. विश्रामगृहाच्या मालकिणीनेही त्या गावात प्रवासी किती थोडे येतात, दिवस कसे कठीण आले आहेत हे त्यांना ऐकविले. त्यांनी तिला आपल्या घरी घरकामाचा सर्व कारभार सांभाळायला येण्याविषयीचा प्रस्ताव मांडला; तिला ते पटले. तिचा नवरा फार पूर्वीच वारला होता; फिनिच्‌का नावाची एकुलती मुलगी तिला होती. पंधरवड्यातच अरीना सविश्ना (नव्या घरकारभारणीचे नाव) आपल्या कन्येला घेऊन मॅरिॲनोला आली आणि त्या लहानशा ‘लॅाज’ मध्ये तिने आपला संसार मांडला. निकालाय पित्रोविच्‌ची निवड यशस्वी ठरली. अरीनाने घरात शिस्त आणली. फिनिच्‌का त्यावेळी सतरा वर्षांची होती; तिला कुणी भेटत नसे की कुणी तिच्याशी बोलत नसे. शांत, गंभीर असे तिचे जीवन होते. रविवारी प्रार्थनामंदिरातच कुठेतरी निकालाय पित्रोविच्‌ना तिचा गोंडस चेहेरा एका बाजूने दृष्टीस पडे. वर्षाहून अधिक काळ असा गेला.

अनुक्रमणिका

एके दिवशी सकाळी अरीना त्यांच्या अभ्यासिकेत आली; नेहमीप्रमाणे त्यांना लवून मुजरा करीत आपल्या मुलगीच्या डोळ्यात स्टोव्हची फुणगी उडाल्याचे सांगून, त्यांना काहीतरी करण्याची विनंती केली. सर्वसाधारण घरबैठ्या लोकाप्रमाणे निकालाय पित्रोविच्नी वैद्यकीचा अभ्यास केला होता; आणि होमिओपाथीवर एक मार्गदर्शिकाही लिहिली होती. अरीनाला त्यांनी ताबडतोब रुग्णाला घेऊन यायला सांगितले. मालकांनी बोलावले आहे हे ऐकून फिनिच्का घाबरूनच गेली; अर्थात् आईपाठोपाठ ती गेली. निकालाय पित्रोविच्नी तिला खिडकीजवळ नेले आणि तिचे डोके आपल्या दोन्ही हातात धरले. त्यांनी तिच्या तांबड्या लाल, सुजलेल्या डोळ्याची कसून पाहाणी केली आणि औषधाचा शेक द्यायला सांगितले— इतकेच नव्हे तर त्यांनी ते औषध स्वतःच तयार करून दिले; आपला रुमाल फाडून, त्याचे तुकडे करून तो शेक कसा द्यायचा हेही दाखविले. त्यांचे सर्व बोलणे फिनिच्काने शांतपणे ऐकले आणि ती जायला उठली. “मालकांच्या हाताचे चुंबन घे, मूर्ख पोरी,” अरीना म्हणाली. निकालाय पित्रोविच्नी आपला हात पुढे केला नाही; स्वतःच गोंधळून जाऊन त्यांनी तिच्या अधोमुख मस्तकावरील भांगावर आपले ओठ टेकले. अल्पावधीतच फिनिच्काचा डोळा बरा झाला; पण निकालाय पित्रोविच्च्या मनावर तिने पाडलेली छाप काही ताबडतोब पुसली गेली नाही. तिच्या त्या नितळ, गोंडस, बुजऱ्या उन्नत चेहेऱ्याचे जणू त्यांना वेडच लागले होते; तिच्या मऊ केसांचा तळहाताला झालेला स्पर्श त्यांना जाणवत होता; ते निरागस, किंचित् विलग असलेले ओष्ठद्वय. आणि त्यांमधून सूर्यप्रकाशात ओलसरपणे चमकणारे मोत्यासारखे दात त्यांच्या डोळ्यांसमोर दिसत. प्रार्थनामंदिरात ते तिच्याकडे निरखून पाहू लागले; आणि तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करू लागले. प्रथम प्रथम त्यांना पाहून ती लज्जित व्हायची; आणि एकदा संध्याकाळी रायच्या शेतात पायवाटेवरून जात असताना जेव्हा त्यांच्याशी गाठ पडली, त्यावेळी समोरासमोर भेटणे टाळण्यासाठी, ती घनदाट, उंच वाढलेल्या रायच्या पिकात पळाली; कॅार्नफ्लावर व वर्मवुडचे तण शेतात वाढलेले होते. रायच्या पिवळ्याधमक कणसांच्या झुबक्यांमागून ती एखाद्या चिमुकल्या प्राण्याप्रमाणे डोकावून पाहात असता, तिचे लहान डोके त्यांच्या दृष्टीस पडले; आणि प्रेमळपणे त्यांनी तिला हाक मारली.

“गुड् इव्हिनिंग, फिनिच्का! मी काही चावरा नाही.”

“गुड् इव्हिनिंग,” ती कुजबुजली; पण लपलेल्या जागेमधून ती काही बाहेर आली नाही.

क्रमाक्रमाने ती त्यांच्याशी निर्भयपणे वागू लागली; पण त्यांच्या सान्निध्यात तिला लाज वाटे; आणि एकाएकी तिची आई अरीना कॅालऱ्याने मृत्युमुखी पडली. आपले कसे होणार?—फिनिच्कासमोर प्रश्नचिन्ह उभे राहिले. आईपासून टापटीप, नियमितपणा व इज्नत ती शिकली होती; पण अजून ती लहान, एकाकी होती. निकालाय पित्रोविच् मनमिळाऊ नि विचारी होते...... पुढे काय घडले हे सांगणे न लगे.

“तेव्हा भाईसाहेब तुला भेटायला आले होते तर?” निकालाय पित्रोविच्नी तिला विचारले. “त्यांनी दारावर टकटक केली आणि ते आत आले?”

“होय.”

“छान, बरे झाले. थांब, मित्याला थोडे झोके देतो.”

अनुक्रमणिका

निकालाय पित्रोविच्नी त्याला जवळजवळ छतापर्यंत उडविण्यास आणि झेलण्यास सुरवात केली; पण त्याच्या आईच्या जीवाची मात्र घालमेल झाली; प्रत्येक वेळी तो वर उडाला की ती त्याचे इटुकले उघडे पाय पकडण्यासाठी आपले बाहू पसरी.

पावेल पित्रोविच् आपल्या कलावस्तूंनी सजविलेल्या अभ्यासिकेत परतले; तिथे भिंतीवर काळ्या-निळ्या रंगाचे सुंदर पडदे सोडलेले होते; एक रंगीबेरंगी 'पर्शियन रग' खिळ्यावर अडकविलेला होता आणि त्यावर शस्त्रास्त्रे टांगलेली होती; अक्रोडाच्या फर्निचरवर गडद हिरव्या रंगाची मखमल मढविलेली होती; काळ्या, पुरातन ओक लाकडाचे 'रेनेसाँ' पद्धतीचे एक पुस्तकाचे कपाट तिथे होते; तिथल्या लिहिण्याच्या भव्य टेबलावर ब्राँझचे छोटे पुतळे होते; आणि एक शेकोटी तिथे होती. त्यांनी सोफ्यावर स्वतःला झोकून दिले; मानेखाली हातात हात घालून ते निश्चल पडून राहिले; भकास नजरेने छताकडे पाहात राहिले. तिथल्या भिंतींपासून आपल्या चेहेऱ्यावरील भाव त्यांना लपवायचा होता की दुसरे काही कारण होते न कळे, पण त्यांनी खिडक्यांवरचे जाडजूड पडदे खाली ओढले आणि पुन्हा स्वतःला सोफ्यावर झोकून दिले.

अनुक्रमणिका

९

त्याच दिवशी बझारव्‌चा नि फिनिच्‌काचा परिचय घडून आला. अर्कादीबरोबर तो बागेत हिंडत होता; आणि बागेतील काही झाडे, विशेषतः ओकची, समाधानकारक का वाढलेली नव्हती, त्याचे कारण त्याला समजावून सांगत होता.

“त्या ऐवजी सिल्व्हर पॉप्लर आणि लकाकणारे देवदार लावायला हवे होते; किंवा चिकणमाती मिसळून ईड लावायला हवे होते. तो लताकुंज मात्र जोमात वाढला आहे;” तो पुढे म्हणाला, “याचं कारण तिथे आकाशिया व लिल्याक लावलेले आहेत; मोठी समंजस आहेत ही झाडे; त्यांची निगा राखण्याचीही फारशी जरुरी नाही. पण इथे कुणीतरी आहे असे दिसते.”

लताकुंजात फिनिच्‌का बसलेली होती; तिच्याबरोबर दुन्याशा व मित्या होते. बझारव्‌ स्तब्ध उभा राहिला; आणि अर्कादीने फिनिच्‌काकडे पाहून ओळखीच्या मित्रासारखी मान डोलवली.

“कोण ती?” त्यांच्यापासून थोड्या अंतरावर गेल्याबरोबर बझारव्‌ने विचारले. “काय देखणी छोकरी आहे!”

“कुणाबद्दल म्हणतोस?”

“तुला ठाऊक आहे, त्याच्यात फक्त एकजणच देखणी आहे.”

अर्कादीने त्याला फिनिच्‌कासंबंधी थोडक्यात माहिती सांगितली; ती सांगताना त्याला अवघडल्यासारखे वाटले.

“वाः!” बझारव्‌ने शेरा मारला; “तुझे वडील रसिक आहेत हं. मला आवडतात तुझे वडील, वा वा! मोठा रंगेल माणूस. पण परिचय करून घ्यायला काहीच हरकत नाही,” तो म्हणाला आणि लताकुंजाकडे वळला.

“एव्‌गेनी!” त्याच्या पाठोपाठ जात अर्कादी बावरून ओरडला; “काय बोलायचे ते जपून रे बाबा.”

“तू निश्चिंत राहा,” बझारव्‌ म्हणाला; कसे वागायचे ते मी जाणतो—इतका काही मी बुद्दू नाही.”

तो फिनिच्‌काजवळ गेला; आणि त्याने टोपी काढून तिला अभिवादन केले.

“मी माझी ओळख करून देतो,” तो म्हणाला; बोलताना तो नम्रपणे वाकला. “मी एक निरूपद्रवी मनुष्य आहे, अर्कादी निकालाय पित्रविच्‌चा मित्र.”

फिनिच्‌का बागेतील आपल्या बैठकीवरून उठली आणि काहीही न बोलता त्याच्याकडे पाहात उभी राहिली.

अनुक्रमणिका

"किती गोंडस बाळ!" बझारव् पुढे म्हणाला; "नाराज होऊ नका, कारण माझ्या स्तुतीने कुणालाही कधी दृष्ट लागलेली नाही. त्याचे गाल एव्हढे लालभडक का बुवा? त्याला दात येताहेत का?"

"होय," फिनिच्का म्हणाली; "चार दात आलेच आहेत आधी; आणि पुन्हा त्याच्या हिरड्या सुजल्या आहेत."

"बघू; आणि भिऊ नका, मी डॉक्टर आहे."

बझारव्ने बाळाला उचलून घेतले; मुलाने घ्यायला विरोध दाखविला नाही की, ते घाबरलेही नाही, त्याने फिनिच्काला व दुन्याशाला फारच आश्चर्य वाटले.

"पाहू......काळजीचे कारण नाही; बरोबर जसे असायला हवे तसे आहे; छान दंतपंक्ती येतील. काही झालेच, तर मला सांगा. आणि तुमची स्वतःची तब्बेत ठीक आहे ना?"

"अगदी ठीक, प्रभूची कृपा."

"प्रभूची कृपा, खरेच—तेच महत्त्वाचे आणि तू?" दुन्याशाकडे वळून त्याने विचारले.

मालकाच्या घरात बेतास बात आणि घराबाहेर मात्र नाचरी, अशी दुन्याशा होती; उत्तरादाखल ती फक्त फिदीफिदी हसली.

"अच्छा, हा घ्या तुमचा गोट्या तुमच्याकडे."

फिनिच्काने मुलाला जवळ घेतले.

"तुमच्याजवळ कसा शांत राहिला!" खालच्या आवाजात फिनिच्का म्हणाली.

"मुलांशी माझे नेहमीच छान जमते," बझारव्ने उत्तर दिले; "माझी त्यांच्याशी गट्टी जमते."

"मुलांना आपल्यावर माया कोण करतं ते बरोबर समजतं," दुन्याशा म्हणाली.

"खरेच, त्यांना समजतं," फिनिच्का म्हणाली, "मित्या तसा कुणाकडेही उगाच जाणार नाही."

"आमच्याकडे येईल का तो?" अर्कादीने विचारले; इतका वेळ तो थोडा दूर अंतरावर उभा होता, तो आता लतकुंजाजवळ आला.

अर्कादीने त्याला जवळ घेण्यासाठी चुचकारण्याचा प्रयत्न केला; पण मित्याने मान वळविली आणि तो किंचाळू लागला; त्यामुळे फिनिच्का फारच गोंधळून गेले.

अनुक्रमणिका

“पुन्हा कधीतरी, त्याला माझी सवय झाली म्हणजे,” लडिवाळपणे अर्कादी म्हणाला; आणि ते दोघे मित्र निघून गेले.

“तिचे नाव काय?” बझारव्‌ने विचारले.

“फिनिच्का......फिदोस्या” अर्कादीने उत्तर दिले.

“आणि तिच्या वडिलांचे नाव? तेही समजायला हवं.”

“निकालाएव्ना”

“छान. मला तिच्यासंबंधी एक गोष्ट आवडली; ती उगीचच फार गोंधळून जात नाही; याच कारणाने काही लोकांचे तिच्या विषयी चांगले मत होणारही नाही. छे ! छे ! तिला घाबरून जाण्याचे काय कारण? ती माता आहे –तिचे ठीक आहे !”

“तिचे ठीक आहे,” अर्कादी म्हणाला, “पण माझे वडील.”

“त्यांचेही ठीक आहे,” बझारव् म्हणाला.

“नाही, मला नाही तसे वाटत.”

“आणखी एक दौलतीचा वारस तुला आवडलेला दिसत नाही?”

“असे हेत्वारोप करताना तुला शरम वाटू नये याचे मला आश्चर्य वाटते!” अर्कादी त्वेषाने म्हणाला; “त्याअर्थाने माझ्या वडिलांचे वागणे चुकीचे आहे असे नाही मी म्हणत. माझे म्हणणे इतकेच की, त्यांनी तिच्याशी लग्न करावे.”

“भले—भले!” थंडपणे बझारव्‌ने साथ दिली. “काय विशाल अंतःकरण आपलं! विवाहाला काही अर्थ आहे असे अजून वाटते तुला; तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती.”

ते दोघेजण न बोलता काही पावले चालून गेले.

“तुझ्या वडिलांची सगळी शेतीवाडी मी डोळ्याखालून घातली,” बझारव्‌ने पुन्हा सुरवात केली. “निकृष्ट जातीची जनावरे, मरतुकडी घोडी; इमारतींतही काही विशेष नाही आणि शेतमजूर तर नंबर एकचे आळशी; त्यांच्यावरचा मुकादम एक मूर्ख तरी, किंवा लुच्चा असावा; यांपैकी नक्की कोण मला अजून समजले नाही.”

“एव्गेनी वासिलिइच, आज तू प्रत्येक गोष्टीवर उखडून बोलतो आहेस.”

अनुक्रमणिका

“आणि हे साधे भोळे शेतकरी तुझ्या वडिलांना चांगलेच खोड्यात पकडत आहेत. तुला ती रशियन म्हण ठाऊक असेल, ‘रशियन शेतकरी देवालाही टोपी घालेल.’

“अशा वेळी काकांचे मत मला पटू लागते,” अर्कादी म्हणाला; “रशियन लोकांविषयी तुझे मत फारच वाईट आहे असे दिसते.”

“त्यात काय अर्थ आहे! स्वतःविषयी फारसे चांगले मत नसणे हाच रशियन व्यक्तीचा चांगला गुण होऊ शकेल. महत्त्वाची गोष्ट एकच : दोन अधिक दोन बरोबर चार; बाकी सगळा भंपकपणा.”

“निसर्गही भंपकच का?” दूरवर चमचमणाऱ्या शेतांकडे मनस्वीपणे पाहात अर्कादीने विचारले; आकाशात नुकत्याच वर येत असलेल्या सूर्याच्या सौम्य, सुंदर प्रकाशात ती शेते चमकत होती.

“तू ज्या अर्थाने समजतोस, त्या अर्थाने निसर्गसुद्धा भंपकच आहे. निसर्ग म्हणजे काही मंदिर नव्हे; तो एक कारखाना आहे; आणि माणूस त्यातला कामगार आहे.”

त्याचवेळी घरातून येत असलेले व्हायोलिनचे आर्त स्वर त्यांच्या कानावर पडले. कुणीतरी अगदी जीव ओतून शूबर्टचे ‘एक्स्पेक्टेशन’ वाजवीत होते; ते वाजविणारे हात फार वाकबगार होते असे नव्हे; पण त्याचे कर्णमधूर मधाळ स्वर आसमंतात भरून राहिले होते.

“कोण ते?” चकित होऊन बझारव्‌ने विचारले.

“माझे वडील.”

“तुझे वडील व्हायोलिन वाजवतात?”

“होय.”

“आणि त्यांचे वय काय?”

“चव्वेचाळीस.”

बझारव् खदखदा हसत सुटला.

“हसायला काय झाले?”

“कमाल..... चव्वेचाळीस वयाचा एक कुटुंबप्रमुख या अशा आडवळणी भागात व्हायोलिन वाजवितो आहे!”

अनुक्रमणिका

बझारव्ला हसता हसता पुरेवाट झाली; पण अर्कादी आपल्या गुरूला कितीही भजत असला, तरी यावेळी मात्र त्याच्या चेहेऱ्यावर स्मितरेषाही उमटली नाही.

अनुक्रमणिका

असाच एक पंधरवडा लोटला; मॅरिअॅनोतला जीवनक्रम नित्याच्या सवयी प्रमाणे चालू होता; अर्कादी आळसात, मजेत दिवस व्यतीत करत होता, तर बझारव् कामात. त्याच्या अनौपचारिक वागण्याची, परखड आणि तडकाफडकी बोलण्याची घरातील प्रत्येकाला सवय झाली होती. फिनिच्का तर त्याच्याबरोबर इतक्या मोकळेपणाने वागत असे की, एकदा तर रात्रीच त्याला उठवावयाला तिने माणूस पाठवला; मित्या हांसडे देत होता; तो गेला होता आणि नेहमीप्रमाणे अर्धवट गमतीने, जांभया देत, मुलाला आराम पडेतोर्यंत दोन तास तिथे थांबला होता. याउलट पावेल पित्रोविच्ना बझारव् अत्यंत तिरस्करणीय वाटत होता; त्यांना तो शिष्ट, उद्धट, तुसडा ग्राम्य आहे असे वाटत होते; आपल्याबद्दल बझारव्ला आदर वाटत नसावा, उलट द्वेष-पावेल किरसानवबद्दल द्वेष वाटत असावा असा त्यांना संशय येत होता! निकालाय पित्रोविच्ना या तरुण "शून्यवादी" माणसाची काहीशी भीतीच वाटत होती; आणि अर्कादीवरचा त्याचा प्रभाव कायम स्वरूपाचा असेल का, याविषयी त्यांना शंका होती; पण तो बोलताना ऐकत राहायला त्यांना बरे वाटे; त्याच्या शास्त्रीय व रासायनिक प्रयोगांना हजर राहायलाही त्यांना आनंद वाटे. बझारव्ने आपल्याबरोबर एक सूक्ष्मदर्शक यंत्र आणले होते; व ते घेऊन तो तासन तास उद्योगमग्न असायचा. नोकरांनासुद्धा तो आवडू लागला; तो मात्र त्यांची थट्टामस्करी करायचा; तो आपला मालक नसून आपल्यातलाच एक आहे, असे त्यांना वाटे. दुन्याशा तर त्याच्यासमोर खिदळत राहायला केव्हाही तयार असे; सशासारखी त्याच्याजवळून उड्या मारत जात असता ती त्याच्याकडे चोरून सूचक कटाक्ष फेकत असे. प्योत्र म्हणजे पोकळ डौल व बावळटपणा यांचा अर्क होता; कपाळावर दिखाऊ तुसडेपणाच्या आठ्य नेहमी मिरवणारा; शिष्ट दिसण्यातच त्याचे सारे वैशिष्ट्य होते; एखादे पान र ट फ करीत वाचणे आणि कोट झटकण्यात नेहमी गर्क असणे एवढीच त्याची योग्यता; पण तो देखील बझारव्ची थोडीशी मेहेरनजर झाली तरी बहाद्दर खुष व्हायचा, प्रफुल्लित व्हायचा. फार्मवरची सगळी पोरे कुत्र्याच्या पिलांसारखी "डॉक्टर" मागे लागत. म्हाताऱ्या प्रकोफिच्लाच काय तो बझारव् आवडला नाही; जेवताना तो त्याच्यासमोर तिरस्काराने पदार्थ सारत असे; तो त्याला "खाटिक" व "वाघ्याचा पाग्या " म्हणत असे; त्याचे ते कल्ले पाहून तो त्याला डुक्करखान्यातला डुक्कर म्हणत असे. पावेल पित्रोविच्प्रमाणे प्रकोफिच्सुद्धा आपल्या परीने एक खानदानी गृहस्थ होता.

वर्षातील सर्वोत्तम दिवस—जूनच्या सुरवातीचे दिवस होते. हवा उत्कृष्ट होती. दूरवर कुठेतरी कॅालऱ्याच्या प्रादुर्भावाची भीती निर्माण झाली होती, हे खरे; पण त्या भागातल्या रहिवाश्यांना आता त्याच्या वरचेवर होणाऱ्या आगमनाची सवय झालेली होती. भल्या पहाटे उठून बझारव् दोन तीन मैल फिरायला जात असे—खरे म्हणजे फिरायला नव्हेच; काही कामाखेरीज फिरायला जाण्याची कल्पनाच त्याला सहन होत नसे; वनस्पतींचे व कीटकांचे नमुने गोळा करायला तो बाहेर पडत असे. कधी तो अर्कादीलाही बरोबर न्यायचा. घराकडे परतताना बहुतेक एकादा वादविषय निघे; त्यात अर्कादी आपल्या मित्रापेक्षा अधिक बडबड करी, पण बहुतेक त्याचाच पराभव होई.

एके दिवशी ते दोघे उशिरापर्यंत बाहेर रेंगाळले; निकालाय पित्रोविच् त्यांना भेटण्यासाठी बागेत गेले. लताकुंजाजवळ पोचल्यावर एकदम त्या दोघांच्या जलद टाकलेल्या पावलांचा आवाज व त्यांचे बोलणे त्यांच्या कानी पडले; ते दोघे कुंजाच्या पलीकडून जात होते आणि म्हणून त्यांना ते दिसले नाहीत.

"माझ्या वडिलांना तू पुरेसे ओळखले नाहीस," अर्कादी म्हणाला.

अनुक्रमणिका

“तुझे वडील एक भला माणूस आहे,” बझारव् म्हणाला, “पण ते काळामागे आहेत! त्यांचा काळ संपलेला आहे.”

निकालाय पित्रोविच् लक्षपूर्वक ऐकू लागले......अर्कादीने उत्तर दिले नाही.

ज्या गृहस्थांचे दिवस सरले होते, ते गृहस्थ तिथे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहिले; आणि नंतर हळूच घराकडे सटकले.

“परवा मी त्यांना पुश्किन वाचताना पाहिले,” बझारव् सांगत होता. “त्यांना तू समजावून सांग त्याचा काडीइतकाही उपयोग नाही. ते काही कुकुल बाळ नाहीत, तू जाणतोसच; तसल्या बाष्कळ गोष्टी फेकून द्यायची वेळ आलेली आहे. या वयात माणसाने सौंदर्यवादी असावे म्हणजे काय! त्यांना काही शहाणपणाचे वाचायला दे.”

“काय देऊ त्यांना वाचायला?” अर्कादीने विचारले.

“सुरवातीला ब्यूख्नरचे Stoff and Kraft दे.”

“मलाही तसेच वाटते,” अर्कादीने संमती दर्शविली. “Stoff and Kraft सोप्या भाषेत लिहिलेले आहे.”......

“असे दिसते खरे,” त्याच दिवशी रात्री जेवणानंतर निकालाय पित्रोविच् आपल्या अभ्यासिकेत बसले असताना आपल्या बंधूंना म्हणाले, “तुम्ही आणि मी काळामागे पडलो आहोत; आपले दिवस संपले आहेत. छान, छान. बझारव्चेच कदाचित बरोबर असेल; पण एका गोष्टीने मी दुखावलो गेलो आहे, हे मान्यच केले पाहिजे; अर्कादीबरोबर अधिक निकटचे, जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होतील याची मी या वेळी तर निश्चितच अपेक्षा करत होतो; पण असे दिसते की, तो पुढे गेला आहे नि मी मागे पडलो आहे; आणि आम्ही एकमेकांना समजू शकत नाही. ”

“तो कसा काय पुढे गेला आहे आणि कुठल्या अर्थाने तो आम्हाला वरचढ झाला आहे?” अस्वस्थपणे पावेल पित्रोविच् मोठ्याने बोलत होते. “तो सर्वश्रेष्ठ शून्यवादी सद्गृहस्थ आहे ना, त्याने हे सगळे त्याच्या डोक्यात भरले आहे. मला त्या डॉक्टरचा द्वेष वाटतो; माझ्या मते तो नुसता वैदू आहे; त्याच्या त्या बेडकांवगैरेवरून माझी खात्रीच झाली आहे की, वैद्यकीतसुद्धा त्याला फारशी गती नाही.”

“नाही, भाईसाहेब, तसे नाही म्हणता येणार तुम्हाला! बझारव् हुशार आहे; आणि त्याच्या विषयाचे त्याला ज्ञान आहे.”

“आणि त्याचा अहंमन्य स्वभाव तर चीड आणणारा आहे,” पावेल पित्रोविच् त्याच आवेशात म्हणाले.

अनुक्रमणिका

“होय,” निकालाय पित्रोविच्नी मान्य केले; “तो अहंमन्य आहे खरा; पण त्याला इलाज नाही असे दिसते; मी फक्त त्याचाच विचार केला नव्हता. मला वाटले होते की, मी काळाबरोबर पावले टाकतो आहे; मी एक आदर्श ‘फार्म’ सुरू केले आहे; कुळांशी माझे संबंध चांगले आहेत; इतके की, या भागात मला लोक ‘साम्यवादी क्रांतिकारक’ म्हणतात; मी वाचन करतो!; चिंतन-मनन करतो आणि प्रत्येक गोष्टीत काळाच्या गरजेप्रमाणे पावले टाकण्याचा प्रयत्न करतो......आणि तरीही माझा काळ संपला आहे असे ते म्हणतात. आणि भाईसाहेब, ते बरोबर आहे असे मलाही वाटायला लागले आहे.”

“ते कसे काय?”

“सांगतो कसे ते. आज सकाळी मी पुश्किन वाचत बसलो होतो......मला वाटते ती ‘द जिप्सीज्’ ही कथा होती...... एकाएकी अर्कादी माझ्याकडे आला; आणि काहीही न बोलता, एखाद्या लहान बालकाशी जसे हळुवार प्रेमाने वागावे, त्याप्रमाणे माझ्या हातातले पुस्तक त्याने काढून घेतले आणि एक जर्मन पुस्तक माझ्या हातावर ठेवले......नंतर त्याने स्मित केले आणि पुश्किनला काखेत मारून तो निघून गेला.”

“कमाल आहे! कुठले पुस्तक होते ते ?”

“हे काय.”

असे म्हणून निकालाय पित्रोविच्नी आपल्या कोटाच्या खालच्या खिशातून ब्यूख्नरचा तो प्रसिद्ध प्रबंध—नववी आवृत्ती —बाहेर काढला.

पावेल पित्रोविच्नी ते पुस्तक चाळले. “हं!” नुसतेच हुंकारले. अर्कादी निकालाइच् आता तुमचे शिक्षण करणार तर. छान, वाचायचा प्रयत्न केला का ? ”

“होय, प्रयत्न केला.”

“मग, कसे काय वाटले?”

“एक मी तर मूर्ख आहे, किंवा ते पुस्तक भंपक आहे. मी मूर्ख असेन झालं.”

“तुमचं जर्मन विसरलं नाही ना?” पावेल पित्रोविच्नी विचारले.

“मला जर्मन समजतं.”

पावेल पित्रोविच्नी ते पुस्तक पुन्हा एकदा हातात खेळवले; आणि खालच्या नजरेने आपल्या बंधूकडे पाहिले. दोघेही बोलले नाहीत.

“एक सांगायचे राहून गेले.” निकालाय पित्रोविच् विषय बदलण्याच्या उद्देशाने म्हणाले, “कल्याझिनचे पत्र आले आहे.”

“मत्वी इलिचचे?”

“होय, या भागाची पाहाणी करायला तो इकडे आला आहे! बडा आसामी झाला आहे तो आता; नातेवाईक म्हणून तुम्ही, मी व अर्कादी त्याला भेटण्यासाठी शहराकडे यावे, असे त्याने लिहिले आहे.”

“मग जाणार का?” पावेल पित्रोविच्नी विचारले.
“नाही! तुम्ही? ”

“नाही, मीही जाणार नाही. चाळीस मैल रखडत जाऊन काहीही साधणार नाही. मॅथ्यूला आपला डामडौल मिरवायचा आहे. जाऊ दे! या भागातले सगळे लोक आहेत की त्याच्यापुढे लोटांगण घालायला; आमच्याविणा त्याचे काहीही अडणार, नाही; उच्च दर्जा प्रिव्ही कौन्सिलचा सभासद! मी नोकरीत राहिलो असतो तर सरकारी सरंजामदारीत रखडलो असतो तर, मीही आज सेनापतीचा ॲडज्यूटांट झालो असतो. शिवाय तुम्ही व मी कालौवात मागे पडलोच आहोत.”

“होय, भाईसाहेब! आपली शवपेटिका तयार करून घेण्याची आणि छातीवर हातांचा क्रॉस करून पडून राहण्याची आपली वेळ आलेली आहे असे वाटते,” निकालाय पित्रोविच् हसत म्हणाले.

“मी काही इतक्या तडकाफडकी पराभव पत्करणार नाही,” त्यांचे बंधू पुटपुटले. “त्या डॉक्टरबरोबर माझी खडाजंगी होणार आहे, याबद्दल मला खात्री आहे.”

त्या दिवशी संध्याकाळी चहाच्या वेळेलाच खडाजंगी झाली. पावेल पित्रोविच् दिवाणखान्यात आले ते चिडलेल्या आणि निश्चयी मनःस्थितीतच! दोन हात करण्याच्या तयारीनेच ते आले होते. प्रतिस्पर्ध्यावर हल्ला करण्यासाठी ते सबब पाहात होते; पण बराच वेळ झाला तरी तशी संधी आली नाही. या वृद्ध किरसानव् बंधूसमोर (त्या दोन बंधूंसंबंधी बझारव् हा शब्दप्रयोग करत असे.) फार बोलायचे नाही असा बझारव्चा नियम होता; त्यावेळी त्याची मनःस्थितीही ठीक नव्हती; आणि चहाचे कपामागून कप तो घशात ओतत होता. पावेल पित्रोविच् अस्वस्थेतेने जणू पेटले होते; शेवटी त्यांची इच्छा पूर्ण झाली एकदाची.

शेजारच्या एका जमीनदारासंबंधी बोलणे चालले होते. “सडलेला सरंजामदारी शिष्ट आहे तो” बझारव् बेफिकिरीने उद्गारला. पिट्स्बर्गमध्ये तो त्याला भेटला होता.

“एक विचारू का?” पावेल पित्रोविच्नी विचारले; त्यांचे ओठ थरथरत होते, “तुमच्या म्हणण्याप्रमाणे ‘शिष्ट’ व ‘सरंजामदार’ हे शब्द समानार्थी आहेत का?”

“मी ‘सरंजामदार शिष्ट’ म्हणालो,” चहाचा एक घुटका सुस्तपणे घोटत बझारव्ने उत्तर दिले.

अनुक्रमणिका

“अगदी बरोबर! पण मला वाटते या ‘सरंजामदार शिष्टां’ विषयीचे तुमचे मत सर्वसाधारण ‘सरंजामदारां’ बद्दलच्या तुमच्या मताहून भिन्न नसावे. तुमच्या या मताशी मी सहमत नाही हे तुम्हाला सांगणे मी माझे कर्तव्य समजतो. मी एक उदारमतवादी व पुरोगामी विचाराचा मनुष्य आहे असे लोक मानतात हे मला इथे सांगावेसे वाटते; पण त्याच कारणासाठी सरंजामदारांविषयी-खऱ्या सरंजामदारांवियी मला आदर आहे. कृपा करून लक्षात ठेवा, महाशय,” (या शब्दासरशी बझारव्‌ने डोळे वर करून पावेल पित्रोविच्‌कडे पाहिले) ते खवचटपणे पुन्हा म्हणाले, “कृपा करून इंग्लिश सरंजामशाही ध्यानात ठेवा, महाशय. स्वतःच्या हक्कांचा ते रतिभरही त्याग करणार नाहीत; आणि याच कारणासाठी दुसऱ्यांच्या हक्कांचा ते मान राखतात; दुसऱ्यांकडून कर्तव्यपूर्तीची ते अपेक्षा करतात; आणि याच कारणास्तव स्वतःची कर्तव्ये ते पार पाडतात. या सरंजामशाहीने इंग्लंडला स्वातंत्र्य दिले आहे; आणि हीच सरंजामशाही त्याचे सातत्य टिकवत आहे.”

“हे पुराण आम्ही बरेच वेळां ऐकले आहे,” बझारव्‌ने उत्तर दिले; “पण तुम्हाला त्यापासून काय सिद्ध करावयाचे आहे?”

“मला हेच सिद्ध करावयाचे आहे की ...... महाशय,” (पावेल पित्रोविच् जेव्हा रागावलेले असत, तेव्हा जाणीवपूर्वक अशा तऱ्हेने त्रुटित शब्द वापरत; अर्थात, अशा तऱ्हेने बोलणे व्याकरणदृष्ट्या बरोबर नाही, हे ते जाणून होते. या अशा शिष्टमान्य छांदिष्टपणात अलेक्झांडरकालीन सवयींचे अवशेष दिसत. त्या वेळची शिष्ट माणसं स्वभाषेत बोलताना क्वचितप्रसंगी अशा तऱ्हेची त्रुटित भाषा वापरत. त्यांना जणू म्हणायचे असे, “आम्ही, अर्थातच, जन्माने रशियन आहोत; पण त्याचबरोबर भले बाजीराव आहोत; विद्वानांचे नियम झुगारून द्यायचे आम्हाला स्वातंत्र्य आहे.”) “हेच ......सिद्ध करायचेय, महाशय, की आत्मप्रतिष्ठा नि स्वाभिमान या दोन भावनांचा सरंजामदारांत चांगला परिपोष झालेला असतो; त्या भावना नसतील तर ‘समाजधारणेचा’ पायाच भक्कम राहणार नाही. व्यक्तीचे चारित्र्य, महाशय, हीच मुख्य बाब आहे; व्यक्तीचे चारित्र्य कसे शिलाखंडासारखे कणखर हवे; कारण त्यावरच सर्व डोलारा उभारला जातो. उदाहरणार्थ, माझ्या सवयी, माझा पोषाख, माझ्या चिकित्सक आवडीनिवडी तुम्हाला वस्तुतः हास्यास्पद वाटतात. याची मला जाणीव आहे; पण हे सर्व स्वाभिमानी स्वभावाच्या जाणिवेतून, कर्तव्यतिष्ठेतून-होय, कर्तव्यनिष्ठेतून आविष्कृत होत असते. मी खेड्यात, एका अर्थाने विजनवासात, राहातो; पण मी माझा दर्जा कमी होऊ देणार नाही. माझ्यातील मानवी श्रेष्ठतेचा मी आदर करतो.”

“पावेल पित्रोविच्, मी तुम्हाला विचारतो,” बझारव् म्हणाला, “तुम्ही आत्मगौरव करता, आणि इथे हात जोडून बसता; समाजधारणेला याचा कुठल्या प्रकारे फायदा होणार आहे? तुम्ही आत्मगौरव केला नाहीत, तरीही तेच करणार.”

पावेल पित्रोविच् पांढरेफट पडले. “तो प्रश्न निराळा. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे मी इथे हात जोडून का बसलो आहे, याचे स्पष्टीकरण करण्याची मला मुळीच जरुरी वाटत नाही. मी तुम्हाला इतकेच सांग इच्छितो की, सरंजामशाही एक तत्त्वप्रणाली आहे; आणि या काळात फक्त अनीतिमान व मूर्ख माणसेच तत्त्वहीन जीवन जगू शकतात. अर्कादी इथे आल्याच्या दुसऱ्याच दिवशी मी त्याला हे सांगितले; आणि इथे तेच पुन्हा सांगतो. खरे आहे की नाही, निकालाय?”

अनुक्रमणिका

निकालाय पित्रोविच्नी मान डोलावली. “सरंजामशाही, उदारमतवाद, प्रगती, तत्त्वप्रणाली,” बझारव् बोलत होता. “तसा विचार केला तर, हे सारे शब्द परके...... कुचकामी आहेत! रशियन माणसाला त्याचा काडीइतकाही काही उपयोग नाही.”

“तुमच्या म्हणण्याप्रमाणे मग कशात तथ्य आहे? तुमचे ऐकायचे म्हणजे मानवजात व तिचे यमनियम यांच्याबाहेर आम्हाला पडावे लागेल. पाहा इतिहासाचे तर्कशास्त्र हेच सांगते......”

“पण आम्हाला काय त्या तर्कशास्त्राचे? त्याविनाही आमचे काही नडत नाही.”

“ते कसे?”

“ते कळायला सोपे आहे. एकाद्या भुकेलेल्या माणसाला भाकरीचा तुकडा भरवायचा असेल तर, त्याला तर्कशास्त्र कशाला हवे? असल्या तात्त्विक विचारांचा काय उपयोग आपल्याला?”

पावेल पित्रोविच्नी स्तंभित होऊन हात वर केले.

“यापुढे तुमचे म्हणणे मला समजत नाही. तुम्ही रशियन जनतेचा अवमान करता आहात. तत्त्वप्रणाली, नियम यांचा स्वीकार न करणे ही गोष्ट मी समजूच शकत नाही. कशाच्या आधारावर मग तुम्ही कार्य करता?”

“आम्ही कुणाचाच अधिकार मानत नाही, हे मी तुम्हाला पूर्वीच सांगितले आहे, काका,” अर्कादी मध्येच म्हणाला.

“आम्हाला जे फायद्याचे वाटते, त्याच्या आधाराने आम्ही कार्य करतो,” बझारव्ने उत्तर दिले.

“सांप्रत नकारात्मक धोरण हेच सर्वांत फायद्याचे आहे...... आणि म्हणून आम्ही नाकारतो......”

“प्रत्येक गोष्ट?”

“प्रत्येक गोष्ट!”

“काय, कला नको, काव्य नको...... इतकेच नव्हे तर...... काय भयंकर बोलणे......”

“प्रत्येक गोष्ट,” बझारव् पुन्हा म्हणाला; त्याची शांतवृत्ती वर्णनातीत होती. पावेल पित्रोविच् त्याच्याकडे एकटक पाहात होते. त्यांनी हे अपेक्षिले नव्हते; अर्कादी मात्र हर्षभरित होऊन चक्क लाजला.

“पण मला असे म्हणायचे आहे,” निकालाय पित्रोविच्नी सुरुवात केली. “तुम्ही प्रत्येक गोष्ट नाकारता; किंवा अधिक काटेकोरपणे बोलायचे तर, तुम्ही प्रत्येक गोष्ट नष्ट करता......पण आपण विधायक असेही काही केले पाहिजे......”

अनुक्रमणिका

“सध्या आमचे ते काम नाही...... प्रथम सगळी जमीन साफ केली पाहिजे.”

“जनतेच्या आजच्या परिस्थितीत त्याची गरज आहे, अर्कादी मान ताठ करून म्हणाला; “या गरजा पुऱ्या करण्यासाठी आम्ही बांधले गेलो आहोत; व्यक्तिगत अहंकार पोसण्याचा आपल्याला अधिकार नाही.”

या शेवटच्या शब्दांनी बझारव् नाखूष झाला; कारण त्यात तत्त्वज्ञानाची म्हणजेच सौंदर्यवादाची झाक होती; बझारव्च्या मते तत्त्वज्ञान व सौंदर्यवाद या मध्ये फारसा फरक नव्हता; पण आपल्या तरुण शिष्याची चूक सुधारण्याचा खटाटोप त्याने केला नाही.

“नाही, नाही!” पावेल पित्रोविच् एकदम जोमाने म्हणाले. “तुम्ही तरुण रशियन जनतेला खरच ओळखता, त्यांच्या आकांक्षांचे, प्रयत्नांचे तुम्ही प्रतिनिधित्व करता यावर मी विश्वास ठेवणार नाही! नाही, तुम्हाला वाटते तशी रशियन जनता खचित नाही. परंपरा ती पवित्र मानते; ही जनता पितृसत्ताक पद्धती मानते; श्रद्धेशिवाय ती जगू शकणार नाही......”

“त्यासंबंधी मी वाद घालणार नाही,” मध्येच अडवून बझारव् म्हणाला. “किंबहुना, याबाबतीत तुमचे म्हणणे बरोबर आहे असे सुद्धा मी म्हणेन.”

“पण मी म्हणतो ते बरोबर असेल......”

“तरीही त्यामुळे काहीच सिद्ध होत नाही.”

“काहीच सिद्ध होत नाही,” अर्कादी तेच पुन्हा म्हणाला; त्याच्या बोलण्यात सराईत बुद्धिबळपटूचा आत्मविश्वास होता; अशा खेळाडूने प्रतिस्पर्ध्याच्या पुढची घातकी खेळी हेरलेली असते; पण त्यामुळे तो मुळीच बिचकलेला नसतो.

“काहीच सिद्ध होत नाही, हे कसे शक्य आहे?” आश्चर्याने पावेल पित्रोविच्नी विचारले. “तुम्ही मग जनतेविरुद्धच जाता आहात?”

“आणि समजा जनतेविरुद्ध आम्ही जात असू?” बझारव् ओरडला. “आकाशात वीज कडाडली की, प्रेषित इल्या आपल्या रथातून दौडत आहे अशी आमच्या लोकांची समजूत आहे. मग काय? आम्ही ते मान्य करायचे? शिवाय ही जनता रशियन आहे; पण मीही रशियन नाही काय?”

“नाही, आतापर्यंत तुम्ही जे काही बोलत आहात, त्यावरून तुम्ही रशियन नाही आहात! मी तुम्हाला रशियन म्हणायला तयार नाही.”

“माझे आजोबा शेतात राबले,” बझारव्च्या उत्तरात स्वाभिमानी दिमाख होता. “तुमच्या कुळांपैकी कुणालाही विचारून पाहा-तुमच्या आणि माझ्यात आपला खरा देशबांधव म्हणून तो कुणाला सहज मान्यता देईल. त्यांच्याशी कसे बोलायचे, हेसुद्धा तुम्हाला माहीत नाही.”

अनुक्रमणिका

“तुम्ही मात्र त्याच्याशी बोलत असता त्याचवेळी त्याला तुच्छ मानता.”

“समजा तो तुच्छ लेखण्याच्याच लायकीचा आहे. तुम्हाला माझा दृष्टिकोन सदोष वाटतो; पण हा दृष्टिकोन माझ्या राष्ट्रभावनेचाच एक उद्रेक असून तो अपघाती आहे, असे तुम्ही कशावरून समजता? त्या राष्ट्राभावनेबद्दलच तुम्ही माझ्याशी वितंडवाद माजविला आहे ना?”

“काय दिव्य कल्पना! शून्यवाद्यांना तिचा बराच उपयोग होईल!”

“त्यांचा काही उपयोग आहे की नाही, हे ठरविण्याचा आपल्याला हक्क नाही. फार काय, आपण अगदीच निरुपयोगी नाही, असे तुम्हालाही वाटतेच.”

“मंडळी, कृपा करून व्यक्तिगत पातळीवर येऊ नका!” निकालाय पित्रोविच् उठून म्हणाले.

पावेल पित्रोविच्नी स्मित केले; आपल्या बंधूंच्या खांद्यावर हात ठेवून त्यांना खाली बसविले.
“तुम्ही अस्वस्थ होऊ नका,” ते म्हणाले; “ज्या मानवी प्रतिष्ठेची आपले डॉक्टर मित्र इतकी निर्दयपणे मस्करी करतात, त्याची जाणीव ठेवून मी तरी स्वतःला विसरणार नाही. मी तुम्हाला विचारतो,” बझारव्कडे वळून, त्यांनी पुन्हा सुरवात केली, “तुमचे तत्त्व काही नवीन आहे अशी तुमची समजूत असेल? ते साफ चूक आहे. तुम्ही पुरस्कारित असलेला भौतिकवाद अनेकदा आचरिला गेला आहे; पण त्याचा अपुरेपणा नेहमीच सिद्ध झाला आहे.”

“पुन्हा परकी शब्द!” बझारव् तुटकपणे म्हणाला. त्याच्या मनात उद्भवलेल्या तुच्छ भावनेने त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा करडा तांबडपणा विलसत होता. “प्रथम, आम्ही कशाचाच पुरस्कार करत नाही; तो आमचा मार्ग नव्हे.”

“मग काय करता तुम्ही?”

“मी सांगतो आम्ही काय करतो ते. थोड्या दिवसांपूर्वी आम्ही म्हणत होतो की, आमचे अधिकारी लाचखाऊ आहेत, आमच्याकडे रस्ते नाहीत, व्यापार नाही, खरा न्याय नाही......”

“अस्स......म्हणजे तुम्ही सुधारणावादी आहात......सुधारणावादी असेच काहीतरी म्हणतात नाही का? तुमच्या काही सुधारणांबाबत मी सुद्धा सहमत होणे शक्य आहे; पण......”

“पण या सामाजिक दुखण्यांबाबत, बडबडण्याचा, सतत बडबडण्याचा आणि फक्त बडबडण्याचा काही उपयोग नाही हे आम्ही ओळखले. हे सगळे वरवरचे आणि पांडित्याच्या दांभिकपणाचे लक्षण होते; आमचे नेते, तथाकथित पुरोगामी आणि सुधारक कुचकामी होते हे स्पष्ट होते; बाष्कळ बडबड हाच आमचा उद्योग-कला, अज्ञात सृजनशीलता, लोकतांत्रिक संस्था, ज्यूरीमार्फत खटले चालविणे, या आणि अशाच निरर्थक विषयांवर रिकामटेकडी बडबड; पण या सर्वांत महत्त्वाचा प्रश्न खायला अन्न मिळविण्याचा; आम्ही मात्र भोळसट समजुतींच्या निबिड अंधकारात गुदमरून जात आहोत; आमचे सगळे उद्योग विफल होत आहेत; कारण काय तर आमच्याकडे हे उद्योग कार्यान्वित करायला कळकळीची माणस नाहीत; आणि

आमचे सरकार ज्या उद्धारासाठी झटते आहे ते काही साधत नाही; कारण काय तर, साधा शेतकरी सुद्धा आपल्याच लोकांना नाडून दारूच्या गुत्त्यात पिऊन तर्र होण्यात धन्यता मानतो."

"अस्सं," पावेल पित्रोविच् मध्येच pdf फाईल मध्ये शिक्का असल्या मुळे या तीन ओळीतीळ मजकुर समजत नाही. असे तुम्ही ठरवलेत."

"काहीही करायचे नाही असे आम्ही ठरवले," उग्रपणे बझारव् म्हणाला; आणि एकदम आपण या गृहस्थासमोर निष्कारण अघळपघळ बोलत आहोत याबद्दल त्याला स्वतःचाच संताप आला.

"आणि फक्त टीका करण्याचे व्रत घेतले?"

"फक्त टीका करण्याचे व्रत घेतले."

"आणि यालाच शून्यवाद म्हणतात?"

"आणि यालाच शून्यवाद म्हणतात" बझारव्ने पुनरुच्चार केला; यावेळी मात्र विशेष उद्दामपणे.

पावेल पित्रोविच्च्या चेहऱ्यावरील स्नायू किंचित आक्रसले. "अस्स काय!" ते उद्‌गारले. त्यांच्या आवाजात एक वेगळाच गंभीरपणा होता. "आमच्या सर्व दुखण्यांवर शून्यवाद हाच उपाय; आणि तुम्ही, तुम्ही आमचे नेते आणि त्राते. पण तुम्ही इतरांना, त्या सुधारकांनासुद्धा उगाच शिव्याशाप का देता? तुम्हीसुद्धा इतरांइतकीच बाष्कळ बडबड नाही का करीत?"

"आमचे इतर काहीही दोष असतील; पण ती चूक मात्र आम्ही करत नाही," बझारव् पुटपुटला.

"मग? करता काय तुम्ही? का काही आंदोलनाची तयारी चालू आहे?"

बझारव्ने उत्तर दिले नाही. पावेल पित्रोविच्च्या अंगभर एक शिरशिरी चमकून गेली; पण त्यांनी तात्काळ स्वतःला सावरले.

"हं! आंदोलन, मोडतोड......" ते पढे म्हणाले. "पण ध्येयाची जाणीव नसेल तर मोडतोड तरी कशी करणार?"

"आम्ही मोडतोड करणार कारण आम्ही शक्तिमान आहोत," अर्कादी उद्‌गारला.

पावेल पित्रोविच्नी आपल्या पुतण्याकडे पाहिले आणि ते हसले.

"आणि या शक्तीची कारणमीमांसा करण्याचीही जरुरी नाही," ताठ बसत अर्कादी म्हणाला.

अनुक्रमणिका

"दुर्दैवी पोरा!" पावेल पित्रोविच्च्या आवाजात विषाद होता; आता मात्र आपली स्थिर वृत्ती टिकविणे त्यांना अशक्य झाले. "तुमच्या देशासाठी तुम्ही काय उपद्व्याप करता आहात हे जरा जाणून घेतलेत तर! नको; एकाद्या देवमाणसाच्या सहनशीलतेचा अंत पाहाणे पुरे! शक्ती! रानटी काल्मूक किंवा मंगोलियन माणसांतसुद्धा शक्ती असते; पण आपल्याला त्याच्याशी काय कर्तव्य आहे? आम्हाला लाख मोलाची वाटते ती संस्कृती; होय, महाशय, तिची फळे आम्हाला मोलाची वाटतात. आणि संस्कृतीची फळे कुचकामी आहेत हे तुम्ही मला सांगू नका; एखादा निकृष्ट चितारी, किंवा रंगारी किंवा तांब्याच्या पाच तुकड्यासाठी नृत्य-संगीत वाजविणारा वादक हे तुमच्यापेक्षा खचितच उपयोगी आहेत; कारण ते संस्कृतीचे प्रतिनिधी आहेत, पाशवी मंगोलियन बळाचे नव्हे! आपण फार पुरोगामी आहोत अशी तुमची समजूत आहे; पण काल्मूक लोकांच्या खोपटात राहायचीच तुमची लायकी! बळ! आणि उद्दाम गृहस्थांनो, लक्षात ठेवा, तुम्ही फक्त साडेचारजण आहात; पण इतरेजण मात्र लक्षावधी आहेत; आपल्या पवित्र परंपरा ते तुम्हाला पायदळी तुडवू देणार नाहीत; तेच तुम्हाला चिरडून टाकतील आणि तुम्हाला तुडवीत पुढे जातील!"

"आम्हाला चिरडून टाकले तर आम्हांला अद्दल घडेल," बझारव् म्हणाला. "पण हा प्रश्न वादातीत नाही. तुम्हाला वाटते तेवढी आमची संस्था लहान नाही ."

"काय? सबंध जनतेशी जमवून घेता येईल असे तुम्हाला खरेच वाटते?"

"एका कःपदार्थ वातीने मॉस्को आगीच्या भक्षस्थानी पडले होते; माहीत आहे ना?" बझारव्ने उत्तर दिले.

"होय, होय. प्रथम सैतानी गर्विष्ठपणा, नंतर इतरांचा उपहास—या भांडवलावरच तुम्ही तरुणांना आकृष्ट करता; अपरिपक्व तरुण हृदयावर त्याचमुळे ताबा मिळविता येतो! तुमच्या जवळच एक तरुण बसला आहे; तुमच्या पायाखालच्या भूमीची पूजासुद्धा तो करील. पाहा जरा त्याच्याकडे! (अर्कादी बाजूला वळला आणि त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या.) आणि हा रोग आधीच खूप दूरवर पसरला आहे. रोममध्ये असलेले आमचे कलाकार म्हणे व्हॅटिकनमध्ये पायसुद्धा ठेवत नाहीत. राफेल हा मूर्ख होता अशी यांची समजूत; का, तर म्हणे तो अधिकारी होता; हे लोक स्वतः मात्र किळस येईल इतके कल्पनाशून्य आणि अयशस्वी; यांच्या कल्पनाशक्तीची धाव कितीही प्रयत्न केला तरी 'गर्ल्स ॲट अ फाऊंटन' च्या पलीकडे जात नाही! आणि त्या 'गर्ल्स' सुद्धा चित्राबाहेरच. ही मंडळी तुमच्या मते मोठी, नाही का?"

"मला वाटते," बझारव्ने प्रत्युत्तर दिले, "राफेलची किंमत पितळेच्या दमडीइतकीही नाही; आणि ते तरुण कलाकार त्याहून निराळे नाहीत"

"शाबास! शाबास रे पठ्ठे! ऐक अर्कादी...... आजच्या तरुणांनी आपली मते अशी व्यक्त केली पाहिजेत! आणि तसा विचार केला तर, तुमचा आदर्श ठेवल्यावर ते अयशस्वी होतील तरी कसे! पूर्वी तरुणांना अभ्यास करावा लागत असे; आपल्याला कुणी निर्बुद्ध म्हणू नये म्हणून ते कष्ट करीत; मग तसे करणे त्यांना आवडो वा न आवडो. पण हल्ली त्यांनी "जगातील प्रत्येक गोष्ट भंपक आहे!" एव्हढे म्हटले की झालीच करामत. तरुण लोक हुरळून जातात. आणि कालचे हे शुंभ आज शून्यवादी बनलेच म्हणून समजा."

अनुक्रमणिका

“तुमचा तो वाखाणला गेलेला गुण, ‘व्यक्तीची प्रतिष्ठा,’ तुम्ही विसरलेले दिसता,” मंदपणे बझारव् म्हणाला; अर्कादी मात्र भडकला होता आणि त्याचे डोळे आग ओकत होते. “आपल्या वादाने मर्यादा सोडली आहे असे दिसते; मला वाटते हा वाद इथेच थांबवणे बरे. तुम्ही मला सांप्रतच्या जीवनपद्धतीतील, कुटुंबसंस्था अगर समाजजीवनातील अशी एक संस्था दाखवा की जिचा पूर्ण, विनाअट नायनाट करण्याची जरुरी नाही; मग तुमच्याशी एकदम सहमत होईन,” तो म्हणाला आणि उठला.

“अशी लक्षावधी उदाहरणे देता येतील,” पावेल पित्रोविच् ओरडले- “लक्षावधी! उदाहरणार्थ- मिर-रशियन खेड्यातील जनता.”

कुत्सित स्मिताने बझारव्चे ओठ वळले. “ग्रामीण जनतेसंबंधी बोलायचे तर,” तो म्हणाला, “तुम्ही आपल्या बंधूंशी बोलणे बरे. मिर-ग्रामीण जनता ही काय चीज आहे, —त्यांची सामूहिक जिम्मेदारीची जाणीव, त्यांच्या मितपानी सवयी आणि तसलेच इतर गुण, याची कल्पना तुमच्या बंधूंना आतापर्यंत आलेली असावी असे वाटते.”

“मग कुटुंबपद्धती—ह्या आमच्या शेतकरी समाजातील कुटुंबपद्धती!” पावेल पित्रोविच् ओरडले.

“त्याविषयीसुद्धा, मला वाटते, तुम्ही लोकांनी तपशीलात न जाणे बरे. आपल्या सुनांची निवड करण्यामागे कुटुंबप्रमुखाचे होणारे फायदे तुमच्या ध्यानात येत नाहीत का? पावेल पित्रोविच्, तुम्ही माझे ऐका; दोन दिवस विचार करा या विषयावर; या क्षणी तात्काळ तुम्हाला नवीन काही सुचणार नाही. आपल्या समाजातील सर्व स्तरांचा विचार करा, प्रत्येक स्तरावर विचार करा; तोपर्यंत मी व अर्कादी.......”

“प्रत्येक गोष्टीचा उपहास करतो, असेच ना?” पावेल पित्रोविच्नी अडवून विचारले.
“नाही; आम्ही बेडकांचे शरीरविच्छेदन करणार आहोत. चल, अर्कादी; जंटलमेन, तूर्त गुडबाय!”

दोघे मित्र बाहेर पडले. दोघे बंधूच तेवढे राहिले; प्रथम त्यानी एकमेकांकडे फक्त पाहिले.

“असे आहेत तर या पिढीतील तरुण!” पावेल पित्रोविच् म्हणाले; “असे आहेत...... आमचे वारसदार!”

“आमचे वारसदार!” निलाकाय पित्रोविच्नी खिन्नपणे तेच शब्द उच्चारले. या संबंध वादात ते जणू कंटकशय्येवर बसून होते; मधून मधून अर्कादीकडे दुःखित अंतःकरणाने चोरून कटाक्ष टाकण्याखेरीज त्यांनी काहीही केले नाही. “मला कशाची आठवण झाली माहीत आहे, भाईसाहेब? आपल्या मातोश्रीशी माझा एकदा झगडा झाला; ती भयंकर भडकली होती आणि माझे काहीच ऐकून घेत नव्हती. मी शेवटी तिला म्हणालो, ‘अर्थातच, तुला माझे पटणे शक्य नाही; आपण दोघे निरनिराळ्या पिढ्यांचे प्रतिनिधी आहोत.’ तिला ते भयंकर अपमानकारक वाटले; मी मनात म्हणालो, ‘नाइलाज आहे. गोळी थोडी कडवट आहे; पण तिने ती गिळलीच पाहिजे.’ आणि आता आपली पाळी आली आहे; आमचे वारस आम्हाला म्हणू शकतात, ‘तुम्ही आमच्या पिढीचे नव्हेत; गिळा ती गोळी.’”

अनुक्रमणिका

“तुमचे औदार्य आणि नम्रता मर्यादेपलीकडचे आहेत,” पावेल पित्रोविच् उत्तरले. “उलट, माझी खात्रीच झाली आहे की, या तरुण लोकांपेक्षा तुम्ही आणि मी म्हणतो तेच अधिक बरोबर आहे; आम्ही कदाचित आमचे विचार जुन्या वळणाच्या भाषेत मांडत असू. जुनेपुराणे...... आणि आमच्यात तो उद्दाम गर्विष्ठपणा नाही इतकेच......आणि आजच्या तरुण पोरांचा तो तोरा! तुम्ही कुणालाही विचारा, ‘तुम्ही तांबडे मद्य पिता की पांढरे?’ ‘तांबड्या मद्याचीच निवड करण्याचा माझा प्रघात आहे!’ असे तो आपल्या घोगऱ्या आवाजात उत्तर देईल; त्याचा चेहरा गंभीर असेल; जणू सगळ्या विश्वाचे डोळे त्याक्षणी त्याच्याकडे लागलेले असतात......”

“आणखी चहा हवा का?” दरवाजात डोकावून फिनिच्काने विचारले; वितंडवाद चालला होता त्या अवधीत दिवाणखान्यात यावे की न यावे याविषयी तिचा विचार पक्का झाला नव्हता.

“नको; सॅमोव्हर नेऊन ठेवायला सांग,” निकालाय पित्रोविच्नी उत्तर दिले; आणि तिच्याकडे जाण्यासाठी ते उठले. पावेल पित्रोविच् त्यांना उद्देशून ‘गुड-नाईट’ फ्रेंचमध्ये तातडीने म्हणाले आणि आपल्या अभ्यासिकेकडे ते वळले.

अनुक्रमणिका

अर्ध्या तासानंतर निकालाय पित्रोविच् बागेतल्या आपल्या आवडत्या लताकुंजाकडे गेले. उदास विचारांचे मळभ त्यांच्या मनात भरले होते. आपण व आपला पुत्र यांतले अंतर प्रथमच त्यांना जाणवले; भविष्यात हे अंतर अधिकाधिक रुंदावत जाणार हे त्यांना स्पष्ट दिसत होते. पिट्स्बर्गमध्ये हिवाळ्यात गेल्यावर त्यांनी नवीन पुस्तके वाचण्यात अनेक दिवस घालविले होते, ते ही व्यर्थच; त्यांच्या तप्त चर्चेत एकादा शब्द बोलून सहभागी होण्यात आनंद मानत, सारे व्यर्थ होते. "आपलेच बरोबर आहे असे आमचे भाई म्हणतात," ते विचार करू लागले, "आत्मप्रौढी बाजूला ठेवून, मला अजूनही असेच वाटते की, ते आमच्याहीपेक्षा सत्यापासून दूर आहेत; पण तरीही मला वाटते त्यांच्याकडे काही विशेष आहे की, जे आमच्यात नाही; काही तरी आमच्यापेक्षा वरचढ...... तारुण्य? नाही; फक्त तारुण्य नव्हे. गुलाम बाळगणाऱ्याच्या वृत्तीच्या छटा यांच्यामध्ये आपल्यापेक्षा कमी आहेत, यात तर त्यांचा वरचढपणा नसेल?"

निकालाय पित्रोविच्चे मस्तक विमनस्कपणे झुकले आणि त्यांनी आपल्या चेहेऱ्यावरून हात फिरविला.

"पण काव्य झिडकारणे?" त्यांचे विचार चालूच होते; "कला, निसर्ग यांविषयी काहीच न वाटणे......"

आणि त्यांनी सभोवर नजर टाकली; जणू निसर्गासंबंधी काहीच भावना नसणे म्हणजे काय हे त्यांना समजून घ्यायचे होते. संध्याकाळ झालेली होती; बागेपासून दोनतीन फर्लांग अंतरावरच्या ॲस्पन-वृक्षराजीमागे सूर्य लपला होता; त्याच्या सावल्या निस्तब्ध शेतांवर दूरवर पसरलेल्या होत्या. झाडीजवळच्या अरुंद रस्त्याने एक शेतकरी आपल्या पांढऱ्या तट्टावर बसून दौडत होता; तो सावलीतून जात होता तरीही त्याची पूर्ण आकृती स्पष्ट दिसत होती; त्याच्या खांद्यावरचे ठीगळसुद्धा; घोड्याच्या टापा बेधडकपणे पडत होत्या. दूर अंतरावरून सूर्यकिरण त्या झाडीवर पडले होते, गर्द झाडीत घुसले होते, आणि ॲस्पनच्या बुंध्यावर उबदारपणे विसावले होते; त्यामुळे ते पाईन वृक्षाप्रमाणे दिसत होते; त्यांची पर्णराजी गर्द निळी दिसत होती; आणि वर फिकट निळे आकाश उभारले होते; संधिप्रकाशाने ते किंचित झळाळले होते. पाकोळ्या उंच भराऱ्या मारत होत्या; वारा एकदम पडला होता; लिल्याकच्या जाळीत चुकलेले भुंगे झोपाळूपणे शांतपणे गुंजारव करीत होते; चिलटांचा एक घोळका एका फांदीवर ढगासारखा स्थिरावला होता; आकाशाच्या पार्श्वभूमीवर ती फांदी उठून दिसत होती. "किती किती सुंदर!" निकालाय पित्रोविच्ना वाटले आणि त्यांच्या आवडत्या काव्यपंक्ती त्यांच्या अगदी ओठावर आल्या; अर्कादीने दिलेले 'Stoff and Kraft' त्यांना आठवले. व ते स्तब्ध झाले; पण तिथेच बसून राहिले; एकांतातील विचारांचे उदासवाणे समाधान मिळविण्यात ते पुन्हा गर्क झाले. ते स्वप्नील होते; खेड्यातील राहणीने ही वृत्ती त्यांच्यात निर्माण केलेली होती. थोड्याच दिवसांपूर्वी ते त्या चौकीत आपल्या पुत्राची प्रतिक्षा करीत असेच स्वप्नाळू झाले होते आणि त्या दिवसापासून एव्हढ्यातच किती बदल घडून आले होते; त्या दोघांतील नाते त्यावेळी अनिश्चित होते, ते आता निश्चित झाले-आणि तेही कसे! आणि मग त्यांच्या मृत पत्नीची प्रतिमा त्यांच्या स्मृतिपटलावर उमटली; पण त्यांना अनेक वर्षे सुपरिचित असलेली सुगृहिणीसारखी ती त्यांच्या मनःचक्षूंसमोर नाही आली; तर तरुण, कृशांगी, वेधक, निरागस डोळ्यांची आणि बालिश, मानेवर चापूनचोपून बांधलेला केसांचा पेड सोडलेली, अशी. तिची प्रथम भेट त्यांना आठवली. त्यावेळी ते विद्यार्थीच होते. ते राहात असलेल्या लॉजिंगच्या जिन्यात त्यांची भेट झाली होती आणि चुकून त्यांचा धक्का

तिला लागला होता; दिलगिरी व्यक्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता; पण "माफ करा" एव्हढेच ते कसेतरी पुटपुटले होते; अभिवादनार्थ तिने किंचित मान झुकविली होती, स्मित केले होते; पण तात्काळ भयभीत झाल्यासारखी ती तिथून सटकली होती; पण जिन्याच्या वळणावर मागे वळून वेगाने तिने त्यांच्याकडे पाहिले होते; गंभीर झाल्याचा बहाणा केला होता आणि ती लज्जित झाली होती. आणि मग नंतरच्या त्या प्रथम प्रथमच्या बुजऱ्या भेटीगाठी, ते अस्फुट शब्द, ते अस्फुट स्मित आणि ते अवघडून जाणे; ती विमनस्कता, ती हुरहुर लावणारी ओढ आणि मग बेहोषी...... कुठे हरवले ते सगळे? ती त्यांची पत्नी झाली होती; त्यांच्याइतके सुख क्वचितच कुणाच्या वाट्याला आले असेल...... "पण," ते विचारमग्न होते, "ते सुखाचे पहिले मधुर क्षण...... त्या क्षणांत अक्षय, अनंत जीवन का बरे सामावून जाऊ नये?"

आपले विचार स्वतःशीच स्पष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही; पण तो परमोच्च सुखाचा क्षण स्मृती ऐवजी दुसऱ्या कुठल्यातरी साधनाने पकडून ठेवावा असे मात्र त्यांना तीव्रतेने वाटले; आपली मर्या जवळ असावी; तिच्या उबदारपणाची आणि श्वासोच्छवासाची अनुभूती यावी अशी तीव्र इच्छा त्याना झाली; आणि या अनुभूतीची संवेदना जाणवल्यासारखे वाटलेही......

"निकालाय पित्रोविच्," फिनिच्काचा आवाज अगदी जवळून आला; "कुठे आहात तुम्ही?"

ते चमकले. त्यांना धक्का नाही बसला; किंवा ते शरमिंदेही नाही झाले. त्यांची पत्नी आणि फिनिच्का यांच्यात तुलना करण्याचा प्रश्नच नव्हता; पण तिने त्यांच्या शोधात यावे याचा त्यांना विषाद वाटला. तिच्या आवाजाने त्यांचे पांढरे केस, वृद्धत्व, वास्तव जीवन यांची जाणीव त्यांना झाली.

गतकालाच्या धूसर धुक्यातून ते स्वप्नील जग नुकतेच आकारात होते आणि त्यात ते नुकतेच पाऊल टाकणार होते-इतक्यात ते भंगले, अंतर्धान पावले.

"इथे आहे मी," त्यांनी उत्तर दिले; "मी आलोच, पळ इकडेच." "पुन्हा गुलाम बाळगणाऱ्याची वृत्ती" त्यांच्या मनात विचार चमकला. फिनिच्काने न बोलताच लताकुंजात त्यांच्याकडे डोकावून पाहिले; आणि ती तिथून नाहीशी झाली; आपण स्वप्नरंजनात गुंगलो आहोत, या अवधीत रात्र पडलेली आहे, हे ध्यानात येऊन त्यांना आश्चर्य वाटले. आजूबाजूला अंधार व नीरव शांतता होती. फिनिच्काचा फिकटसा चेहेरा त्यांच्या नजरेसमोर चमकून गेला होता. घराकडे जाण्यासाठी ते उठले; पण त्यांच्या अंतःकरणात स्फुरलेली भावना काही ताबडतोब शमली नाही आणि ते बागेतच मंदपणे फेऱ्या मारू लागले; काही वेळ त्यांची नजर खाली पायांकडे वळे आणि मग वर चमचमणाऱ्या तारकांनी भरलेल्या आकाशाकडे वळे. ते बराच वेळ थकून जाईपर्यंत चालले; पण त्यांची अस्वस्थता, एक प्रकारची हुरहूर, धूसर, खिन्न अस्वस्थता शांत झाली नाही. त्यावेळी त्यांच्या मनात काय चालले होते हे बझारव्ला समजले असते तर तो केव्हढा उपहासाने हसला असता त्यांना! अर्कादीने तर स्वतःच त्यांचा निषेध केला असता. एक चाळीस वर्षांचा शेतकीतज्ज्ञ आणि शेतकरी अकारण अश्रू ढाळतो आहे; —ही कल्पनाच व्हायोलिन वाजविण्यापेक्षाही शतपटीने वाईट होती.

निकालाय पित्रोविच् चालत राहिले; पण घरात जावे की न जावे याबद्दल त्यांचे मन निश्चित होईना; ते घर सुस्थितीचे, शांततेचे जणू घरटे होते; सर्व खिडक्यांतून उजेड प्रकाशत होता आणि ते जणू

अनुक्रमणिका

अगत्यपूर्वक त्यांच्याकडे पाहात होते. पण तो अंधार, ती बाग आणि मुखावर पखरण घालणारी ती ताजी हवा यांपासून दूर त्यांना जाववेना; ती उदास अस्वस्थ करून सोडणारी आर्तता त्यांना सोडवेना.

एका वळणाजवळ त्यांना पावेल पित्रोविच् भेटले. "काही होतय का तुम्हाला?" त्यानी निकालाय पित्रोविच्ना विचारले. "एखाद्या पिशाचासारखे पांढरे फटक दिसता; तुमची तब्येत ठीक नाही; जाऊन झोपा."

निकालाय पित्रोविच्नी आपली मनःस्थिती त्यांना थोडक्यात स्पष्ट केली. आणि तिथून ते पसार झाले. पावेल पित्रोविच् बागेच्या अगदी टोकाला गेले; तेही विचारमग्न झाले. आणि त्यांचेही डोळे आकाशाकडे वळले. पण त्यांच्या सुंदर काळ्या डोळ्यांत तारकांच्या प्रकाशाखेरीज काहीच प्रतिबिंबित झाले नाही. ते काही ध्येयवेडे नव्हते; चोखंदळ असल्याने त्यांचे मन शुष्क, भोगवादी होते; त्यात फ्रेंच पद्धतीच्या शून्यवादाची छटा मिसळली होती; त्यामुळे ते स्वप्नाळू नव्हते.

"तुझ्या लक्षात आले का?" त्या रात्री बझारव् अर्कादीला विचारत होता. "माझ्या डोक्यात एक छान कल्पना आली आहे. आज तुझे वडील सांगत होते की, तुमच्या प्रसिद्ध नातेवाईकाकडून त्यांना निमंत्रण आलेले आहे. तुझे वडील जाणार नाहीत; आपण जाऊ एक्स् – या शहराकडे; तो थोर माणूस तुलाही बोलवतो आहेच. हवा बघ किती छान पडली आहे; आपण गावात भटकू इकडे तिकडे. पाचसहा दिवसांची सफर होईल; मजा करू."

"तू परत इकडे येणार ना?"

"नाही, मला वडिलांकडे गेले पाहिजे. एक्स् –पासून पंचवीस मैलांवर ते राहतात. त्यांना आणि आईला भेटून खूप दिवस झाले; त्या म्हाताऱ्या माणसांना थोडे खूष केले पाहिजे. माझ्याशी ते फार चांगले आहेत; विशेषतः वडील; मोठा गमतीदार माणूस. मी त्यांचा एकूलता एक मुलगा ना."

"फार दिवस तू त्यांच्याकडे राहणार का?"

"बहुतेक नाही. ते अर्थातच फार कंटाळवाणे होईल."

"आणि मग परत जाताना पुन्हा इकडे येशील?"

"कुणास ठाऊक......पाहू. मग तुझे काय ठरले? जायचं ना?"

"जशी तुझी इच्छा," सुस्तपणे अर्कादी म्हणाला.

आपल्या मित्राच्या सूचनेने तो खरे म्हणजे हर्षभरित झाला होता. पण आपल्या भावना लपविणे आपले कर्तव्य आहे असे त्याला वाटले. उगीच नव्हता तो शून्यवादी!

अनुक्रमणिका

दुसऱ्या दिवशी बझारव्बरोबर एक्स्कडे जाण्यासाठी तो निघाला. मॅरिॲनोतल्या तरुण पिढीला त्यांच्या जाण्याचे वाईट वाटले; दुन्याशा रडली देखील......पण वडील माणसांना छातीवरचे ओझे कमी झाल्यासारखे वाटले.

अनुक्रमणिका

ज्या एक्स्-शहरी आपले मित्र रवाना झाले, ते शहर एका तरुण राज्यपालाच्या अधिपत्याखाली होते; अनेक रशियन लोकांप्रमाणे तो एकाचवेळी पुरोगामी व हुकूमशहा होता. आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षातच त्याने सरंजामदारांच्या मार्शलबरोबर भांडण काढले होते; हा मार्शल 'गार्डस्' मधून अधिकारी होऊन निवृत्त झाला होता; मुक्तद्वार आदरातिथ्य आणि पैदाशीच्या घोड्यांचा कळप ठेवणे, या गोष्टींबद्दल तो प्रसिद्ध होता; राज्यपालाने कनिष्ठ नोकरवर्गाशीही भांडणतंटे उपस्थित केले होते. या सर्व तंटेबखेड्यांचे पर्यवसान पिट्स्बर्गमधल्या मंत्रालयाने आपला एक विश्वासू माणूस सर्व प्रकरणाची जागेवर चौकशी करण्यास पाठविला यात झाले. या कामासाठी अधिकाऱ्यांनी निवडलेला मनुष्य म्हणजे मत्वी इलिच् कल्याझिन्, कल्याझिन्चा मुलगा; याच गृहस्थाच्या देखरेखीखाली किर्सानव् बंधूंनी काही दिवस काढले होते. तो सुद्धा 'तरुण युवक' होता; म्हणजे इतकेच की, चाळिशी त्याने नुकतीच ओलांडली होती आणि मुत्सद्दी व्हायच्या ऊर्ध्वगामी मार्गावर त्याने आधीच प्रगती केलेली होती; छातीच्या दोन्ही बाजूला एक एक चांदणीच्या आकाराचे पदक त्याने लावले होते; अर्थात्च ते पदक परदेशी बनावटीचे होते; पण प्रथम दर्जाचे नव्हते. ज्या राज्यपालाची चौकशी करण्यासाठी तो आला होता, त्याच्याप्रमाणे तोही पुरोगामी आहे असा समज होता; तो म्हणजे एक आधीच 'बडे प्रस्थ' झाले होते; पण इतर बहुसंख्य बड्या धेंडांहून तो निराळा होता. स्वतःबद्दलचे त्याचे विचार परकाष्ठेचे होते; त्याच्या आत्मप्रौढीला सीमा नव्हती; पण त्याचे वागणे साधे होते; तो मायाळू वाटायचा आणि दुसऱ्यांचे बोलणे मेहेरबानीखातर ऐकून घ्यायचा आणि इतका हासायचा की, प्रथम ओळख झालेल्या माणसाला तो "रंगेला" वाटे. महत्त्वाच्या प्रसंगी मात्र आपल्या सत्तेचा दरारा इतरांना कसा जाणवेल याची त्याला चांगली माहिती होती. "हिंमत पाहिजे," तो मग फ्रेंच भाषेत म्हणायचा. "दुसऱ्यावर वर्चस्व मिळविण्यासाठी सर्वप्रथम हिंमत पाहिजे." असे असले तरी त्याची नेहमी फसगत होत असे; आणि कुठलाही सामान्य अनुभवाचा अधिकारी सुद्धा त्याला आपल्या बोटाभोवती फिरवत असे. ग्विझॉत्संबंधी मत्वी इलिच् आदराने बोलत असे; आणि आपण ठराविक चाकोरीतून जाणाऱ्या उच्चपदस्थ नोकरशहाहून निराळे आहोत, त्याचप्रमाणे कुठलीही सामाजिक घटना आपल्या नजरेतून सुटत नाही, हे तो प्रत्येकाच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करत असे......असले शब्दप्रयोग त्याला पाठ होते. प्रचलित वाङमयातील प्रगतीसंबंधी सुद्धा तो माहिती करून घेत असे; अर्थात, त्यासंबंधी एक प्रकारची उच्चभ्रू बेपर्वाई दर्शवित असे, हे खरे; जणू एखाद्या प्रौढ पुरुषाने कधी रस्त्यावरून जाणाऱ्या बालकांच्या मिरवणुकीमागून जावे, त्याप्रमाणे. वस्तुतः या बाबतीत मत्वी इलिच् अलेक्झांडरकालीन राजकारणी पुरुषांपेक्षा फार पुढे गेला होता असे नव्हे; कुणा मदाम स्वेत्चिनकडे संध्याकाळी पार्टीला जाण्यापूर्वी ते कॉण्डिलॅकचे एकादे पान वाचून तयारी करून जात; मत्वी इलिच्ची पद्धत फक्त निराळी, अधिक आधुनिक होती इतकेच. एक पटाईत दरबारी आणि महान ढोंगी यापेक्षा तो काही निराळा नव्हता; सरकारी कारभार करण्याकडे त्याचा विशेष कल होता असे नव्हे; बौद्धिक सामर्थ्य तर शून्य; पण आपला कार्यभाग कसा साधायचा हे त्याला पक्के ठाऊक होते; त्याबाबतीत तो कुणालाही भारी होता आणि तीच तर महत्त्वाची गोष्ट आहे.

मत्वी इलिच्ने अर्कादीचे अगत्याने, खेळकरपणाने म्हणता येईल असे स्वागत केले; असा खेळकरपणा हा एक सुबुद्ध उच्चाधिकाऱ्यांचा विशेष असतो. पण आपले मावसबंधू घरीच राहिले याचे मात्र त्याला विलक्षण आश्चर्य वाटले. "तुझे वडील नेहमीच विक्षिप्त होते," तो म्हणाला; बोलता बोलता त्याने आपल्या भरजरी, मखमली ड्रेसिंगकोटाच्या झिरमिळ्या उडविल्या आणि अचानकपणे, विवेकपूर्वक चापूनचोपून गणवेश पेहेरलेल्या एका तरुण अधिकाऱ्याकडे वळून तो ओरडला, "हो का?" जणू तो त्याच्या

बोलण्यावरच लक्ष केंद्रित करून होता इतका वेळ. त्या तरुण अधिकाऱ्याचे ओठ इतका वेळ चूपचाप राहिल्यामुळे जणू चिकटले होते; तो ताडकन उठला आणि बावरलेल्या स्थितीत त्याने आपल्या वरिष्ठाकडे पाहिले. पण एकदा त्याला गडबडून सोडल्यावर मत्वी इलिच्ने त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या हाताखालच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांना बुचकळ्यात टाकायचे हा जणू नियमच आहे; हा हेतू साध्य करून घेण्याच्या प्रत्येकाच्या पद्धती भिन्न आहेत एव्हढेच. यात खालील पद्धती इतर पद्धतीपेक्षा अधिक प्रचलित आहे; इंग्लिश लोक म्हणतात त्याप्रमाणे 'फार लोकप्रिय ' आहे. एखादा वरिष्ठ अधिकारी बहिरा असल्यासारखा अगदी साधे शब्द देखील समजत नसल्याचा अचानक बहाणा करतो. उदाहरणार्थ, तो विचारील,

"आज वार कोणता?"

त्याला आदरपूर्वक माहिती पुरविली जाते, "आज शुक्रवार आहे, एक्स्लन्सी."

"अं? काय ? काय म्हणता ?" एकाग्रचित्त होऊन तो थोर माणूस त्याला पुन्हा विचारतो.

"आज शुक्रवार आहे, युवर एक्स्लन्सी."

"अं? काय ? शुक्रवार म्हणजे ? कुठला शुक्रवार?"

"शुक्रवार; आठवड्यातील एक दिवस, युवर एक्स्लन्सी."

"म्हणजे, मला अक्कल शिकवता?"

मत्वी इलिच् उदारमतवादी म्हणून ओळखला जात असला तरी, शेवटी तोही वरिष्ठ अधिकारीच.

"माझे ऐक, अर्कादी, तू राज्यपालांकडे जा आणि त्यांची भेट घे," तो अर्कादीला म्हणाला; "वरिष्ठांना आदर दाखविण्यासाठी त्यांची भेट घेणे अगत्याचे असते या जुन्या रुढीनुसार मी तुला हा सल्ला देतो आहे असे नाही, तर राज्यपाल एक खरेच उमदा माणूस आहे म्हणून; शिवाय इथल्या प्रतिष्ठित समाजातील लोकांशी ओळख करून घेण्याची तुझी इच्छा असेल......तू अगदीच भालू नसावास? आणि परवा त्यांच्याकडे 'बॉल्' आहे."

"तुम्ही असणार का त्या बॉलला?" अर्कादीने विचारले.

"माझ्या सन्मानार्थच ते 'बॉल' देत आहेत," मत्वी इलिच्ने उत्तर दिले; त्यांना त्याची कीव आली. "तुला नृत्य करता येते ना?"

"येते; पण विशेष नाही."

अनुक्रमणिका

"च् च् च्! इथे सुंदर मुली आहेत आणि तुझ्यासारख्या तरुणाला नृत्य येत नाही हे किती लज्जास्पद आहे. अर्थात् मी हे जुन्या रूढ कल्पनानुसार नाही म्हणत; माणसाचे चातुर्य त्याच्या पायात असते असे मला मुळीच म्हणायचे नाही; पण बायरनवाद हाही हास्यास्पद आहे; जर बायरनवाद सर्वकाळ अंगीकारला तर."

"पण काका, बायरनवादाचा पुरस्कर्ता म्हणून नाही मी......"

"मी तुझी इथल्या स्त्रियांशी ओळख करून देईन; मी घेईन तुला माझ्या पंखाखाली," मत्वी इलिच्ने त्याला पुढे बोलूच दिले नाही आणि तो मानभावीपणाने हसला. "तुला ते उबदार वाटेल, काय?"

एका नोकराने प्रवेश केला आणि बादशहाच्या अधिपत्याखालील प्रांतांच्या सुपरिंटेण्डेण्ट आल्याची त्यांनी वर्दी दिली. हे गृहस्थ वृद्ध होते; त्यांचे डोळे मवाळ होते नि त्यांच्या जिवणीभोवती खोल रेषा उमटल्या होत्या; निसर्गावर विशेषतः वसंतऋतूतील दिवसांवर ते अवास्तव खूष असत; त्यावेळी, त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर "प्रत्येक चिमुकली उद्योगी मधमाशी प्रत्येक चिमुकल्या फुलाकडून चिमुकली लाच घेते." अर्कादीने तिथून काढता पाय घेतला.

ते ज्या खानावळीत राहात होते तिथे त्याला बझारव् भेटला; राज्यपालांकडे आपल्याबरोबर येण्यासाठी त्याने त्याला प्रवृत्त करण्यात बराच वेळ गेला. "बरं, गत्यंतर नाही," शेवटी बझारव् म्हणाला, "गोष्टी अर्धवट करण्यात हशील नाही; आपण इथे उमराव-बहाद्दुरांना भेटायला आलो आहोत; चला तर भेटू त्यांना!"

राज्यपालांनी त्यांचे अगत्यपूर्वक स्वागत केले. पण त्यांना बसायला सांगितले नाही; आणि ते स्वतःही बसले नाहीत. त्यांची अखंड धांदल आणि यातायात सुरू होती; सकाळी ते कडक पेहेराव आणि अवास्तव कडक गळपट्टा परिधान करीत असत; खाण्यापिण्याच्या बाबतीत जणू त्यांना पुरेसे कधीच मिळालेले नसावे असे वाटे; सदासर्वदा ते कसली ना कसली तरी व्यवस्था करण्यात गुंतलेले असत. किर्सानव् व बझारव् यांना त्यांनी आपल्या नृत्यसमारंभास निमंत्रित केले आणि काही मिनिटातच दुसऱ्यांदा निमंत्रित केले; त्यांना आपले बंधू मानून, 'किरसानव्' असे संबोधले.

राज्यापालांकडून ते घराकडे परतत असता एका ठेंगू माणसाने त्यांच्या शेजारून चाललेल्या गाडीतून उडी मारली; त्याने स्लाव्होफिल पद्धतीचा राष्ट्रीय पोषाख घातला होता. "एव्गेनी वासिलिइच्!" अशी मोठ्याने हाक मारली आणि तो बझारव्कडे धावला.

"अरे! हेर् सित्निकोफ् वाटतं," फुटपाथवरून चालता चालताच बझारव् म्हणाला; "इकडे कसा काय अचानक आलास तू ?"

"अगदी अचानक खरेच," त्याने उत्तर दिले आणि तो गाडीकडे परत गेला; वारंवार हात हालवत तो मोठ्याने म्हणाला, "या, आमच्या मागे मागे या! माझ्या वडिलांचा इथे व्यापार होता," गटारीवरून उड्या मारत तो पुढे म्हणाला, "म्हणून त्यांनी मला बोलावलं......तू इथे आल्याचे मला आजच समजले आणि तुला भेटायाला आलो होतो......" (त्या मित्रद्वयांना खोलीत परतल्यावर खरेच एक कार्ड मिळाले;

त्याचे कोपरे दुमडलेले होते आणि एका बाजूला फ्रेंच भाषेत आणि दुसऱ्या बाजूला स्लाव भाषेत सितनिकोफ् चे नाव लिहिलेले होते.) “राज्यपालांकडून तर येत नसशील ना तू?”

“नसशील कसला; आम्ही तिकडूनच तडक येत आहोत.”

“अस्स! मग मीही त्यांना भेट देण्यासाठी जाईन...... एव्गेनी वासिलिइच्, मला तुझ्या......ओळख करून दे...... ”

“सित्निकोफ्, किर्सानव्,” चालण्याचे न थांबताच बझारव् पुटपुटला.

“मला फारच आनंद झाला,” मानभावीपणाने हसत आणि बाजूने चालत चालत सित्निकोफ् म्हणाला; त्याने बोलताना तातडीने आपल्या हातातील थोडेसे जादा सुरेख असलेले मोजे काढले. “मी खूप ऐकले आहे......एव्गेनी वासिलिइच्चा मी जुना मित्र आहे......त्याचा शिष्य म्हटले तरी चालेल. माझा पुनर्जन्म ही त्याचीच कृपा.”

बझारव्च्या त्या चेल्याकडे अर्कादीने पाहिले. त्याच्या लहानसर रेखीव चेहेऱ्यावर नाजूक पण आकर्षक रूपलक्षणे होती; आणि त्यावर उत्साह व मतिमंदता असा मिश्र भाव उमटला होता; त्याचे बारीक डोळे खोबणीत घट्ट बसविल्यासारखे दिसत होते; त्याची नजर एकटक पण अस्वस्थ होती; त्यांचे हसणे सुद्धा अस्वस्थ वाटत होते—एक प्रकारचे अपरे, ठोकळेबाज हास्य.

“तुमचा विश्वास बसणार नाही,” तो पुढे म्हणाला, “पण जेव्हा एव्गेनी वासिलिइच्ने मला प्रथम सांगितले की, आपण कुणाचाही अधिकार मान्य करणे योग्य नाही, तेव्हा मी इतका हर्षभरित झालो......जणू माझे डोळे उघडले गेले होते! मला वाटले अखेर खरा माणूस सापडला! बरी आठवण झाली, एव्गेनी वासिलिइच्, इथे एक बाई आहे; तिची ओळख तू करून घेतलीच पाहिजेस; तुला समजण्याची खरोखरच तिची पात्रता आहे; तुझी भेट म्हणजे तिला उत्सवच वाटेल; मला वाटते, तिच्यासंबंधी तू ऐकले असशीलच? ”

“कोण ती?” बझारव्ने अनिच्छेने विचारले.

“कुक्शिना, एव्दोक्सी, एव्दोक्स्या कुक्शिन्. एक विलक्षण बाई आहे ती; खऱ्या अर्थाने ‘विमुक्त,’ पुरोगामी स्त्री. तुला एक सांगू? आपण सर्वजण आताच जाऊ तिच्याकडे. इथेच दोन पावलांवर ती राहाते. तिथेच लंच घेऊ. अजून तुझे जेवण नाही ना झाले?”

“नाही; अजून नाही.”

“छान, उत्तम. नवऱ्याला सोडून ती राहाते; ती कुणावरही अवलंबून नाही.”

“ती देखणी आहे का?” बझारव्ने मध्येच विचारले.

“ना......नाही, तसे नाही म्हणता येणार.”

“मग तिला भेटण्याचा एव्हढा आग्रह का, बाबा?”

“छीः; हा तुझा विनोद झाला......ती आपल्याला शँपेनची बाटली देईल.”

“अस्सं. तुझ्यातल्या व्यवहारी माणसाचे मात्र दर्शन घडले. बरे, मला सांग, तुझे वडील अजून जिन्च्याच धंद्यात आहेत का?”

“होय,” सित्निकोफ् सत्वर म्हणाला आणि त्याला कर्कश हास्याची उकळी फुटली. “मग? येणार ना?”

“काही निश्चित नाही.”

“तुला लोकांना भेटायचे होते, जा ना मग,” अर्कादी खालच्या आवाजात म्हणाला.

“आणि मिस्टर किर्सानव्, तुम्ही येणार ना?”सित्निकोफ्ने विचारले. “तुम्हीही आले पाहिजे; तुम्हाला सोडून आम्ही जाणार नाही.”

“पण आपण एकदम सर्वजण कसे तिच्याकडे जाऊन धडकायचे?”

“त्याची फिकीर नको. कुक्झिना उदार आहे !”

“शँपेनची बाटली मिळेल म्हणतोस?” बझारव्ने विचारले.

“एकच काय, तीन!” सित्निकोफ् ओरडला; “ती माझी जिम्मेदारी.”

“नाहीतर काय देशील?”

“माझे शिर.”

“त्यापेक्षा तुझ्या वडिलांचे पैशाचे पाकिट अधिक बरे. पण आम्ही येतो म्हणा.”

अनुक्रमणिका

१३

एक्स्—शहरातल्या एका रस्त्यावर सामान्य सद्गृहस्थाचे असावे तसे मॅास्को पद्धतीचे घर होते; याच घरात अवदोत्या निकितिश्ना, किंवा एवदोक्स्या कुक्झिन् राहात होती; ते नुकतेच आगीच्या भक्षस्थानी पडले होते; आमच्या भागातील शहरे दर पाच वर्षांनी जळून भस्म होतात हे सर्वश्रूतच आहे. दरवाजावर खिळ्याला अडकविलेले एक तिरके भेटकार्ड होते आणि त्यावरच घंटी वाजविण्यासाठी मूठ होती. हॅालमध्ये प्रवेश केल्यावर टोपी घातलेली एक व्यक्ती सामोरी येत असे; ती व्यक्ती नोकर किंवा सहकारी यांपैकी कुणीच नसावी—या सर्व लक्षणांवरून घरमालकिणीच्या पुढारलेपणाची साक्ष मिळत होती. सित्निकोफ्ने अवदोत्या निकितिश्ना घरी आहे का, याची चौकशी केली.

“कोण? व्हिक्टर का?” लगतच्या खोलीतून कर्कश आवाज आला; “आतच ये.”

ती टोपी घातलेली नौकरानी तात्काळ नाहीशी झाली.

“मी एकटा नाही,” सित्निकोफ् म्हणाला; अर्कादीकडे आणि बझारव्कडे एक झर्रकन कटाक्ष टाकत त्याने झटकन आपला वरकोट काढला. कोटाखाली कोचमन पेहरतात तसले मखमालीचे जाकीट होते;

“काही हरकत नाही.” पुन्हा तोच आवाज. “आत ये.”

ते तरुण आत गेले. ज्या खोलीत त्यानी प्रवेश केला. ती खोली दिवाणखान्यापेक्षा काहीशी कामचलाऊ अभ्यासिकेसारखी वाटली. वृत्तपत्रे, पत्रे, रशियन नियतकालिकांचे लठ्ठ अंक—त्यातले बरेच उघडलेले सुद्धा नव्हते,—धुळीने माखलेल्या टेबलावर अस्ताव्यस्त पडले होते; सिगारेटची पांढरी थोटके तर सगळीकडे विखुरली होती. चामडीने मढविलेल्या सोफ्यावर, तरुण दिसणारी एक स्त्री लवंडली होती. तिचा सुंदर केशसंभार काहीसा विस्कटला होता; तिच्या अंगावर रेशमी गाऊन होता—तोही अव्यवस्थित; तिच्या आखूड हातावर किमती हस्तभूषणे होती आणि डोक्यावर कलाबतू केलेला रुमाल. सोफ्यावरून ती उठली; मखमालीची ओढणी तिने निष्काळजीपणे खांद्यावर ओढून घेतली; ओढणीच्या काठांना पिवळसर लोकर जोडलेली होती; सुस्तपणे ती म्हणाली, “गुड् मॅार्निंग, व्हिक्टर,” आणि तिने सित्निकोफ्-चा हात दाबला.

“बझारव्, किर्सानव्,” बझारव्ची नक्कल करीत त्याने ताबडतोब जाहीर केले.

“बहोत खुश,” मादाम कुक्झिन् म्हणाली. तिने आपले गोल गोल डोळे बझारव्वर रोखले. त्या दोन डोळ्यांमधले तिचे अपरे तांबूस नाक असहाय वाटत होते. “मी तुला ओळखते,” ती म्हणाली आणि तिने त्याचाही हात दाबला.

बझारव्च्या कपाळावर आठ्या पडल्या. या विमुक्त स्त्रीत खरे म्हणजे तिरस्कार वाटावा असे काही नव्हते; पण तिच्या चेहऱ्यावरचा भाव पाहणाऱ्याच्या मनात एक प्रकारची अढी निर्माण करत असे. तिच्याकडे पाहून विचारावेसे वाटे, “तुला काय होतय? भूक लागली आहे? की कंटाळा आला आहे? की लज्जा वाटते

आहे? ही तगमग कशासाठी ?" ती आणि सित्निकोफ् या दोघांच्याही बाबतीत या अस्वस्थेचा प्रत्यय येई. तिचे वागणे पूर्णपणे अनिर्बंध होते; पण त्याचप्रमाणे ती नेहमी अवघडल्यासारखी वाटे; आपण स्वतः सत्प्रवृत्त व साधे आहोत अशी तिची सरळ समजूत होती; पण नेहमी ती ज जे करत असे ते ते तिला करायचे नसावेच, असे इतरांना वाटे; लहान मुले म्हणतात त्याप्रमाणे, तिच्या बाबतची प्रत्येक गोष्ट 'सहेतुक' असे—म्हणजेच साधेसुधेपणानेही नव्हे आणि सहजपणेही नव्हे.

"होय, मी तुला ओळखते, बझारव्," ती पुन्हा म्हणाली. (मॅास्कोमधल्या आणि प्रांतातल्या पुष्कळ स्त्रियांची एक विशिष्ट सवयवच आहे—पुरुषांची ओळख झाल्या दिवसापासून त्यांना त्यांच्या आडनावाने संबोधण्याची सवय तिला होती.)

"सिगार हवी का?"

"सिगार तर पाहिजेच," सित्निकोफ् मध्येच म्हणाला; हा वेळपर्यंत एका आरामखुर्चीत तो लोळत पडला होता आणि हवेत पाय नाचवत होता; "पण आम्हाला जेवण हवे. आम्हाला भयंकर भूक लागली आहे; आणि शँपेनची एखादी लहानशी बाटली पाठवून द्यायला सांग."

"चैनीबाज," एव्दोक्स्याने शेरा मारला आणि ती मोठ्याने हसली. (ती हसत असे तेव्हा तिच्या वरच्या दंतपंक्तीवरील हिरड्या दिसत.) "बझारव्, खरे की नाही? तो चैनीबाज आहे?"

"जीवनातल्या ऐषआरामाचा मी भोक्ता आहे," सित्निकोफ्च्या बोलण्यात प्रौढी होती; "पण त्यामुळे माझ्या उदारमतवादाला बाध येत नाही."

"तसे नाही; बाध येते, जरूर बाध येते!" एवदोक्स्या मोठ्याने म्हणाली. तिने आपल्या नौकरानीला लंच आणि शँपेनबद्दल सूचना मात्र दिल्या.

"तुला काय वाटते यासंबंधी?" बझारव्कडे वळून तिने विचारले. "मला वाटते तू माझ्याशी सहमत आहेस."

"तसेच काही नाही," बझारव्ने उत्तर दिले; "रासायनिकदृष्ट्या सुद्धा मांसाचा एक तुकडा पावाच्या तुकड्यापेक्षा अधिक बरा."

"तू रसायनशास्त्राचा अभ्यास करतोस? माझेही तेच वेड आहे. मी स्वतःच एक प्रकारचे नवीन मिश्रण बनवले आहे."

"नवीन मिश्रण? तू?"

"होय. आणि कशासाठी ठाऊक आहे? बाहुल्यांची डोकी बसविण्यासाठी; म्हणजे ती मोडणार नाहीत. मी किती व्यवहारी आहे पाहा. पण अजून सगळे तयार नाही. मला अजून लायबिग् वाचायचा आहे. बरी आठवण झाली, 'मॅास्को गॅझेट' मधील किस्त्याकव्चा स्त्री-कामगार या विषयावरचा लेख वाचलास

का? जरूर वाच. तुला स्त्रियांच्या प्रश्नांबाबत आत्मियता असावी असे मी समजते? आणि शाळांच्या प्रश्नांबाबत सुद्धा ? तुझा मित्र काय करतो? त्याचे नाव?"

मादाम कुक्झिन् प्रश्नामागून प्रश्न विचारत होती, उत्तराची वाट न पाहता; तिच्या विचारण्यात एक प्रकारचा खोटा बेफिकिरपणा होता; फाजील लाडाने बिघडलेली मुले आपल्या दायांना असेच प्रश्न विचारत असतात.

"माझे नाव अर्कादी निकालाइच किर्सानव्" अर्कादी म्हणाला, "आणि मी निरुद्योगी आहे."

एव्दोक्स्या खिदळली. "किती छान! वा, तू धूम्रपान करीत नाहीस? व्हिक्टर, तुझ्यावर मी फार रागावले आहे."

"का बुवा?"

"जॉर्ज सँडवर तू पुन्हा स्तुतिसुमने उधळतो आहेस असे मला समजले. प्रतिगामी बाई, दुसरे काय आहे तिच्यात? इमर्सनबरोबर तिची तुलना लोक कसे करू शकतात कोण जाणे! शिक्षण, शरीरशास्त्र किंवा इतर कुठल्याही विषयात तिला गम्य नाही. गर्भशास्त्राविषयी तिला काही माहिती नसावी याबद्दल संशय नाही—आणि या काळांत त्याशिवाय कसे चालणार?" (एव्-दोक्स्याने आपले हातसुद्धा हवेत फेकले.) "वाः, एलिस्येविच्ने काय छान लेख लिहिला आहे या विषयावर! अभिजात प्रतिभा असलेला सद्गृहस्थ आहे तो." (एवदोक्स्या 'माणूस' या शब्दाऐवजी 'सद्गृहस्थ' असा शब्द सारखा वापरत होती.) "बझारव्, तू असा माझ्या बाजूला सोफ्यावर येऊन बैस. तुला ठाऊक नसेल, पण मला तुझी फार भीती वाटते."

"ते का बुवा? विचारायला हरकत नाही ना?"

"तू एक घातकी सद्गृहस्थ आहेस; अस्सा टीकाखोर आहेस. हाय रे दैवा! किती विचित्र; मी एखाद्या खेडवळ स्त्रीसारखी बडबडते आहे. पण मी एक ग्रामीण स्त्री आहेच म्हणा. माझ्या मालमत्तेवर देखरेख मी स्वतःच करते; आणि गंमत पाहा, माझ्याकडे असलेला बेलीफ इरोफे हा एक निराळ्याच प्रकारचा माणूस आहे; कूपरच्या 'पाथफाईंडरसारखा,' त्याच्यात उत्स्फूर्त असे काही आहे! मी आता इथेच स्थायिक व्हायचे ठरविले आहे; या शहरात राहाणे असह्य आहे, नाही का? पण त्याला उपाय काय? "

"हे शहर इतर शहरांप्रमाणेच आहे," बझारव्ने शांतपणे शेरा मारला.

"इथले सगळेच व्यवहार कसे क्षुद्र आहेत; तेच भयंकर वाटते! दर हिवाळ्यात मी मॉस्कोला जायची......पण कायदेशीर पती श्रीयुत कुक्झिन् आता तिथे राहात असतात. आणि मॉस्को......निदान मला तरी तसे वाटते, आता पूर्वीसारखे राहिले नाही. मी परदेश प्रवासाला जायचा विचार करते आहे; गेल्या वर्षी तर मी निघालेच होते."

"पॅरिसला, होय ना?" बझारव्ने विचारले.

"पॅरिसला, आणि हैडेलबर्गला."

“हैडेलबर्गला कशासाठी?”

“हे काय विचारणे? तिथे ब्यून्सेन आहे ना!” याला बझारव्‌कडे उत्तर नव्हते.

“प्येर सपझ्निकोफ.....त्याची तुझी ओळख आहे?”

“नाही, माझी ओळख नाही.”

“प्येर सपझ्निकोफची ओळख नाही? तो तर सदैव लिदिया हिस्तातव्‌कडेच राहातो.”

“मला तिच्याबद्दलही काही माहिती नाही.”

“छान; आपल्याबरोबर मला न्यायचे त्यानेच ठरविले होते. परमेश्वर कृपेने मी स्वावलंबी आहे; मला मुले नाहीत; काय म्हणाले मी : परमेश्वरकृपा ! पण जाऊ द्या.”

एव्‌दोक्स्याने आपल्या बोटांनी एक सिगरेटची गुंडाळी तयार केली; तिची बोटे तंबाखूच्या डागाने तांबट झाली होती; मग ती सिगरेट जिभेवर टेकवून तोंडात ओढली आणि तिने धूम्रपान सुरू केले. नौकरानी एक ट्रे घेऊन आत आली.

“वाः, हे पाहा जेवण! तुम्हा लोकांना जेवणाआधी क्षुधाचेतक काही हवे का? व्हिक्टर, ती बाटली उघड, ते तुझ्या सवयीचे आहे. ”

“होय, ते माझ्या वळणातले आहे खरे,” सितनिकोफ् पुटपुटला आणि पुन्हा एकदा हिसके बसल्यासारखे तो हसू लागला.

“इकडे देखण्या स्त्रिया आहेत?” तिसरा प्याला रिकामा करत बझारव्‌ने विचारले.

“होय, आहेत,” एवदोक्स्याने उत्तर दिले; “पण त्या सगळ्या रेम्या डोक्याच्या आहेत. माझी मैत्रीण, उदाहरणार्थ. अदिनत्सवा दिसायला सुंदर आहे. आता तिचे चारित्र्य संशयास्पद आहे हे खरे......अर्थात ते महत्त्वाचे नाही; पण तिला काही स्वतंत्र मते नाहीत, उदारता नाही......यातले काही नाही. आपली सबंध शिक्षण-पद्धतीच बदलली पाहिजे. मी यावर खूप विचार केला आहे; आमच्या स्त्रियांचे शिक्षण फारच निकृष्ट प्रतीचे आहे.”

“त्यांच्या बाबतीत काहीच करण्यासारखे नाही,” सित्‌निकोफ् मध्येच म्हणाला; “कुणालाही त्यांच्याविषयी तुच्छताच वाटेल; मी तर त्यांना पूर्ण आणि संपूर्ण तुच्छ मानतो!” (कुणाविषयी तरी तुच्छतेची भावना बाळगणे आणि ती व्यक्त करण्याची संधी मिळणे ही एक सितनिकोफ्‌ची सुखद अनुभूती होती; स्त्रियांवर त्याचा विशेष रोख होता. पण त्या बिचाऱ्याला संशयसुद्धा आला नाही की, काही महिन्यांतच आपल्या बायकोची हांजीहांजी करण्याचे त्याच्या नशिबात होते—केवळ ती दुर्दोलेअसव घरा ण्यात

'प्रिन्सेस' म्हणून जन्माला आलेली होती म्हणून.) "त्यांच्यातील एकीचीसुद्धा आमचे बोलणे समजण्याची लायकी नाही; आपल्यासारख्या प्रौढ पुरुषांनी जिच्याबद्दल काही बोलावे अशी एकही नाही!"

"पण आमचे संभाषण त्यांना समजण्याची काडीइतकीही जरुरी नाही." बझारव्ने आपले मत मांडले.

"कुणाबद्दल म्हणतोस तू?" एवदोक्स्याने विचारले.

"सुंदर स्त्रियांबद्दल."

"म्हणजे? प्रूधाँचे विचार तुला पटतात तर ?"

बझारव् बढाईखोरपणे ताठ बसला. "मी कुणाचेही विचार स्वीकारत नाही; माझे विचार माझे स्वतःचे असतात."

"सर्व अधिकारी व्यक्तींचा धिक्कार असो!" सित्निकोफ् ओरडला; गुलामी वृत्तीने तो ज्याचा गौरव करत असे, त्याच्यासमोर धाडसाने आपल्याला बोलायला मिळाल्याबद्दल तो हर्षभरित झाला होता.

"पण मेकॉलेसुद्धा...... " मादाम कुकझिन् बोलायला सुरवात करणार इतक्यात......

"मेकॉलेचा धिक्कार," सित्निकोफ् गरजला. "त्या मूर्ख बायांचा तुम्ही कैवार घेणार?"

"मूर्ख बायांचा नव्हे......पण स्त्रियांच्या हक्करक्षणासाठी रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत झगडण्याचे मी व्रत घेतले आहे."

"धिक्कार!" इथे मात्र सित्निकोफ् थांबला."पण मी ते नाकारत नाही त्यांना," तो म्हणाला.

"नाही; पण तू स्लाव्होफिल् आहेस हे मला ठाऊक आहे."

"नाही; मी स्लाव्होफिल् नाही; पण, अर्थातच...... "

"नाही, नाही, नाही! तू स्लाव्होफिल् आहेसच. पितृसत्ताक हुकूमशाहीचा तू पुरस्कर्ता आहेस. तुला तुझ्या हातात नेहमी चाबूक हवा !"

"चाबूक ही एक उत्कृष्ट वस्तू आहे." बझारव् म्हणाला, "पण आपण शेवटच्या थेंबापर्यंत येऊन ठेपलो आहोत."

"कशाच्या?" एव्दोक्स्याने विचारले.

"शॅम्पेनच्या, पूज्य अवदोत्या निकितिश्ना, तुझ्या रक्ताच्या नव्हे, शॅम्पेनच्या."

अनुक्रमणिका

“स्त्रियांवर हल्ला झाला तर ते मी कधीच शांतपणे ऐकून घेणार नाही,” एव्दोक्स्या ठामपणे म्हणाली. “भयंकर, फारच भयंकर. त्यांच्यावर टीकेची झोड उठविण्याऐवजी तू मिशेलेटचे ‘De l’amour’ वाच. फारच उत्तम आहे ते! सद्‌गृहस्थहो, आपण आता प्रेमावर चर्चा करू,” एवदोक्स्या पुढे म्हणाली आणि सोफ्यावरच्या चुरगाळलेल्या गादीवर तिचा हात सुस्तपणे विसावला.

थोडा वेळ अचानक सगळे शांत होते. “छे, प्रेमाविषयी कशाला बोलायला हवे?” बझारव् म्हणाला, “पण आत्ताच तू कुणी मादाम अदिन्त्सवा या नावाचा उल्लेख केलास; तेच नाव ना? कोण आहे ती?”

“मोहक, मारू आहे ती!” सित्निकोफ् बरळला. “मी ओळख करून देतो तिची. हुशार, श्रीमंत आणि विधवा. आता ती तितकी पुढारलेली नाही, हे बरीक खरे; एवदोक्स्याशी तिचे संबंध वाढले पाहिजेत. एवदोक्शी, तुझ्या आरोग्याप्रीत्यर्थ मी पितो! प्याल्याला प्याला किणकिणुदे ! टिण्......टिण्......टिण्......टिण्!!! ”

“व्हिक्टर, तू बहकला आहेस.”

जेवण असेच बराच वेळ लांबले. पहिल्या शँम्पेनच्या बाटलीनंतर दुसरी, तिसरी आणि चवथीही रिकामी झाली. एवदोक्स्या अनिर्बंधपणे बडबड करत होती; सित्निकोफ् तिला साथ देत होता. विवाह हा पक्षपात आहे की गुन्हा, सर्व माणस जन्मतःच समान असतात की नाही, आणि व्यक्तिमत्त्व म्हणतात ते निश्चित कशात असते इत्यादी विषयांवर दीर्घकाल चर्चा चालू होती. शेवटी एवदोक्स्यांची पाळी आली; मद्यसेवनाने ती लालबुंद झाली होती; आपल्या पसरट बोटांनी तिने बदसूर पियानो वाजवायला सुरवात केली; आणि आपल्या घोगऱ्या आवाजात, प्रथम काही जिप्सी गाणी गाऊ लागली; नंतर सेमूर शिफ्‌चे ‘ग्रॅनाडा लाइज् स्लम्बरिंग’ हे गाणे म्हटले; सित्निकोफ्‌ने आपल्या डोक्याभोवती एक स्कार्फ गुंडाळला आणि पुढील ओळी म्हटल्या जात असता मरणोन्मुख प्रियकराची नक्कल केली :

“तुझे नि माझे ओष्ठद्वय ते;
चुंबनिदाहक ग्रंथीत होते,”

अर्कादीच्या सहनशीलतेने मर्यादा गाठली. “सज्जन हो, या घराला थोड पागलखान्याचे स्वरूप येते आहे,” तो मोठ्याने म्हणाला. बझारव्‌ने आतापर्यंत संभाषणात एखादा व्याजोक्तीपूर्ण शेरा मारण्यापलीकडे विशेष भाग घेतला नव्हता—त्याने आपले सर्व लक्ष शॅम्पेनवर केंद्रित केले होते—त्याने एक मोठी जांभई दिली आणि तो उठला; यजमानीणबाईचा निरोपसुद्धा न घेता अकार्दीबरोबर तडक बाहेर पडला. सित् निकोफ्‌ने उडी मारली आणि तोही त्यांच्या मागून गेला.

“कशी काय वाटली तुला ती?” खुशामत केल्यासारखे एकदा त्यांच्या उजव्या, एकदा डाव्या बाजूला उड्या मारत त्याने विचारले. “मी सांगितलेच होते तुला, विलक्षण व्यक्तिमत्त्व! हिच्यासारख्या इतर स्त्रिया असत्या तर! तिच्या पद्धतीने ती एका उच्च नीतिमत्तेचा नमुना आहे. ”

“आणि ती समोरची संस्था तुझ्या राज्यपालाच्या उच्च नीतिमत्तेची नमुना वाटते?” ते एका जिन्‌च्या गुत्त्याजवळून जात होते, तिकडे बोट दाखवून बझारव्‌ने विचारले.

अनुक्रमणिका

सित्निकोफ्ला पुन्हा शरीराला हासडे देत हसण्याचा उमाळा फुटला. आपल्या कुळाबद्दल त्याला विलक्षण शरम वाटे; त्यामुळे बझारव्ने दाखविलेल्या अनपेक्षित जवळिकीने आपली स्तुती होते आहे की निंदा, हे त्याला समजले नाही.

अनुक्रमणिका

काही दिवसांनी राज्यपालांकडचा नृत्यसमारंभ पार पडला. मत्वी इलिच् हाच खरा त्या समारंभाचा नायक होता. उमरावबहाद्दुरांच्या मार्शलने जाहीरपणे सांगितले की, तो केवळ मत्वी इलिच्चा मान राखण्यासाठी हजर झाला होता; आणि स्वतः राज्यपाल 'बॅाल' च्या वेळी एके ठिकाणी पूर्ण निश्चल उभे होते, तरीही 'व्यवस्थापनाची देखरेख' करण्यात गुंतल्यासारखे वाटत होते. मत्वी इलिच्च्या वागण्यातील अगत्य हे त्याच्या उच्च दर्जाला शोभण्यासारखेच होते. सर्वांशी तो आपुलकीने वागत होता; काही जणांशी वागण्यात मात्र त्याच्या मनातील किंचित तिरस्काराची छटा, तर इतर काही जणांच्यासंबंधी किंचित आदराची छटा जाणवत होती. स्त्रियांच्या समोर तर तो अभिवादनाची आणि स्मितहास्याची खैरात करत होता; एखाद्या खऱ्या फ्रेंच सरदाराप्रमाणे; उच्च अधिकाऱ्याला शोभेलसे हास्य अखंडपणे उधळत होता—उत्साहपूर्ण, खळखळणारे हास्य; पण त्या हास्यात इतर कुणीच सहभागी होण्याची शक्यता नव्हती. अर्कादीच्या पाठीवर त्याने थाप मारली आणि त्याला मोठ्याने हाक मारली "माझ्या पुतण्या;" बझारव्कडेही जाता जाता एक दृष्टिक्षेप टाकून त्याच्यावर अनुग्रह केला—बझारव्ने काहीसा जुनाट, संध्याकाळी पेहेरायचा कोट घातला होता—एकदा अस्फुट पण प्रेमळपणे रेंकल्यासारखा आवाज काढला; की ज्या मधून "मी......" आणि "खूप खूप" एवढेच शब्द ओळखता येत होते. सित्निकोफ्पुढे स्मितपूर्वक बोट पुढे केले—पण त्यावेळी त्याची नजर दुसरीकडेच वळलेली होती; मादाम कुकझिन्ला सुद्धा तो "भारून टाकणारे सौंदर्य " म्हणाला; वास्तविक तिचे हातमोजे मळकट होते आणि झग्याला क्रिनोलाईनसुद्धा जोडलेले नव्हते; केसात फक्त 'बर्ड ऑफ पॅराडाईज' माळले होते. माणसांचे घोळके जमले होते; आणि त्यांत नृत्य करणाऱ्यांचा तुटवडा नव्हता; मुलकी अधिकारी सर्वसाधारणपणे भिंतीजवळ उभे होते; पण सैन्याधिकारी मात्र चिकाटीने नृत्य करत होते; विशेषतः त्यांच्यातला एकजण पॅरिसमध्ये सहा आठवडे राहून आलेला होता आणि अनेक "झट्", "आह, किश्ट्र", "श, श", "मॅान् बिबी" अशासारखे धाडशी उद्गार शिकून घेतले होते. त्यांचा उच्चार तो शक्यतो पूर्ण बरोबर करत असे; त्यात पॅरिसपद्धतीची ऐट होती; फ्रेंचमध्ये तो "मी तसे केले असते तर," या ऐवजी "मी तसे करायचे योजले असते तर," असे तो म्हणे. खरे म्हणजे तो त्या विशिष्ट रशियन-फ्रेंच अशा धेडगुजरी भाषेत आपले विचार व्यक्त करायचा. फ्रेंच लोक अशा बोलण्याची थट्टा करतात; पण खरे म्हणजे फ्रेंच भाषा आम्ही अगदी देवदूतांप्रमाणे बोलावी अशी त्यांनी आपली समजूत करून घेण्याचे काही कारण नाही; "जणू आम्ही देवदूत असल्यासारखे," 'मऊ मेणाहुनी' देवदूतासारखे.

अर्कादी अपेक्षेप्रमाणे वाईट रीतीने नृत्य करत होता; तर बझारव्ने मुळीच नृत्य केले नाही; ते दोघे एका कोपऱ्यात जाऊन उभे राहिले; सित्निकोफ्ने स्वतःला त्यांच्यावर लादले; त्याच्या चेहेऱ्यावर कुत्सित तिरस्काराचा भाव होता; तो सारखा द्वेषमूलक शेरे मारत होता; आजूबाजूला तुसडेपणाने पाहात होता; पण खरे म्हणजे खुश होता. एकाएकी त्याच्या चेहेऱ्यावरचा भाव बदलला आणि अर्कादीकडे वळून, थोडे गडबडून गेल्यासारखे दाखवून, तो म्हणाला, "अदिन्त्सवा आली!"

अर्कादीने भोवताली पाहिले आणि एक काळा पोषाख परिधान केलेली उंच स्त्री खोलीच्या दरवाजात उभी असलेली त्याला दिसली. तिच्या हालचालीतील आदब पाहून तो प्रभावित झाला. तिचे उघडे बाहू तिच्या कृशकटीच्या बाजूला आकर्षकपणे विसावले होते. तिच्या केसांत माळलेले फुशियाचे मृदू गेंद डौलाने तिच्या निमुळत्या स्कंधांवर ओघळले होते; तिचे स्वच्छ डोळे किंचित पुढे आलेल्या भुवयांखालून पाहात होते—त्यात प्रशांततेची आणि बौद्धिक चमक दिसून येत होती;— प्रशांततेचीच, सचिंततेची नव्हे—

आणि तिच्या ओठावर अस्फुट स्मित विलसत होते. तिच्या चेहेऱ्याच्या सबंध ठेवणीतच एक प्रकारचा सौंदर्यपूर्ण आणि नाजूक प्रभाव जाणवत होता.

"तुझी ओळख आहे तिच्याशी?" अर्कादीने सित्निकोफ्ला विचारले.

"घनिष्ठ. तुझी ओळख करून देऊ?"

"कृपया......या चौजोडप्यांच्या नृत्यानंतर."

बझारव्चेही लक्ष मादाम अदिन्त्सवाकडे वेधले गेले होते.

"आहे खरी एक वेधक पुतळी," त्याने शेरा मारला. "इतर बायांहून वेगळी."

तो नृत्यप्रकार संपेपर्यंत थांबल्यानंतर सित्निकोफ्ने अर्कादीला मादाम अदिन्त्सवाकडे नेले; पण तिच्याशी त्याचा घनिष्ठ परिचय होता असे काही दिसले नाही; बोलताना त्याची वाक्ये अडखळत होती आणि ती त्याच्याकडे विस्मयाने पाहात होती. पण अर्कादीचे आडनाव ऐकल्यावर मात्र तिच्या चेहेऱ्यावर प्रसन्नता उमटली. निकिलाय पित्रोविच्चा तर तो मुलगा नव्हेना ? तिने अर्कादीला विचारले.

"होय."

"तुझ्या वडिलांशी माझी दोन वेळा भेट झालेली आहे; खूप ऐकले आहे मी त्यांच्याविषयी," ती पुढे म्हणाली; "तुझा परिचय झाला याचा मला आनंद वाटतो."

त्याच क्षणी एका ॲडजूटांटने तिच्याकडे झेप घेतली आणि एक 'क्वाड्रिल' नाचण्यासाठी त्याने तिची विनवणी केली. तिने मान्यता दिली.

"तुम्ही नृत्य करता तर?" अर्कादीने आदरपूर्वक विचारले.

"होय, मी नृत्य करते. मी नृत्य करत नाही असे तुला का वाटले? मी फार वयस्कर आहे असे तुला वाटते?"

"छे, छे; मी तसे म्हणणे कसे शक्य......पण तसे असेल तर माझ्याबरोबर 'माझूर्का' नाचण्याची मी विनंती करणार आहे."

मादाम अदिन्त्सवा प्रेमळपणे हसली. "अलबत," ती म्हणाली आणि तिने अर्कादीकडे पाहिले; त्या पाहण्यात श्रेष्ठकनिष्ठतेचा भाव नव्हता, तर विवाहित बहिणीने आपल्या धाकट्या भावाकडे पाहावे त्या नजरेने तिने त्याच्याकडे पाहिले. मादाम अदिन्त्सवा अर्कादीपेक्षा वयाने अधिक होती—एकोणत्तीस वय होते तिचे—तिच्या सांनिध्यात आपण एक शाळकरी मुलगा आहोत, एक छोटा विद्यार्थी आहोत असे त्याला वाटले; आणि म्हणून दोघांच्या वयातील अंतर विशेष महत्त्वाचे वाटले. मत्वी इलिच् तिच्याशी मोठ्या

रुबाबात आणि गोडीगुलाबीचे भाषण करत गेला. अर्कादी दूर झाला; पण दुरून त्यांच्याकडे पाहात राहिला; चौजोडप्यांचा नाच चाललेला होता तेव्हासुद्धा तिच्यावर खिळलेली नजर त्याला दुसरीकडे वळविणे अशक्य झाले. नृत्यातील जोडीदाराशी आणि उच्च अधिकाऱ्यांशी ती सारख्याच सहजतेने बोलत होती; मधूनच तिने आपली मान व डोळे सौम्यपणे वळविले आणि दोनदा मधुर हास्य केले. सगळ्या रशियनांच्या नाकांप्रमाणे तिची नासिका किंचित जाड होती; तिची कांती पूर्णपणे नितळ नव्हती; पण तरीही इतकी आकर्षक स्त्री आपल्याला पूर्वी कधीच भेटली नव्हती हे मात्र त्याला निश्चितपणे जाणवले. तिचा आवाज त्याच्या कानात घुमून राहिला होता; तिच्या पोषाखावरच्या घड्यासुद्धा तिच्या शरीरावर आकर्षकपणे व प्रशस्तपणे शोभून दिसत होत्या; तशा त्या इतर स्त्रियांवर दिसल्या नसत्या;—तिच्या हालचालींत एक प्रकारचे मार्दव होते, सुलभता होती; त्यामुळे त्या उठून दिसत.

'माझूर्का' नृत्याचे वाद्यसंगीत सुरू झाल्यावर अर्कादी मनातून संकोचला आणि नृत्यात सहभागी न होता तो आपल्या नृत्यातील साथीदाराजवळ नुसताच उभा राहिला; तिच्याबरोबर संभाषण करण्याची त्याने तयारी केलेली होती; पण प्रत्यक्ष बोलताना मात्र त्याला एकही शब्द सुचत नव्हता; तो नुसताच आपल्या केसांतून बोटे फिरवत राहिला. पण त्याचा संकोच आणि गोंधळ फार वेळ टिकले नाहीत; मादाम अदिन्त्सवाच्या शांत मनोवृत्तीचा त्याच्यावरही पगडा बसला; आणि पंधरा मिनिटांतच तो तिला आपल्या वडिलांसंबंधी, काकासंबंधी आणि पिट्स्बर्ग व खेड्यातील जीवनाविषयी मोकळेपणाने माहिती सांगू लागला; मादाम अदिन्त्सवा सौजन्यपूर्ण सहानुभूतीने ऐकत होती; मधूनच आपल्या पंख्याची किंचित उघडझाक करत होती; तिच्याशी नृत्य करण्यासाठी साथीदार आल्यानंतर मात्र त्याचे बोलणे मध्येच तुटले; इतरांप्रमाणे सित्निकोफ्नेही दोनदा तिला नृत्यासाठी विचारले. ती पुन्हा परत येऊन आपल्या जागेवर स्थानापन्न झाली आणि तिने पंखा उचलला; तिचे श्वसन देखील अधिक जलद होत नव्हते, तोच अर्कादीने पुन्हा आपली बडबड सुरू केली; तिच्या सांनिध्यात असल्याचा आनंद, तिच्याशी संभाषण करण्याचा आनंद त्याच्या रोमरोमांत भरून राहिला होता; तिच्या डोळ्यांकडे, लोभस कपोलाकडे आणि तिच्या गोंडस, भव्य, चतुर मुखमंडलाकडे पाहाताना तो हरखून गेला होता. ती मोजकेच बोलत, होती; पण तिच्या शब्दांत तिचे जीवनाबद्दलचे ज्ञान प्रतीत होत होते; तिच्या काही उद्‌गारांवरून अर्कादीला जाणवले की, या तरुण स्त्रीने खूप अनुभवले असले पाहिजे, खूप खोलवर विचार केला असला पाहिजे......

"तुझ्याजवळ ते दुसरे कोण उभे होते?" तिने त्याला प्रश्न केला, "ज्यावेळी सित्निकोफ् तुला माझ्याकडे घेऊन आला, त्यावेळी?"

"तुम्ही पाहिलं त्याला?" अर्कादीने प्रतिप्रश्न केला. "त्याचा चेहरा तेजस्वी आहे, नाही? त्याचे नाव बझारव्, माझा मित्र."

अर्कादी मग 'त्याच्या मित्रासंबंधीच' बोलण्यात गुरफटला. तो त्याच्या प्रत्येक गोष्टीविषयी इतक्या उत्साहाने बोलत होता की, मादाम अदिन्त्सवाने आपली नजर त्याच्याकडेच वळवली आणि ती त्याच्याकडे एकटक पाहात राहिली. दरम्यान 'माझूर्का' नृत्याचा शेवट जवळ आलेला होता. आपल्या साथीदारापासून दूर व्हायचे अर्कादीच्या जीवावर आले; जवळ जवळ तासभर तिच्या सुखद सहवासात तो रमला होता! आता हे खरे की, हा वेळपर्यंत ती त्याच्यावर जणू आपल्या उच्चस्थानावरून अनुग्रहच करते आहे असे त्याला वाटले आणि त्याबद्दल त्याने तिच्याशी कृतज्ञ राहिले पाहिजे......पण तरुण हृदयांना असल्या भावनेचा काच जाणवत नसावा.

अनुक्रमणिका

संगीत थांबले. “सुटले,” मादाम अदिन्त्सवा उठत म्हणाली. “मला भेटायला यायचे कबूल केले आहेस तू; तुझ्या मित्राला घेऊन ये तुझ्याबरोबर. ज्या माणसाने आपली कशावरही श्रद्धा नाही असे म्हणण्याचे धाष्टर्य दाखविले आहे, त्या व्यक्तीला भेटण्याची मला फार जिज्ञासा आहे.”

नंतर राज्यपाल मादाम अदिन्त्सवाला सामोरे गेले; त्यांनी भोजन तयार असल्याचे घोषित केले आणि चिंताक्रांत चेहेऱ्याने तिला नेण्यासाठी हात पुढे केला. तिथून जाताना मागे वळून अर्कादीकडे पाहून तिने अखेरचे स्मित केले व अभिवादन केले. त्यानेही खाली वाकून अभिवादन केले; आणि तो तिच्या आकृतीकडे पाहात राहिला (काळ्या रेशमी पोषाखाच्या करड्या धूसर चमकदारपणात नटलेला तिचा देह किती कमनीय दिसत होता!) त्याला वाटले, “यावेळी ती माझे अस्तित्वसुद्धा विसरली असेल,” आणि त्याचवेळी त्याच्या मनातील एका विलक्षण सुखद नम्र भावनेची त्याला जाणीव होत होती.

“कसं काय” कोपऱ्यात उभ्या असलेल्या बझारव्‌जवळ जाताक्षणीच त्याने त्याला विचारले. “मजेत वेळ गेला ना? आताच मला एक सद्‌गृहस्थ त्या स्त्रीबद्दल सांगत होता; तो म्हणाला, ‘ती “अगदीच लिलिचं फूल नाही!”’ पण मला वाटते तो खुळचट असला पाहिजे; तुला तिच्याबद्दल काय वाटते, कोण आहे ती? ती अगदीच लिलिचं फूल नाही काय?”

“तिच्यासंबंधीची ही व्याख्या काही माझ्या नीटशी ध्यानात आली नाही,” अर्कादीने उत्तर दिले.

“वाः! किती निरागस!”

“तसे असेल तर, तू ज्या गृहस्थांच्या उद्‌गारांचा उल्लेख आता केलास त्याचा अर्थ मला नीटसा कळला नाही असे समज. मादाम अदिन्त्सवा अतिशय गोड स्वभावाची आहे, हे निःसंशय; पण तिच्या वागण्यात इतका थंडपणा आणि तुटकपणा आहे की......”

“निश्चल जलाशय......समजले!” बझारव् म्हणाला. “त्यामुळेच अशा गोष्टींना खमंगपणा येतो. मला वाटते तुला बर्फाचे खडे आवडत असावेत?”

“कदाचित,” अर्कादी पुटपुटला. “त्याबद्दल मला काही म्हणायचे नाही. तिला तुझा परिचय करून घ्यायचा आहे आणि तिच्याकडे तुला घेऊन येण्यासाठी तिने मला सांगितले आहे.”

“तू तिला माझ्याबद्दल काय सांगितले असशील याची मी कल्पना करू शकतो! पण एक बरे केलेस. मला घेऊन चल. ती कोणीही असो—प्रांतातील एक सिंहीण असो अगर कुक्झिनाच्या पठडीतील ‘पुढारलेली’ असो—तिच्याजवळ दोन सुंदर खांदे आहेत एवढे पुरे; असे खांदे मी बऱ्याच दिवसांत पाहिलेले नाहीत.”

बझारव्‌च्या या माणूसघाण्या वृत्तीमुळे अर्कादी दुखावला गेला; पण नेहमीप्रमाणे त्याने आपल्या मित्राचा—त्याच्या न आवडणाऱ्या गोष्टीबद्दलच अगदी निषेध केला असे नाही.

“स्त्रियांना स्वतंत्र विचार करण्याचा अधिकार तू का नाकारतोस?” त्याने सौम्य स्वरात विचारले.

“कारण, माझ्या मित्रा, माझ्या पाहणीप्रमाणे तरी केवळ कुरूप स्त्रियाच स्वतंत्र विचारसरणीच्या स्त्रिया असू शकतात.”

एव्हढ्यावर तो संवाद थांबला. भोजनानंतर ते दोघे तरुण तडक बाहेर पडले. मादाम कुक्‌झिन्‌च्या नाराज, कुत्सित पण काहीशा म्लान अशा हास्याने त्यांचा किंचित्काल पाठपुरावा केला; त्या दोघांपैकी कुणीच तिच्याकडे लक्ष न दिल्याने तिचा स्वाभिमान दुखावला गेला होता. त्या नृत्यसमारंभाला ती उशीरपर्यंत थांबली आणि पहाटे चारच्या सुमाराला ती सित्‌निकोफ्-बरोबर पॅरिसमधल्या पद्धतीप्रमाणे ‘पोल्का-माझूर्का’ नृत्य करीत होती. राज्यपालांनी दिलेल्या ‘बॉल’ चे हे सर्वांत शेवटचे उद्‌बोधक असे दृश्य होते.

अनुक्रमणिका

"सस्तन प्राण्यांच्या कुठल्या जातीतील हा नमुना आहे ते तरी पाहू," मादाम अदिन्त्सवा ज्या अतिथिगृहात राहात होती तिचे जिना चढून वर जाताना बझारव् अर्कादीला म्हणाला. "इथे काहीतरी चुकल्या चुकल्यासारखे वाटते आहे."

"मला तुझे नवल वाटते!" अर्कादी मोठ्याने म्हणाला. "तू, तू, बझारव्, नैतिकतेच्या संकुचित कल्पनांना चिकटून......"

"मला तुझी गंमत वाटते!" त्याला पुढे बोलू न देता बझारव् निष्काळजीपणे म्हणाला. "तुला ठाऊक नाही काय की, माझ्या भाषेत, माझ्यापुरते तरी, 'काहीतरी चुकल्यासारखे' याचा अर्थ 'काहीतरी बरोबर' असा असतो? अर्थात हे माझ्या फायद्याचेच असते. तिने आपले लग्न विचित्र पद्धतीने केले आहे असे तूच नाही का सकाळी मला सांगितलेस? अर्थात् श्रीमंत माणसाशी विवाह करणे यात विचित्र काहीच नाही असे माझे मत आहे; उलट ते शहाणपणाचे आहे. गावगप्पांवर माझा विश्वास नाही; पण आपले सुसंस्कृत राज्यपाल म्हणतात त्याप्रमाणे या गावगप्पांना भक्कम आधार असावा असे आपले मला वाटते."

अर्कादीने उत्तर दिले नाही; त्याने खोलीच्या दारावर टकटक केले. गणवेशातील एका नोकराने दोघांना एका मोठ्या दालनात नेले. रशियातील अतिथी गृहातील सर्व खोल्यांप्रमाणेच ती खोली अगदी अव्यवस्थितपणे सजविली होती. पण तिथे फुले मात्र भरपूर होती. थोड्याच वेळात मादाम अदिन्त्सवा सकाळच्या साध्या वेषात प्रविष्ट झाली. वसंत ऋतूतील सकाळच्या प्रकाशात ती अधिकच तरुण भासत होती. अर्कादीने बझारव्ची ओळख करून दिली आणि बझारव् काहीसा गडबडून गेल्याचे पाहून त्याला मनातून महदाश्चर्य वाटले; मादाम अदिन्त्सवा मात्र अधल्या दिवशीप्रमाणे पूर्ण शांत होती. आपण गोंधळून गेल्याची जाणीव बझारव्ला स्वतःलाच झाली आणि त्यामुळे तो चिडला होता. "उलटाच प्रकार हा!—एका बाईची भीती वाटावी!" त्याच्या मनात आले; आणि अगदी सित्निकोफ्प्रमाणे त्याने आरामखुर्चीत लोळत बडबडायला सुरवात केली; त्याच्या बडबडण्यात ओढून ताणून आणलेली सहजता होती; मादाम अदिन्त्सवाने मात्र आपले निवळ डोळे त्याच्यावर खिळविले होते.

अना सर्गेवना अदिन्त्सवा ही सर्गेव् निकलाएविच् लक्तेव्ची मुलगी. सर्गेव निकलाएविच् लक्तेव् या गृहस्थाची देखणेपणाबद्दल, सट्टबाजपणाबद्दल, जुगारी प्रवृत्तीबद्दल अपकीर्ती होती; पिट्स्बर्ग व मॉस्को या शहरांत पंधरा वर्षे अनिर्बंध जीवन जगून त्यांनी आपले नाव गाजवले आणि अगदी धमाल उडवून दिली होती. पत्यांच्या जुगारात ते पूर्णपणे कंगाल झाले आणि अशा स्थितीत आपल्या खेड्याकडे परतणे त्याना भाग पडले; तिथे लौकरच त्याना मृत्यू आला. आपल्या दोन मुलींना फारच थोडी जायदाद त्यांनी मागे ठेवली. त्यावेळी अना वीस वर्षांची तरुण स्त्री होती; आणि कत्या ही बारा वर्षांची पोरगी होती. त्यांची आई एच्-एस् या सरंजामदार पण दरिद्री घराण्यातील. तिचे पती पिट्स्बर्गमध्ये ऐन बहरात होते त्याच वेळी ती वारली. पित्याच्या मृत्यूनंतर अनाची अवस्था मोठी कठीण झाली. पिट्स्बर्गमध्ये एकप्रकारचे तेजस्वी शिक्षण तिला मिळालेले होते; सांसारिक, आर्थिक विवंचनांना तोंड देण्यासाठी किंवा ग्रामीण भागात अज्ञात जीवन जगण्यासाठी त्या शिक्षणाचा उपयोग नव्हता. आजूबाजूला शेजाऱ्यांशी किंवा खास कुणाशी तिचा परिचय नव्हता; की, कुणाचा सल्ला घ्यायची सोय नव्हती. तिच्या वडिलांचा शेजाऱ्यांशी कुठल्याही प्रकारचा संबंध टाळण्याचाच प्रयत्न असायचा; त्यांना ते आपल्यापरीने तुच्छ लेखत, तर ते त्यांना त्यांच्यापरीने तुच्छ

लेखत. तिने अर्थातच हातपाय गाळले नाहीत; ताबडतोब आपल्या आईच्या एका बहिणीला-प्रिन्सेस अवदोत्या स्तिपानव्ना, एच्-ला बोलाऊन घेतले. ही वयोवृद्ध बाई भलतीच रागीट आणि उर्मट स्वभावाची होती; भाचीच्या घरी एकदा येऊन राहिल्यावर घरातल्या चांगल्या खोल्या तेव्हढ्या स्वतःच्या उपयोगासाठी आपल्याकडे ठेवल्या. सकाळपासून संध्याकाळपर्यंत कुरकुर करीत राहणे आणि शिव्याशाप देणे चालू असे. आपला एकुलता गुलाम नोकर बरोबर घेतल्याखेरीज ती बागेतसुद्धा कधी जात नसे; तो एक तुसड्या मनोवृत्तीचा हुजऱ्या होता; त्याचा फाटका गणवेश हिरवट रंगाचा होता; आणि त्याच्या कडा निळसर होत्या; त्याच्या डोक्यावर एक तिकोनी हॅट असे मावशीच्या सगळ्या लहरी अनाने विनातक्रार सहन केल्या; हळूहळू बहिणीचे. शिक्षण करण्याच्या कामाला ती लागली; आणि या विजनवासात आपले आयुष्य फुकट घालविण्याची कल्पना तिने अखेर स्वीकारल्यासारखे वाटले......पण तिच्या प्रारब्धात निराळेच काही होते. अदिन्त्सवाच्या ती एकदा दृष्टीस पडली. त्यावेळी त्यांचे वय शेहेचाळीस होते; आणि ते खूप श्रीमंत होते; ते तऱ्हेवाईक, विमनस्क मनोवृत्तीचे होते; स्थूल, सुस्त, उदास होते; पण बावळट किंवा दुष्ट प्रवृत्तीचे नव्हते. ते तिच्या प्रेमात पडले आणि त्यांनी तिला मागणी घातली. ती त्यांची पत्नी झाली; सहा वर्षे त्यांनी तिच्याबरोबर संसार केला; आणि मृत्यूसमयी आपली सर्व मालमत्ता तिच्या नावे केली. त्यांच्या मृत्यूनंतर जवळजवळ एक वर्ष अना सर्गेव्ना खेड्यात राहिली; नंतर ती आपल्या बहिणीबरोबर परदेशात गेली; पण फक्त जर्मनीत थांबली. तिला परदेशप्रवासाचा कंटाळा आला आणि ती परत आपल्या आवडत्या निकल्स्कोकडे राहायला आली. हे ठिकाण एक्स्—या शहरापासून अंदाजे तीस मैल अंतरावर होते. तिथे तिचे एक विशाल, अप्रतीम सजविलेले असे घर होते; एक सुंदर बगीचा होता; बागेत वनस्पती संवर्धनाच्या सोयी होत्या; तिच्या मृत पतीने आपले षोक पुरविण्यात पैशाची पर्वा केली नव्हती; अना सर्गेव्ना शहरात क्वचितच जात असे; कामाखेरीज सहसा नाही. आणि त्यावेळीसुद्धा फार दिवस राहात नसे. त्या भागातल्या लोकांमध्ये ती अप्रिय होती; अदिन्त्सवाबरोबर तिचा विवाह झाला त्यावेळी लोकांनी खूप आकांडतांडव केले; तिच्यासंबंधी खोट्यानाट्या वदंता उठल्या. तिच्या वडिलांनी जुगारात ज्या क्लृप्त्या वापरल्या. त्यात म्हणे तिचा हात होता; ती परदेशी गेली त्यालासुद्धा सबळ कारणे होती; आपल्या कर्माची फळे नाहीतर कशी लपून राहणार...... "आलं ना ध्यानात?" या शब्दांनी त्या तिरस्करणीय गावगप्पांचा शेवट होत असे. "ती त्या अग्निदिव्यातून गेलेली आहे," कुणीतरी तिच्याविषयी म्हणे; त्या भागातील कुणी प्रसिद्ध कोटीबाज गृहस्थ मग पुस्ती जोडत असे, "आणि इतर दिव्यातूनही?" हे सर्व बोलणे तिच्या कानावर येई; पण ती त्याकडे दुर्लक्ष करीत असे; स्वतंत्र बाणा आणि दृढनिश्चय हे मोठ्या प्रमाणात तिच्या स्वभावातील गुण होते.

मादाम अदिन्त्सवा आपल्या आरामखुर्चीत मागे रेलून बसलेली होती आणि हात जोडून बझारव्चे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होती. बझारव्ही आपली नेहमीची सवय सोडून खूप बडबड करत होता. आणि आपल्या बोलण्यात तिला गोडी वाटावी असा प्रयत्न करत होता—अर्कादीला हे आणखी एक आश्चर्य. बझारव्चा हेतू साध्य होत होता की नाही याबद्दल त्याची खात्री होईना. अना सर्गेव्नाच्या चेहेऱ्यावरून तरी त्याच्या बोलण्याचा तिच्यावर काय परिणाम होत होता, हे सांगणे कठीण होते. तिच्या चेहेऱ्यावरचा भाव तसाच सात्त्विक व शुद्ध होता; तिचे सुंदर डोळे एकटक नजरेने चमकत होते; पण त्या एकटक नजरेत सौम्यपणा होता. पहिली काही मिनिटे बझारव्च्या अशिष्ट वागणुकीचा तिच्या मनावर प्रतिकूल परिणाम झाला होता; एखाद्या दुर्गंधाने किंवा बेसूर आवाजाने व्हावा तसा; पण तिने ओळखले की, तो बावरून गेला होता; आणि ही गोष्ट तिला स्वतःलाच गौरवास्पद वाटली. बाष्कळ बडबड ऐकण्याची तिला विलक्षण घृणा होती आणि बझारव्वर बाष्कळपणाचा आरोप कुणीच केला नसता. त्या दिवशी अनेक आश्चर्यकारक गोष्टी पाहण्याचे अर्कादीच्या दैवातच होते. मादाम अदिन्त्सवासारख्या प्रगल्भ स्त्रीशी बझारव् आपली मते आणि आपले विचार यांविषयी बोलत राहील अशी अर्कादीची अपेक्षा होती; तिने स्वतःच "कशावरही श्रद्धा नाही

असे म्हणण्याचे धैर्य दाखविणाऱ्या" माणसाचे विचार ऐकण्याची इच्छा दर्शविली होती; पण त्याऐवजी बझारव् वैद्यक, होमिओपाथी आणि वनस्पतीशास्त्र यांवरच बोलत होता. मादाम अदिन्त्सवानेसुद्धा आपला एकांतवासातला वेळ काही फुकट घालविला नव्हता हे प्रत्ययास आले; तिने अनेक उत्कृष्ट ग्रंथांचे वाचन केलेले होते; आणि ती स्वतः उत्कृष्ट रशियन बोलत असे. संभाषणाचा ओघ तिने संगीताकडे वळविला; पण बझारव्ला कलेबद्दल आस्था नाही असे पाहून संभाषणाचा ओघ पुन्हा तिने निर्वेधपणे वनस्पतिशास्त्राकडे वळविला; त्याचवेळी अर्कादी गाण्यांच्या राष्ट्रीय चीजांचे मर्म या विषयावर एक प्रवचनच झोडण्याच्या तयारीत होता; त्याच्याकडे तिने दुर्लक्ष केले. आपल्या धाकट्या भावाशी वागावे तसे मादाम अदिन्त्सवा त्याच्याशी वागत होती; त्याचा सुस्वभाव व तारुण्यसुलभ साधेपणा यांचे तिला कौतुक होते; पण तेव्हढेच. अशा तऱ्हेने निरनिराळ्या विषयांवरील त्यांचे संभाषण जवळजवळ तीन तास मोकळेपणाने चालले होते.

शेवटी ते मित्र उठले आणि निरोप घेऊ लागले. अना सर्गेवनाने त्यांच्याकडे सस्नेह पाहिले आणि आपला सुंदर, गोरा हात त्यांच्यापुढे केला; आणि क्षणभर विचार करून ती त्यांना साशंक पण सस्मित मुद्रेने म्हणाली, "सद्गृहस्थहो, तुम्हाला कंटाळवाणे होण्याची भीती नसेल, तर 'निकल्स्कोला' माझ्याकडे भेटायला या ना."

"उत्तम, अना सर्गेव्ना," अर्कादी मोठ्याने म्हणाला, "मला सर्वोच्च आनंद वाटेल......"

"आणि तुम्ही, मस्यू बझारव्?"

बझारव्ने फक्त अभिवादन केले आणि आणखी एक शेवटचे आश्चर्य अर्कादीसाठी वाढून ठेवले होते; आपला सुहृद चक्क लाजला आहे असे त्याच्या नजरेस पडले.

"मग?" त्याने रस्त्यात त्याला प्रश्न केला; "अजूनही तुझे तसेच मत आहे का......की ती......"

"कुणी सांगावे? तिचे सर्वच कसे यथायोग्य आहे!" बझारव्ने प्रत्युत्तर दिले; आणि थोडे थांबून तो पुढे म्हणाला, "ती ग्रँड-डचेस, राजघराण्यांतील व्यक्ती वाटते. तिच्या मागे लवाजमा आणि डोक्यावर मुकुट तेव्हढा पाहिजे."

"आमच्या ग्रँड-डचेस इतके सफाईदार रशियन बोलत नाहीत," अर्कादीने शेरा मारला.

"तिने सुख दुःख भोगले आहे, दोस्त; आपत्काल म्हणजे काय हे तिने अनुभवले आहे!"

"ती सुस्वरूप आहे एव्हढे खरे," अर्कादीने निर्वाळा दिला.

"किती सुडौल देह आहे तिचा," बझारव् म्हणाला. "विच्छेदन टेबलावर हा देह पाहायला मिळाला तर बहार नाही का होणार!"

"शूऽऽ, एव्गेनी; कृपा करून असे बोलू नको! हे फार मर्यादातिक्रमण होत आहे."

“अच्छा, रागाऊ नको, बच्चू. तिचा देह पहिल्या प्रतीचा आहे, इतकेच मला म्हणायचे आहे. तिच्याकडे राहायला आपण गेलेच पाहिजे.”

“केव्हा?”

“परवाच जायला काही हरकत नाही. इथे तरी काय काम आहे? कुक्झिन्बरोबर शॅम्पेन पीत बसायचे? की तुझ्या त्या मामे भावंडाचे, त्या उदारमतवादी अधिकाऱ्याचे बडबडणे ऐकत बसायचे?......परवाच निघू आपण इथून. बरी आठवण झाली; माझ्या वडिलांचे छोटेसे गावही तिथून फार दूर नाही. हे निकल्स्को एस्—रस्त्यावरच लागते, नाही का?”

“होय.”

“ऑप्टाईम, मग हयगय का? ते काम मूर्ख आणि नीतिमार्तंडांचे ! किती वैभवशाली देहसौष्ठव !”

त्यानंतर तीन दिवसांनी ते दोघे मित्र निकल्स्कोकडे जायला निघाले. दिवस उजळलेला होता, पण ऊष्मा नव्हता; चौकीवर जुंपलेले तुकतुकीत घोडे. झपाट्याने दौडत होते; पळताना त्यांच्या बांधलेल्या, वेणीदार शेपट्या उडत होत्या; अर्कादीने रस्त्याकडे पाहिले आणि अजाणतेपणे तो हसला.

“माझे अभिनंदन कर” बझारव् एकदम मोठ्याने म्हणाला, “आज २२ जून, माझ्या मार्गदर्शक देवतेचा दिवस आहे. आपल्यावर आज ती देवता प्रसन्न होते की नाही, ते पाहू. घरी आज माझी मार्गप्रतीक्षा करीत असतील,” त्याचा आवाज किंचित पडला......“करू देत मार्गप्रतीक्षा......त्यात काय एव्हढे?”

अनुक्रमणिका

१६

अना सर्गेव्ना राहात असलेली हवेली एका उजाड टेकडीवर बांधलेली होती. काही अंतरावरच एक पिवळ्या दगडीबांधकामाचे प्रार्थनामंदिर होते; त्याच्यावर हिरवे छप्पर व पांढरे खांब होते; आणि मुख्य प्रवेशद्वाराच्या वरच्या भागावर "ख्रिस्ताचे पुनरुत्थान" हा भाग इटालीयन शैलीत कोरलेला होता. चित्राच्या अग्रभागी एक काळाकभिन्न शिरस्त्राणधारी योद्धा पसरलेला होता; त्याच्या गोलंकार आकृतीमुळे तो अधिकच ठळक दिसत होता. प्रार्थनामंदिराच्या मागे दोन रांगांत विभागलेले खेडे वसले होते; धाब्याच्या छपरांमधून डोकावणारी धुराडी मधूनच दिसत होती. गावच्या जमिनदाराचे घर प्रार्थनामंदिराच्या शैलीत बांधलेले होते; अलेक्झांडरकालीन स्थापत्यशैली म्हणून ही शैली आपल्याकडे ओळखली जाते. ते घरही पिवळ्या रंगाने रंगविले होते; तसेच त्याला हिरवे छप्पर आणि पांढरे खांब होते; घरापुढील ओसरीवरील त्रिकोणात कुलमानद्योतक चिन्ह उभे होते. शिल्पकाने ह्या दोन इमारती ख्रिस्तवासी अदिन्त्सवाच्या संमतीनेच बांधलेल्या होत्या; ते म्हणत त्याप्रमाणे त्यांना निरर्थक आणि अनियंत्रित अशा नवीन कल्पना पसंत नसत. घराच्या आजूबाजूच्या एका पुरातन बागेतील काळपट झाडे दोन्ही बाजूला उभी होती; आणि प्रवेशमार्गाच्या दोन्ही बाजूला छाटलेल्या पाईन वृक्षांची रांग होती.

आमच्या मित्रद्वयांना हॉलमध्ये गणवेशातील दोन हुजरे सामोरे गेले; त्यांच्यापैकी एकाने कारभाऱ्याला बोलावण्यासाठी तात्काळ धूम ठोकली. कारभारी ताबडतोब तिथे येऊन दाखल झाला; तो चांगला धष्टपुष्ट होता. आणि त्याने काळा ड्रेसकोट पेहेरलेला होता. त्याने त्यांना जिन्यावरून एका खास खोलीत नेले; त्या जिन्याच्या पायऱ्या जाड लोकरीने आच्छादलेल्या होत्या; त्यांच्यासाठी खोलीत दोन पलंग आधीच तयार करून ठेवलेले दिसत होते; स्वच्छता-प्रसाधनाचे सर्व साहित्य तिथे उपलब्ध होते. घरातला सर्व कारभार शिस्तबद्ध चालत असे, हे स्पष्ट होते; प्रत्येक वस्तू कशी झकपक होती; मंत्र्यांच्या घरातील स्वागत करण्याच्या खोलीत असतो तसला एक विशिष्ट प्रकारचा सौम्य सुगंध सगळीकडे भरून राहिला होता.

"आपण अर्ध्या तासात भेटायला यावे असा अना सर्गेव्नाचा निरोप आहे," कारभाऱ्याने निवेदन केले; "तोपर्यंत काही हुकूम?"

"हुकूम काही नाही," बझारव्ने उत्तर दिले; "पण कदाचित एक प्याला व्होड्का आणण्याची तसदी घेऊन अनुग्रह कराल का?"

"जरूर, साहेब," कारभारी म्हणाला; त्याचा गोंधळ उडाल्याचे त्याच्या चेहेऱ्यावर दिसत होते; तो मागे वळला; चालताना त्याचे बूट करकरत होते.

"काय 'उच्च रीतीरिवाज'!" बझारव्ने शेरा मारला. "तुम्ही लोक त्याचे असेच वर्णन करता, नाही का? ती ग्रँड-डचेस आहे, म्हणजे हे सर्व आलेच."

"चांगली ग्रँड्-डचेस आहे," अर्कादीने प्रत्युत्तर दिले, "पहिल्याच भेटीत तिने तुझ्या आणि माझ्यासारख्या सरंजामदारांना आपल्याकडे राहाण्यासाठी निमंत्रित केले आहे."

"विशेषतः मला, एका भावी डॉक्टरला, एका डॉक्टरच्या मुलाला, आणि एका प्रार्थनामंदिरातील कारकुनाच्या नातवाला......प्रार्थनामंदिरातील एक 'कारकुनाचा मी नातू आहे हे तुला ठाऊक असेलच? थोर स्पेरान्स्कीप्रमाणे,' किंचितत्काल थांबून बझारव् म्हणाला आणि त्याने आपले ओठ दुमडले. "कसेही असले तरी ती स्वास्थ्यप्रिय आहे; नाही का! आपण रात्रीचा पोषाख चढवायला हवा ना?"

अर्कादीने फक्त खांदे उडविले......पण थोडेसे अवघडल्याची जाणीव त्यालाही झाली होती.

अर्ध्या तासानंतर बझारव् व अर्कादी मिळून दिवाणखान्यात गेले. ती एक मोठी प्रशस्त खोली होती; काहीशी आरामशीरपणे ती सजविलेली होती; पण विशेष अभिरुचीचा तिथे अभाव जाणवत होता. तेथे जाडजूड, किंमती फर्निचर होते; पण भिंतीलगत त्याची रचना मात्र सर्वसामान्य, बेडौल वाटत होती; भिंतीला दालचिनी रंगाचा कागद चिकटविलेला होता आणि त्यावर सोनेरी रंगात फुले काढलेली होती; अदिन्त्सवानी हे फर्निचर मॉस्कोमधल्या आपल्या एका मित्राकडून मागविलेले होते; तो मद्याचा व्यापारी व त्यांचा अडत्याही होता. एका भिंतीवर बरोबर मध्ये, सोफ्याच्या वर, एका गुबगुबीत पण केस विरळ असलेल्या व्यक्तीचे चित्र लटकावलेले होते; आणि ती व्यक्ती जणू भेटायला आलेल्या पाहुण्यांकडे नाराजीने पाहात होती. "हेच ते ख्रिस्तवासी गृहस्थ असतील," अर्कादीजवळ बझारव् कुजबुजला आणि तिरस्काराने म्हणाला, "आपण इथून पळून जाणे इष्ट नाही का?" ......पण त्याच क्षणी यजमानीणबाईने प्रवेश केला. तिने पातळ रेशमी पोषाख केलेला होता; तिचे केस कानांमागे सारखे वळविले होते; त्यामुळे तिच्या नितळ आणि टवटवीत चेहेऱ्यावर लहान मुलीसारखा भाव विलसत होता.

"तुम्ही आपला शब्द पाळला याबद्दल मी तुमची आभारी आहे," तिने सुरवात केली. "काही दिवस तुम्ही इथे राहिले पाहिजे; तसे अगदी वाईट नाही इथे. माझ्या बहिणीशी तुमची ओळख करून देते; ती पियानो छान वाजवते. मस्यू बझारव्, तुमच्या बाबतीत ही क्षुल्लक बाब आहे म्हणा; पण मस्यू किर्सानव्, तुम्हाला संगीताची आवड असावी असे वाटते. माझी बहीण व मी याखेरीज माझ्याबरोबर माझी वृद्ध काकी राहाते आणि आमचे एक शेजारी कधीमधी पत्ते खेळायला येतात; एव्हढाच आमचा गोतावळा. आणि आता आपण सर्व बसू या."

मादाम अदिन्त्सवाच्या या छोट्याशा भाषणात एक विशिष्ट काटेकोरपणा होता; जणू ते तिने पाठ केले होते; मग ती अर्कादीकडे वळली. तिच्या बोलण्यावरून तिच्या आईचा अर्कादीच्या आईशी परिचय होता असे प्रतीत झाले; इतकेच नव्हे तर अर्कादीच्या आईने आपल्या आणि निकालाय पित्रोविच् प्रेम प्रकरणात तिला आपली विश्वासू सखी केले होते. अर्कादीने मग आपल्या मृत आईबद्दल खूप जिव्हाळ्याने बोलण्यास सुरवात केली; बझारव् आल्बमची पाने चाळत बसला होता. "काय मवाळ मांजरीसारखा होत चाललोय मी!" तो स्वतःशीच विचार करत होता.

एक उमदे, ग्रेहाऊंड जातीचे कुत्रे दिवाणखाण्यात पळत आले. त्याच्या गळ्यात निळा पट्टा होता; आपल्या पंजाने ते जमीन उकरत होते; त्याच्या मागोमाग एका अठरा वर्षे वयाच्या तरुणीने प्रवेश केला; तिचे केस काळे होते आणि तिची कांती शामल होती; तिचा चेहरा गोल, लोभस होता आणि डोळे लहान काळेभोर होते. तिच्या हातात फुलांनी भरलेली एक परडी होती.

“ही माझी कत्या,” तिच्याकडे किंचित मान झुकवून मादाम अदिन्त्सवा म्हणाली. कत्याने हलकेच अभिवादन केले; आपल्या बहिणीजवळ जाऊन ती बसली आणि फुले गोळा करू लागली. त्या ग्रेहाऊंडचे नाव फिफी होते; तो दोन्ही पाहुण्यांजवळ जाऊन शेपटी हलवत, त्यांच्या हातात आपले थंडगार नाक खुपसत बसून राहिला.

“सगळी फुले तू स्वतःच वेचलीस?” मादाम अदिन्त्सवाने विचारले.

“होय,” कत्याने उत्तर दिले.

“आंटी चहा घ्यायला खाली येणार आहे ना?”

“होय.”

बोलताना कत्या मोहक हसत असे; तिचे हास्य लाघवी, किंचित भित्रे, निष्कपट वाटे; अशा वेळी भुवयांखालून पाहाताना तिच्या डोळ्यात एक प्रकारचा लबाड करडेपणा जाणवत असे. तिच्या बाबतीतील प्रत्येक गोष्ट ही तिचे यौवन, आणि पोक्तपणाचा अभाव यांची निदर्शक होती; तिचा आवाज आणि तिच्या चेहेऱ्यावरील फुलोरा, तिचे गुलाबी हात आणि शुभ्र तळवे, तिचा किंचित निरुंद बांधा......ती सारखी लाजत होती आणि तिचा श्वासोच्छ्वास वेगाने होत होता.

मादाम अदिन्त्सवा बझारव्‌कडे वळून म्हणाली, “एव्‌गेनी वासिलिइच्, केवळ उपचार म्हणून तुम्ही चित्रे चाळताहात; तुम्हाला त्यात रस वाटत नसावा. इकडे आमच्या जवळ या ना; आपण चर्चा करू कशावर तरी.”

बझारव् थोडासा जवळ गेला. “कुठल्या विषयावर चर्चा करण्याचे आपण योजले आहे?” त्याने विचारले.

“तुम्हाला आवडेल तो. पण सांगून ठेवते, मी फार चिकित्सक बाई आहे.”

“तुम्ही?”

“होय, आश्चर्य वाटते का?”

“कारण माझ्या समजुतीप्रमाणे तुम्ही शांत, थंड प्रकृतीच्या आहात; आणि वाद घालण्यासाठी मनुष्य विकारवश असावा लागतो.”

“तुम्हाला इतक्या अल्पावधीत माझ्यासंबंधी तर्क करता येणे कसे शक्य आहे? प्रथम म्हणजे मी आततायी आणि आडमुठी आहे, कत्याला विचारा; दुसरे असे की, मी सहज वहावत जाते.”

अनुक्रमणिका

बझारव्ने अना सर्गेव्नाकडे पाहिले. “कदाचित; तुम्हालाच ते अधिक ठाऊक म्हणा. तेव्हा तुम्हाला चर्चा करावीशी वाटते—हरकत नाही. तुमच्या या आल्बममध्ये सॅक्सन पर्वतांची चित्रे आहेत, ती मी पाहात होतो; आणि तुम्ही तर शेरा मारला की, मला त्यात गोडी नाही. तुम्हीच तसे म्हणालात, कारण कलेमध्ये मला रस नाही असे तुम्हाला वाटते; आणि ते खरेही आहे; पण भूरचनाशास्त्राच्या दृष्टीकोनातून हे देखावे पाहाण्यात मला रस आहे; उदाहरणार्थ, पर्वतांची रचना......”

“माफ करा. पण भूगर्भशास्त्रज्ञ म्हणून तुम्ही अगोदर त्या विषयावरील स्वतंत्र ग्रंथाकडे वळला असता, एका चित्राकडे नव्हे.”

“या चित्रावरून एका दृष्टीक्षेपात मला दहा पानांत वर्णिलेल्या माहितीचा बोध होतो.”
अना सर्गेव्ना काही वेळ स्तब्ध राहिली.

“तेव्हा कलेसंबंधी तुम्हाला काहीच वाटत नाही तर?” ती म्हणाली;बोलताना तिने आपले कोपर टेबलावर टेकले आणि या तिच्या हालचालीने तिचा चेहेरा बझारव्च्या निकट आला. “पण कलेशिवाय तुमचे कसे काय चालते?”

“का? मला विचारावेसे वाटते की, कलेचे प्रयोजनच काय? ”

“किमान मानवाचा अभ्यास आणि त्याच्यासंबंधी माहिती करून घेण्यासाठी तरी.”

बझारव् हसला. “एक तर, त्यासाठी जीवनानुभव पुरा आहे; आणि दुसरे असे की, निरनिराळ्या व्यक्तींचा पृथक् अभ्यास करण्यात काहीच लभ्यांश नाही. सर्व माणसे सारखीच; शरीराने तशीच मनानेही. आपल्या प्रत्येकाचा मेंदू, प्लीहा हृदय आणि फुफ्फुसे सारखीच आहेत; आणि तथाकथित नैतिक गुण सुद्धा सर्वांत सारखेच असतात; क्षुल्लक फरकांना फारसे महत्त्व नाही. मनुष्यप्राण्याचा एक नमुना अभ्यासला की सगळे समजल्यासारखेच आहे. माणसं अरण्यातील झाडासारखी असतात; वनस्पती शास्त्रज्ञ काही प्रत्येक बर्चचा वृक्ष अभ्यासत बसत नाही.”

कत्या सावकाश एक एक फूल माळत होती; तिने बझारव्कडे पाहिले; तिचा चेहेरा प्रश्नांकित होता; त्याच्या तीव्र व निर्विकार डोळ्यांना तिचे डोळे भिडले आणि तिची कानशिले लाल झाली. अना सर्गेव्नाने मान हलविली.

“अरण्यातील झाडे,” तिने पुनरुच्चार केला. “तुमच्या म्हणण्याप्रमाणे मग मूर्ख आणि हुशार किंवा सत्प्रवृत्त आणि दुष्प्रवृत्त यांच्यात काहीच फरक नाही?”

“नाही; एक फरक आहे; रोगी आणि निरोगी माणसांत जसा फरक असतो तसा. एखाद्या क्षयी माणसाची फुफ्फुसे आणि तुमची किंवा माझी फुफ्फुसे यांची स्थिती सारखीच असणार नाही; ती जरी एकाच प्रकारे घडविली गेली असली तरी सुद्धा. शारीरिक रोग कसे उद्‌भवतात हे आपण सर्वसाधारणपणे जाणतो; नैतिक रोग वाईट शिक्षणाने उद्‌भवतात; अगदी बाळपणापासून जी निरर्थक भंपकबाजी डोक्यात भरलेली

अनुक्रमणिका

असते त्यापासून, समाजातील दोषस्थळांतून ते उद्‌भवतात; थोडक्यात, समाज सुधारा; मग कुठलाही रोग शिल्लक राहणार नाही.”

हे सर्व बोलत असताना बझारव्‌चा अभिनिवेश असा होता की, त्याच्या मनात जणू सर्व वेळ एकच विचार होता, “तुमचा माझ्यावर विश्वास बसो अगर न बसो, मला सारखेच!” त्याने गालमिशावरून अंमळशी बोटे फिरविली, आणि त्याची नजर खोलीभर फिरली.

“म्हणजे तुमचा निष्कर्ष असा की,” अना सर्गेव्‌ना म्हणाली, “जेव्हा समाज सुधारेल, तेव्हा कुणी मूर्ख वा कुणी दुष्ट माणूस राहाणार नाही?”

“कसेही असो, सुयोग्य समाजव्यवस्थेत एखादा मनुष्य मूर्ख असो वा हुशार असो, किंवा दुष्ट असो वा सद्‌गुणी असो—या गोष्टीला अजिबात महत्त्व नाही.”

“हां, समजले; म्हणजे त्या सर्वांची प्लीहा सारखीच असेल.”
“अगदी बरोबर, बाईसाहेब.”

मादाम अदिन्‌त्सवाने अर्कादीकडे वळून विचारले, “अर्कादी निकालाएविच्, तुझे काय मत आहे?”

“एव्‌गेनीशी मी सहमत आहे,” त्याने उत्तर दिले.

कत्याने त्याच्यावर आपली नजर रोखली.

“तुमचे मला नवल वाटते, मंडळी,” मादाम अदिन्‌त्सवा म्हणाली, “आपण या विषयावर अधिक बोलू. पण आता माझी काकी चहाला इकडे येत आहे; तिला आपण त्रास देता कामा नये.”

अना सर्गेव्‌नाची काकी प्रिन्सेस एच्......दाखल झाली; आणि मखमालीचे आवरण असलेल्या एका रुंद आरामखुर्चीत येऊन बसली; त्या खुर्चीत बसण्याचा फक्त तिचाच मान होता; तिची आकृती लहान, कृश होती; आणि तिचा चेहेरा आक्रसल्यासारखा, हाताच्या मुठीसारखा आवळलेला दिसत होता; तिच्या करड्या भुवयांखालून तिचे तीव्र डोळे दुष्टपणाने पाहात होते. तिने कुणालाच अभिवादन केले नाही. कत्याने तिच्या पायांखाली पदासन ठेवले. म्हातारीने तिचे आभार मानले नाहीत की, तिच्याकडे पाहिलेसुद्धा नाही; पिवळ्या शालीखाली तिचे हात फक्त हलले; त्या शालीने तिचा क्षीण देह जवळजवळ सर्व झाकला गेला होता. पिवळा हा प्रिन्सेस्‌चा आवडता रंग; तिच्या टोपीच्या रिबन्ससुद्धा भडक पिवळ्या होत्या.

“कशी काय झोप झाली, आंटी” मादामा अदिन्‌त्सवाने आवाज चढवून विचारले.

“ते कुत्रे आहेच का इथे,” म्हातारी उत्तरादाखल पुटपुटली; आणि फिफी आपल्याकडे येण्यासाठी दबकत पावले टाकतो आहे असे पाहून ती ओरडली, “शू......शू!”

कत्याने फिफिला हटकले आणि त्याच्यासाठी दरवाजा उघडला.

अनुक्रमणिका

बाहेर फिरायला जाण्याच्या अपेक्षेने फिफी खुश झाला; पण आपल्यामागे दरवाजा बंद झालेला पाहून त्याने गुरगुरत दरवाजावर ओरखडे काढायला सुरवात केली. प्रिन्सेसच्या कपाळाला आठ्या पडल्या. कत्या बाहेर जायला निघाली......

"मला वाटते चहा तयार असेल," मादाम अदिन्त्सवा म्हणाली. "चला मंडळी; आंटी, चहाला आत येणार ना?"

प्रिन्सेस खुर्चीतून उठली. आणि काहीही न बोलता सर्वांपुढे ती दिवाणखान्याबाहेर पडली. त्या सर्वांनी तिच्यामागून भोजनगृहात प्रवेश केला. गणवेशातल्या एका छोट्या हुजऱ्याने खास प्रिन्सेससाठी केलेली, तक्याने मढविलेली, आरामखुर्ची टेबलाजवळून खर्रकन ओढली; म्हातारी त्यात बुडून गेल्यासारखी बसली; कत्याने एका कपात चहा ओतून प्रथम तो तिच्यासमोर ठेवला; त्या कपावर कुलमानद्योतक मुद्रा उठविलेली होती. म्हातारीने आपल्या कपात थोडा मध टाकला (चहात साखर घालणे म्हणजे एक पाप आहे आणि ते उधळपट्टीचे लक्षण आहे असे तिचे मत होते; खरे म्हणजे तिला स्वतःला कशावरही एक कपर्दीकही खर्च करावा लागत नसे.) आणि अचानकपणे घोगऱ्या आवाजात तिने विचारले, "प्रिन्स इव्हानने काय लिहिले आहे?"

तिला कुणीच उत्तर दिले नाही, बझारव् व अर्कादीने ओळखले की, तिला सर्वजण आदराने वागवत असले तरीसुद्धा तिच्याकडे सर्वजण दुर्लक्ष करीत होते.

"तिच्या उच्च कुळामुळे असेल, कदाचित" बझारव्ला वाटले......

चहापानानंतर अना सर्गेव्नाने बाहेर फिरायला जाण्याचे सुचविले; पण झिमझिम पाऊस सुरू झाला होता आणि मग प्रिन्सेसखेरीज सर्वजण दिवाणखान्यात परत आले. पत्ते खेळण्यात पटाईत असलेला तो शेजारीही आला; त्याचे नाव पोर्फिरी प्लतोनिच् होते; तो स्थूल,वृद्धत्वाकडे झुकलेला; छोटे, कृश पाय असलेला; भलताच नम्र आणि गमतीला केव्हाही तयार असा इसम होता. अना सर्गेवना अजून मुख्यतः बझारव्बरोबरच बोलत होती; "इतरांबरोबर चढाओढीने जुन्या पद्धतीप्रमाणे 'पैसे लाऊन' खेळायची तयारी आहे का," असे तिने त्याला विचारले. बझारव्ने संमती दर्शविली; तो म्हणाला "खेड्यातील डॉक्टर म्हणून जी जी कामे पार पाडावी लागणार आहेत त्यासाठी मला तयारी करायला हवीच."

"तुम्हाला लक्षपूर्वक खेळले पाहिजे," अना सर्गेव्ना म्हणाली; "पोर्फिरी प्लतोनिच् आणि मी तुम्हाला पराभूत करू. आणि कत्या, तू अर्कादी निकालाएविच्साठी पियानोवर काही वाजवून दाखव; त्याला संगीताची आवड आहे; आणि आम्हालाही ऐकायला मिळेल."

कत्या अनिच्छेने पियानोकडे वळली; आणि अर्कादीसुद्धा संगीताचा जरी भोक्ता असला तरी तिच्या मागोमाग अनिच्छेनेच गेला; मादाम अदिन्त्सवा आपल्याला पिटाळून लावते आहे असे त्याला वाटले; आणि या वयातल्या सर्व तरुणांप्रमाणे त्याच्या हृदयात एक अस्फुट आणि जाचक भावना उसळली......जणू प्रेमोद्भवाची ती प्राथमिक चिन्हेच असावीत. कत्याने पियानोचे झाकण वर केले आणि अर्कादीकडे न पाहाताच विचारले :

अनुक्रमणिका

“काय वाजवून दाखवू मी तुम्हाला?”

“तुला आवडेल ते” अर्कादीने बेफिकीरपणे उत्तर दिले.

“कुठल्या प्रकारचे संगीत तुम्हाला अधिक आवडते?” आपल्या बैठकीत बदल न करता तिने पुन्हा विचारले.

“अभिजात संगीत,” अर्कादीने त्याच स्वरात उत्तर दिले.

“मोझार्ट आवडतो तुम्हाला?”

“होय, आवडतो.”

कत्याने मोझार्टचे सी—मायनरमधले सोनाटा—फँटा झीया वाजवायला सुरवात केली. ती अतिशय छान वाजवत असे, पण तिच्या वाजवण्याची पद्धत थोडीशी जादा बिनचूक आणि काटेकोर होती.

ती ताठ आणि निश्चल बसलेली होती; स्वरमुद्रिकेवर तिचे नेत्र स्थिरावले होते; ओठ घट्ट आवळले होते; सोनाटाच्या शेवटी मात्र तिचा चेहरा उजळला; तिचा केशसंभार खाली ओघळला आणि केसांची एक बट तिच्या काळ्या भुवयांवर पडली.

सोनाटाच्या शेवटाने अर्कादी विशेष भारून गेला; त्या शेवटच्या भागातले स्वैरभैर कर्णमधुर संगीत एकप्रकारचा भान हरवून टाकणारा उल्हसितपणा निर्माण करते—त्यातल्या दुःखी, प्रायः शोकपर्यवसायी वेदना मनाचा ठाव घेतात......पण मोझार्टच्या संगीताने स्फुरलेल्या कल्पनांचा कत्याशी मात्र काहीही संबंध नव्हता. तिच्याकडे पाहाताना त्याला इतकेच वाटले, “हं, ती फारसे वाईट वाजवत नाही; आणि दिसायला फारशी वाईट नाही म्हणा.”

सोनाटा संपल्यावर स्वरांवरील आपली बोटे न उचलता कत्याने विचारले, “पुरे का?” तिला अधिक उपद्रव देण्याची आपली इच्छा नाही असे सांगून अर्कादीने मोझार्टवर बोलायला सुरवात केली; त्याने तिला विचारले की, तो सोनाटा तिने स्वतःच निवडलेला होता की, कुणी त्याची शिफारस केलेली होती? कत्या मात्र त्याला एकाक्षरी उत्तरे देत होती; ती स्वतःतच मश्गूल झाली, आत्मकोशात निबद्ध झाली. असे घडले की, मग ती आपल्या कोशातून सहजासहजी बाहेर येत नसे; अशा वेळी तिच्या चेहेऱ्यावर आडमुठेपणाचा, खरे म्हणजे बावळटपणाचा भाव दिसे. ती लाजरी होती असे म्हणता येणार नाही, पण भेदरट होती; ती आपल्या बहिणीच्या दबावाखाली असावी; तिने तिचे शिक्षण केले होते आणि याविषयी तिला संदेह नव्हता. या परिस्थितीत अर्कादीला फिफीला चुचकारण्याखेरीज गत्यंतर उरले नाही; प्रेमळपणे स्मित करून त्याने त्याच्या डोक्यावर एक टपली मारली आणि आपण अगदी निःसंकोचपणे वागत आहोत असे दाखविले.

कत्याने पुन्हा फुलांशी चाळा सुरू केला. या अवधीत बजारव् सारखा पराभूत होत होता. अना सर्गेव्ना खेळण्यात विलक्षण वाकबगार दिसत होती; पोर्फिरी प्लतोनिच्ही चांगलाच तग धरून होता. बझारव्ने गमावलेली रक्कम अगदी क्षुल्लक होती तरीसुद्धा त्याला ते फारसे बरे वाटले नाही. जेवणाचे वेळी अना सर्गेव्नाने पुन्हा वनस्पतीशास्त्राकडे संभाषणाचा ओघ वळविला.

"उद्या सकाळी आपण फिरायला बाहेर पडू," ती त्याला उद्देशून म्हणाली. "रानफुलांची लॅटीन नावे व त्यांच्या जाती मला तुम्ही शिकवायला हव्यात."

"लॅटीन नावांचा तुम्हाला काय उपयोग?" बझारव्ने विचारले.

"प्रत्येक गोष्टीत शिस्तबद्धता हवी," तिने उत्तर दिले.

"अना सर्गेव्ना काय प्रगल्भ स्त्री आहे!" अर्कादी बझारव्ला म्हणाला.

"होय," बझारव्ने उत्तर दिले, "बुद्धी असलेली बाई आहे. तिने जीवनही पाहिले आहे."

"तसे कुठल्या अर्थाने म्हणतोस, एव्गेनी वासिलिइच्?"

"चांगल्या अर्थाने, मित्रा, अगदी चांगल्या अर्थानेच मी तसे म्हणतो अर्कादी निकालाएविच्! ती आपली जायदादसुद्धा फार चांगल्या प्रकारे सांभाळत असली पाहिजे याबद्दल मला संशय नाही. पण प्रगल्भ वगैरे अशी ती नाही, तिची बहीण आहे."

"काय, ती काळूंद्री?"

"होय, ती काळूंद्रीच. ती आज टवटवीत आणि अनाघ्रात, लाजरी आणि शांत आणि तू जे जे म्हणशील तशी आहे. शिकवून सुधारणा करायला ती योग्य आहे. तुला तिच्यातून काहीतरी सुंदर व्यक्तिमत्व निर्माण करता येईल; पण ती दुसरी मात्र नुसता शिळ्या पावाचा तुकडा."

अर्कादीने बझारव्ला उत्तर दिले नाही; आणि मग दोघेही आपल्याच विचारात मश्गूल होऊन झोपी गेले.

त्या रात्री अना सर्गेव्नाच्या डोक्यातही आपल्या पाहुण्यांचेच विचार घोळत होते. बझारव्मधला स्त्रियांचा कैवार वगैरे घेण्याच्या वृत्तीचा अभाव व त्याचे परखड विचार तिला आकर्षक वाटले. त्याच्यात तिला काही नवे अननुभूत आढळले आणि तिचे औत्सुक्य जागृत झाले.

अना सर्गेव्ना एक विलक्षण व्यक्ती होती. तिच्याजवळ कुठलेच पूर्वग्रह नव्हते, अगर कुठल्याच निश्चित समजूती नव्हत्या; त्यामुळे ती कधीच हतबल झाली नाही की, काही साधण्यासाठी तिने अन्य मार्गांचा अवलंब केला नाही.

अनुक्रमणिका

अनेक गोष्टी तिला स्पष्टपणे समजलेल्या होत्या; तिला बऱ्याच गोष्टींत गोडी होती; पण कशातच तिला पूर्ण समाधान वाटत नव्हते; पण खरे म्हणजे पूर्ण समाधान मिळविण्याची तिची आकांक्षाच नव्हती. त्याचप्रमाणे तिची बुद्धी चौकस व अलिप्त होती; तिच्या मनातील शंका विसरून जाण्याइतक्या कधीही शमल्या नाहीत की, तिला भांबावून सोडण्याइतक्या प्रभावीही झाल्या नाहीत. ती इतकी स्वतंत्र वृत्तीची व धनवान नसती तर कदाचित तिने स्वतःला जीवन संग्रामात झोकून दिले असते आणि भावविवशताही अनुभवली असती. पण तिचा जीवनौघ सरळ वाहात होता; कधी तिला विलक्षण रुक्ष वाटे आणि मग ती दिवसामागून दिवस जाणीवपूर्वक, धांदल गडबड न करता, संथपणे ढकलत राही; हा जीवनौघ क्वचितच ढवळला जाई. कधी सप्तरंगी स्वप्ने तिच्या डोळ्यांसमोर तरळत; पण ती विरून जात तेव्हाच ती निर्भरपणे श्वास घेई; त्यांचा तिला कधी खेद वाटला नाही. कधी कधी कल्पनेत ती सांकेतिक नीतिमत्तेच्या मर्यादा ओलांडत असे; पण त्यावेळीसुद्धा तिच्या भुरळ पाडणाऱ्या सुरेख आणि शीतल शरीरातील रक्त नेहमीप्रमाणे शांतपणे वाहात असे. कधी सुगंधी स्नानगृहामधून बाहेर पडल्यावर, उबदार आणि हलके हलके झाल्यावर ती विचारमग्न होई; जीवनाचे वैय्यर्थ, दुःख, कष्ट आणि क्षुद्रता......यांवर ती विचार करी. तिच्या अंतःकरणात एकाएकी कसल्यातरी साहसाची भावना संचारून सबंध शरीरभर अनिर्बंध उत्कटतेने वाहात राही; पण एका अर्धवट उघड्या असलेल्या खिडकीतून थंड वाऱ्याचा झोत येई आणि मग अना सर्गेव्ना स्वतःतच आक्रसून बसे; ती केविलवाणी आणि क्षुब्ध होई; त्या भयानक वाऱ्याच्या झोतापासून दूर पळून गेले पाहिजे एवढा एकच विचार त्याक्षणी तिच्या मनात घर करून राही.

प्रणयात अपयशी झालेल्या स्त्रियांप्रमाणे तिला कशाची तरी आस लागलेली होती; पण कशाची हे तिलाही सांगता आले नसते. खरं सांगायचं म्हणजे तिला कशाची उणीव नव्हती; पण तरीही प्रत्येक गोष्ट आपल्याला हवी असे तिला वाटे. मृत अदिन्त्सवांचा तर विचारही तिला सहन होत नव्हता (तिने त्यांच्याशी लग्न केले ते व्यवहारी विचारांमुळे; अर्थात तो बऱ्यापैकी माणूस होता हे तिला माहीत नसते तर तिने विवाहाला मान्यता दिली नसती); सर्व पुरुषांविषयी तिच्या मनात अव्यक्त तिरस्काराची भावना वसत होती; तिच्या लेखी पुरुष म्हणजे ऐदी, स्थूल, झोपाळू, कमजोर आणि लोचट प्राणी. पूर्वी एकदा परदेशात कुठेतरी तिला एक देखणा स्वीडीशी तरुण भेटला होता. त्याच्या चेहेऱ्यावर स्त्रीदाक्षिण्य जणू ओसंडत होते; आणि त्याच्या अनावृत भालप्रदेशाखालून त्याचे निळे निरागस डोळे चमकत होते; त्याचा तिच्यावर विलक्षण प्रभाव पडला होता; पण तरीही त्यामुळे तिचे रशियाला परत जाणे अडून राहिले नाही.

"हा डॉक्टर विलक्षण दिसतो!" तिच्या मनात विचार आला; आपल्या ऐषआरामी बिछान्यात लेस लावलेल्या उशांवर ती पहुडली होती आणि अंगावर एक पातळ रेशमी पांघरूण ओढले होते......वैभवपूर्ण जीवन जगण्याचा तिच्या वडिलांचा स्वभाव तिच्यातही थोडाबहुत उतरला होता. आपल्या पाणीदार पण प्रेमळ पित्यावर तिने लडिवाळपणे प्रेम केले होते. तिला त्यांनी विलक्षण माया लावली होती. बरोबरीच्या मैत्रीच्या नात्याने ते तिच्याशी विनोद करत; पूर्ण विश्वासाने तिच्याशी हितगुज करत; तिचा सल्ला घेत. आईची तिला क्वचितच आठवण येई.

"हा डॉक्टर विलक्षण दिसतो!" ती स्वतःशीच पुन्हा म्हणाली. तिने पाय लांब केले, स्मित केले आणि मानेखाली हाताची घडी घातली; मग एका फडतूस फ्रेंच कादंबरीतील एकदोन पानांवरून डोळे फिरवले; पुस्तक खाली टाकले—शुद्ध आणि शीतल होऊन आपल्या शुद्ध आणि सुगंधी पांघरुणात ती निद्राधीन झाली.

अनुक्रमणिका

दुसऱ्या दिवशी सकाळी अना सर्गेव्ना लंचनंतर जी बझारव्बरोबर वनस्पतीशास्त्रावर चर्चा करत भटकत राहिली, ती रात्रीच्या जेवणाच्या वेळी परत येईपर्यंत; अर्कादी कुठेच गेला नाही; त्याने कत्याच्या सहवासातच एक तासभर काढला. त्याला तिचा कंटाळा वाटला नाही; आधल्या दिवशीचा सोनाटा वाजविण्याची तिनेच इच्छा प्रदर्शित केली; पण शेवटी मादाम अदिन्त्सवा जेव्हा परत आलेली, त्याच्या दृष्टीस पडली, त्यावेळी तात्काळ त्याच्या अंतःकरणात एक कळ उठली. बागेतून येत असता ती दमल्यासारखी वाटत होती; तिचे गाल लाल झाले होते आणि तिच्या गोल गवती हॅटखालून तिचे डोळे नेहमीपेक्षा अधिक चमकदार वाटत होते. एका रानफुलाचा बारीक देठ ती आपल्या बोटाभोवती गुंडाळत होती; पातळ दुपट्टा तिच्या कोपरापर्यंत ओघळला होता; आणि तिच्या हॅटच्या रुंद काळ्या फिती तिच्या वक्षाला बिलगल्या होत्या; बझारव् नेहमीप्रमाणे आत्मविश्वासपूर्ण व निर्विकारपणे तिच्या मागोमाग आला; पण त्याच्या मुद्रेवरील प्रसन्नता, किंबहुना प्रेमळ भाव पाहून अर्कादी काही खूष झाला नाही. “गुड-मॉर्निंग!” तोंडातल्या तोंडात पुटपुटत बझारव् आपल्या खोलीकडे जाण्यासाठी वळला; मादाम अदिन्त्सवानेही विसरभोळेपणाने त्याच्याशी ‘शेकहँड’ केला आणि ती बझारव्च्या पाठोपाठ गेली.

“गुड-मॉर्निंग काय!” अर्कादी स्वतःशीच म्हणाला......“जणू आज आपण एकमेकाना आधी भेटलोच नव्हतो!”

अनुक्रमणिका

काळ हा कधी पक्ष्यासारखा उडून जातो, तर कधी कीटकासारखा रेंगाळत जातो हे सर्वश्रुतच आहे; पण तो वेगाने धावतो की मंद गतीने जातो हे ध्यानातसुद्धा जेव्हा येत नाही त्याचवेळी मनुष्य विशेष सुखी असतो. अर्कादी आणि बझारव्ने मादाम अदिन्त्सवाच्या घरी अशाच तऱ्हेने पंधरा दिवस काढले. याचे अंशतः श्रेय तिच्या शिस्तबद्ध जीवनाला आणि शिस्तबद्ध गृहव्यवस्थेस दिले पाहिजे. ती स्वतः शिस्तीचे पालन काटेकोरपणे करत असे आणि दुसऱ्यांना पालन करण्यास भाग पाडत असे. दिवसभरातील प्रत्येक काम ठरल्यावेळी पार पडत असे. सकाळी आठाच्या ठोक्याला सर्वजण चहासाठी एकत्र जमत; सकाळचा चहा ते दुपारचे जेवण या वेळेत ज्याला जे करायचे असे ते त्याने करावे; यजमानीणबाई स्वतः बेलिफ (सर्व जमीन-जुमला फाळा पद्धतीने लावलेला होता), स्टिवार्ड व प्रमुख घरकारभारी यांच्याबरोबर शेती व्यवहाराच्या कामात गुंतलेली असे. रात्रीच्या भोजनाआधी पुन्हा सर्वजण चर्चेसाठी अगर वाचन करण्यासाठी एकत्र येत; संध्याकाळचा वेळ फिरण्यासाठी, पत्ते खेळण्यासाठी आणि संगीतासाठी दिलेला असे; साडे दहा वाजता आपल्या खोलीकडे परततेवेळी, अना सर्गेव्ना दुसऱ्या दिवशीच्या कामाच्या सूचना देऊन मगच झोपण्यासाठी जात असे. रोजच्या जीवनातील हा काटेकोरपणा आणि काहीसा दिखाऊ नियमितपणा बझारव्ला आवडला नाही—"रुळांच्या चाकोरीवरून धावण्यासारखे हे आहे." असे त्याने त्याचे वर्णन केले; गणवेशातील हुजरे आणि शिष्ट कारभारी पाहून त्याच्या लोकशाहीवृत्ती दुखावल्या गेल्या. त्याने सांगूनच टाकले की जर याच पद्धतीने वागायचे ठरवले तर इंग्रजी पद्धतीने शेपटी-कोट व पांढरे टाय पेहेरून लोक जेवणसुद्धा घेऊ लागतील. एकदा या विषयावर अना सर्गेव्नाशी तो स्पष्टच बोलला. तिची वृत्तीच अशी होती की तिच्यापुढे कुणीही मोकळेपणाने बोलायला कचरत नसे. त्याचे सर्व बोलणे तिने ऐकून घेतले; त्यावर तिची प्रतिक्रिया एव्हढी—,"तुमच्या दृष्टिकोनातून तुमचे बरोबर असेलही—आणि कदाचित, त्याच दृष्टिकोनातून मी थोडी 'फाजील खानदानी' असेनही; पण या शिस्तीखेरीज ग्रामीण भागात राहाणे अशक्य होईल जीवन भकास होऊन जाईल;" आणि तिने आपल्या पद्धतीनेच वागणे चालू ठेवले. बझारव्ने कुरबूर केली; पण त्याचे व अर्कादीचे जीवन तिथे आरामात चालले होते याचे कारणच हे होते की, "गाडी काटेकोरपणे रुळांवरून जात होती." असे असले तरी निकल्स्कोला आल्यापासून त्या दोघा तरुणांत बदल घडलेला होता. अना सर्गेवना बझारव्शी सहसा सहमत होत नसे, तरीसुद्धा तिच्या मनात त्याच्या संबंधी आस्था निर्माण झालेली होती हे स्पष्ट होते; बझारव्सुद्धा अस्वस्थ झाल्याची चिन्हे दिसत होती; त्याच्या बाबतीत हे अभूतपूर्व होते; क्षुल्लक कारणाने त्याचा संताप व्हायचा; बोलण करायला तो नाखूष असायचा; तो चिडखोर बनला होता; आणि कुठेही एका जागी स्वस्थ बसत नव्हता; जणू कुठल्यातरी सुप्त वासनेने त्याला पछाडले होते. अर्कादी मात्र आपण आता मादाम अदिन्त्सवाच्या प्रेमात खात्रीलायकरीत्या पडलो आहोत असे समजून एका सौम्य अशा विमनस्क अवस्थेत होता; असे असले तरी हा विमनस्कपणा त्याच्या कत्याबरोबरच्या मैत्रीच्या आड येऊ शकला नाही; किंबहुना तिच्याशी जिव्हाळ्याच्या आणि मैत्रीच्या भावनेत तो अधिकच गुरफटला गेला. "तिला माझ्याबद्दल काहीच आस्था नसावी ना; तसे असू दे......पण ही मला झिडकारत नाही, किती चांगली आहे ही," त्याला वाटले; आणि पुन्हा एकदा त्याचे अंतःकरण एका विलक्षण सुखद भावनेने भरून आले. कत्याला अस्पष्टपणे एक जाणवले की, तो तिच्या सहवासात दुःखपरिहाराचे समाधान शोधत होता; आणि मग तिनेही दोघांमधील या काहीशा बुजरट आणि विश्वासार्ह मैत्रीच्या सात्विक आनंदाचा अव्हेर केला नाही. अना सर्गेवनाच्या हजेरीत ते दोघे एकमेकांशी बोलत नसत; बहिणीच्या कठोर नजरेसमोर कत्या शरमिंदी व्हायची; आणि अर्कादी आपल्या प्रणयदेवतेच्या सांनिध्यात असताना दुसऱ्या कुठल्याही गोष्टीकडे लक्ष देऊ शकत नव्हता; पण कत्याबरोबर एकटा असताना मात्र तो हर्षभरित असे. मादाम अदिन्त्सवाचे लक्ष खेचून घेण्याचे सामर्थ्य आपल्यात नाही हे तो जाणून होता; तिच्या

सहवासात एकटा असताना तो बुजून जायचा आणि किंकर्तव्यमूढ व्हायचा; अशा वेळी त्याच्याशी काय बोलावे हे तिलाही उमजत नसे; तिच्या मानाने तो खूपच लहान होता. कत्याच्या सहवासात मात्र अर्कादी निर्भर असायचा; कत्याशी तो विनम्रपणे वागत असे; संगीत कादंबरी-वाचन, काव्य आणि अशाच क्षुल्लक गोष्टींबद्दलची तिची प्रतिक्रिया व्यक्त करायला तो तिला उत्तेजन देत असे; या असल्या क्षुल्लक गोष्टींतच आपल्यालाही गोडी आहे हे मात्र त्याच्या ध्यानात येत नसे किंवा त्याला जाणवतही नसे. कत्याही आपल्यापरीने विमनस्कतेचे मळभ झटकून टाकण्याच्या भरीस पडली नाही कत्याच्या सहवासात अर्कादी आणि मादाम अदिन्त्सवाच्या सहवासात बझारव् रमत असत; आणि मग विशेषतः फिरायला गेल्यावर असे होत असे की, ती दोन जोडपी काही वेळ एकत्र येऊन मग आपापल्या अलग मार्गाने निघून जात. कत्याला निसर्ग पूजनीय वाटे, तर अर्कादी निसर्गावर प्रेम करी; अर्थात हे प्रकटपणे मान्य करण्याचे धाडस तो दाखवत नसे; मादाम अदिन्त्सवा बझारव्प्रमाणे निसर्गसौंदर्याबाबत काहीशी उदासीन होती. हे दोन मित्र सतत अलग राहात गेले आणि त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला; त्या दोघांतील संबंध बदलत चालले. मादाम अदिन्त्सवाबद्दल अर्कादीशी काहीही बोलण्याचे बझारव्ने सोडून दिले; तिच्या 'सरंजामी सवयी 'बद्दलसुद्धा बोलण्याचे त्याने सोडून दिले. आता हे खरे की, पूर्वीप्रमाणेच तो कत्याचे कौतुक करत असे; आणि तिच्या भावनाप्रधान वृत्तीला लगाम घालण्याचा सल्ला मात्र त्याने त्याला दिला; पण त्याच्या कौतुक करण्यात उतावळेपणा होता आणि उपदेशात कोरडेपणा; आणि एकंदरीत तो अर्कादीशी पूर्वीपेक्षा कमी बोलत होता……तो त्याला टाळतो आहे, त्याच्या सहवासात अस्वस्थ आहे असे वाटत होते.

अर्कादीला हे सारे समजत होते; पण त्याने ते स्वतःशीच ठेवले.

बझारव्च्या वृत्तीत झालेल्या या नवीन बदलाचे कारण मादाम अदिन्त्सवासंबंधी त्याच्या मनात स्फुरलेल्या भावना हेच होते; या भावनेने त्याचा छळवाद मांडला होता, त्याला वेड लावले होते; त्याच्या मनातील खळबळीच्या संभाव्यतेचा जर कुणी दुरान्वयानेही निर्देश केला असता तर कुत्सित हास्य करून व तिरसट अर्वाच्य बोलून त्याने त्या भावनेचा तत्क्षणीच इन्कार केला असता. स्त्रियांबद्दल व स्त्रीसौंदर्याबद्दल बझारव्ला जबरदस्त आकर्षण वाटे; पण आदर्श प्रेम, किंवा त्याच्या मताप्रमाणे रोमॅन्टिक प्रेम म्हणजे शुद्ध वेडपटपणा, अक्षम्य नेभळटपणा होता; स्त्रीदाक्षिण्य वगैरे भावना म्हणजे काहीतरी रोग किंवा विरूपता आहे असे त्याला वाटे; टोगेन्बर्ग आणि इतर सगळ्या जर्मन व फ्रेंच गीतकारांना वेड्यांच्या इस्पितळात का ठेवले नव्हते याचे त्याला नेहमी आश्चर्य वाटे. "समजा एखाद्या बाईबद्दल तुम्हाला आकर्षण वाटले," तो म्हणायचा, "प्रयत्न करा व उद्दिष्ट साध्य करून घ्या; पण ते जर जमले नाही तर मग तिच्याकडे पाठ फिरवा. समुद्रात हवे तितके चांगले मासे असतात." मादाम अदिन्त्सवाने त्याच्या मनाचा कबजा घेतला होता; तिच्याबद्दलच्या अफवा, तिच्या स्वतंत्र, वेगळ्या कल्पना, त्याच्याबद्दल तिला वाटणारे निर्विवाद आकर्षण—हे सगळे त्याला अनुकूल वाटत होते; पण त्याच्या लौकरच ध्यानात आले की, तिच्या बाबतीत त्याला "उद्दिष्ट साध्य" करणे कठीण होते. आणि तिच्याकडे पाठ फिरवून चालायला लागणे आपल्या शक्तिबाहेरचे आहे हेही त्याने जाणले—आणि त्यामुळेच तो गडबडून गेला. तिच्या विचारासरशी त्याचे रक्त पेटून उठे; त्याने आपल्या रक्तावर सहज ताबा मिळविला असता; पण त्याच्या अंतःकरणात दुसरीच एक भावना मूळ धरत होती, तिचा त्याने कधीच स्वीकार केलेला नव्हता; त्या भावनेची थट्टा केलेली होती आणि तिच्यामुळे त्याच्या स्वाभिमानाला धक्का बसला होता. मादाम अदिन्त्सवाशी बोलताना कुठल्याही आदर्शवादी गोष्टीसंबंधी तो आपली घृणा नेहमीपेक्षा अधिक ठामपणे व्यक्त करत होता; पण एकांतात मात्र हा आदर्शवाद आपल्यातच आहे हे ओळखून तो संतप्त होत होता. अशा वेळी तो जंगलात लांब टांगा टाकत, मार्गात आलेल्या फांद्या छाटत, आणि स्वतःचा व तिचाही तीव्र शब्दांत धिक्कार करत भटकत राहायचा; किंवा

कोठारातल्या माळ्यावर चढून, आडमुठेपणाने डोळे मिटून निद्राधीन व्हायचा प्रयत्न कारायचा; पण त्यात त्याला नेहमीच यश येत नसे. आपल्या निष्कलंक बाहूंनी एके दिवशी तिने आपल्या मानेला विळखा घातला आहे असे चित्र त्याच्या मनःचक्षूसमोर अचानक उभे राही; तिचे ते स्वाभिमानी ओठ त्याच्या चुंबनांना प्रतिसाद देताना दिसत आणि तिचे बुद्धीमान डोळे त्याच्यावर ममतेने—होय ममतेने—त्याच्यावर खिळून राहिल्यासारखे वाटत; हे सर्व त्याला आठवे आणि त्याच्या डोक्यात सणक येई; क्षणभर तो स्वतःलाच विसरून जाई आणि परत संतापाने तो भडकून उठे सर्व प्रकारच्या "लज्जास्पद" विचारांत तो गुरफटल्यासारखा होई; जणू कुणी सैतान वेडावून दाखवत चिथावून त्याला तसे करायला लावत होता. मादाम अदिन्त्सवामध्येही बदल होत आहे अशी पुसटशी शंका त्याला मधून मधून येई; तिच्या चेहेऱ्यावरील भाव काही विशेष प्रकारचा आहे असे त्याला वाटे;......कदाचित ती......पण मग त्या क्षणी तो पाय आपटत, दातओठ खात, मुठी आवळत बसे.

दरम्यान बझारव्चा अंदाज काही फार चुकला नव्हता. मादाम अदिन्त्सवाच्या भावनेच्या तारा त्याने छेडल्या होत्या; त्याच्यासंबंधी तिला आस्था वाटत होती; त्याच्यासंबंधी अनेक विचार तिच्या मनात येत. त्याच्या गैरहजेरीत तिला रूक्ष वाटत नसे की त्याच्या आगमनासाठी ती आतुर होत नसे; पण त्याच्या सहवासात ती अधिक उल्हसित मात्र होत असे. अभिरुची आणि तिच्या शिष्ट सवयी यांच्यावर टीका करून तो तिला दुखवीत असे, खिजवीत असे; तरीसुद्धा त्याच्याबरोबर एकटे असणे, त्याच्याशी बोलणे तिला आवडे. आपल्याबद्दलचे त्याचे मत हेरून घेण्यासाठी आणि त्याच्याजवळ आत्मविश्लेषण करण्यासाठी जणू ती उत्सुक होती.

एके दिवशी तिच्याबरोबर बागेत फिरत असता आपल्या वडिलांकडे लौकरच जाणार असल्याचे त्याने अचानक छद्मीपणाने जाहीर केले......ती पांढरीफटक पडली; जणू तिला कसलातरी चटका बसला होता; तो चटका इतका जबरदस्त होता की, ती स्तिमित झाली आणि त्याच्या बोलण्यातील मर्म काय असावे यावर बराच वेळ विचार करत राहिली. बझारव्ने आपला जाण्याचा निर्णय व्यक्त केला होता तो तिची परीक्षा पाहाण्यासाठी किंवा त्यातून काय निष्पन्न होते ते पाहण्यासाठी नव्हे; तो कधीच "बनवाबनवी" करत नसे; त्याच दिवशी सकाळी त्याच्या वडिलांच्या बेलिफाशी त्याचे बोलणे झाले होते; त्या बेलिफाने लहानपणी त्याचे संगोपन केले होते; टिमोफिच् त्याचे नाव. हा टिमोफिच् म्हातारा होता; जीवनाचा विविध अनुभव आणि व्यवहारी शहाणपण त्याच्यापाशी भरपूर होते; डोक्यावर तुरळक पिवळट केस आणि रापलेला लाल चेहेरा; त्याच्या मिचक्या डोळ्यांत सूक्ष्म अश्रुकण दिसत होते; त्या दिवशी बझारव् समोर तो अनपेक्षितपणे दत्त म्हणून उभा राहिला; त्याचा आखूड कोट राखीनिळा, जाड्या भरड्या कापडाचा होता; कमरेला त्याने कातडी पट्टा आवळलेला होता आणि पायात डांबरी बूट होते.

"कसे काय, म्हातारबाबा?" बझारव्ने मोठ्याने हाक मारली.

"एव्गेनी वसिलिइच्, तुमचे ठीक आहे ना?" म्हाताऱ्याने विचारले. आनंदाने तो हसला, तसे त्याच्या चेहेऱ्यावर सुरकुत्यांचे जाळे पसरले.

"इकडे कशाला आलास? त्यानी मला बोलाविले आहे ना?"

"छे छे, साहेब, असे कसे होईल?" टिमोफिच् गुळमुळला. (घरून निघतेवेळी त्याच्या धन्याने दिलेली कडक ताकीद त्याला आठवली.) "कामाच्या निमित्ताने शहराकडे आम्हाला पाठविले होते; आपली स्वारी आल्याचे ऐकले आणि वाकडी वाट करून आलो इकडे—म्हटले साहेबांचे दर्शन होईल......आपणाला त्रास देण्याचा विचारसुद्धा आमच्या मनात येईल का!"

"थांब, खोटे बोलू नको," बझारव्ने त्याला मध्येच अडविले. "हा शहराकडे जाण्याचा रस्ता आहे हे तू मला सांगतोस?" टिमोफिच् अडखळला आणि निरुत्तर झाला. "वडिलांचे ठीक आहे ना?"

"ठीक आहे परमेश्वर कृपेने."

"आणि आई?"
"अना व्लास्येव्नाही देवदयेने ठीक आहे."

"मला वाटते, ते माझी वाट पाहात असतील, नाही?"

त्या ठेंगण्या म्हाताऱ्याची मान एका बाजूला लवली.

"एव्गेनी वासिलिइच, त्यांना पाहिले की अंतःकरणात कालवाकालव होते, खरेच."

"बरे, बरे, पण तोंड बंद कर! सांग त्यांना मी येतो आहे लौकरच म्हणून"

"बरे, साहेब" म्हणून टिमोफिच्ने निःश्वास टाकला.

घराबाहेर पडता पडता त्याने दोन्ही हातांनी डोक्यावरची टोपी खाली ओढली, मोडकळलेल्या शर्यतीच्या गाडीत चढला आणि दौड मारली—पण शहराच्या दिशेने मात्र नव्हे.

त्या दिवशी संध्याकाळी मादाम अदिन्त्सवा आणि बझारव् तिच्या खोलीत बसले होते; कत्या पियानो वाजवत होती आणि अर्कादी ते ऐकत हॉलमध्ये शतपावली करत होता; प्रिन्सेस वर आपल्या खोलीत गेली होती; तत्त्वता तिला पाहुणे लोक मुळीच आवडत नसत, आणि तिच्या शब्दात सांगायचे म्हणजे "ही असली अडाणी प्रभावळ," तर अगदीच नकोशी वाटे. खोलीत इतरांसमवेत असताना ती फुरंगटून बसायची; पण एकदा आपल्या खोलीत गेली म्हणजे असे शिव्याशाप द्यायला सुरवात करत असे की, तिच्या डोक्यावरची टोपी, केसांचा टोप, सर्व काही उड्या मारायला लागे. मादाम अदिन्त्सवाला हे सर्व ठाऊक होते.

"इथून निघायचा तुमचा बेत कसा काय ठरला?" तिने सुरवात केली; "तुमच्या वचनाचे काय?"

"कसले वचन," बझारव्ने चमकून विचारले.

"विसरलात? रसायनशास्त्रातले धडे द्यायचे तुम्ही कबूल केले होते."

अनुक्रमणिका

“त्याला इलाज नाही! माझे वडील माझी वाट पाहात आहेत; अधिक काळ मला भटकता येणार नाही. पण तुम्ही पेलाऊस एट् फ्रेमीचे Notions ge'ne'rales de Chimie वाचा; चांगले आहे ते पुस्तक, छान लिहिले आहे. तुम्हाला पाहिजे ते त्यात मिळेल.”

“पण तुम्हाला आठवते का, तुम्ही म्हणाला होता की पुस्तक काही.....तुम्ही निश्चित काय म्हणाला होता ते आता आठवत नाही; पण मला काय म्हणायचे आहे हे तुमच्या ध्यानात आले असेलच......आठवते का?”

“पण नाइलाज आहे!” बझारव् पुन्हा म्हणाला.

“जायलाच हवे का?” मादाम अदिन्त्सवा हळूवार स्वरात म्हणाली.

त्याने तिच्याकडे नजर टाकली. आरामखुर्चीवर मागे तिचे डोके रेलले होते आणि कोपरापर्यंत अनावृत असलेल्या बाहूंची छातीवर घडी केली होती. कागदाची जाळीदार शेड लावलेल्या एकुलत्या दिव्याच्या प्रकाशात ती फिकट दिसत होती.तिचे सर्वांग एका लफ्फेदार शुभ्र गाऊनच्या कोमल घड्यांमध्ये लपेटले होते;तिची पावले एकमेकांवर पडली होती आणि त्यांची बोटेसुद्धा झाकली गेली होती.

“मी विचारतो, राहायचे तरी कशासाठी?” बझारव्ने प्रतिप्रश्न केला.

मादाम अदिन्त्सवाने मान बाजूला वळविली. “कशासाठी म्हणून विचारता? माझ्या सहवासात इथे तुम्हाला आनंद वाटला नाही ? का तुम्हाला वाटते की, तुम्ही इथून गेल्यावर इथे कुणाला चुकल्या चुकल्या सारखे वाटणार नाही?”

“माझी खात्रीच आहे त्याबद्दल.”

मादाम अदिन्त्सवा एक मिनिटभर निस्तब्ध होती. “चुकीची समजूत आहे तुमची; पण मला तुमचा विश्वास वाटत नाही. मनापासून तुम्ही हे म्हणत नाही.” तरीही बझारव् स्वस्थ बसला होता. “एव्गेनी वासिलिइच्. तुम्ही बोलत का नाही?”

“काय बोलणार मी? कुणाबद्दल चुकल्याचुकल्यासारखे वाटण्याइतकी कुणाची लायकी नसते; माझी तर मुळीच नाही.”

“ते कसे?”

“मी एक व्यवहारी, निरस फलाणा माणूस. कसे बोलावे हेही मला कळत नाही.”

“तुम्ही लबाड आहात, एव्गेनी वासिलिइच्.”

अनुक्रमणिका

“मला त्याची सवय नाही. जीवनाच्या ज्या शिष्टमान्य बाजूला तुम्ही इतके महत्त्व देता, त्याच्याशी माझा काहीच संबंध नाही हे तुम्हाला ठाऊक आहे ना? ”

मादाम अदिन्त्सवाने रुमालाचा कोपरा दातात घट्ट धरला.

“तुम्हाला काय वाटते ते वाटो, पण तुम्ही गेल्यावर मात्र मला रूक्ष वाटेल इथे.”

“अर्कादी राहील,” बझारव् म्हणाला. मादाम अदिन्त्सवाने किंचित खांदे उडवले. “मला कंटाळा येईल,” ती पुन्हा पुटपुटली.

“खरेच? पण कुठल्याही परिस्थितीत हा तुमचा कंटाळा फार काळ टिकणार नाही.”

“कशावरून तुम्हाला तसे वाटते?”

“कारण तुम्हीच सांगितल्याप्रमाणे तुमचा नित्यक्रम मोडला तरच तुम्हाला कंटाळवाणे वाटते. स्वतःचे जीवन तुम्ही इतके निर्दोष नियमितपणे शिस्तबद्ध केले आहे की, त्यात रूक्षपणाला किंवा उदासीनतेला स्थान नाही किंवा......कुठल्याही अप्रिय भावनेला स्थान नाही. ”

“मी इतकी निर्दोष वाटते तुम्हाला......म्हणजे इतक्या काटेकोर नियमितपणे मी जीवन आखलेले आहे?”

“तसे म्हणायला हरकत नाही. आता हेच पाहाना; काही मिनिटांतच दहाचा ठोका पडेल आणि त्याबरोबर मला तुम्ही इथून घालवून देणार हे मला आधीच ठाऊक आहे.”

“नाही; एव्‌गेनी वासिलिइच्, मी तुम्हाला निघून जायला सांगणार नाही. थांबू शकता तुम्ही. ती खिडकी उघडा......मला गुदमरल्यासारखे होते आहे. ”

बझारव् उठला आणि त्याने खिडकीला एक धक्का दिला. ती खाडकन उघडली......खिडकी इतक्या सहजपणे उघडेल असे त्याला वाटले नव्हते; शिवाय त्याचे हात थरथरत होते. काळ्याकुट्ट, कोमल रातराणीने काळ्या आकाशातून खोलीत जणू डोकावून पाहिले; झाडांच्या पानांची सूक्ष्म सळसळ आणि शुद्ध मोकळ्या हवेचा सुगंध आत आला.

“खिडकीवरचा पडदा ओढून बसा खाली,” मादाम अदिन्त्सवा म्हणाली; “तुम्ही जाण्यापूर्वी मला तुमच्याशी काही बोलायचे आहे. तुमच्यासंबंधी काही सांगा; स्वतःसंबंधी तुम्ही कधीच बोलत नाही.”

“विषयाचे ज्ञान कसे वाढवावे यासंबंधी मी तुमच्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत असतो, अना सर्गेव्‌ना.”

“तुम्ही फार विनयशील आहात. पण ज्यांच्यासाठी तुम्ही आम्हाला सोडून जात आहात त्यांच्यासंबंधी—तुमच्या कुटुंबासंबंधी, वडिलांसंबंधी मला जाणून घ्यायचे आहे.”

अनुक्रमणिका

“ही असे का बोलते आहे?” बझारव् विचारात पडला.

“या सगळ्या गोष्टींत काही तथ्य नाही,” तो प्रकटपणे म्हणाला. “निदान तुमच्या दृष्टीने; आमची माणसं अप्रसिद्ध आहेत......”

“आणि मला तुम्ही सरंजामदार समजता?”

बझारव्ने मान वर करून मादाम अदिन्त्सवाकडे पाहिले.

“होय,” त्याच्या आवाजात फाजील कठोरपणा होता.

ती हसली. “माझ्याबद्दल तुम्हाला फारच थोडे माहीत आहे हे स्पष्टच आहे; मग तुम्ही कितीही म्हणा की, सर्व माणसे सारखी आहेत आणि त्या सर्वांचा अभ्यास करण्याची मुळीच जरुरी नाही. मी माझ्या जीवनाबद्दल सांगेन तुम्हाला आज ना उद्या कधीतरी......पण प्रथम तुम्ही सांगा तुमच्याबद्दल.”

“तुमच्याबद्दल मला अत्यल्प माहिती आहे,” बझारव् म्हणाला. “कदाचित, तुम्ही म्हणता ते बरोबर असेलही; कदाचित, प्रत्येक व्यक्ती हे कोडे असू शकेल. उदाहरणार्थ, तुमचेच पाहा; तुम्ही लोकांत मिसळत नाही, तुम्हाला ते जाचक वाटते, आणि दोन विद्यार्थ्यांना आपल्याबरोबर राहायला तुम्ही बोलावले आहे. तुमच्यासारखे सौंदर्य, बुद्धिमत्ता असताना तुम्ही अशा खेड्यात का बरे राहावे ? ”

“काय? काय म्हणालात तुम्ही?” मादाम अदिन्त्सवाने अधीरतेने मध्येच विचारले. “माझे......सौंदर्य?”

बझारव्च्या कपाळावर आठ्या पडल्या. “जाऊ दे ते,” तो पुटपुटला; “मला इतकेच म्हणायचे होते की, तुम्ही खेड्यात स्थायिक होण्याचे कारण मला पुरेसे समजलेले नाही.”

“तुम्हाला ते समजत नाही......पण तुमचे स्वतःचे असे काही स्पष्टीकरण असेलच?”

“होय......मला असे वाटते की, तुम्ही एकाच ठिकाणी सतत राहाता याचे कारण तुम्ही स्वतःचेच लाड करता, तुम्हाला ऐषआराम प्रिय आहे आणि इतर कुठल्याही बाबतीत तुम्ही बेफिकीर आहात.”

मादाम अदिन्त्सवाने पुन्हा स्मित केले. “कुठल्याही भावनेच्या लाटेबरोबर मी वाहून जाण्याची शक्यता आहे यावर तुमचा खरेच विश्वास बसत नाही?”

बझारव्ने तिच्याकडे कटाक्ष टाकला.

“औत्सुक म्हणून, कदाचित; पण दुसऱ्या कुठल्याही कारणाने नव्हे.”

अनुक्रमणिका

“खरे का? छान, मला आता उमगले की, आपण मित्र का होऊ शकतो; तुम्हीसुद्धा माझ्याप्रमाणेच आहात, होय ना?”

“आपण इतके मित्र आहोत......,” गदगदल्या स्वरात बझारव् उद्‌गारला. बझारव् उठला. एका बाजूला असलेल्या त्या अंधाऱ्या आराम खोलीत बरोबर मध्ये एक दिवा मंदपणे तेवत होता; खिडकीचा पडदा वारंवार हलत होता आणि त्या कावेबाज रात्रीचा ताजेपणा आत वाहात होता. मादाम अदिन्त्सवा निश्चल बसलेली होती; पण हळूहळू एका सुप्त भावनेने तिला पछाडले.

बझारव्लाही त्याची जाणीव झाली. एका सुंदर तरुणीबरोबर आपण एकांतात आहोत याची एकदम जाणीव त्याला झाली......

“कुठे निघालात?” तिने हळुवारपणे विचारले.

त्याने उत्तर दिले नाही; त्याने खुर्चीत बसकण मारली.

“मी एक थंड प्रकृतीची, माजलेली आणि लाडाने बिघडलेली व्यक्ती आहे असे तुम्हाला वाटते तर,” खिडकीवर खिळलेली नजर न हलविता ती त्याच स्वरात म्हणाली. “पण मी स्वतःला इतकी ओळखून आहे की, त्यामुळे मी दुःखी होते.”

“तुम्ही दुःखी? कारण काय? बाष्कळ कंड्यांना तुम्ही किंमत देत नसालच?”

मादाम अदिन्त्सवाच्या चेहेऱ्यावर नाखुशी दिसली. आपल्या शब्दांचा भलताच अर्थ त्याने काढल्यामुळे तिला चीड आली.

“एव्गेनी वासिलिइच्, असल्या गावगप्पांना मी थारा देत नसते; आणि त्यामुळे माझी मनःस्थिती बिघडू न देण्याइतकी मी स्वाभिमानी आहे. मी दुःखी आहे......कारण जीवनाबद्दल मला वासना, आसक्ती वाटत नाही. तुमचा माझ्या बोलण्यावर विश्वास बसत नाही; एक कलाबतूत गुंडाळलेली, मखमाली खुर्चीत आराम करत असलेली ‘सरंजामी’ व्यक्ती बोलते आहे असे तुम्हाला वाटते. मला सत्य लपवायचे नाही; तुम्ही ज्याला ऐषआराम म्हणता तो मला आवडतो; आणि त्याचवेळी जगण्याची आस्थाही मला वाटत नाही. या विरोधाभासाचे तुम्हीच विश्लेषण करा, जसे कराल तसे. पण तुमच्या दृष्टीने हे सगळे ‘रोमँटिक’आहे.”

बझारव्ने मान हलवली. “तुम्ही सुदृढ, स्वतंत्र आणि संपन्न आहात; आणखी काय पाहिजे? कशाची उणीव वाटते तुम्हाला?”

“मला काय हवे?” मादाम अदिन्त्सवाने त्याच शब्दांचा पुनरुच्चार केला व एक उसासा टाकला.

“मी फार थकले आहे, माझे वय झाले आहे, जणू खूप दीर्घ आयुष्य मी जगले आहे असे वाटते. होय, माझे वय झाले आहे,” आपल्या उघड्या बाहूंवर हळुवारपणे लेस ओढत ती म्हणाली. बझारव्च्या नजरेशी तिची नजर भिडली आणि सूक्ष्मपणे ती शरमिंदी झाली. “कितीतरी आठवणी मागे राहिल्यासारख्या वाटतात. पिट्स्बर्गमधले दिवस, संपत्ती, नंतर दारिद्रय, नंतर माझ्या वडिलांचा मृत्यू, विवाह, आणि नंतर

अनुक्रमणिका

अपरिहार्य असा यथानुक्रम परदेशप्रवास......कितीतरी आठवणी. पण आठवावे असे काहीच नाही; आणि पुढे......पुढे दूर दूर दिशाहीन रस्ता.....पुढे जाण्याची वांच्छाच उरली नाही."

"तुम्हाला विफलता वाटते का?" बझारव्‌ने विचारले.

"नाही; पण मी असमाधानी आहे," प्रत्येक शब्दावर जोर देत मादाम अदिन्त्सवाने उत्तर दिले. "वाटत की, कशाततरी स्वतःला अतूटपणे गुंतवून घ्यावे....."

"तुम्हाला प्रेमात पडायचं आहे," बझारव्‌ने तिला मध्येच अडविले, "पण प्रेम करायला तुम्ही असमर्थ आहात; तुमच्या दुःखाचे हेच कारण आहे."

मादाम अदिन्त्सवा आपल्या लेसच्या अस्तनीचे निरीक्षण करू लागली.

"प्रेम करायला मी असमर्थ आहे हे खरे वाटते का?" ती म्हणाली.

"'नाही' असे म्हणतो फार तर! त्या अवस्थेतला मी 'दुःख' म्हटले, ते मात्र बरोबर नाही. उलट ही आपत्ती ज्याच्यावर ओढवली त्या व्यक्तीची कींवच करावी."

"आपत्ती, कसली?"

"प्रेमात पडण्याची."

"आणि ते तुम्हाला कसे समजते?"

"असेच ऐकीव गोष्टीवरून," बझारव्‌ने रागाने उत्तर दिले.

"तू छचोरपणा करते आहेस," तो स्वतःशीच म्हणाला; "तुझे जीवन भकास आहे म्हणून काहीतरी चाळा म्हणून तू मला नादाला लावते आहेस; आणि मी मात्र......" त्याचे अंतःकरण जणू विदीर्ण होत होते.

"शिवाय तुम्ही स्वभावाने जादा कडक आहात," हे बोलताना त्याचे संबंध शरीर पुढे झुकले होते आणि खुर्चीच्या टोकाशी तो चाळा करत होता.

"कदाचित, माझ्या दृष्टीने मिळवायचे तर सगळे, नाहीतर काहीच नाही. जीवास जीव द्यावा. माझे घ्यावे, आपले द्यावे, आणि तेही मागे वळून न पाहाता, खंत न करता. नाहीतर काही करू नये हे बरे."

"वा, वा?" बझारव् म्हणाला; "हा चांगला वायदा आहे; पण आजपर्यंत......तुमचे ईप्सित साध्य झालेले नसावे याचे मला नवल वाटते."

"कुठल्याही गोष्टीसाठी आपले सर्वस्व ओवाळून टाकावे हे सहज शक्य आहे असे वाटते तुम्हाला?"

अनुक्रमणिका

"नाही; चिंतनग्रस्त होऊन, प्रतीक्षा करत, स्वतःला अवास्तव किंमत देत, थोडक्यात स्वतःचा बडेजाव माजवून ते सहज शक्य होणार नाही; पण मागचा पुढचा विचार न करता स्वतःला झोकून दिलेत तर ते सहज शक्य आहे."

"स्वतःचा बडेजाव माजवू नये हे कसे शक्य आहे? मला स्वतःलाच आपली किंमत वाटत नसेल तर माझ्याबद्दल आसक्ती तरी कुणाला वाटावी?"

"मला त्याच्याशी कर्तव्य नाही; माझी किंमत काय आहे हे त्या दुसऱ्या व्यक्तीने ठरवावे. आपण स्वतः समर्पित करू शकतो की नाही हा खरा प्रश्न आहे."

मादाम अदिन्त्सवा खुर्चीतून थोडी पुढे रेलली. "या सर्व गोष्टींचा स्वतःला अनुभव असल्यासारखे तुम्ही बोलता."

"ते ओघाने आले, अना सर्गेव्ना; या गोष्टींना माझ्या जीवनात स्थान नाही हे तुम्ही जाणता."

"पण तुम्हाला स्वतःला समर्पित करता आले काय?"

"मला माहीत नाही. मला प्रौढी मिरवायची नाही."

मादाम अदिन्त्सवा काहीच बोलली नाही आणि बझारव् निःशब्द झाला. दिवाणखान्यातून पियानोचे स्वर तरळत येत होते .

"कत्या इतका वेळ कशी काय वाजवत बसली आहे?" मादाम अदिन्त्सवा म्हणाली.

बझारव् उठला. "होय, उशीर झाला आहे खरा; तुमची झोपायला जायची वेळ झाली."

"थोडे थांबा; एव्हढी घाई कसली? ......मला दोन शब्द बोलायचे आहेत तुमच्याशी."

"काय?"

"थांबा थोडे," मादाम अदिन्त्सवा कुजबुजली. तिची नजर बझारव्वर खिळून राहिली; जणू ती त्याचे लक्षपूर्वक निरीक्षण करत होती.

त्याने खोलीत एक फेरी मारली आणि एकदम तिच्या जवळ जाऊन गडबडीने तो म्हणाला "गुड बाय;" आणि तिचा हात इतक्या जोराने दाबला की, ती जवळजवळ किंचाळलीच; एव्हढ्यात तो बाहेर पडला होता. ती हुळहुळलेली बोटे तिने ओठांना लावली, त्यांच्यावर फुंकर घातली; आणि एकदम आपल्या बैठ्या खुर्चीतून आवेगाने उठून ती झपझप पावले टाकत दरवाजात गेली......जणू बझारव्ला परत आणण्याची तिची इच्छा होती......एका नौकरानीने चांदीच्या ट्रेमध्ये एक काचेची सुरई घेऊन खोलीत प्रवेश केला. मादाम अदिन्त्सवा स्तब्ध उभी राहिली, नौकरानीला जायला अनुज्ञा दिली, पुन्हा खाली

अनुक्रमणिका

बसली आणि पुन्हा विचारात निमग्न झाली. तिचा केशसंभार मोकळा झाला होता आणि त्याचे एक काळेशार पेंडाळे तिच्या खांद्यावर रुळत होते. अना सर्गेवनाच्या खोलीतील दिवा बराच वेळ जळत होता आणि ती तशीच निश्चल बसून राहिली होती; रात्रीच्या थंडीमुळे तिचे हात काहीसे दुखत असल्यासारखे ती वरचेवर आपले हात चोळीत होती; हीच काय ती तिची हालचाल.

त्यानंतर दोन तासांनी बझारव् आपल्या खोलीकडे परतला; त्याचे बूट दंवबिंदूंनी भिजलेले होते; त्याचे केस विसकटलेले होते आणि तो उद्विग्न मनःस्थितीत होता. खोलीत त्याला अर्कादी हातात पुस्तक घेऊन बसलेला आढळला; त्याच्या कोटाची बटनेसुद्धा गळ्यापर्यंत बंद होती.

“अजून तू झोपला नाहीस?” त्रासिकपणे त्याने विचारले.

“अना सर्गेव्नाकडे तू आज बराच वेळ थांबला होतास,” उत्तर देण्याऐवजी अर्कादीने शेरा मारला.

“होय, कत्या सर्गेव्नाबरोबर तू पियानो वाजवत बसला होतास तेव्हढा वेळ मी तिच्याकडे थांबलो होतो.”

“मी नव्हतो वाजवत......” त्याने सुरवात केली, पण तो थांबला. आपल्या डोळ्यांत अश्रू जमा होताहेत असे त्याला वाटले; पण आपल्या छद्मी मित्रासमोर अश्रू ढाळणे त्याला आवडले नाही.

१८

दुसऱ्या दिवशी सकाळी मादाम अदिन्त्सवा चहासाठी खाली आली, त्यावेळी बझारव् आपल्या कपावर ओणवून बराच वेळ बसलेला होता; नंतर अचानक मान वर करून त्याने तिच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला......चपराक बसल्यासारखे तिने त्याच्याकडे वळून पाहिले; आणि त्याला भासले की, गेल्या रात्रीपासून तिचा चेहेरा फिकट पडला होता. ती तडक आपल्या खोलीकडे गेली आणि मग लंचच्या वेळेपर्यंत ती बाहेर पडली नाही. सकाळपासूनच पावसाला सुरवात झालेली होती; फिरायला बाहेर पडण्याचा प्रश्नच नव्हता. सारेजण दिवाणखान्यात गोळा झाले. अर्कादीने एक नियतकालिकाचा ताजा अंक उचलला आणि मोठ्याने वाचायला सुरवात केली. त्याने जणू कुठले तरी अनुचित कृत्य केले आहे असे दर्शविण्यासाठी प्रिन्सेसच्या चेहेऱ्यावर नेहमीसारखा आश्चर्याचा भाव उमटला आणि तिने त्याच्यावर रागाने डोळे वटारले; पण त्याने तिच्याकडे अजिबात लक्ष दिले नाही.

“एव्गेनी वासिलिइच्,” अना सर्गेव्ना म्हणाली, “माझ्या खोलीकडे या......मला विचारायचे होते......काल तुम्ही एका पाठ्यपुस्तकाचा उल्लेख केला होता.”

ती उठली आणि दरवाजाकडे वळली. प्रिन्सेसने सभोवार पाहिले; तिला जणू म्हणायचे होते, “माझ्याकडे पाहा; पाहा कशी स्तिमित झाले आहे मी!” आणि पुन्हा तिने अर्कादीवर डोळे वटारले; पण त्याने आपला आवाज चढविला; तो कत्याजवळ बसलेला होता; त्याने तिच्याशी आखमिचौली केली आणि वाचन चालू ठेवले.

मादाम अदिन्त्सवा लगबगीने आपल्या अभ्यासिकेकडे गेली. बझारव् लगेच तिच्या मागोमाग चालू लागला......पुढे जाणाऱ्या रेशमी गाऊनची नाजूक सळसळ आणि खसखस कानांनी टिपून घेत. मादाम अदिन्त्सवा गेल्या रात्री ज्या खुर्चीत बसली होती त्याच खुर्चीत आताही बसली; आणि बझारव्नेही आपली पूर्वीचीच जागा घेतली.

“त्या पुस्तकाचे नाव काय?” थोड्या स्तब्धतेनंतर ती म्हणाली.

“पेलाऊस एट् फ्रेमीचे “Notions ge’ne’rales,” बझारव्ने उत्तर दिले. गॅनोच्या “Traite ele’mentaire de physique experimentale” या पुस्तकाचीही शिफारस करायला हरकत नाही. त्याच्यातील चित्रे अधिक स्पष्ट आहेत; आणि एकंदरीत ते पाठ्यपुस्तक म्हणूनच आहे.”

मादाम अदिन्त्सवाने आपला हात पुढे केला. “एव्गेनी वासिलिइच्, माफ करा, पण पाठ्यपुस्तकांवर चर्चा करायला मी तुम्हाला बोलावले नव्हते. काल रात्रीचे आपले संभाषण पुढे चालू करावयाचे होते. तुम्ही अकस्मात निघून गेलात......तुम्हाला कंटाळवाणे होणार नसेल तर......”

“बंदा सेवेस हजर आहे, अना सर्गेव्ना. पण आपण कशाविषयी बोलत होतो काल रात्री?”

मादाम अदिन्त्सवाने बझारव्कडे एक तिरका कटाक्ष टाकला.

“मला वाटते सुख म्हणजे काय यावर बोलत होतो. मी तुम्हाला माझ्यासंबंधी सांगितले. सहज आठवले म्हणून मी आताच ‘सुख’ शब्दाचा उल्लेख केला. मला एक सांगा : संगीताचा किंवा संध्यासमयाचा किंवा सहृदय मित्रांच्या संभाषणाचा आस्वाद घेत असताना असे का वाटावे की, ते सारे सुख एका अनंत सुखसमाधानाची पूर्वसूचना आहे, खऱ्या वास्तव सुखापासून ते काहीसे वेगळेच आहे......मला म्हणायचे आहे ते असे सुख की, ज्याची अनुभूती आपणाला येत आहे? तसे का वाटावे? की तुम्हाला कदाचित अशा भावनेची अनुभूतीच आलेली नाही?”

“आपण जिथे, सुख न तिथे’ ही म्हण तुम्हाला माहीत असेल,” बझारव्ने उत्तर दिले; “शिवाय आपण असमाधानी आहोत असे तुम्ही कालच म्हणालात. असल्या कल्पना माझ्या डोक्यात खचित कधीही येत नाहीत.”

“तुम्हाला कदाचित त्या हास्यास्पद वाटत असतील, नाही?”

“नाही; पण माझ्या डोक्यात तसल्या कल्पना येत नाहीत.”

“खरेच? तुमचे काय विचार आहेत ते मला जाणून घ्यावेसे वाटतात हे तुम्हाला ठाऊक आहे ना?”

“काय? मी नाही समजलो.”

“हे पाहा; तुमच्याशी फार दिवसांपासून मोकळेपणाने बोलायचे होते मला आपण कुणी सामान्य व्यक्ती नाही याची तुम्हाला जाणीव आहे हे कुणी तुम्हाला सांगायला नको; तुम्ही अजून तरुण आहात......सबंध जीवन अजून तुमच्या पुढे आहे. तुम्ही स्वतःसाठी कशाची तयारी चालविली आहे? भावीजीवनाचे कुठले चित्र तुमच्या पुढे आहे? म्हणजे मला असे म्हणावयाचे आहे की......तुम्हाला कुठली गोष्ट साध्य करून घ्यायची आहे? कुठल्या ध्येयाप्रत तुमची वाटचाल आहे? तुमच्या मनात काय आहे? थोडक्यात तुम्ही कोण आहात?काय आहात?”

“मला तुमचे नवल वाटते, अना सर्गेवना, मी प्राकृतिकविज्ञान अभ्यासतो आहे हे तुम्हाला ठाऊक आहे......आणि मी कोण......”

“तेच, कोण आहात तुम्ही?”

“मी जिल्हा डॉक्टर होणार आहे हे मी अगोदरच तुम्हाला सांगितले आहे.”

मादाम अदिन्त्सवाने थोडी अस्वस्थ हालचाल केली.

“तुम्ही असे का बोलता? तुमचा स्वतःचाच त्यावर विश्वास नाही.अर्कादीने असे उत्तर द्यावयाचे, तुम्ही नव्हे.”

“ते का बरे? अर्कादी कुठल्या......?”

अनुक्रमणिका

“थांबा! असल्या सामान्य आयुष्यक्रमाने तुमचे समाधान होणे शक्य आहे का? आणि वैद्यकशास्त्रावर तर आपला विश्वास नाही अशी भूमिका तुम्ही स्वतःच नेहमी घेत आहा, नाही का ? तुम्ही......तुमची ती महत्त्वाकांक्षा......आणि आता एक जिल्हा डॉक्टर! मला उडवून लावण्यासाठी तुम्ही अशी उत्तरे देता, कारण माझ्यावर तुमचा विश्वास नाही. पण एव्‌गेनी वासिलिइच, मी तुमचे मनोगत ओळखू शकते हे तुम्हाला समजत का नाही; मी स्वतः तुमच्याप्रमाणेच दारिद्रय भोगले आहे; तुमच्याप्रमाणेच मीही महत्त्वाकांक्षी होते; कदाचित तुमच्यासारख्याच यातना मीही भोगल्या आहेत.”

“ते सारे ठीक आहे, अना सर्गेव्‌ना, पण मला तुम्ही क्षमा केली पाहिजे; कारण......सर्वसाधारणपणे स्वतःविषयी कधीही मोकळेपणाने बोलण्याची मला सवय नाही; आणि तुमच्या-माझ्यामध्ये एक केवढी मोठी दरी आहे......”

“कसली दरी? मी एक सरंजामदार आहे हेच तुम्ही मला पुन्हा सांगणार ना? ते पुरे, एव्‌गेनी वासिलिइच्; मला वाटले मी तुम्हाला पटवून दिले होते की......”

“आणि हे सर्व बाजूला ठेवले तरी,” बझारव्‌ मध्येच म्हणाला, “आपले भवितव्य बहुतांशी आपल्यावर अवलंबून नसते, अशा स्थितीत त्या भवितव्याबद्दल विचार करायला अगर बोलायला कोण कसा उद्युक्त होईल? काही करण्याची संधी मिळालीच तर बरेच झाले; पण तशी संधी मिळालीच नाही, तर निदान आपण आधीच रिकामटेकडी बडबड केलेली नव्हती याचा तरी आनंद मिळेल.”

“अशा तऱ्हेच्या स्नेहपूर्ण संभाषणाला तुम्ही रिकामटेकडी बडबड समजता? ......किंवा तुमच्या विश्वासास पात्र होण्यालायक स्त्री मी नाही असे तुम्हाला वाटत असेल? तुम्ही आम्हा सर्वांना तुच्छ मानता हे मी जाणते.”

“अना सर्गेव्‌ना, तुम्हाला ठाऊक आहे की मी तुम्हाला तुच्छ लेखत नाही.”

“नाही, मला काहीच ठाऊक नाही......पण तसे आपण समजून चालू. तुमच्या भावी आयुष्यक्रमाबद्दल बोलायला तुम्ही नाराज आहात हे मी समजू शकते; पण याक्षणी तुमच्या मनात जे चालले आहे......”

“चालले असेल!” बझारव्‌ने पुनरुच्चार केला; “मी म्हणजे जणू कुणी शासनखाते अगर संस्था आहे! ते कसेही असो, ते अगदी नीरस आहे; शिवाय ‘मनात जे काही चालले असेल’ त्या प्रत्येक गोष्टीसंबंधी बोलणे एखाद्याला नेहमी कसे शक्य होईल?”

“का? तुमच्या मनात काय चालले आहे त्या प्रत्येक गोष्टीसंबंधी मोकळेपणाने बोलायला तुम्हाला का अशक्य वाटावे हेच मला कळत नाही.”

“तुम्हाला ते शक्य आहे?” बझारव्‌ने विचारले.

अनुक्रमणिका

"शक्य आहे," किंचित्काल आशंका वाटून तिने उत्तर दिले.

बझारव् नतमस्तक झाला. "तुम्ही माझ्यापेक्षा अधिक सुदैवी आहात."

अना सर्गेव्नाने त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. "तुमची मर्जी," ती पुढे म्हणाली; "पण मला अजूनही वाटतं की आपण एकत्र आलो ते विनाकारण नाही; आणि आपण एकमेकांचे खास मित्र होऊ. तुमच्यातला हा संकोच, मितभाषीपणा अखेर नाहीसा होईल याबद्दल मला खात्री वाटते."

"माझ्यात तुम्हाला मितभाषीपणा आढळला......तुम्ही म्हणता त्या प्रमाणे......संकोच आढळला का?"

"होय."

बझारव् उठला आणि खिडकीजवळ गेला. "माझ्या मितभाषीपणाचे कारण तुम्हाला जाणून घ्यावयाचे आहे ना? माझ्या मनात काय चालले आहे हे तुम्हाला जाणून घ्यावयाचे आहे ना?"

"होय," मादाम अदिन्त्सवा पुन्हा म्हणाली; तिच्या स्वरात एक प्रकारची धास्ती होती. अशी धास्ती का वाटावी हे त्याक्षणी तिला कळले नाही.

"आणि तुम्हाला राग येणार नाही?"

"नाही."

"नाही?" बझारव् पाठमोरा उभा होता. "मग मला सांगायचे आहे की मी एखाद्या मूर्खासारखा, वेडपटासारखा तुमच्यावर प्रेम करतो......हे, शेवटी हे माझ्याकडून वदवून घेतलत तर."

मादाम अदिन्त्सवाने आपले दोन्ही बाहू पुढे केले; पण बझारव् खिडकीच्या तावदानावर डोके टेकून रेलला होता. त्याचा श्वासोच्छ्वास जोरात होत होता; आणि त्याचे सर्वांग थरथरत होते. पण ते थरथरणे काही तारुण्यसुलभ बुजरेपणातून निर्माण झालेले नव्हते; ज्या धास्तीने त्याला पछाडले होते ती प्रीतीच्या पहिल्या प्रकटीकरणाची गोड धास्ती नव्हती; प्रभावी आणि क्लेशकारक विकारांचा त्याच्या अंतःकरणात कल्लोळ माजला होता—द्वेषभावनेहून निराळा नसणाऱ्या, आणि कदाचित द्वेषसदृश असणाऱ्या विकारांचा तो कल्लोळ असावा......मादाम अदिन्त्सवाला त्याची भीती वाटली आणि त्याच्याविषयी अनुकंपाही वाटली.

"एव्गेनी वासिलिइच्!" ती म्हणाली; तिच्या आवाजात अभावित लाघवीपणाची छटा होती.

तो झर्रकन मागे वळला; शोधक नजरेने त्याने तिच्याकडे पाहिले आणि तिचे दोन्ही बाहू पकडून त्याने अकस्मात तिला छातीशी ओढले.

अनुक्रमणिका

त्याच्या मिठीतून तिने स्वतःला ताबडतोब मुक्त करून घेतले नाही; पण दुसऱ्याच क्षणी ती दूर एका कोपऱ्यात जाऊन उभी राहिली आणि तिथून बझारव्‌कडे पाहात राहिली. तो झपाट्याने तिच्याकडे धावला.

"तुमचा गैरसमज झाला आहे."

घाबरून घाईने ती पुटपुटली. त्याने आणखी एक पाऊल पुढे टाकले असते तर जणू ती किंचाळणार होती......बझारव्‌ने ओठ चावले आणि तो बाहेर पडला.

अर्ध्या तासानंतर एका नौकरानीने अना सर्गेव्‌नाला बझारव्‌ची चिठ्ठी आणून दिली; चिठ्ठीत एकच ओळ होती; "मी आजच निघू की, उद्यापर्यंत थांबू?"

"तुम्ही कशाला जायला हवे? मी तुम्हाला समजून घेतले नाही—तुम्ही मला समजून घेतले नाही," अना सर्गेव्‌नाने उत्तर पाठविले; पण तिला स्वतःलाच वाटले, "मी स्वतःला तरी कुठे समजून घेतले आहे."

भोजनाच्या वेळेपर्यंत ती बाहेर आली नाही. काही वेळ खिडकीजवळ थांबत, तर काही वेळ आरशासमोर थांबत, आणि अजून जेथे एक भाजणारा डाग आहे असे तिला वाटत होते त्या आपल्या मानेवर संथपणे चोळत ती त्या खोलीतच शतपावली करीत राहिली. बझारव्‌चे आत्मकथन व आत्मविश्वास "चेतविण्यासाठी" आपल्याला कुठल्या भावनेने प्रवृत्त केले याचा ती स्वतःशीच विचार करत राहिली......असे काही घडणार याची शंकासुद्धा आपल्याला का येऊ नये हेच तिला कळेना. "माझेच चुकले," ती प्रकटपणे म्हणाली, "पण ह्याचे पर्यवसान असे होईल हे आधीच कळणे कसे शक्य होते!" ती विचारमग्न झाली; बझारव् जेव्हा तिच्याकडे धावत होता, त्यावेळचा त्याचा एखाद्या हिंस्त्र प्राण्यासारखा चेहरा आठवून ती लज्जेने लाल झाली.

"किंवा......?" एकाएकी ती मोठ्याने म्हणाली; ती थांबली आणि तिने केसांची झुलुपे मागे झटकली......आरशातील स्वतःच्या प्रतिबिंबाकडे तिचे लक्ष वेधले; मान मागे झुकलेली, अर्धवट दुमडलेल्या ओठात आणि अर्धोन्मिलीत नेत्रांत विलसणारे गूढ स्मित; जणू ज्यामुळे तिचाच गोंधळ उडाला होता ते कोडे क्षणार्धात उलगडले होते......

"नाही," तिने शेवटी निर्णय घेतला. "या प्रकरणाचा शेवट काय होईल हे एक परमेश्वरच जाणे; त्याच्याशी खेळ करून भागणार नाही; शांतता हीच या जगात सर्वांत श्रेयस्कर."

तिच्या मनाची शांतता ढळली नाही; पण तिला उदासवाणे वाटले; आणि एकदा तर तिच्या डोळ्यांतून अश्रू टपकले; त्याचे कारण तिला सांगता आले नसते—तिचा अपमान झाला होता हे मात्र त्याचे कारण खचित नव्हे. आपला अधिक्षेप झाला आहे असे तिला वाटले नाही; उलट आपण अपराधी आहोत असेच तिला वाटत राहिले. अनेक सुप्त भावनांच्या प्रभावाने जीवन नीरसपणे व्यतीत होत आहे या जाणिवेने, नाविन्याच्या हव्यासाने तिने स्वतःला एका विशिष्ट मर्यादेपर्यंत झोकून दिले होते; मागे वळून पाहायला लावले होते; आणि मागे वळून पाहाता तिला दिसली ती एक खोल दरी नव्हे......तर नुसतीच एक पोकळी किंवा किळसवाणे काहीतरी.

अनुक्रमणिका

१९

मादाम अदिन्त्सवाचा मनोनिग्रह जबरदस्त होता; आणि कुठल्याही प्रकारच्या पूर्वग्रहापासून ती सर्वस्वी अलिप्त होती तरी तिने जेव्हा जेवणासाठी भोजनगृहात प्रवेश केला त्यावेळी तिला अवघडल्यासारखे वाटलेच. भोजन अर्थातच फारच व्यवस्थितपणे पार पडले. पोर्फिरी प्लतोनोविच्नी प्रवेश केला आणि त्यांनी खूप गमतीदार किस्से सांगितले; नुकतेच ते शहराकडून आले होते. त्यांनी सांगितलेल्या अनेक गोष्टींपैकी एका गव्हर्नरने म्हणे विशेष कामगिरीवर असलेल्या आपल्या सचिवांना आरी लावलेले बूट वापरण्याचा आदेश दिला होता; कारण काय तर त्याला जर त्यांना कुठे कामावर पाठवायचे असेल तर अधिक वेगाने त्याला त्यांना घोड्यावरून दौडविता येईल! अर्कादी खालच्या आवाजात कत्याशी बोलत होता आणि त्याचवेळी प्रिन्सेसच्या गरजांकडेही चातुर्याने लक्ष पुरवत होता. बझारव्ने उग्र आणि दुराग्रही मौन धारण केले होते. मादाम अदिन्त्सवाने त्याच्याकडे दोन वेळा पाहिले; गुपचुपपणे नव्हे तर सरळ चेहेऱ्यावर नजर स्थिरावून; त्याच्या चेहेऱ्यावर पित्तप्रकोप आणि असंतुष्टता स्पष्ट दिसत होती; त्याचे डोळे खाली वळले होते आणि एकप्रकारचा क्षुद्र निश्चयीपणा चेहेऱ्यावर उमटला होता; ती स्वतःशीच उद्गारली, "नाही......नाही......नाही......" भोजनानंतर सगळ्यांबरोबर ती बागेत गेली; आणि बझारव्ला आपल्याशी बोलायचे आहे असे पाहून एका बाजूला काही पावले वळून उभी राहिली. तो तिच्या जवळ गेला, पण मान वर करून त्याने तिच्याकडे पाहिले नाही; घोगऱ्या स्वरात तो म्हणाला :

"मला तुमची क्षमा मागितली पाहिजे, अना सर्गेव्ना. माझ्यावर तुम्ही खवळला असणार."

"नाही, मी तुमच्यावर रागावलेली नाही, एव्गेनी वासिलिइच्," मादाम अदिन्त्सवाने उत्तर दिले; "पण मला खेद वाटतो."

"हे त्याहूनही वाईट आहे. कसेही असो, मला पुरेशी शिक्षा मिळाली आहे. मी सर्वस्वी मूर्ख ठरलो हे तुम्हाला खात्रीने पटेल. तुम्ही लिहिलेत, "जायला हवेच का?" पण मी राहू शकत नाही; इच्छाही नाही. उद्या मी गेलेलो असेन."

"एव्गेनी वासिलिइच्? तुम्ही काय म्हणून......?"

"मी काय म्हणून जातो आहे?"

"नाही; मला तसे म्हणायचे नव्हते."

"अना सर्गेव्ना, भूतकाळाची उजळणी करण्यात काही स्वारस्य नाही......हे आज ना उद्या घडणार होतेच. परिणामी मला इथून जायला पाहिजे. एका शर्थीवर मी इथे राहाण्याची कल्पना करू शकतो; पण ती शर्थ कदापि पुरी होणार नाही. एक गोष्ट विचारण्याचे धाडस करतो त्याबद्दल क्षमस्व; पण मला वाटते तुमचे माझ्यावर प्रेम नाही आणि ते कधी बसणारही नाही, नाही का?"

बझारव्चे डोळे त्याच्या काळ्याभोर भुवयांखाली क्षणभर चमकले.

अनुक्रमणिका

अना सर्गेव्नाने त्याला उत्तर दिले नाही, तिच्या मनात एक विचार चमकून गेला, "या माणसाची मला भीती वाटते."

"गुड-बाय्" बझारव्ने निरोप घेतला; जणू तिच्या मनातील विचार त्याला जाणवला; आणि तो परत घरात गेला.

अना सर्गेव्ना त्याच्यामागून संथपणे चालत गेली; कत्याला तिने बोलावले आणि तिचा हात आपल्या हातात घेतला; संध्याकाळपर्यंत तिने तिची संगत सोडली नाही. ती पत्ते खेळली नाही; सारखी हसत राहिली; ते हसणे तिच्या निस्तेज व चिंतातुर चेहेऱ्याशी विसंगत होते. अर्कादी गोंधळून गेला होता; अशा वेळी त्याच्यासारखी तरुण पोरे ज्या नजरेने पाहातील त्या नजरेने तिच्याकडे पाहात तो स्वतःलाच सारखा विचारत होता, "याचा अर्थ काय?" बझारव्ने स्वतःला खोलीत कोंडून घेतले होते; अर्थात चहासाठी मात्र तो बाहेर आला. त्याच्याशी एखादा प्रेमळ शब्द बोलण्यासाठी अना सर्गेव्ना आसुसलेली होती; पण संभाषण सुरू कसे करावे हेच तिला समजेनासे झाले होते.

एका अनपेक्षित घटनेने तिची या अवघडलेल्या अवस्थेतून सुटका झाली; एका नोकराने सितनिकोफ् आल्याची वर्दी दिली.

प्रगतीच्या त्या प्रेषिताने ज्या पद्धतीने खोलीत प्रवेश केला त्याचे वर्णन करणे शब्दातीत आहे. आपल्या स्वाभाविक निलाजरेपणाने त्याने, ज्या स्त्रीशी त्याची ओळखही नव्हती, जिने त्याला कधीही निमंत्रण दिले नव्हते, अशा स्त्रीला खेड्यात तिच्याकडे जाऊन भेट घेण्याचा बेत निश्चित केला होता. पण त्याने माहिती काढलेली होती त्याप्रमाणे तिच्याकडे तिचे बुद्धिमान आणि जिवलग मित्र राहात होते, हे समजल्यावर मात्र तो घाबरून गेला. त्याने आधीच पाठ करून ठेवलेले दिलगिरीयुक्त व स्तुतिवाचक भाषण करण्याऐवजी आपल्याला एव्दोक्स्या कुक्झिन्ने अना सर्गेव्नाच्या क्षेमसमाचारासाठी पाठविले आहे, अर्कादी निकलाएविच्ची ती नेहमी तारीफ करते आणि त्याच्याही क्षेमसमाचारासाठी आपल्याला पाठविले आहे वगैरे वगैरे तो असंबद्धपणे बरळत राहिला......इतके बोलल्यावर मात्र तो अडखळला आणि त्याचे प्रसंगावधान इतके गळाटले की, तो मटकन् आपल्या हॅटवरच बसला. अर्थात ज्याअर्थी आपल्याला कुणी हाकलून काढले नाही, इतकेच नव्हे तर अना सर्गेव्नाने त्याची आपल्या चुलतीशी व बहिणीशी त्याची ओळख करून दिली, हे पाहून तो सावरला आणि त्याने पुन्हा जिभेचा पट्टा सुरू केला. क्षुद्र व्यक्तींचा परिचय असणे हे केव्हा केव्हा जीवनात पथ्यावर पडते; त्यामुळे मनावरचा अतिरिक्त ताण कमी होतो; अतिरिक्त आत्मविश्वासू व आत्मत्यागी भावनांचा कैफ उतरतो. कारण तो क्षुद्रपणा आणि त्या भावना यांचे परस्पर नाते ओळखले जाते. सित्निकोफ्च्या आगमनाने सर्वच कसे अधिक रुक्ष आणि सरळसोपे वाटू लागले; किंबहुना त्या सर्वांनी भोजनावर चांगलाच ताव मारला; आणि नेहमीपेक्षा अर्धातास आधी झोपायला जाण्यासाठी सर्वजण उठले.

"मला पुन्हा तेच म्हणावेसे वाटते," बिछान्यावर अंग टाकत अर्कादी बझारव्ला म्हणाला; तोही कपडे उतरत होता; "तू जे मागे एकदा मला उद्देशून म्हणाला होतास 'तू इतका उदास का आहेस? कुणाला वाटेल की तू जणू एखादे पवित्र कर्म पार पाडले आहेस.'" अलीकडे त्या दोन मित्रांत सहज मोकळेपणाने थट्टा-मस्करी करण्याचा एक प्रकारचा बहाणा निर्माण झालेला होता; पण सुप्त असंतोष आणि अप्रकट संशय याचेच ते निःसंशय एक लक्षण होते.

अनुक्रमणिका

“मी उद्या वडिलांकडे निघालो,” बझारव् म्हणाला.

अर्कादी किंचित् उठून एका बाजूवर कोपरावर रेलला. त्याला विस्मय वाटले; पण त्याच वेळी कुठल्यातरी कारणाने तो खूषही झाला. “अस्सं!” त्याने शेरा मारला, “आणि म्हणून तू उदास आहेस होय?”

बझारव्ने जांभई दिली. “तुला फार कळू लागले तर म्हातारा होशील.”

“आणि अना सर्गेव्ना?” अर्कादीने ठेका चालू ठेवला.

“अना सर्गेव्नाचे काय?”

“म्हणजे तुझ्या प्रयाणाला तिची संमती आहे का, असे मला विचारायचे होते?”

“मी तिच्या तैनातीतील नोकर नाही.”

अर्कादी विचारात पडला आणि बझारव् भिंतीकडे तोंड वळवून बिछान्यावर पडून राहिला.

काही वेळ असाच निःशब्द गेला. “एव्गेनी?” अर्कादीने एकदम हाक मारली.

“काय?”

“मीही तुझ्याबरोबर उद्या येईन.”

बझारव्ने उत्तर दिले नाही.

“मी मात्र घराकडे जाईन” अर्कादी पुढे म्हणाला. “ओहलवस्कीपर्यंत आपण मिळून जाऊ; तिथे फेदॉकडे घोडे मिळतील तुला. तुझ्या माणसांशी परिचय करून घ्यायला मला आनंद वाटला असता, पण तुमच्या दोघांच्यात लुडबुडायची माझी इच्छा नाही. तू नंतर आमच्याकडे अर्थातच येणार आहेस ना?”

“माझे सामान तुमच्याकडेच पडले आहे,” बाजूवर न वळताच बझारव् म्हणाला.

“त्याच्याप्रमाणे मीही इतका तडकाफडकी का निघतो आहे याबद्दल तो मला कसे काय विचारत नाही?” अर्कादीला वाटले. “आणि खरे म्हणजे मी तरी का निघतो आहे आणि तो तरी का निघतो आहे?” त्याची विचारमालिका सुरू होती. स्वतःच्याच प्रश्नाला त्याला समाधानकारक उत्तर सापडले नाही; पण त्याचे अंतःकरण मात्र कडवट भावनांनी भरून गेले होते. इथल्या रुळलेल्या जीवनक्रमापासून दूर जाणे आपल्याला अवघड जाईल असे त्याला वाटले; पण एकटे राहणही विचित्र दिसले असते. “त्या दोघांत काहीतरी बिनसले असले पाहिजे.” त्याने स्वतःशीच तर्क केला; “तो गेल्यानंतर मी इथे रेंगाळण्यात काय

अनुक्रमणिका

स्वारस्य आहे? ती तर मला पूर्णपणे कंटाळलेली आहे; माझ्या वाट्याला आहे हेही मी शेवटी गमावत आहे." अना सर्गेव्नाची मूर्ती त्याच्या मनःचक्षूंसमोर उभी राहिली; आणि मग हळूहळू दुसऱ्या एका व्यक्तीच्या रूपाने त्या लोभस तरुण विधवेची प्रतिमा पुसून टाकली.

"कत्याचाही विरह किती दुःखदायक आहे!" अर्कादी आपल्या उशीशी कुजबुजला; तिथे आधीच एक अश्रू टपकला होता......एकाएकी त्याने आपले केस मागे झटकले आणि तो मोठ्याने म्हणाला:

"तो मूर्ख सित्निकोफ्ही याचवेळी कशाला धडपडला इथे?"

बझारव्ने बिछान्यातच हालचाल केली आणि मग त्याने प्रत्युत्तर दिले, "तू अजून बच्चा आहेस, बच्चा. सितनिकोफ्सारखी माणसं आपल्यासाठी अनिवार्य आहेत. समजतं का? मला असल्या टोणग्यांची जरुरी वाटते. केवळ परमेश्वरच असली मडकी घडवितो असे नाही !"

"ओ हो!" अर्कादी स्वतःशीच म्हणाला आणि तत्क्षणी बझारव्च्या असीम अहमन्यतेचा त्याला स्पष्टपणे प्रत्यय आला. "म्हणजे मी आणि तू परमेश्वर आहोत का? निदान तू एक देव असशील; पण मग मी मात्र टोणगा ठरतो. "

"होय," बझारव् पुन्हा म्हणाला; "तू अजून बावळट बच्चा आहेस."

दुसऱ्या दिवशी अर्कादीने आपण बझारव्बरोबर जाणार आहोत हे सांगितल्यावर मादाम अदिन्त्सवाला त्याचे नवल वाटले नाही. ती कंटाळल्यासारखी आणि आत्ममग्न दिसत होती. कत्या शांतगंभीरपणे त्यांच्याकडे पाहात होती. प्रिन्सेसची प्रतिक्रिया स्वतःला शालीत गुरफटून घेण्याइतपतच होती; अर्कादीच्या नजरेतून ते निसटले नाही; सित्निकोफ् मात्र कमालीचा अस्वस्थ दिसत होता. जेवणासाठी तो नुकताच आलेला होता; नेहमीच्या स्लाव्होफिल पद्धतीच्या पोषाखाऐवजी त्याने नवा, भपकेबाज पोषाख पेहेरलेला होता. त्याने स्वतःबरोबर इतके कपडे आणलेले होते की, त्याची सरबराई करण्यासाठी ठेवलेल्या नोकराला त्याने चकित केले होते; आणि आता एकाएकी त्याचे सोबती त्याला सोडून जात होते. त्याने एकदोन पावले टाकली, पण झुडपाच्या कडेला शिकार बनलेल्या सशाप्रमाणे दुप्पट वेगाने मागे वळला आणि अगदी भयग्रस्त होऊन रडक्या आवाजात आपणही निघून जाणार असल्याचे त्याने जाहीर केले. मादाम अदिन्त्सवाने त्याला मुळीच आडकाठी केली नाही.

"माझी गाडी फार आरामशीर आहे," अर्कादीकडे वळून तो अभागी तरुण म्हणाला; "तुम्ही माझ्याबरोबर चला; आणि एव्गेनी वासिलिइच् तुमच्या कोचातून येईल, ते अधिक सोयीचे होईल."

"पण माझे ठिकाण तुमच्या वाटेवर अजिबात येत नाही; शिवाय ते बरेच दूरही आहे."

"त्यात काय बिघडले? मला खूप वेळ आहे; शिवाय त्या बाजूलाच माझेही काम आहे."

अनुक्रमणिका

"जिन् विकण्याचे?" अर्कादीने विचारले; त्याच्या स्वरात काहीसा फाजील तिरस्कार होता. पण सित्निकोफ् इतका खजिल झाला होता की, त्याला नेहमीप्रमाणे हसणेही जमले नाही. "माझी गाडी अतिशय आरामशीर आहे याची मी हमी देतो," तो पुटपुटला; "त्यात सर्वांना जागा होईल."

"मत्सू सित्निकोफ्ना नकार देऊन दुखवू नका," अना सर्गेव्नाने शेरा मारला.

अर्कादीने तिच्याकडे नजर टाकली आणि अर्थपूर्ण रीतीने तिला अभिवादन केले.

जेवणानंतर पाहुणे जायला निघाले. बझारव्ला निरोप देताना मादाम अदिन्त्सवाने आपला हात पुढे केला आणि ती म्हणाली, "आपण पुन्हा भेटू, नाही का?"

"तुमची आज्ञा," बझारव्ने उत्तर दिले.

"तसे असेल तर, आपण भेटूच."

अर्कादी प्रथम पायऱ्या उतरून खाली गेला; आणि तो सित्निकोफ्च्या गाडीत जाऊन बसला. एका नोकराने आदरपूर्वक गाडीचा पडदा लावला; पण अर्कादीने त्याचा खून करण्यात आनंद मानला असता, किंवा त्याला भडभडून रडे तरी आले असते. बझारव् कोचात आपल्या जागेवर जाऊन बसला. ओहलवस्कीला ते पोचले; तिथे चौकीदार फेडॅातचे घोडे जुंपून होईपर्यंत अर्कादीने वाट पाहिली आणि मग कोचाकडे जाऊन आपले नेहमीचे स्मित करीत तो बझारव्ला म्हणाला, "एव्गेनी वासिलिइच्, मलाही ने तू आपल्या बरोबर; मला तुझ्याकडे यायचे आहे."

"आत ये," बझारव् पुटपुटला.

सित्निकोफ् तिथेच गाडीच्या चाकांभोवती ये-जा करत होता; चालताना तोंडाने तो शीघ्र गतीने शीळ घालत होता; त्याने ते शब्द ऐकले आणि तो आवासून उभा राहिला. अर्कादीने शांतपणे आपले सामान गाडीतून बाहेर घेतले आणि तो बझारव्जवळ येऊन बसला; आणि आपल्या जुन्या सहप्रवाशाला अभिवादन करून तो मोठ्याने म्हणाला. "लगाव चाबूक!" कोच भरधाव सुटला आणि थोड्या वेळातच दृष्टिआड झाला......सित्निकोफ् पूर्णपणे गोंधळून गेलेला होता आणि तो आपल्या कोचमनकडे पाहात राहिला; पण त्याचा कोचमन मात्र पुढच्या घोड्याच्या शेपटीला चाबकाने चमकी मारण्यात गुंतला होता. नंतर त्याने गाडीत उडी मारली आणि बाजूने चाललेल्या दोन कुळवाड्यांना उद्देशून तो ओरडला, "गाढवांनो, टोप्या घाला!" शहराकडे त्याने दौड मारली; त्याला पोचायला बराच उशीर लागला; आणि दुसऱ्या दिवशी मादाम कुक्झिन्च्या घरी त्या दोन "गर्विष्ठ, तिरस्करणीय गांवढळांचा" त्याने चांगलाच समाचार घेतला.

गाडीत बझारव्जवळ बसल्यावर अर्कादीने बझारव्चा हात प्रेमाने दाबला आणि बराच वेळ तो काहीच बोलला नाही. बझारव्लाही तो प्रेमाने दाबलेला हात आणि ती स्तब्धता यांचा अर्थ उमगला आणि त्याला ते आवडलेही होते असे दिसले. आधल्या रात्री त्याला थोडीसुद्धा झोप मिळाली नव्हती; त्याने धूम्रपान केले नव्हते की, बऱ्याच दिवसांत पोटभर अन्न देखील खाल्ले नव्हते. भुवयांपर्यंत खाली ओढलेल्या त्याच्या टोपीखाली आधीच रोड असलेला त्याचा चेहरा उदासवाणा व ठळकपणे उठून दिसत होता.

अनुक्रमणिका

"अच्छा, भाई," तो अखेर बोलला, "एक सिगरेट काढ. पण मला सांग, माझी जीभ पिवळी दिसते का?"

"होय, दिसते," अर्कादीने उत्तर दिले.

"हं......सिगरेटलाही चव नाही. यंत्रात काही तरी बिघाड झाला आहे."

"तुझ्यात अलीकडे बदल झालेला दिसतो खरा," अर्कादी म्हणाला.

"त्याचे काही विशेष नाही! सर्व काही अल्पावधीत ठीक होईल. एक कटकट मात्र आहे—माझी आई फार हळव्या मनाची आहे; मी जर पिपासारखा गरगरीत झालो नाही, आणि जर रोज दसपट अन्नभक्षण केले नाही, तर बिचारी फारच व्याकुळ होते. माझ्या वडिलांचे ठीक आहे; त्यांनी स्वतःच आयुष्यात खूप चढउतार अनुभवले आहेत. नको, हे धूम्रपान काही जमत नाही," तो म्हणाला आणि रस्त्यावरच्या धुळीत ती सिगरेट फेकून दिली.

"वीसएक मैल असेल का?" अर्कादीने विचारले.

"शक्य आहे; पण या साधू माणसालाच विचार." त्याने बॉक्सवर बसलेल्या त्या फेदॅतच्या मजुराकडे बोट दाखविले.

पण तो साधू महाराज एव्हढेच म्हणाला, "कुणास ठाऊक—इकडे रस्त्याची मोजणी झालेली नाही," आणि त्याने खालच्या आवाजात दांड्याजवळच्या घोड्याला शिव्याशाप देणे चालू ठेवले; तो घोडा म्हणे "टाळक्याने लत्ताप्रहार करत होता," म्हणजे काय तर डोके खाली करून हिसके देत होता.

"होय, होय" बझारव् म्हणाला; "मित्रा, चांगला धडा मिळाला, अगदी बोधप्रद धडा. कुठे बिनसले ते परमेश्वरच जाणे. प्रत्येकजण काडीच्या आधारे जगत असतो, पायाखालची अनंत दरी कुठल्याही क्षणी उघडण्याची शक्यता असते आणि तरीही त्याने आगेकूच केले पाहिजे, सर्वप्रकारच्या गैरसोयी निर्माण केल्या पाहिजेत आणि आपले आयुष्य बरबाद केले पाहिजे."

"कशासंबंधी तू बोलतो आहेस?" अर्कादीने विचारले.

"'कशासंबंधी' मी नाही बोलत; अगदी स्पष्टपणे मी म्हणतो आहे की, आपण दोघेही मूर्खासारखे वागलो आहोत. त्यासंबंधी बोलून काय उपयोग! तरीही इस्पितळात काम करताना मी पाहिलेले आहे की, जो आपल्या आजाराबद्दल उद्विग्न झाला आहे तो निश्चित रोगमुक्त होतो."

"तुला काय म्हणायचे आहे ते नीटसे ध्यानात येत नाही," अर्कादी म्हणाला; "मला वाटले होते की, तक्रार करण्यासारखे तुझ्या बाबतीत काहीच नाही."

अनुक्रमणिका

"आणि ज्याअर्थी तुला समजत नाही, त्याअर्थी मी ते सांगतो तुला समजावून. माझ्या मते एखाद्या स्त्रीला आपल्या करांगुलीवरसुद्धा ताबा मिळवून देण्यापेक्षा रस्त्यावर खडी फोडलेली बरी. हा सर्व......" बझारव् आपला आवडता शब्द "सौंदर्यवाद" उच्चारण्याच्या बेतात होता; पण स्वतःला आवरून तो म्हणाला, "भंकसपणा. तुझा माझ्यावर आता विश्वास बसणार नाही; पण मी सांगतो तुला; तू आणि मी दोघेही स्त्रियांच्या सांनिध्यात वावरलो आणि तो सहवास सुखप्रद वाटला; पण तशा प्रकारच्या सहवासाचा त्याग करायचा म्हणजे कसे एखाद्या उकाड्याच्या दिवशी थंड पाण्यात उडी मारल्यासारखे वाटते. असल्या क्षुद्र गोष्टींसाठी आपल्याला वेळ नाही; एका उत्कृष्ट स्पॅनिश म्हणीप्रमाणे माणसाने शेळपट होता कामा नये......अरे ये भल्या माणसा," बॉक्सवर बसलेल्या त्या कृषकमजदूराकडे वळून बझारव् म्हणाला,— "मला वाटते तुझी बायको असेलच?"

त्या कृषकमजदूराने आपला पिचके डोळे असलेला चेहेरा त्या दोन मित्रांकडे वळविला.

"बायको? ही प्रत्येक पुरुषाला बायको असते."

"तू तिला मारपीट करतोस का?"

"माझ्या बायकोला? कधी कधी सगळ्या गोष्टी घडतात. तसेच कारण असल्याखेरीज नाही मारपीट करत."

"उत्तम. आणि ती तुला मारते का?"

त्या मजदूराने लगाम खेचले. "हे काय बोलणे झाले, साहेब. तुम्हाला थट्टा सुचते......" त्याचा अधिक्षेप झाला होता हे स्पष्ट होते.

"ऐकलस, अर्कादी निकालाएविच्!" पण आपल्याला मार मिळाला आहे......सुशिक्षित माणसे होण्याचे हे फळ."

अर्कादी बळेच हसला आणि बझारव्ने दुसरीकडे तोंड वळविले; आणि मग सबंध प्रवासभर त्याने तोंड उघडले नाही.

प्रवासाचे ते वीस मैलांचे अंतर अर्कादीला चाळीस मैलांसारखे वाटले. पण शेवटी बझारव्चे वडील राहात असलेली ती वाडी एका लहानशा टेकडीच्या उतारावर वसलेली त्यांच्या दृष्टिपथात आली. त्याच्या बाजूलाच बर्चच्या कोवळ्या झुडुपांच्या घळीत एक लहानसे धाब्याचे घर दिसत होते. एका झोपडीजवळ दोन शेतकरी एकमेकांशी शिवीगाळ करत उभे होते.

"तू डुकरीण आहेस," एकजण म्हणाला; "आणि पिणाऱ्या पिलापेक्षाही वाईट."

"आणि तुझी बायको चेटकीण आहे," दुसऱ्याने प्रत्युत्तर दिले.

अनुक्रमणिका

“त्यांच्या बेलगाम वागणुकीवरून,” बझारव् अर्कादीला सांगू लागला, “आणि त्यांच्या उत्तरे देण्याच्या खेळकर प्रवृत्तीवरून तुला आढळून येईल की, या शेतकऱ्यांवर माझ्या वडिलांची फारशी जुलूम जबरदस्ती नसावी. ते पाहा, ते स्वतःच पायऱ्यांवर येऊन उभे आहेत. त्या सगळ्यांना घंट्यांचा आवाज ऐकू आला असला पाहिजे......तेच ते, तेच......त्यांची आकृती माझ्या चांगलीच परिचयाची आहे. अरेरे! किती थकलेले दिसताहेत, बिचारे!”

अनुक्रमणिका

बझारव्ने कोचाच्या बाहेर वाकून पाहिले; आणि अर्कादीने आपल्या मित्राच्या पाठीमागून डोके बाहेर काढले आणि देशमुखवाडीच्या त्या लहानशा घराच्या पायऱ्यांवर उभी असलेली एक व्यक्ती त्याला दिसली. उंच, कृश, आणि विसकटलेले केस. ससाण्यासारखे सरसरीत नाक. त्यांनी सैन्यातला जुनापुराणा कोट परिधान केलेला होता; त्याची बटने सुटलेली होती. आपल्या लांबट पाईपचे झुरके घेत पाय फाकून ते उभे होते. उन्हाचा त्रास चुकविण्यासाठी त्यांचे डोळे मिचकत होते.

घोडे थांबले.

"आलास बाबा, एकदाचा," बझारव्चे वडील म्हणाले; त्यांचे धूम्रपान चालूच होते आणि बोटांमधला पाईप सारखा खालीवर नाचत होता. "ये बाहेर; मला तुला कडकडून भेटू दे."

त्यांनी आपल्या पुत्राला बाहुपाशात घेतले......"एन्यूशा, एन्यूशा," एका स्त्रीचा थरथरता आवाज ऐकू आला. दरवाजा उघडला गेला आणि एक टुमटुमीत, खुजी म्हातारी दृष्टिस पडली. तिच्या डोक्यावर पांढरी टोपी आणि अंगात आखूड, रेघारेघाचे जॅकेट होते.

ती विव्हळत होती, लटपटत होती; बझारव्ने तिला सावरले नसते तर ती कोलमडलीच असती. तिच्या गुबगुबीत हातांनी लगेच त्याच्या मानेभोवती विळखा घातला आणि तिचे डोके त्याच्या छातीवर विसावले; आणि तिथे संपूर्ण शांतता पसरली. तिच्या दबलेल्या हुंदक्यांचाच काय तो आवाज होत होता.

वृद्ध बझारव् सुस्कारे टाकत होते आणि त्यांनी पूर्वीपेक्षाही डोळे अधिक मिचमिचे केले.

"हा, पुरे, पुरे आता, अरीशा! थांबव ते," अर्कादीकडे दृष्टिक्षेप टाकत ते म्हणाले. तो कोचात स्तब्धपणे बसलेला होता; तर बॅाक्सवर बसलेल्या त्या मजदूराने मान बाजूला वळविली; "त्याची अजिबात जरुरी नाही, थांबव आता."

"वासिली इवानोविच्," अडखळत म्हातारी म्हणाली. "किती दीर्घ काळ, माझा लाडका......एन्यूशा......"

आपल्या हातांची पकड ढिली न करता अश्रूंनी ओला झालेला व मायेने ओथंबलेला आपला सुरकुतलेला चेहेरा तिने बाजूला केला.

अंतरावरून आपल्या आनंदी पण काहीशा गमतीदार डोळ्यांनी तिने त्याच्याकडे एकटक पाहिले आणि पुन्हा एकदा त्याच्या मानेवर झेप टाकली.

"बरे, बरे; चालायचेच हे," वासिली इवानोविच् म्हणाले; "निदान आपण आत तरी जाऊ. एव्गेनीबरोबर एक पाहुणा आलेला आहे. तुम्ही हे मनावर घेऊ नका," अर्कादीकडे वळून पाय फरपटत चालत ते म्हणाले, "स्त्रिया दुबळ्या असतात हेच खरे; शिवाय आईचं अंतःकरण......"

अनुक्रमणिका

त्यांचे ओठ आणि भुवया स्वाभाविकपणेच स्फुरत होते; आणि त्यांची दाढी थरथरत होती......पण स्वतःला सावरण्याचा आणि शक्यतो निर्विकार दिसण्याचा त्यांचा प्रयत्न स्पष्ट होता.

"चल, आतच जाऊ आपण, आई," बझारव् म्हणाला आणि त्याने त्या अशक्त स्त्रीला घरात नेले. एका आराम खुर्चीत तिला बसवून त्याने पुन्हा एकदा वडिलांना घाईने अलिंगन दिले आणि अर्कादीची ओळख करून दिली.

"तुमच्या ओळखीने फारच आनंद झाला," वासिली इवानोविच् म्हणाले; "पण इथे तुम्हाला भव्यदिव्य असे काही आढळणार नाही; माझ्या घरातील प्रत्येक गोष्ट साधेपणाने, सैन्यातील शिस्तीप्रमाणे आखली गेली आहे. अरीना व्लास्येव्ना, कृपा करून आता शांत हो; हा काय दुबळेपणा ! आपल्या सन्माननीय पाहुण्यांचे तुझ्याविषयी वाईट मत होईल."

"साहेब," आपल्या अश्रूंच्या पडद्याआडून ती वृद्धा म्हणाली, "तुमचे आणि तुमच्या वडिलांचे नाव समजले तर मला धन्य वाटेल."

"अर्कादी निकालाएविच्," वासिली इवानोविच्नी खालच्या आवाजात गंभीरपणे सांगितले.

"माझ्यासारख्या खुळ्या म्हातारीचे काही मनावर घेऊ नका," म्हातारीने नाक शिंकरले आणि एकदा उजवीकडे व एकदा डावीकडे मान झुकवून तिने काळजीपूर्वक एक एक डोळा पुसला. "क्षमा करा; पण मला वाटायचं माझ्या लाडक्याला भेटल्याशिवायच मी मरणार."

"मग आता त्याला भेटण्यासाठी आपण जिवंत राहिलो ना, बाईसाहेब," वासिली इवानोविच् मध्येच म्हणाले. "तन्यूष्का," एका तेरा वर्षे वयाच्या अनवाणी उभ्या असलेल्या मुलीकडे वळून ते म्हणाले. तिने तांबडा भडक रंगाचा सुती पोषाख पेहेरलेला होता आणि ती दाराआडून बुजरेपणाने पाहात होती; "तुझ्या मालकिणीसाठी पाण्याचा ग्लास घेऊन ये—ट्रेमधून; ऐकलंस का?—आणि तुम्ही मंडळी," जुन्या काळात रूढ असलेल्या खेळकरपणाने ते पुढे म्हणाले, "कृपया या निवृत्त शिपाई गड्याच्या खोलीत चला. "

"एन्यूशा, फक्त आणखी एकदाच तुला कडकडून भेटू दे," अरीना व्लास्येव्ना कळवळून म्हणाली. बझारव् तिच्यापुढे वाकला. "किती मोठा, देखणा झाला आहेस रे तू!"

"देखणाबिखणा मला काही समजत नाही," वासिली इवानोविच्नी शेरा मारला; "पण आता तो 'प्रौढ झाला आहे.' तशी म्हणच आहे, नाही का? आणि आता अरीना व्लास्येवना, तुझी वात्सल्यपूर्ती झाल्यावर पाहुण्यांच्या क्षुधातृप्तीचाही काही विचार कर; कारण तुला ठाऊक आहेच की, परीकथांनी बुलबुलांचेसुद्धा पोट भरत नाही."

म्हातारी खुर्चीतून उठली. "वासिली इवानोविच्, ताबडतोब पाने मांडण्याची व्यवस्था करते. स्वैपाकघरात स्वतः जाऊन सॅमोव्हर इथे आणायला सांगते; सगळी जय्यत तयारी होईल. या तीन वर्षात मी त्याला भेटलेय की, खाऊपिऊ घातलंय; हे का नको आहे मला करायला ? "

अनुक्रमणिका

“पुरे, पुरे......आटप आता, आम्हाला लाजवू नको; तुम्ही मंडळी कृपा करून माझ्या मागोमाग या; एव्गेनी, हा टिमोफिच् तुझ्या समाचाराला आला आहे; तो म्हातारा गडी देखील तुला पाहून खूष झाला आहे असे दिसते; नाही का रे म्हाताऱ्या? या माझ्याबरोबर.” आणि वासिली इवानोविच् आपली टाचा झिजलेली पादत्राणे फऱ्फटत पुढे गेले.

त्या सबंध घरात सहा खोल्या होत्या. ज्या खोलीत त्यांनी या मंडळींना नेले तिला ते अभ्यासिका म्हणत. एका जाडजूड खूर असलेल्या टेबलाने दोन खिडक्यांमधील जागा व्यापलेली होती; त्याच्यावर पुरातन धूळ साचलेले, धूरकटल्यासारखे दिसणारे काळपट कागद अस्ताव्यस्त पडले होते; भिंतीवर तुर्की बंदूका लटकावलेल्या होत्या; त्याचबरोबर काही चाबूक, एक तरवार, दोन नकाशे, शरीरविज्ञानाच्या काही आकृती, हॅाफलंडचे चित्र, केसांनी विणलेली आणि काळ्या चौकटीत बसविलेली नावाची पाटी, आणि काचेत बसविलेले प्रणाणपत्र इत्यादी वस्तू टांगलेल्या होत्या; बर्चवुडची दोन विशाल कपाटे होती; त्या दोन कपाटांमधील जागेत एक कातडी आवरण घातलेला सोफा होता; तो फाटलेला होता आणि वापरून वापरून त्याला काही ठिकाणी भोके पडलेली होती; घडवंचीवरच्या कप्प्यात पुस्तके, पेट्या, भुसा भरलेले पक्षी, बरण्या आणि बुधले यांची एकच गर्दी उसळलेली होती; एका कोपऱ्यात एक मोडके विद्युत्पादक रसायनपात्र होते.

“अर्कादी निकालाएविच्, मी तुम्हाला आधीच बजावले आहे,” वासिली इवानोविच् म्हणाले, “आम्ही अगदी उघड्यावर तळ ठोकून राहिल्यासारखे राहतो.”

“थांबा तेव्हढ्यावरच, एव्हढे खंत वाटण्यासारखे कशाला बोलायला हवे?” बझारव्ने मध्येच अडवून विचारले. “आम्ही काही क्रॅासस लोक नाही हे किर्सानव्ला माहीत आहे; तुमच्याकडे स्वयंपाकी नाही हेही त्याला ठाऊक आहे. त्याला राहायला कुठली खोली द्यायची, हा खरा प्रश्न आहे?”

“अलबत, एव्गेनी; आपल्या लहानशा बिऱ्हाडात एक झकास खोली आहे; त्या खोलीत त्याला मुळीच तकलीफ वाटणार नाही.”

“म्हणजे अशा तऱ्हेची खोली तुम्ही बांधून घेतली आहे काय?”

“अं हं; आपले स्नानगृह आहे ना, तिथेच,” टिमोफिच् मध्येच म्हणाला.

“म्हणजे स्नानगृहाशेजारची खोली,” वासिली इवानोविच्नी गडबडीने पुस्ती जोडली. “उन्हाळ्याचे दिवस आहेत......मी स्वतः तिथे जाऊन सगळी व्यवस्था करतो; आणि टिमोफिच, त्यांचे सामान आत घे तोपर्यंत. एव्गेनी, तुला माझी अभ्यासिका चालेल. ज्याची त्याला खोली.”

“पाहिलस कसे आहेत माझे वडील! गंमतीदार पण गोड स्वभावाचा भिडू,” वासिली इवानोविच्ची पाठ फिरताच बझारव् म्हणाला. “तुझ्या वडिलांसारखेच विक्षिप्त, पण थोड्या निराळ्या अर्थाने. ते बडबड फार करतात.”

“आणि तुझी आई तर विलक्षण चांगली आहे,” अर्कादी म्हणाला.

अनुक्रमणिका

“हो, तिच्यापुढे गुळमुळीतपणा नाही चालत. आपल्यासाठी भोजनप्रबंध कसा करते हे पाहाशीलच.”

“साहेब, तुम्ही आज याल अशी अपेक्षा नव्हती त्यांची; त्यामुळे गोमांस आज आणलेले नाही,” बझारव्ची पेटी आत ओढून आणत असता टिमोफिच् म्हणाला.

“गोमांस नसले तरी चालेल आम्हाला. चंद्रासाठी हट्ट धरण्यात अर्थ नाही. दारिद्र्य हा काही दुर्गुण नाही, असे म्हणतात ना.”

“तुझ्या वडिलांकडे किती कृषकमजदूर आहेत?” अर्कादीने एकाएकी विचारले.

“ही शेतीवाडी त्यांची नव्हे; आईची आहे; माझ्या आठवणीप्रमाणे पंधराएक कृषकमजदूर आहेत त्यांच्याकडे.”

“बावीस, सगळे मिळून,” टिमोफिच्ने दुरुस्ती केली; त्याच्या आवाजात असंतोष जाणवत होता.

पादत्राणांचे फरफटणे ऐकू आले आणि मागोमाग वासिली इवानोविच् आत आले. “थोड्या वेळातच तुमची खोली तुमच्या स्वागतासाठी तयार होईल,” अत्यानंदाने ते म्हणाले. “अर्कादी......निकालाइच्? मी म्हणतो ते बरोबर आहे ना? आणि हा तुमच्यासाठी नोकर,” एका मुलाकडे बोट दाखवून ते म्हणाले; त्यांच्याबरोबरच तो आत आलेला होता. त्याचे केस आखूड कापलेले होते आणि निळ्या रंगाचा पायघोळ कोट त्याने पेहेरलेला होता; त्याच्या कोटाचे हातोपे कोपरापाशी फाटलेले होते; आणि त्याच्या पायातले बूट त्याचे स्वतःचे नव्हते हे स्पष्ट दिसत होते. “याचे नाव फेडका. आमच्या चिरंजीवांनी सांगू नका असे बजावले असले तरीही मी पुन्हा एकदा सांगतो की, इथे तुम्हाला भव्य, किमती असे काहीही आढळणार नाही. पाईपमध्ये तंबाखू भरायचे मात्र त्याला बरीक समजते. तुम्ही धुम्रपान करत असालच?”

“मी सर्वसाधारणपणे सिगार ओढतो,” अर्कादीने उत्तर दिले.

“तेच शहाणपणाचे. मी सुद्धा सिगारच पसंत करतो; पण इकडच्या विजनवासात मिळणे भारी कठीण.”

“बस्स, पुरे करा आत्मनिंदा,” बझारव्ने त्यांना पुन्हा अडविले. “त्यापेक्षा या सोफ्यावर जरा बसा पाहू; आम्हाला जरा पाहू दे तुमच्याकडे.”

वासिली इवानोविच् हसत खाली बसले. दिसायला ते आपल्या पुत्रासारखेच होते; फक्त त्यांचे कपाळ तेव्हढे खाली झुकलेले आणि निरुंद होते; जिवणी किंचित रुंद होती; आणि ते नेहमी अस्वस्थ असायचे; काखेत कोट बोचल्यासारखे ते आपले खांदे उडवत; डोळे मिचकावत, खाकरत, त्यांच्या बोटांच्या हालचाली सारख्या चालू असत; या उलट त्यांचा मुलगा त्याच्या विशिष्ट निर्भर स्वस्थपणामुळे उठून दिसे.

अनुक्रमणिका

"आत्मनिंदा!" वासिली इवानोविच्नी त्या शब्दाचा पुनरुच्चार केला. "आम्ही अशा विजनावस्थेत राहातो असे भासवून आपल्या पाहुण्यांच्या सहानुभूतीला मी आवाहन करतो असे, एव्गेनी, तुला वाटायला नको. उलट, विचारी माणसाला कुठलीही स्थिती विजनावस्थेसारखी वाटत नाही असे माझे मत आहे. निदान मी तरी, शक्य असेल तेव्हढे, गंजून न जाण्याचा, काळाच्या मागे न पडण्याचा प्रयत्न करत असतो."

वासिली इवानोविच्नी एक पिवळा रेशमी रुमाल खिशातून बाहेर काढला; अर्कादीच्या खोलीकडे जाताना त्यांनी तो ओढून घेतला होता; आणि तो रुमाल हवेत फडकवत ते पुढे म्हणाले, "मला आता त्या गोष्टीचा उल्लेख करायचा नाही आहे की, उदाहरणार्थ, बरेचसे नुकसान सोसून मी माझ्या कुळांना भाडेपद्धतीवर सगळी जमीन देऊन टाकली आहे आणि मी फक्त निम्म्या फायद्याचा वाटेकरी आहे; तसे करणे मला माझे कर्तव्यच आहे असे वाटले. सारासार विचार करूनच हे पाऊल उचलले आहे; पण इतर जमीनदारांच्या हे स्वप्नातही येणार नाही. मी बोलतो आहे ते शास्त्र, संस्कृती या संदर्भात बोलतो आहे."

"होय, तरीच तुमच्याकडे हे 'द फ्रेंड ऑफ हेल्थ' हे १८५५ चे पुस्तक दिसते आहे." बझारव्‌ने शेरा मारला.

"एका जुन्या मित्राने ते मैत्रीखातर भेट म्हणून पाठवले आहे," वासिली इवानोविच्नी तत्परतेने उत्तर दिले. "पण सांगायचे झाले तर, उदाहरणार्थ, आम्हाला कपाललक्षण विद्येचीही थोडी माहिती आहे," मुख्यत्वे अर्कादीला उद्देशून ते म्हणाले आणि कपाटावर ठेवलेल्या प्लास्टरच्या मस्तकाकृतीकडे त्यांनी अंगुलिनिर्देश केला; त्यावर चौकोन रेखाटलेले होते आणि त्यांना क्रमांक दिलेले होते; "शेनलाईन व रॅडमॅशर हेही आम्हाला अपरिचित आहेत असे नाही."

"अजूनही या भागातले लोक रॅडमॅशरवर का विश्वास ठेवतात?" बझारव्‌ने विचारले. वासिली इवानोविच्नी घसा साफ केला. "या भागात......अर्थातच तुम्हा मंडळींना बऱ्याच गोष्टींची उत्तम माहिती असते; आम्हाला तुमच्याशी बरोबरी कशी करता येईल? तुम्ही लोकच आता आमची जागा घेणार. आमच्या काळात सुद्धा 'वातपित्तवादी' म्हणता येईल अशांचा एक पंथ होता; हॉफ्मन, शिवाय ब्राऊन आणि त्याचा 'जीवात्मवाद;' आम्हाला ते सारे हास्यास्पद वाटायचे; पण अर्थातच तेही कधीकाळी थोर म्हणून गणले गेले होतेच. तुमच्या काळात रॅडमॅश्‌र्‌ची जागा दुसऱ्या कुणीतरी घेतलेली आहे; तुम्ही त्याला मान देता, पण आणखी वीसएक वर्षांनी हास्यास्पद व्हायची त्याचीही पाळी आहे."

"तुमच्या समाधानासाठी एक गोष्ट सांगतो," बझारव् म्हणाला, "आजकाल आम्ही वैद्यकशास्त्रच हास्यास्पद मानतो आणि आम्ही कुणापुढेही मान तुकवत नाही."

"असे कसे? तू तर डॉक्टर होणार आहेस, नाही का?"

"होय, पण एक गोष्ट दुसऱ्या गोष्टीच्या आड यायचं कारण नाही" वासिली इवानोविच्नी आपले मधले बोट पाईपमध्ये खुपसले; त्यात अजूनही थोडी जळती राख शिल्लक होती. "असे का, शक्य आहे......मी वाद घालत नाही. कोण मी? एक निवृत्त सैनिक डॉक्टर, बस्स एवढेच; दैवगतीने मी आता शेतीत पडलो आहे. तुमच्या आजोबांच्या ब्रिगेडमध्ये मी होतो," पुन्हा एकदा अर्कादीकडे वळून ते म्हणाले; "माझ्या काळात मी खूप गोष्टी पाहिल्या आहेत. समाजातील सगळ्या स्तरांशी माझा संबंध आला, सर्व

प्रकारच्या लोकांमध्ये मी वावरलो! तुमच्यासमोरची ही व्यक्ती, म्हणजे मी स्वतः, प्रिन्स विटगेन्स्टाईन् आणि झुकीव्स्की यांची नाडीपरीक्षा केली आहे! दक्षिण विभागातील चौदाव्या तुकडीत ते होते, समजलं" (आणि इथे वासिली इवानोविच्‌नी अर्थपूर्णरीत्या आपले ओठ दुमडले). "पण माझा उद्योग हा थोडा एकांगीपणाचा होता. आपल्या शस्त्राला घट्ट धरून ठेवावे आणि इतर कुठल्याही गोष्टीची पर्वा करू नये. तुमचे आजोबा मात्र मान्यवर गृहस्थ......खरा शिपाई गडी."

"तो एक बुध्दू माणूस आहे हे आता तरी कबूल करा की," बझारव्‌ने सुस्तपणे एक विधान केले.
"वा एव्गेनी, ही काय भाषा झाली! ......आता जनरल किर्सान्व् हे काही फार......"

"जाऊ दे, पुरे त्यांचा विषय," बझारव् मध्येच अडवून म्हणाला; "तुमचे बर्चचे बन पाहून आपण खूष झालो येताना; चांगलेच वाढले आहे ते."

वासिली इवानोविच् उल्हसित झाले. "आणि आता माझा छोटा बगीचा तू पाहायला हवास! प्रत्येक रोप मी माझ्या हाताने लावले आहे. फळझाडे, रासबेरी, आणि सर्व प्रकारची औषधी वनस्पती. तुम्ही तरुण मंडळी कितीही हुशार असला तरी पॅरासेल्ससने लॅटिनमध्ये एक पवित्र सत्य सांगून ठेवले आहे:

"वनस्पतीत, शब्दात आणि प्रस्तरात......"......मी आता व्यवसायातून मुक्त झालो आहे हे तुम्हाला ठाऊक आहेच; पण तरीही आठवड्यातून दोनतीन वेळा तरी मला माझ्या जुन्या व्यवसायाकडे ओढून नेले जाते. सल्ला विचारण्यासाठी माणसं येतात आणि मी काही त्यांना हाकलून लावू शकत नाही. काही वेळा तर गरीब लोक मदतीसाठी माझ्यावरच अवलंबून राहातात. वस्तुतः या भागात जवळपास कुणी डॉक्टर नाहीच. एकजण आहे इथे शेजारी; निवृत्त मेजरच्या हुद्द्याचा. तोही लोकांना तपासतो म्हणायला हरकत नाही. मी चौकशी केली, 'त्यांनी वैद्यकाचा अभ्यास केला आहे का?' लोकानी उत्तर दिले, 'नाही, अभ्यास नाही केला त्यांनी; भूतदया म्हणून ते लोकांना औषधपाणी देतात'......हा! हा! हा! भूतदया म्हणे! तुमचे काय मत? हा!हा! हा!"

"फेडका माझी पाईप भर," बझारव्‌ने कडकपणे फर्मान सोडले.

"आणखी एक डॉक्टर रोग्याकडे गेला," वासिली इवानोविच्‌नी एक प्रकारच्या हताशपणे चालू ठेवले, "तोपर्यंत रोग्याने राम म्हटला होता; नोकराने डॉक्टरला बोलू दिले नाही; 'तुमची आता जरुरी नाही,' त्याने त्यांना सांगितले. त्यांना ते अनपेक्षित होते; ते गोंधळले आणि त्यांनी विचारले, 'बरे, मरणापूर्वी तुझ्या धन्याला उचकी लागली होती काय?' 'होय.' 'फार उचकी लागली होती काय?' 'होय.' 'मग काही हरकत नाही,' आणि ते परत गेले. हा! हा! हा!"

ते एकटेच हसत राहिले; अर्कादीने बळेच स्मित केले. बझारव्‌ने फक्त पाय ताणले. अशा तऱ्हेने तासभर संभाषण चालले होते; दरम्यान अर्कादी आपल्या खोलीकडे जाऊन आला; खोली स्नानगृहाला लागूनच होती; पण स्वच्छ आणि सोरीची होती. शेवटी तन्यूश्याने आत येऊन भोजन तयार असल्याची वर्दी दिली. वासिली इवानोविच् प्रथम उठले. "चला, मंडळी. माझे बोलणे तुम्हाला रुक्ष वाटले असल्यास थोर मनाने तुम्ही मला क्षमा केली पाहिजे. माझी गुणी पत्नी त्याची भरपाई करील अशी अपेक्षा करतो."

भोजन गडबडीने तयार केलेले होते, पण चविष्ट आणि मनसोक्त होते; फक्त मद्यच काय ते निकृष्ट प्रतीचे असावे; काळ्या शेरीसारखे; टिमोफिच्ने शहरातल्या एका प्रसिद्ध व्यापाऱ्याकडून ते आणले होते; तांबट, राळेसारखी चव होती त्याला; आणि माशांचा उपद्रव तर विचारायलाच नको. एरव्ही एक नोकराचे पोर एका मोठ्या हिरव्या फांदीने माशांना हुसकत असे; पण यावेळी मात्र वासिली इवानोविच्नी या तरुण पिढीकडून होणाऱ्या टीकेच्या भीतीने त्याला दूर पाठवले होते. मधल्या वेळेत अरीना व्लास्येव्नाने पोषाख बदलला होता; रेशमी फितींनी बांधलेली एक उंच टोपी तिने पेहेरली होती, आणि फिकट निळसर फुलांची नक्शी काढलेली शाल लपेटलेली होती. लाडक्या एन्यूशाला पाहिल्याबरोबर तिला पुन्हा एकदा उमाळा आला, पण नवऱ्याने ताकीद देण्याची यावेळी जरुरी पडली नाही; कारण तिनेच तत्परतेने आपले अश्रू पुसले; नाहीतर शालीवर अश्रूंचे डाग दिसले असते. ती तरुण मंडळीच काय ते खात होती; घरधनी आणि त्याची पत्नी यांचे भोजन पूर्वीच आटोपले होते. फेडका वाढायला होता; प्रथमच बूट घातल्या कारणाने त्याला बोजड वाटत होते; त्याला मदत करण्यासाठी अन्फिशुश्का नावाची स्त्री होती; चेहेऱ्याने आणि एका डोळ्याने ती पुरुषी थाटाची वाटत होती; मोलकरणीची, कुक्कुटपालनाची आणि धुणी धुण्याची सर्व कामे ती करत असे. वासिली इवानोविच् सबंध भोजन होईपर्यंत शतपावली करत होते; बोलताना त्यांच्या चेहेऱ्यावर परमसुखाचा, जणू मोक्षप्राप्तीच्या सात्विक आनंदाचा भाव होता; नेपोलियनच्या धोरणाबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली; त्याबद्दल व इटलीच्या प्रश्नाबद्दल ते बोलत होते. अरीना व्लास्येवनाचे अर्कादीकडे मुळीच लक्ष नव्हते; आपला गोल चेहेरा हाताच्या लहानशा मुठीवर रेलून ती बसलेली होती; तिच्या गालावरच्या व भुवयांवरच्या चामखिळ्यांमुळे तिच्या चेहेऱ्यावर साधेपणाचा, सात्त्विकतेचा भाव प्रतीत होत होता; पुत्राच्या चेहेऱ्यावर तिची नजर खिळून राहिलेली होती. आणि तिचे उसासे टाकणे चालूच होते; तो किती दिवस राहण्यासाठी आला आहे हे जाणण्यासाठी तिचे प्राण अगदी कंठाशी आले होते, पण त्याला विचारायचे धाडस तिला झाले नाही.

"तो जर दोनच दिवस म्हणाला तर," तिला वाटले आणि तिच्या अंतःकरणाने ठावच सोडला. मांसाशनाचा हप्ता संपल्यावर वासिली इवानोविच् काही क्षण दिसेनासे झाले; आणि एक शँपेनची अर्धी बाटली घेऊन आले. "हे घ्या," ते मोठ्याने म्हणाले, "आम्ही जरी विजनवासात राहात असलो तरी सणासुदीला जल्लोष करायला काहीतरी असते!" त्यांनी तीन प्याल्यात शँपेन व एका लहान प्याल्यात वाईन ओतली; आणि "आमच्या सन्माननीय पाहुण्याप्रीत्यर्थ" असे म्हणून सैनिकीपद्धतीप्रमाणे एका घोटात पिऊन टाकले; अरीना व्लास्येव्नालाही त्यानी शेवटच्या थेंबापर्यंत वाईन प्यायला लावली. नंतर मुरंबे आणले; अर्कादीला गोड पदार्थ अजिबात आवडत नसत, पण कर्तव्य म्हणून त्याने चार प्रकारच्या चार फोडी तोंडात टाकल्या; मुरंबे नुकतेच बनविलेले होते; बझारव्ने ते खाण्यास चक्क नकार दिला व ताबडतोब सिगरेट शिलगावली. नंतर चहाबरोबर साय, लोणी आणि खुसखुशीत बिस्किटे; वासिली इवानोविच्नी मग त्यांना संध्याकाळची शोभा पाहण्यासाठी बागेत नेले. बागेत चालताना एका विशिष्ट जागेजवळ आल्यावर ते अर्कादीजवळ कुजबुजले—

"सूर्यास्त पाहात असताना या जागेवर बसून मी चिंतन करतो; माझ्यासारख्या वैराग्याच्या बाबतीत ते उचितच आहे. आणि त्या तिकडे, थोडे पुढे गेल्यावर, मी काही झाडे लावलेली आहेत; होरेसला ती झाडे प्रिय होती."

"कसली झाडे?" बझारव्च्या कानावर तेवढेच शब्द पडले होते.

अनुक्रमणिका

“आकाशियाची.”

बझारव्‌ने जांभई द्यायला सुरवात केली.

“मॉर्फियस्‌च्या कुशीत विसावण्याची आमच्या प्रवाशांची वेळ झालीसे वाटते,” वासिली इवानोविच् नी शेरा मारला.

“म्हणजेच झोपायची वेळ झाली आहे,” बझारव् म्हणाला, “बरोबर. वेळ झाली आहे, निश्चित.”

आपल्या आईला ‘गुडनाईट’ करताना, त्याने तिच्या कपोलाचे चुंबन घेतले; आणि तिने त्याला आलिंगन दिले; त्याची पाठ फिरताच त्याच्या ध्यानात येणार नाही असे त्रिवार आशिर्वचन उच्चारले. वासिली इवानोविच्‌नी अर्कादीला त्याच्या खोलीपर्यंत सोबत केली; आणि “मी तुमच्या एव्हढा असताना जसा प्रसन्न विश्रांती घ्यायचा तशी विश्रांती” घेण्याची इच्छा व्यक्त केली. आणि खरोखरच अर्कादीही आपल्या स्नानगृहाशेजारच्या खोलीत शांतपणे गाढ झोपी गेला; पुदिन्याचा सुगंध तिथे भरून राहिलेला होता; चुलवणाच्या मागे दोन रातकिडे झोपेतच किर्रपणे गाण्यात एकमेकांशी चढाओढ करीत होते. वासिली इवानोविच् अर्कादीच्या खोलीतून आपल्या अभ्यासिकेकडे वळले; आपल्या चिरंजीवाच्या पायथ्याशी सोफ्यात बसून राहिले; त्याच्याबरोबर मोकळेपणाने बोलणे करण्याच्या उद्देशाने; पण बझारव्‌ने झोपेचे निमित्त सांगून त्यांना बाहेर पिटाळले; पण सकाळपर्यंत त्याला झोप मात्र आली नाही. डोळे सताड उघडे ठेवून जणू सूडबुद्धीने अंधारात तीक्ष्ण नजरेने तो पाहात राहिला; बालपणीच्या आठवणींचा त्याच्यावर फार प्रभाव नव्हता; आणि शिवाय नुकत्याच अनुभवलेल्या कडवट भावनांचा विसर पडण्याइतका अवधी त्याला मिळालेला नव्हता. अरीना व्लास्येवनाने प्रथम तृप्त होईपर्यंत प्रार्थना केली आणि नंतर आन्फिशुश्काबरोबर खूप उशिरापर्यंत तिचे संभाषण चालू होते; अन्फिशुश्का आपला एकाक्ष तिच्यावर खिळवून मुकस्तंभासारखी उभी होती; आणि एव्‌गेनी वासिलिइच् संबंधी आपले अंदाज व मते आपल्या गूढ आवाजात व्यक्त करत होती. म्हातारीचे डोके समाधानाने, मद्याने आणि तंबाखूच्या धुराने भोवळल्यासारखे झाले होते; तिच्या पतीने तिच्याशी काही बोलण्याचा प्रयत्न केला, पण हवेत हात हलवून हताशपणे त्यांनी तो नाद सोडून दिला.

अरीना व्लास्येवना पुराणपद्धतीची अस्सल रशियन स्त्री होती; अशी स्त्री खरे म्हणजे दोन शतकांपूर्वीच्या मॉस्को शहरातच जन्माला यायची. ती अतिशय भक्तिपरायण व भावनाप्रधान होती; भविष्यकथन, मंत्रतंत्र, स्वप्ने व सर्व प्रकारचे शकुन अपशकुन इत्यादींवर तिचा पूर्ण विश्वास होता; कुठल्याही माथेफिरूच्या भविष्यवाणीवर,तसेच घरातील व झाडावरील भूतपिशाच, अशुभ भेटी, पाप्याची नजर, लोकप्रिय औषधी उपाय यांवरही तिचा विश्वास होता; ‘पवित्र गुरुवार’ या दिवशी खास तयार केलेले मीठ ती खात असे; आणि जगाचा अंत जवळ आला आहे अशी तिची श्रद्धा होती. ईस्टरच्या रविवारी सायंप्रार्थनेच्या वेळी जर दिवे गेले नाहीत, तर गव्हाचे चांगले पीक येते यावर तिचा विश्वास होता. माणसाची नजर पडली तर आळंबे वाढणार नाही, पाणी जिथे असेल तिथे सैतानाचे वास्तव्य असते, प्रत्येक यहुदी माणसाच्या छातीवर एक रक्ताच्या डागाचा व्रण असतो, इत्यादी गोष्टींवरही तिचा विश्वास होता. उंदीर, साप, बेडूक चिमण्या, जळवा, वीज, थंड पाणी, ओझी वाहणारी जनावरे, घोडे, मेंढ्या, तांबड्या केसाची माणसं, आणि काळे मांजर इत्यादींचे तिला भय वाटे; रातकिडे आणि कुत्री अस्वच्छच असतात असा तिचा समज होता. गोवत्समांस, कबूतराचे मांस, नदीतला खेकडा, शतावरी, बज्रांगी, ससा इत्यादी

खाणे तिला वर्ज्य होते. ती कलिंगडेसुद्धा खात नसे; कारण कापलेले कलिंगड तिला जॉन् द बॅप्टिस्टच्या मस्तकाची आठवण करून देई; कालवाचे नाव ऐकून तर तिला हुडहुडी भरत असे. ती खादाड होती, पण तिचे उपासतापासही कडक असत. दिवसाच्या चोवीस तासांपैकी दहा तास ती झोपत असे; पण वासिली इवानोविच्ना किरकोळ डोकेदुखीचा जरी त्रास असला तर मात्र ती अजिबात झोपत नसे. "अलेक्सिस ऑर द कॅाटेज इन् द फॅारेस्ट" खेरीज आयुष्यात दुसरे पुस्तक तिने वाचले नव्हते. वर्षातून एक, फार तर दोन पत्रे तिच्या हातून लिहून होत. पण गृहिणी कामात, लोणची-मुरंबे करण्यात ती पटाईत होती; अर्थातच स्वतःच्या हातांनी ती काहीच करत नसे; आणि बहुधा बसलेली जागा तिला सोडवत नसे. अरीना व्लास्येव्नाचे अंतःकरण वात्सल्याने भरलेले असे; आणि आपल्या परीने ती बावळटही नव्हती. जगाची विभागणी दोन गटात झाली आहे अशी तिची धारणा होती—एक गट मालकांचा, धनी लोकांचा आणि हुकूम सोडणे हे त्यांचे काम; दुसरा गट सामान्यांचा, आणि मालकांची सेवा करणे हे त्याचे कर्तव्य—त्यामुळे दास्यत्वाचा किंवा लाचारी करणारांचा तिला कधी तिटकारा वाटला नाही; पण तिच्या दास्यत्वात असणाऱ्यांशी ती प्रेमळपणे व सौम्यपणाने वागत असे; एकाही भिकाऱ्याला तिने कधी रिक्तहस्त पाठविले नाही, आणि स्वतः गप्पिष्ट असली तरी कुणाचीही निंदा करत नसे. तरुणपणात दिसायला ती देखणी होती, क्लॅव्हिकॅार्ड नावाचे वाद्य ती वाजवत असे आणि थोडे फ्रेंच बोलायलाही ती शिकलेली होती. पण पतीबरोबर पुष्कळ वर्षे भ्रमंती करण्यात गेल्यामुळे—तसेच त्यांच्याशी इच्छेविरुद्ध विवाहबद्ध झाल्यामुळे—ती स्थूल झाली होती आणि संगीत व फ्रेंच भाषा पूर्णपणे विसरून गेली होती. आपल्या पुत्रावर तिचे विलक्षण प्रेम होते, पण तितकीच तिला त्याची भीती वाटे; शेतीवाडीची देखरेख तिने पूर्णपणे वासिली इवानोविच्वर सोपविली होती—आणि हल्ली ती कशातच लुडबूड करत नसे; सरकार अमलात आणणार असलेल्या सुधारणा आणि स्वतःचे बेत याबद्दल तिचे वृद्ध पती बोलू लागले की, तात्काळ हातरुमाल हवेत झटकून ती विव्हळू लागे आणि भयग्रस्त होऊन भुवया उंच उंच चढवत असे. आपल्यावर कुठलीतरी भयंकर आपत्ती कोसळणार आहे असे तिला सारखे वाटत असे आणि ती भयभीत होई; एखाद्या दुखःद आठवणीने तिच्या डोळ्यांत टचकन पाणी येई. आजकाल अशा स्त्रिया विरळाच. हे बरे की वाईट; परमेश्वरच जाणे.

अनुक्रमणिका

२१

सकाळी उठल्याबरोबर अर्कादीने खिडकी उघडली आणि त्याला पहिले दर्शन झाले ते वासिली इवानोविच् यांचे. पौर्वात्य पद्धतीचा ड्रेसिंग गाऊन त्यांनी खिशातल्या रुमालाने कमरेभोवती बांधलेला होता आणि बागेत खोदकाम करण्यात ते मग्न झाले होते. तो तरुण पाहुणा दृष्टिस पडल्यावर, हातातील कुदळीवर रेलून ते मोठ्याने म्हणाले, “तुम्हाला उदंड आरोग्य लाभो ! कशी काय झोप झाली ?”

“मस्त,” अर्कादीने उत्तर दिले.

“पाहिलं का, पुरातन काळातल्या निवृत्त रोमन योद्धा सिन्सिनॅाटस्‌प्रमाणे मी कसा सलगमसाठी वाफे तयार करतो आहे. स्वतःच्या हातांनी काम करून उपजीविका करण्याची वेळ आलेली आहे—आणि ही परमेश्वरकृपाच म्हणायची ! दुसऱ्यावर अवलंबून राहाणे कुचकामाचे आहे; प्रत्येकाने स्वतः होऊन काम केले पाहिजे. जीन जेकस् रूसोचे म्हणणे खरे आहे याचा पडताळा येतो. अर्ध्या तासापूर्वी तुम्ही मला एकदम निराळ्या अवतारात पाहिले असते. एक कुळवाडी बाई ‘ढाळ’ लागल्याची तक्रार घेऊन आली—आम्ही ज्याला ‘अतिसार’ म्हणतो, त्यालाच ते ‘ढाळ’ म्हणतात. मी......कसे बरे अधिक स्पष्ट करून सांगावे तुम्हाला?—मी तिला अफूचे औषध दिले; आणि दुसऱ्या एकीचा दात काढला. तिला मी भूल देणार होतो. पण तिला ते पटले नाही. हे सर्व मी मोफत करतो—आपली हौस म्हणून. मला आता त्याची सवय झाली आहे म्हणा; मी एक कुणबावू—अप्रसिद्ध घराण्यातून वर आलेला सामान्य माणूस—जुन्या प्रतिष्ठित घराण्यातला नव्हे, माझ्या अर्धांगीसारखा......चहापूर्वी सकाळची ताजी हवा घेण्यासाठी इकडे सावलीत येणार का ?”

अर्कादी त्यांच्याकडे जाण्यासाठी बाहेर पडला.

“पुन्हा एकदा सुस्वागतम्,” वासिली इवानोविच् म्हणाले; आणि सैनिकी पद्धतीप्रमाणे सलाम ठोकण्यासाठी आपला हात डोक्यावरच्या तेलकट टोपड्याकडे नेला.

“ऐषआराम, करमणूक यांची तुम्हाला सवय झाली आहे हे मी जाणतो, पण या जगातली थोर माणसेसुद्धा झोपडीत काही काळ व्यतीत करायला नाखूष असत नाहीत.”

“बाप रे,” अर्कादीने इन्कार करत म्हटले, “जणू मी या थोर व्यक्तींपैकी एक आहे! आणि ऐषआरामाचीही मला सवय नाही.”

“क्षमस्व, क्षमस्व,” वासिली इवानोविच् गालात हसत शिष्टाचार म्हणून म्हणाले. “मी आता जरी इतिहासजमा होण्याच्या बेतात असलो तरी, मी जग पाहिले आहे—पक्ष्याच्या उडण्यावरून मी त्याची जात ओळखू शकतो. माझ्यापरीने मी एक साधारण मानसशास्त्रज्ञही आहे आणि मुखलक्षणांवरून स्वभाव जाणण्याची विद्याही मला अवगत आहे. सांगायला हरकत नाही—ही विद्या जर मला अवगत नसती तर दुःखाच्या खाईत मी कधीच पडलो असतो; माझ्यासारख्या साध्या माणसाला कुठेच संधी मिळाली नसती. तोंडावर स्तुती करतो असे नव्हे, पण तुमची आणि माझ्या मुलाची मैत्री पाहून मला मनोमन संतोष वाटतो. मी आताच पाहिलं; नेहमीप्रमाणे तो लौकर उठला—तुम्हाला ते ठाऊक आहे म्हणा—आणि आसपासच्या

भागात चक्कर मारण्यासाठी गेला आहे. एक विचारू का? माझ्या मुलाशी तुमची ओळख फार दिवसांपासून आहे का?"

"गेल्या हिवाळ्यापासून."

"खरेच. आणखी एक विचारू का—पण आपण बसलो तर बरे, नाही का? काही आडपडदा न ठेवता एक पिता म्हणून विचारतो, माझ्या एव्गेनीबद्दल तुम्हाला काय वाटते?"

"मला आजपर्यंत भेटलेल्या व्यक्तींत तुमचा मुलगा मला श्रेष्ठ वाटतो," अर्कादीने ठासून उत्तर दिले.

वासिली इवानोविच्चे डोळे गोलगोल झाले आणि त्यांचे गाल सौम्यपणे उजळून निघाले. त्यांच्या हातांतून कुदळ गळून पडली.

"आणि म्हणून तुम्हाला वाटते," त्यांनी सुरवात केली......

"माझी खात्रीच आहे," अर्कादी त्यांना मध्येच अडवून म्हणाला, "तुमच्या चिरंजीवाचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे; तुमचे नाव तो दिगंत करील. त्याला प्रथम भेटल्यापासूनच याविषयी माझी खात्री झाली आहे."

"ते......ते कसे काय?" वासिली इवानोविच्नी बळेच विचारले.

विजयी हास्यमुद्रेने त्यांचे तोंड विसावले होते, ते हास्य तिथे तसेच राहिले होते.

"आमची प्रथम भेट कशी झाली हे तुम्हाला ऐकायचे आहे काय?"

"होय......सगळे सांगा."

अर्कादीने मग आपली कहाणी सांगायला सुरवात केली आणि बझारव्संबंधी तो अधिक प्रेमभराने, अधिक उल्हसितपणे बोलू लागला; मादाम अदिनत्सवाबरोबर एके दिवशी तो माझूर्का नाचत असताना त्याने बझारव्संबंधी तिला प्रेमभराने आणि उल्हसितपणे सांगितले होते, त्यापेक्षाही अधिक उत्साहाने तो आज बोलत होता.

वासिली इवानोविच् जिवाचे कान करून ऐकत होते; त्यांचे डोळे भरून आल्याने मिचमिचत होते; दोन्ही हातांनी त्यांनी हातरुमालाचा बोळा केला; घसा साफ केला; केसातून बोटे फिरविली आणि शेवटी मात्र त्यांना राहवले नाही; खाली वाकून त्यांनी अर्कादीच्या स्कंधाचे चुंबन घेतले.

"तुम्ही मला किती सुखी केले आहे म्हणून सांगू," ते म्हणाले; त्यांच्या चेहेऱ्यावरचे स्मितहास्य तसेच होते. "तुम्हाला सांगायला काहीच हरकत नाही......मी......माझ्या मुलाला एक देवसमान मानतो; माझ्या वृद्ध पत्नीविषयी तर सांगायलाच नको—मातेचे अंतःकरण आपण जाणतोच! पण माझ्या भावना

त्याच्यासमोर व्यक्त करायची सोय नाही, कारण त्याला ते आवडत नाही. भावनाविष्काराचे प्रदर्शन करण्याच्या तो विरुद्ध आहे; त्याच्या या ताठरपणाबद्दल बरेच लोक त्याला दोष देतात; त्यांना वाटते की, ते त्याच्या गर्विष्ठपणाचे आणि भावनाशून्यतेचे लक्षण आहे, पण त्याच्यासारख्या माणसांचे मूल्यमापन सर्वसामान्य निकष लावून करता येणार नाही, नाही का? आता हेच पाहा—उदाहरण म्हणून सांगायचे तर, त्याच्या ठिकाणी दुसरा कुणी असता तर तो आपल्या मातापित्यांना भार होऊन राहिला असता; तुमचा विश्वास बसणार नाही, पण जन्मल्यापासून त्याने जरुरीपेक्षा एक कपर्दीकही कधी घेतली नाही; आणि तेही नाइलाज म्हणून, परमेश्वर साक्ष आहे!"

"तो एक निरिच्छ, प्रामाणिक माणूस आहे," अर्कादी म्हणाला.

"अगदी बरोबर; तो निरिच्छ आहे. आणि अर्कादी निकालाइच्, मी त्याला देवसमान मानतो. एव्हढेच नाही, तर मला त्याचा अभिमान वाटतो; माझ्या महत्त्वाकांक्षेचा उत्कर्षबिंदू म्हणजे त्याच्या जीवनगाथेत कधीतरी पुढील ओळी लिहिल्या जातील; "एका साध्या सैनिक-डॉक्टरचा मुलगा; त्याच्या पित्याला अर्थातच त्याचा श्रेष्ठपणा वेळीच उमगला होता, आणि त्याने त्याच्या शिक्षणासाठी कुठल्याही गोष्टींची उणीव भासू दिली नाही......" म्हाताऱ्याच्या आवाजात कंप होता. अर्कादीने त्यांचा हात दाबला.

"तुमचा काय अंदाज आहे?" वासिली इवानोविच्नी किंचित्काल स्तब्धतेनंतर विचारले, "तुम्ही अपेक्षिता ती कीर्ती त्याला वैद्यकीय व्यवसायात मिळेल असे वाटते तुम्हाला?"

"वैद्यकीय व्यवसायातच असे नव्हे; अर्थात् त्याही प्रांतात तो नावाजलेल्या शास्त्रज्ञांत गणला जाईल."

"मग कशात, अर्कादी निकालाइच्,"

"आताच काही सांगणे कठीण आहे, पण तो कीर्तिवान होईल."

"तो कीर्तिवान होईल!" त्या वृद्धाने ते शब्द पुन्हा उच्चारले; आणि ते मनोराज्यात गुंगून गेले.

"अरीना व्लास्येव्नाने तुम्हाला चहासाठी बोलावले आहे," अन्फीशुश्काने निरोप आणला; तिने पिकलेल्या रासबेरींची एक भली मोठी थाळी आणली होती.

वासिली इवानोविच् चमकून उठले, "रासबेरीबरोबर थंड केलेली साय असेल ना?"
"आहे."

"थंड पाहिजे हं, लक्षात ठेव! अर्कादी निकालाइच्, भीड नको; आणखी घ्या. एव्गेनी अजून कसा आला नाही?"

"मी इथे आहे," अर्कादीच्या खोलीमधून बझारव्चा आवाज आला.

अनुक्रमणिका

वासिली इवानोविच्नी तात्काळ मागे वळून पाहिले “वा! मित्राला भेटायचे होते वाटते तुला; पण तुला बराच उशीर झाला होता, दोस्त; आणि आमचे त्याच्याशी बराच वेळ संभाषणही झाले आहे. आता आपल्याला चहासाठी आत जायला हवे, बाईसाहेबांचे बोलावणे आहे. बरी आठवण झाली, मला तुझ्याशी थोडे बोलायचे आहे.”

“कशासंबंधी?”

“एक कुळवाडी आला होता; त्याला कामिनी झाली आहे......”

“म्हणजे कावीळ?”

“होय, जुनाट आणि दुराराध्य कामिनीचा तो रोगी आहे. मी त्याला काढा आणि सेन्ट जॉनचा रस घ्यायला सांगितले आहे; मुळ्याखेरीज काही खायचे नाही असे त्याला बजावले आहे; आणि सोडा दिला आहे; पण हे सर्व उपचार तात्पुरते उपशामक म्हणून उपयोगी आहेत; काहीतरी निश्चित उपचार पाहिजे. औषधे तुला हास्यास्पद वाटतात, पण काही व्यवहारी सल्ला तू देऊ शकशींल, असा मला भरवसा वाटतो. पण त्याविषयी नंतर बोलू. आता सर्वजण चहासाठी आत चला.”

बागेतल्या जागेवरून वासिली इवानोविच्नी उडी मारली; आणि “रॅाबर्ट ल् डियाबल्” मधील खालील ओळी ते गुणगुणू लागले:—

“एकच ध्यास असे जीवनी

जीवन जगणे सुखे भोगुनी!”

“असामान्य जीवनोत्साह!” खिडकीपासून दूर होत बझारव्ने शेरा मारला.

दुपार झाली होती. पांढुरक्या ढगांच्या पातळ पडद्यामागे सूर्य तळपत होता. सगळीकडे नीरव स्तब्धता पसरलेली होती; खेड्यातले कोंबडे एकमेकांवर चिडखोरपणे आरवत होते, त्याखेरीज कशाचाच आवाज येत नव्हता; कोंबड्यांच्या आरवण्याने ऐकणाऱ्याच्या मनात एक प्रकारचा सुस्तपणा व भकासपणा निर्माण होत होता; आणि दूर कुठेतरी झाडाच्या टोकावर ससाण्याच्या पिलाचे आर्त चिवचिवणे चालू होते. गवताच्या एका लहान गंजीच्या सावलीत अर्कादी आणि बझारव् पडून राहिले होते. त्यांनी वाळलेल्या आणि सळसळणाऱ्या, पण अजूनही हिरवट-सुगंधी असणाऱ्या गवताच्या पेंढ्या अंगाखाली घेतल्या होत्या.

“ते अॅस्पन्चे झाड,” बझारव् म्हणाला, “माझ्या बालपणीच्या स्मृती चाळवते; विटा काढण्यासाठी खणलेल्या खड्ड्यांच्या कडेला ते वाढले आहे आणि त्या काळात तो खड्डा आणि ते अॅस्पन्चे झाड यांमध्ये काही जादू असावी असा मला पूर्ण विश्वास वाटायचा; त्यांच्या संनिध मला कधी रूक्षपणा जाणवला नाही. मी लहान पोर असल्याने मला रुक्ष वाटणे शक्यच नव्हते हे त्यावेळी माझ्या ध्यानात आले नाही. आता मी मोठा झालो आहे आणि त्या झाडातली जादू नाहीशी झाली आहे.”

अनुक्रमणिका

“इथे एकूण किती वर्षे तू राहिलास?” अर्कादीने विचारले.

“सलग दोन वर्षे; आणि मग आमचा प्रवास सुरू झाला. या गावाहून त्या गावाकडे असे भटके जीवन आम्ही जगत होतो.”

“आणि हे घर फार जुने आहे ना?”

“होय. माझ्या आजोबानी ते बांधले—आईचे वडील.”

“कोण होते ते—तुझे आजोबा?”

“कुणास ठाऊक. असेल कुणी दुय्यम दर्जाचा मेजर. सुव्रव्‌बरोबर ते मोहिमेत होते; आणि आपण आल्प्स पर्वत कसे चढून गेलो याच्या गोष्टी सांगत बसायचे—बहुधा कपोलकल्पित गोष्टी.”

“सुव्रव्‌चे चित्र तुझ्या खोलीत अडकवलेले दिसले. तुमच्या टुमदार घरासारखी घरे मला आवडतात—जुन्या पद्धतीची, उबदार घरे; एक विशिष्ट गंध भरून राहिलेला असतो त्यात.”

“दिव्याच्या तेलाचा आणि गवताचा वास,” बझारव् जांभई देत म्हणाला. “आणि शिवाय या छान टुमदार घरात घोंगावणाऱ्या माशा......हट्!”

किंचित्काल स्तब्धतेनंतर अर्कादीने विचारले, “तू लहान असताना तुझ्याशी घरातील माणसं फार कडकपणे वागत असत का?”

“माझे आईवडील तू पाहातोसच. ते कडक आहेत असे म्हणता येणार नाही.”

“तुला त्यांच्यासंबंधी जिव्हाळा वाटतो का, एव्‌गेनी?”

“होय.”

“तुझ्यावर त्यांची किती माया आहे!”

बझारव् काही वेळ बोलला नाही. “मी कसला विचार करतो आहे, ठाऊक आहे तुला?” मानेखाली हातात हात गुंतवत तो अखेर बोलला.

“नाही. कसला?”

“मला वाटते माझ्या आईवडिलांचे जीवन किती सुखी आहे. वयाची साठी गाठली तरी किरकोळ गोष्टींवर अवडंबर माजवतात, ‘उपशामक’ औषधावर चर्चा करतात, लोकाना तपासून औषधे देतात, शेतकऱ्यांशी एखाद्या उदार धन्याप्रमाणे वागतात; थोडक्यात म्हणजे मजेत जीवन जगतात; माझी आईसुद्धा

सुखात आहे; सगळ्या प्रकारच्या कामांनी तिला दिवसाचे चोवीस ताससुद्धा पुरत नाहीत; आणि स्वतःसंबंधी विचार करायला वेळ मिळत नाही म्हणून ती सुस्कारे सोडते, विव्हळत बसते; आणि मी......"

"आणि तू?"

"मी चिंतन करतो; या इथे गंजीखाली मी पहुडलो आहे......या अनंत अवकाशाच्या तुलनेने मी किती नगण्य जागा व्यापून राहिलो आहे, अवकाश मी व्यापून राहू शकत नाही; आणि त्या अवकाशाच्या खिजगणतीतही मी नाही; आणि जो काळ जगण्याचे माझ्या वाट्याला आले आहे तो सुद्धा किती अत्यल्पइतका की त्या अनंतत्वात मला स्थान नाही, आणि असणारही नाही......आणि या अणूत, या गणिती बिंदूत, रक्त वाहाते आहे, मेंदू काम करतो आहे आणि त्याला आभिलाषा आहे......हे घृणास्पद नाही का? क्षुद्र नाही का?"

"पण तू म्हणतोस ते सर्वसाधारणपणे सर्वच माणसांना लागू पडते असे मला म्हणावेसे वाटते."

"बरोबर," बझारव् मध्येच म्हणाला. "मला म्हणायचे होते की, ही माणसं—माझे आईवडील, जीवन जगण्यात इतकी गर्क होऊन गेलेली आहेत की, त्यांना आपल्या नगण्यतेचा विचारसुद्धा शिवत नाही, अस्वस्थ करत नाही, अंतःकरण विदीर्ण करत नाही......आणि मी......भकासपणा आणि त्वेष याखेरीज मला भावनाच नाहीत."

"त्वेष? त्वेष कशाचा?"

"कशाबद्दल म्हणून तू विचारतोस? विसरलास काय?"

"मला सर्व आठवते, पण तरीही रागावण्याचा तुला अधिकार आहे हे मी मान्य करणार नाही. तू दुर्दैवी आहेस असे फार तर मी म्हणेन......पण......"

"छेः! अर्कादी निकालाएविच्, तुझा प्रेमाकडे पाहाण्याचा दृष्टिकोण आजच्या इतर तरुणांप्रमाणेच आहे असे म्हटले पाहिजे; क्लक् क्लक् करून तुम्ही कोंबडीला जवळ बोलवता, पण ती जवळ आली की, मग मात्र तुम्ही दूर पळता; मी तसा नाही. पण त्याबद्दल बोलणे पुरे. ज्या गोष्टीला इलाज नाही त्याबद्दल बोलणे लज्जास्पद आहे." तो एका बाजूला वळला. "वा! ती पाहा एक शूर मुंगी एका अर्धमृत माशीला ओढत नेत आहे. जा घेऊन भय्या, तिला जा घेऊन! तिच्या विरोधाला जुमानू नको; प्राणी म्हणून दयाबुद्धीशी तुझी फारकत असणे हा तुझा अधिकारच आहे—त्याचा तू पुरेपूर फायदा उठव—सद्सद्विवेक बुद्धी असलेल्या आत्मघातकी मनुष्यप्राण्यासारखे नको!"

"एव्गेनी, तुला असे नाही बोलता येणार. स्वतःला तू बरबाद करून घेतले आहेस!"

बझारव्ने वर मान केली. "मला अभिमान वाटावा अशी एव्हढीच गोष्ट आहे जिथे मी स्वतःला चिरडून टाकले नाही, तिथे एक स्त्री मला चिरडून टाकू शकेल हे कदापि शक्य नाही. तथास्तु ! संपले आहे सारे ते! त्याबद्दल एक शब्दही तुला ऐकावा लागणार नाही."

अनुक्रमणिका

दोघे मित्र काही काळ तसेच शांत पडून राहिले.

“होय,” बझारव्‌ने सुरवात केली, “मनुष्य हा फार विचित्र प्राणी आहे. आमचे ‘पितामह’ इथे व्यतीत करत असलेले अर्धमृत जीवन एका अंतरावरून पाहिले की वाटते, ‘यापेक्षा अधिक चांगले काय असू शकेल?’ खायचे, प्यायचे आणि आपण किती योग्य, विवेकी जीवन जगतो आहोत याची जाणीव ठेवायची. हे जर जमले नाही तर भकासपणाने तुमचे जीवन व्यापून जाईल. इतरेजनाशी व्यवहार ठेवलेच पाहिजेत, निदान त्यांना शिव्यशाप देण्यापुरते तरी.”

“जीवन असे शिस्तबद्ध आखले पाहिजे की प्रत्येक क्षण अर्थपूर्ण होईल,” अर्कादीने विचारपूर्वक विधान केले.

“होय का! पण जे अर्थपूर्ण आहे तेच रोचक हा समज मात्र चुकीचा आहे. जे निरर्थक असेल त्यासंबंधीही माणसाने आपले मत बनविले पाहिजे. पण क्षुद्रपणा, क्षुद्रपणा मात्र अगदी असह्य आहे.”

“पण जो माणूस क्षुद्रपणाला काहीच किंमत देत नाही, त्याच्या बाबतीत क्षुद्रपणाचे अस्तित्वच नसते.”

“हं......तू आता जे म्हणालास ते सर्वसामान्य विधान फक्त उलटे मांडलेस.”

“काय? त्या शब्दप्रयोगाचा मतितार्थ काय?”

“सांगतो; उदाहरणार्थ ‘शिक्षण हे उपकारक आहे’ हे सामान्य विधान झाले; पण ‘शिक्षण हे अपायकारक आहे’ हे वाक्य वरच्या सामान्य विधानाचे फक्त उलटे रूप आहे. त्या वाक्यात अधिक शैलीदारपणा असेल, पण वस्तुतः त्याचा अर्थ तोच.”

“आणि मग सत्य......सत्य कुठे आहे, कोणत्या बाजूला?”

“कोणत्या बाजूला?’ हेच माझे प्रतिध्वनीसारखे उत्तर, ‘कोणत्या बाजूला?’”

“एव्‌गेनी, तू आज विमनस्क आहेस.”

“खरेच? उन्हाने माझा मेंदू नरम झाला असला पाहिजे; आणि शिवाय इतक्या रासबेरी खाणे हेही मला मानवण्यासारखे नाही.”

“तसे असेल तर थोडी वामकुक्षी घेणे हे काही गैर नाही,” अर्कादीने शेरा मारला.

“निश्चित; तू फक्त माझ्याकडे पाहू नकोस म्हणजे झाले; झोपेत माणसाचा चेहेरा फारच बावळट दिसतो.”

अनुक्रमणिका

“पण लोकाना आपल्यासंबंधी काय वाटते याचे तर तुला सोयरसुतक नाही, नाही का?”

“तुला काय उत्तर द्यावे मला काही समजत नाही. खऱ्या माणसाने पर्वा करू नयेच; खरा माणूस तोच की ज्याच्यासंबंधी विचार करण्याची गरजच नाही; अशा माणसांविषयी द्वेष तरी वाटावा अगर त्याचे आज्ञापालन करावे.”

“गम्मत आहे! कुणाचाच द्वेष करत नाही,” क्षणभर विचार करून अर्कादी म्हणाला.

“आणि मी मात्र अनेकांचा द्वेष करतो. तू हळव्या हृदयाचा मुळमुळीत प्राणी आहेस; तुला कुणाविषयी द्वेष वाटेल तरी कसा?......तू भीरू आहेस; तू स्वतःवर फारसा अवलंबून नाहीस.”

“आणि तू,” त्याला मध्येच अडवून अर्कादीने विचारले, “तू स्वतःला कोण समजतोस? स्वतःबद्दल तुझे फार उच्च मत आहे का? ”

बझारव् थांबला. “जेव्हा माझ्या तोडीचा माणूस मला भेटेल” प्रत्येक अक्षरावर जोर देत तो म्हणाला, “तेव्हा मी माझ्यासंबंधीचे मत बदलेन. होय, द्वेष! उदाहरणार्थ, तूच आज आमचा बेलीफ फिलीप् च्या घरकुलावरून जाताना म्हणालास –खरोखरच ते एक स्वच्छ आणि सुंदर घरकूल आहे—. ज्या दिवशी गरिबातला गरीब शेतकरी अशा घरात राहू लागेल, त्या दिवशी रशिया पूर्णत्वाला पोचलेला असेल; त्यासाठी आपण सर्वांनी झटले पाहिजे......आणि तरीही या गरीबातल्या गरीब शेतकऱ्याबद्दल, हा फिलिप् किंवा सिडोर—कुणी का असेना तो—यांच्याविषयी माझ्या मनात उबग आहे; त्यांच्यासाठी माझ्या चामडीचे जोडे करून देईन, पण त्यांच्या तोंडून मात्र कृतज्ञतेचा एक शब्दही निघणार नाही......आणि तो कृतज्ञतेचा शब्द तरी का निघावा? आणि समज त्याला स्वच्छ अशा घरात राहायला मिळाले आणि त्याबद्दल माझ्या अंगाचा तिळपापड होत असेल तर मला त्यापासून काय मिळणार आहे?”

“पुरे......एव्गेनी, तुला हे बोलताना कुणी ऐकले तर आम्ही तत्त्वहीन आहोत असा आरोप करणाऱ्यांचेच समर्थन होईल.”

“तुझे बोलणे तुझ्या काकांच्या वळणाचे आहे. सर्वसाधारण तत्त्वे अशी काही असत नाहीत—तुला अजून ते समजलेलेच नाही! फक्त भावना असतात. सर्व काही त्यावरच अवलंबून असते.”

“ते कसे?”

“तसेच; माझेच उदाहरण पाहा. माझा अकरणात्मक दृष्टिकोण हा माझ्या स्वतःच्या संवेदनांवरच अवलंबून असतो; नकारात्मक भूमिका घेणे मला आवडते—त्याच पद्धतीने माझ्या मेंदूची घडण झालेली आहे, एव्हढेच ! मला रसायनशास्त्र का आवडते ? तुला सफरचंद का आवडतात ?” आपल्या संवेदनांच्या आधारावरच.एकूण एकच. माणसाला यापेक्षा अधिक खोलवर वेध घेणे शक्य नाही. हे तुला दुसरे कुणी सांगणार नाही आणि खरे म्हणजे मीही तुला पुन्हा कधी सांगणार नाही.”

अनुक्रमणिका

“अस्स, प्रामाणिकपणा हाही संवेदनांचाच भाग आहे का?”

“मी तसेच म्हणेन.”

“एव्गेनी?” खिन्न स्वरात अर्कादीने सुरवात केली……

“काय? काय म्हणतोस? हे तुला मानवणार नाही असे दिसते?” बझारव्ने मध्येच विचारले. “नाही, भय्या. सगळ्याच गोष्टींच्या मुळाशी घाव घालायचा असेल तर, मग आपले पायसुद्धा कापावे लागतील. पण आपण अध्यात्मावर खूप चर्चा केली. ‘निसर्ग घालतो निद्रेची फुंकर,’ इति पुश्कीन्.”

“पुश्कीन् असे काही म्हणाला नाही,” अर्कादीने इन्कार केला.

“बरे बुवा तो जर तसे म्हणाला नसेल, तर एक कवी म्हणून त्याने तसे म्हणायला हरकत नव्हती. ओघानेच आले म्हणून वाटते की, तो सैनिकी पेशातला असावा.”

“पुश्कीन् कधीच सैनिक नव्हता.”

“पण त्याच्या प्रत्येक पानावर लिहिलेले आढळेल “शस्त्रे! शस्त्रे” रशियन भूमीच्या गौरवासाठी.”

“तुझा भलताच शोध आहे! मी तुला सांगतो की, ही शुद्घ नालस्ती आहे.”

“नालस्ती? ही बाब गंभीर आहे! मला धास्तावण्यासाठी काय शब्द वापरला आहेस! एखाद्यावर जो आरोप तू करतोस, त्या आरोपाला प्रत्यक्षात तो वीसपटीने तरी पात्र असतो असे अगदी खात्रीने म्हणायला हरकत नाही.”

“मला वाटते आपण निद्राधीन होण बरे,” त्रासिकपणे अर्कादी म्हणाला.

“आनंदाने,” बझारव्ने उत्तर दिले. पण कुणालाच झोप आली नाही. एकमेकांविषयी जवळ जवळ वैरत्वाची भावना दोघांत निर्माण झाली होती. पाच एक मिनिटांनंतर दोघांनी डोळे उघडले आणि स्तब्धपणे एकमेकांकडे नजर वळविली.

“ते पाहा,” एकाएकी अर्कादी म्हणाला, “मेपल वृक्षाचे एक वाळलेले पान गरगरत खाली येत आहे; एखाद्या फुलपांखरासारखीच त्याची झेप आहे. किती विचित्र? औदासिन्य आणि विलय, तेज आणि जीवन यांप्रमाणेच.”

“मित्रा, अर्कादी निकालाएविच्!” बझारव् ओरडला, “माझी तुला एकच विनंती आहे; कृपा करून असले गोलमाल बोलू नको.”

अनुक्रमणिका

“जेव्हढे चांगले जमेल तेव्हढे मी बोलतो......आणि ही शुद्ध हुकूम शाही आहे. एक कल्पना आली माझ्या डोक्यात; तिला मी शब्दरूप देऊ नये?”

“बरोबर; आणि मीसुद्धा मग माझ्या कल्पना का बोलून दाखवू नयेत?” मला तुझे ते गोलमाल बोलणे अगदी अश्लील वाटते.”

“मग श्लील कशाला म्हणायचे? शिव्याशापांना?”

“हा! हा! तुझ्या काकांच्या पावलावर पाऊल टाकायचे तू ठरविले आहेस हे स्पष्ट आहे. त्या नेभळटाने तुझे बोलणे ऐकले असते तर तो खूष होऊन गेला असता!”

“पावेल पित्रोविच्‌ना काय म्हणालास तू?”

“मी म्हणालो—आणि योग्य तेच म्हणालो की, ते नेभळट आहेत.”

“पण हे असह्य होते आहे मला!” अर्कादी मोठ्याने म्हणाला.

“हा हा! कुटुंबप्रेमाची भावना बोलते आहे,” बझारव्‌ने थंडपणे शेरा मारला. “ही भावना लोकांना कशी अतूटपणे बांधून ठेवते हे मी पाहिले आहे. एखादा माणूस प्रत्येक गोष्टीचा त्याग करायला तयार होईल आणि पूर्वग्रह टाकून देईल; पण आपला भाऊ, उदाहरणार्थ, हातरुमाल चोरतो म्हणून तो चोर आहे हे मान्य करणे मात्र त्याच्या जीवावर येईल. आणि असाच विचार करू लागलो तर कळून येईल की, आपला भाऊ, माझा भाऊ......काही प्रतिभावंत नाही हा विचार पचविणे कुणालाही कठीण आहे.”

“मी माझ्या न्यायबुद्धीला स्मरून बोललो; त्यात कुटुंबभावनेचा काही संबंध नाही,” भावनावेगाने अर्कादीने उत्तर दिले. “पण ज्याअर्थी तुला ती न्यायबुद्धी नाही, ती ‘संवेदना’ नाही, त्याअर्थी तुला ते समजणार नाही.”

“दुसऱ्या शब्दात सांगायचे तर अर्कादी किर्‌सानव्‌ हा माणूस इतक्या प्रगल्भ बुद्धिमत्तेचा आहे की, माझ्यासारख्याला तो अगम्य आहे. अशा व्यक्तीपुढे मी नतमस्तक होऊन यापुढे एक शब्दही बोलणार नाही.”

“एव्‌गेनी, असे बोलू नको; आपण शेवटी खरेच भांडायला लागू!”

“अर्कादी! माझ्यावर दया कर, आपण एकदातरी गंभीरपणे भांडावे अशी माझी तुला विनंती आहे......”

“पण त्यामुळे कदाचित शेवट...... ”

अनुक्रमणिका

"मारामारीत होईल?" बझारव्ने विचारले. "वा? या इथे गवताच्या गंजीजवळ, या सुंदर ग्रामीण वातावरणात, जगापासून आणि लोकांच्या नजरेपासून दूर दूर, त्याला काही हरकत नाही. पण मारामारीत तू काही माझी जोड नव्हेस; एका मिनिटात मी तुझा गळा घोटून काढीन."

बझारव्ने आपली लांब क्रूर बोटे पसरली......अर्कादी गर्रकन वळला आणि जणू गंमत म्हणून प्रतिकारासाठी सज्ज झाला......पण आपल्या मित्राचा चेहेरा त्याला खुनशी वाटला, त्याच्या स्मितात उग्र धमकावणीची सूचना होती आणि त्या स्मिताने त्याचे ओष्ठद्वय विद्रूपपणे दुमडले गेले होते, त्याच्या डोळ्यांत निराळीच चमक दिसत होती; हे सर्व पाहून साहजिकच तो भयभीत झाला.

"वा! इथे येऊन बसलात वाटते!" त्याच क्षणी वासिली इवनोविच्चा आवाज त्यांच्या कानी पडला; ते वृद्ध सैनिक-डॉक्टर त्या दोघा तरुणांपुढे उभे ठाकले; त्यांनी घरी बनविलेली सुती बंडी पेहेरली होती आणि डोक्यावर घरीच बनविलेली वेताची हॅट होती. "मी तुम्हाला सगळीकडे शोधतो आहे......जागा तर उत्तम शोधून काढली आहे तुम्ही, आणि चांगल्याच उद्योगात गर्क झालेले दिसता. 'धरती मातेवर पहुडून अंतरिक्षाचा वेध घेत.' याला विशेष अर्थ आहे, माहीत आहे ना?"

"शिंका काढतानाच फक्त मी आकाशाकडे पाहतो, एरव्ही नाही," बझारव् गुरगुरला; आणि अर्कादीकडे वळून तो हलक्या आवाजात म्हणाला, "यांनी येऊन मोडता घातला."

"शूः, बोलू नकोस," अर्कादी कुजबुजला आणि त्याने गुपचूप आपल्या मित्राचा हात दाबला; पण असे धक्के बसल्यावर कुठलीही मैत्री फार काळ टिकणार नाही.

"माझ्या तरुण मित्रांनो, मी तुमच्याकडे अशा दृष्टिकोनातून पाहतो की," वासिली इवानोविच् दरम्यान बोलत होते. बोलताना ते मान हलवत होते; आपल्या गमतीदारपणे वाकलेल्या काठीवर त्यांनी आपले हात रेलले होते; त्या काठीवरचे नक्षीकाम व काठीच्या टोकावरील तुर्की माणसाची आकृती त्यांनी स्वतःच कोरलेली होती,—"मी पाहतो आहे आणि मला कौतुक वाटल्याखेरीज राहात नाही. तुमच्याकडे ताकद आहे, यौवन आहे, टवटवी आहे, कर्तत्व आहे आणि बौद्धिक कौशल्य आहे! जणू तुम्ही दोघे म्हणजे कॅस्टर व पोलूक्स !"

"तुमचे सुरू झाले म्हणायचे—थेट पुराणात गेला तुम्ही!" बझारव्ने शेरा मारला. "तुझ्या चटकन् ध्यानात येईल की, तरुणपणी लॅटीनवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते! माझ्या आठवणीप्रमाणे लॅटीनमधल्या तुमच्या प्रावीण्याबद्दल तुम्ही एक रौप्यपदकही मिळविले होते, नाही का!"

"होय डिऑस्कुरी, डिऑस्कुरी पदक मिळविले होते."

"पुरे, पुरे करा; मिरवू नका उगाच."

"कधीतरी प्रदर्शन करायला काहीच हरकत नसावी," ते वृद्ध गृहस्थ कुजबुजले. "अर्थात् तुम्हाविषयी वाटणारे कौतुक व्यक्त करण्यासाठी मी तुम्हाला शोधत आलो नाही; तर, प्रथम, थोड्याच वेळात आपण भोजनाला बसणार आहोत हे सांगण्यासाठी; आणि दुसरे असे, एव्गेनी, तुझ्या मनाची तयारी

अनुक्रमणिका

करण्यासाठी......तू समजूतदार आहेस, तू जग पाहिले आहेस, स्त्रिया कशा असतात हे तू जाणतोस......आणि म्हणून तू मनावर घेणार नाहीस......तुझ्या आगमनाप्रीत्यर्थ 'टी डिअम्' प्रार्थना म्हणण्याची तुझ्या आईची इच्छा आहे. अर्थात् या प्रार्थनेला तू हजर राहावेस म्हणून मी तुला बोलावतो आहे अशी समजूत करून घेऊन नको......खरे म्हणजे प्रार्थना संपलीही असेल; पण फादर अलेक्सी......"

"ते गावातले पुरोहित?"

"होय पुरोहित; ते आपल्याबरोबर भोजन घेणार आहेत......मला याची कल्पना नव्हती. आणि मी मान्यताही दिलेली नव्हती......पण ते घडले कसे तरी......माझे म्हणणे त्यांना समजले नसावे......आणि......खरे तर......अरीना व्लास्येव्ना......शिवाय ते एक विचारी भले गृहस्थ आहेत."

"भोजनातील माझा वाटा ते खाणार नाहीत ना?" बझारव्ने चौकशी केली. वासिली इवानोविच् हसले. "हे काय बोलणे?"

"मला तेव्हढेच विचारायचे होते. कुणाही व्यक्तीच्या पंक्तीला बसायची माझी तयारी आहे."

वासिली इवानोविच्नी आपली हॅट सरळ केली. "विचारायच्या आधी मला खात्रीच होती," ते म्हणाले, "तू कुठल्याही पूर्वग्रहापासून अलिप्त आहेस. मी बासष्ट वयाचा म्हातारा माणूस माझ्याजवळ तर पूर्वग्रह अजिबात नाही. (वस्तुतः प्रार्थना करण्याची सूचना वासिली इवानोविच् यांचीच; पण ते मान्य करण्याचे धाडस त्यांना झाले नाही. आपल्या पत्नीपेक्षा ते कमी धार्मिक वृत्तीचे होते असे मुळीच नाही.) "आणि फादर अलेक्सीला तुझा परिचय करून घेण्याची फार इच्छा आहे. तुला आवडतील, पाहाशीलच तू. पत्त्याने खेळण्यासही त्यांची हरकत नसते; किंबहुना कधीमधी......पण हे मात्र आपल्या आपल्यातच हं......ते पाईपसुद्धा ओढतात."

"छान. जेवणानंतर एक व्हिस्टचा डाव टाकू; मी त्यांना पूर्ण कफल्लक करून टाकेन."

"त्यांना! त्यांना! पाहू आपण ! ते दिसेलच!"

"तुम्ही खूप पटाईत आहात मला ठाऊक आहे," विशेष जोर देत बझारव् म्हणाला.

वासिली इवानोविच्च्या तांबट गालावर किंचित् अस्वस्थतेची छटा उमटली.

"काय हे, एव्गेनी......झाले गेले. अच्छा, या तरुणासमोर मान्य करायला मला मुळीच हरकत वाटत नाही की, तरुणपणी मला बराच नाद होता त्याचा; आणि त्याचा पुरेपूर मोबदलाही मी भरला आहे! पण इथे किती ऊष्मा वाटतो! मी खाली बसतो. तुमच्यात मी लुडबूड तर करत नाही ?"

"छे, मुळीच नाही." अर्कादीने उत्तर दिले.

वासिली इवानोविच् धापा टाकत गवतावर खाली बसले आणि ते म्हणाले, “तुमचे हे आश्रयस्थान पाहून मला आठवतात आम्हा सैनिकांचे उघड्यावरचे तळ, ॲम्ब्यूलन्स थांबण्याची ठिकाणे, असेच कुठेतरी एखाद्या गवताच्या गंजीखाली......आणि तेही भाग्याचे वाटायचे.” त्यांनी उसासा टाकला. “जीवनात खूप खूप अनुभव आले. उदाहरणार्थ, तुमची हरकत नसेल तर बेसारा बीयाताच्यां प्लेगच्या साथीची गमतीदार कहाणी मी सांगतो.”

“ज्या कामगिरीबद्दल तुम्हाला “ब्लाडीमीर क्रॅास” मिळाला ती कहाणी?” बझारव्ने मध्येच विचारले. “माहीत आहे, माहीत आहे......बरी आठवण झाली, तुम्ही तो ‘क्रॅास’ लावून का हिंडत नाही?”

“मी आताच नाही का सांगितलं की, मी पूर्वग्रहरहित मनुष्य आहे म्हणून?” वासिली इवानोविच् पुटपुटले (खरे म्हणजे आधल्या दिवशी संध्याकाळीच त्यांनी कोटावरील ती तांबडी रिबन काढून ठेवली होती), आणि त्या प्लेगच्या साथीची कहाणी सांगायला सुरवात केली. “अरेच्या, याला डुलकी लागली वाटतं,” अर्कादीला उद्देशून ते एकदम कुजबुजले; बोलताना एव्गेनीकडे निर्देश करीत त्यानी अर्थपूर्णरीत्या डोळे मिचकावले. “एव्गेनी! ऊठ!” ते मोठ्याने म्हणाले, “चला भोजनासाठी आत जाऊ.”

फादर ॲलेक्सी देखणे, धडधाकट दिसत होते. आपले दाट केस त्यांनी चापून चोपून विंचरले होते. लिल्याक् रंगाच्या रेशमी पायघोळ झग्यावर त्यांनी भरतकाम केलेला कमरपट्टा बांधला होता. ते व्यवहारकुशल आणि मनमिळावू होते. तत्परतेने त्यांनी स्वतः होऊन अर्कादी व बझारव् यांच्याबरोबर हस्तांदोलनासाठी हात पुढे केला; जणू आपला शुभाशिर्वाद त्यांना नको असेलच याची आधीच त्यांना कल्पना आली होती; आणि कुठल्याही प्रकारचा निर्बंध न बाळगता ते वागत होते. आपल्या उच्च स्थानावरून त्यांनी कुणाचा अधिक्षेप केला नाही की, कुणाचे मन दुखविले नाही; त्यांनी त्या शाळकरी लॅटीनचा किंचित् हसून गौरव केला, आणि आपल्या बिशपच्या आदराप्रीत्यर्थ ते उभे राहिले; दोन लहान प्याले मद्य घेतले पण तिसरा प्याला नाकारला. अर्कादीने दिलेल्या सिगारचा स्वीकार केला, पण घरी न्यायचे निमित्त सांगून शिलगावली मात्र नाही. त्यांच्याबद्दल एकच अप्रिय गोष्ट सांगता येईल; आणि ती म्हणजे, तोंडावरच्या माशा पकडण्यासाठी आपला हात सारखा काळजीपूर्वक आणि विचारपूर्वक वर नेण्याची त्यांची सवय; कधीकधी तर माशा मारण्यात ते यशस्वी होत. त्या हिरव्या टेबलाजवळ ते स्थानापन्न झाले आणि मोजक्या शब्दांत त्याबद्दल समाधान व्यक्त केले. आणि शेवटी बझारव्कडून त्यांनी अडीच रूबल्स जिंकून घेतले; आणि त्या नोटा खिशात घातल्या; अरीना व्लास्येव्नाच्या घरातील मंडळीना चांदीच्या नाण्यांत व्यवहार करण्याची कल्पना सुद्धा नव्हती......पूर्वीच्या सवयीप्रमाणे ती आपल्या चिरंजीवाजवळ बसली होती (ती पत्ते खेळत नसे), तिची मूठ तशीच गालावर टेकलेली होती; एखादा नवीन गोड खाद्यपदार्थ आणावयास सांगण्यासाठी तेवढी ती उठून जात असे. बझारव्ला कुरवाळायचे तिला भय वाटे; तोही तिला उत्तेजन देत नसे; आपल्याला कुरवाळण्याचे त्याने तिला प्रोत्साहन दिले नाही; शिवाय वासिली इवानोविच्नी त्याला निष्कारण “उपद्रव” द्यायला तिला प्रतिबंध केला होता. “तरुण माणसांना असल्या गोष्टी आवडत नसतात,” त्यांनी तिला बजावले होते. (त्या दिवशी भोजनाचा बेत काय होता हे सांगणे न लगे; त्या दिवशी भल्या पहाटेच टिमोफिच्ने गोमांस आणण्यासाठी दौड मारली होती; ट-बॉट, ग्रमिल आणि खेकडे आणण्यासाठी बेलिफाने दुसऱ्या दिशेला धाव घेतली होती; अळंभीसाठीच केवळ तांब्याच्या बेचाळीस दिडक्या कुळवाडी बायांजवळ मोजल्या होत्या); पण अरीना व्लास्येवनाचे डोळे बझारव्वर खिळलेले होते; तिच्या डोळ्यात केवळ भक्तिभाव अगर मायाच प्रतिबिंबीत झाली होती असे नव्हे; तर भीती,

औत्सुक्यमिश्रित दुःखसुद्धा तिच्या नजरेत प्रतीत होत होते, एक प्रकारच्या नम्र निषेधभावनेची छटासुद्धा जाणवत होती.

बझारव् मात्र आपल्या मातेच्या डोळ्यातील भाव-भावनांचे विश्लेषण करण्याच्या मनःस्थितीत नव्हता; तिच्याकडे तो क्वचितच वळून पाहात होता; एखादा प्रश्न विचारण्यासाठी. एकदा त्याने "शुभ शकुन" म्हणून तिचा हात आपल्या हातावर ठेवायला सांगितले; आपला मऊ, लहान हात तिने त्याच्या खरखरीत रुंद तळहातावर ठेवला.

"बरं," थोडा वेळ वाट पाहून तिने विचारले, "काही उपयोग झाला आहे का त्याचा?"

"पूर्वीपेक्षाही अधिक अशुभ," बेफिकीरपणे हंसत बझारव् म्हणाला.

"तो फार उतावळेपणाने खेळतो आहे," फादर ॲलेक्सी जणू सहानुभूतीने म्हणाले; आणि त्यांनी आपली दाढी कुरवाळली.

"नेपोलियनचा कायदा, फादर ॲलेक्सी, नेपोलियनचा कायदाच उपयोगी आहे," एक्याची उतारी करत वासिली इवानोविच् म्हणाले.

"पण त्यामुळेच त्याची सेंट हेलेनाला रवानगी झाली," फादर ॲलेक्सीनी शेरा मारला; आणि त्यांनी हुकुमाने एक्का मारला.

"एन्यूशा, बेदाण्याचा चहा करून हवा का?" अरीना व्लास्येवनाने विचारले.

बझारव्ने फक्त खांदे उडविले.

"छेः!" दुसऱ्या दिवशी बझारव् अर्कादीला म्हणाला, "उद्या मी इथून निघालो. इथला कंटाळा आला आहे; मला काम करायचे आहे, पण इथे काम करणे शक्य नाही. तुमच्या घराकडे पुन्हा जाऊ; माझी प्रयोगसाधनेही तुमच्याकडेच राहिली आहेत. तुमच्या घरी निदान स्वतःला एकांतात कोंडून घेता येते. इथे मात्र वडील सारखे सांगत बसतात मला, "माझी अभ्यासिका तुझ्यासाठी सज्ज आहे, तुला कुणीही उपद्रव देणार नाही;" आणि सदासर्वकाळ ते एक तसूभरही दूर जात नाहीत; आणि त्यांच्यापासून स्वतःला कोंडून घ्यायचे हे मलाही काहीसे लाजिरवाणे वाटते. आईच्या बाबतीतही तीच गोष्ट. पलीकडच्या खोलीतून तिचे निश्वास मला ऐकू येतात; आणि तिच्याकडे गेलो तर तिच्याशी बोलण्यासारखे काहीच नसते."

"तिला फार दुःख होईल," अर्कादी म्हणाला, "आणि त्यांनासुद्धा."

"पुन्हा येईन त्यांना भेटायला."

"केव्हा?"

अनुक्रमणिका

"पिट्स्बर्गला परतताना."

"मला तुझ्या आईबद्दल विशेषतः वाईट वाटते."

"ते का बुवा?" तिने भरविलेल्या स्ट्रॅाबेरीने तुझ्या अंतःकरणाचा कबजा घेतलेला दिसतो; की दुसरे काही?"

अर्कादीने मान खाली घातली "एव्गेनी, तू तुझ्या आईला ओळखत नाहीस. ती केवळ एक सत्शील स्त्री नाही, ती खरोखरच अत्यंत हुशार आहे. आज सकाळी ती माझ्याबरोबर अर्धा तास बोलत बसली होती; आणि किती समंजसपणे, मनोरंजक बोलत होती."

"सबंध वेळ माझ्यासंबंधीच अघळपघळ बोलत होती ना?"

"तुझ्यासंबंधीच केवळ आम्ही बोलत होतो असे नाही."

"शक्य आहे; बघे लोकांना अधिक दिसते खरे. एखादी स्त्री जर अर्धा तास संभाषण चालू ठेवू शकत असेल, तर ते आशादायक चिन्ह आहे. पण कसेही असो, मी इथून जायचे निश्चित केले आहे."

"पण त्यांना ही गोष्ट कळविणे तुला सोपे जाणार नाही. येत्या पंधरा दिवसांत आपण काय काय करायचे याच्या योजना ते सारख्या आखीत असतात."

"नाही; ते सोपे नाही. आज माझ्या अंगात कुठला वेताळ शिरला होता कुणास ठाऊक; मी वडिलांना थोडे चिडीला आणले; परवा कधीतरी त्यांनी आपल्या भाडे करणाऱ्या कुळवाड्याला मारेकऱ्याकडून बडवून काढले होते; आणि तेही सकारण. ......हां, हां, इतके विस्मयचकित होऊन तू माझ्याकडे पाहाण्याची जरुरी नाही; तो कुळवाडी एक दारूबाज आणि लुच्चा, भामटा आहे; फक्त मला या गोष्टी ज्ञात आहेत याची, काय म्हणतात त्याप्रमाणे माझ्या वडिलांना कल्पना नव्हती. ते थोडे क्षुब्ध झाले होते; आणि आता पुन्हा एकदा त्यांना पूर्वीपेक्षाही अधिक नाराज करावे लागणार......जाऊ दे! डरो मत! ते विसरून जातील!"

बझारव् म्हणाला होता, "जाऊं दे;" पण वासिली इवानोविच्ना आपला बेत सांगेपर्यंत मात्र दिवस उलटून गेला. शेवटी अभ्यासिकेत त्याना 'गुड नाईट' म्हणायच्या. वेळेला जांभई देण्याचा बहाणा करत तो म्हणाला, "हां......तुम्हाला सांगायचे विसरून गेलो होतो जवळ जवळ......उद्या फेडॅाट्कडे माणूस पाठवून घोडे मागवून घ्या."

वासिली इवानोविच् हबकून गेले. "म्हणजे किर्सानव् जाणार आहेत का?"

"होय, आणि मीही जातो आहे त्याच्याबरोबर."

वासिली इवानोविच्चे डोके गरगरले. "तू जाणार आहेस?"

"होय......जायलाच हवे. कृपा करून घोड्यांची जुळणी करा."

"बरे......" तो वृद्ध पिता अडखळला; "फेडॉट्कडे माणूस पाठवायचा......बरे पण......पण......पण काय झाले?"

"त्याच्याबरोबर काही दिवस राहाण्यासाठी मला गेले पाहिजे. पुन्हा मी पुढे येईनच."

"आह्! किती थोड्या दिवसांसाठी......छान." वासिली इवानोविच्नी रुमाल काढला आणि नाक शिंकरून ते जवळ जवळ पळतच सुटले. "बरे......होईल सर्व व्यवस्था. मला वाटले तू राहाशील आमच्याबरोबर......थोडे अधिक दिवस. तीनच दिवस......तीन वर्षांच्या कालावधीनंतर, किती थोडे दिवस, अगदी थोडे दिवस. नाही का, एव्गेनी!"

"पण मी तडक पुन्हा इकडे येणार आहे. मला जाणे अगत्याचे आहे."

"अगत्याचे......बरे! कर्तव्य आधी. घोडी सज्ज राहातील. हरकत नाही. अरिनाला आणि मला हे अनपेक्षित होते. शेजाऱ्याकडून तिने काही फुले मागून आणली आहेत; तुझी खोली तिला सजवायची होती." (वासिली इवानोविच्नी प्रत्येक दिवशी चालत असलेल्या टिमोफिच्बरोबरच्या आपल्या खलबतांचा मात्र त्याच्यापुढे चुकूनसुद्धा उल्लेख केला नाही. स्लिपर्समध्ये उघड्या पायांनी उभे राहून ते खिशातून एकावर एक अशा जुन्या चुरगळलेल्या रूबलच्या नोटा थरथरत्या हाताने काढत आणि त्याला एक एक वस्तू आणण्यास पाठवत असत; विशेषतः चांगले खाद्यपदार्थ आणि तांबडे मद्य; कारण त्या तरुणांना त्याची बरीच आवड दिसली. यातल्या कुठल्याही गोष्टीचा उल्लेख त्यानी केला नाही.)

"स्वातंत्र्य......ही गोष्ट फार महत्त्वाची आहे; माझा तोच नियम आहे......मी तुला अडथळा आणणार नाही......नाही......"

ते एकाएकी थांबले आणि दरवाजाकडे वळले.

"आपण खरेच लौकरच पुन्हा भेटू, पिताजी."

पण वासिली इवानोविच्नी मागे वळून न पाहाता, फक्त हात हलविला आणि ते निघून गेले. ते आपल्या शयनगृहात आले त्यावेळी आपली पत्नी आधीच निद्राधीन झालेली त्यांनी पाहिले; आणि ते खालच्या आवाजात प्रार्थना पुटपुटू लागले; तिला उठवावे असे त्यांना वाटले नाही. पण ती जागी झालीच.

"वासिली इवानोविच्?" तिने हाक मारली.

"होय, मीच, आईसाहेब."

"एन्युशाकडून आलात का? त्या सोफ्यावर त्याला आराम वाटत नसावा अशी सारखी रूखरूख वाटते. त्याच्यासाठी तुमची प्रवासातील गादी व नव्या उशा ठेवायला मी अन्फिशुश्काला सांगितले आहे;

अनुक्रमणिका

आपला पिसांचा बिछानाच मी देणार होते; पण त्याला फार मऊ बिछाना आवडत नाही हे आठवते मला......"

"ते जाऊ दे आईसाहेब; उगीच त्रास करून घेऊ नको. त्याचे ठीक आहे. प्रभो, या पतित माणसावर दया कर," हलक्या स्वरात त्यानी आपली प्रार्थना चालू ठेवली; आपल्या वृद्ध पत्नीविषयी वासिली इवानोविच्‌ना वाईट वाटले; तिच्यापुढे किती दुःख वाढून ठेवले होते हे तिला निदान रात्रीतरी सांगायचे नाही असे त्यांनी ठरविले.

दुसऱ्या दिवशी बझारव्‌ व अर्कादी जाण्यासाठी निघाले. सकाळपासून घरात खिन्नतेचे वातावरण पसरले होते; अन्फिशुश्काच्या हातून ट्रे पडला; फेड्कासुद्धा गोंधळून गेला होता, आपले बूट उतरणे त्याला भाग पडले. वासिली इवानोविच्‌ तर नेहमीपेक्षा जास्तच धांदरटपणा करत होते; चेहेऱ्यावर काही न दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न होता; ते मोठ्याने बोलत होते, पाय आपटत होते; पण त्यांचा चेहेरा पांढराफटक पडला होता आणि आपल्या मुलाच्या डोळ्याला डोळा द्यायचे ते टाळत होते. अरीना व्लास्येव्‌नाचे मुळूमुळू रडणे चालू होते; ती पुरेपूर हबकली होती आणि सकाळीच तिच्या पतीने तिला दोन तास सुनावले नसते तर स्वतःला आवर घालणे तिला अशक्य झाले असते. पण आपण एका महिन्याच्या अवधीत निश्चित येतो असे वारंवार आश्वासन देऊन, मागे खेचणाऱ्या कुटुंबबंधनांतून सुटका करून बझारव्‌ कोचात जाऊन बसला; घोडे दौडू लागले आणि घंटी वाजू लागली; गाडीच्या चाकांनी वळण घेतले आणि त्यांच्याकडे यापुढे पाहात राहाणे निरुपयोगी होते; धूळ स्थिर होत होती; कमरेत वाकलेला टिमोफिच्‌ रडतखडत आपल्या खोलीत परत फिरला; त्या लहानशा घरात ती वृद्ध माणसं मागे राहिली; त्या घराला एकदम रोडावलेली आणि वैराण अवकळा प्राप्त झाली; घराच्या पायऱ्यावर उभे राहून वासिली इवानोविच्‌नी आणखी काही क्षण मनमुरादपणे हवेत रुमाल हलविला; आणि मग मात्र ते एका खुर्चीत मटकन खाली बसले आणि त्यांचे मस्तक छातीवर झुकले. "त्याने आपला त्याग केला आहे; आपल्याला सोडून गेला आहे," ते अडखळत बोलले; "सोडून गेला; त्याला इथे आमच्याबरोबर रूक्ष वाटत होते; एकटा, एकटा गेला!" ते अनेकवेळा पुटपुटले. मग अरीना व्लास्येवना त्यांच्याकडे वळली आणि आपले पांढरे मस्तक त्यांच्या पांढऱ्या मस्तकावर रेलून म्हणाली, "त्याला इलाज नाही, वास्या! मुलगा म्हणजे तुटून बाजूला गेलेला एक तुकडा. एखाद्या बहिरी ससाण्याप्रमाणे मन मानेल त्याप्रमाणे तो घराकडे व घराबाहेर उडून जातो; तुम्ही आणि मी मात्र झाडाच्या खोबणीत वाढलेल्या फंगसप्रमाणे आहोत; आपण एकमेकांजवळ बसून राहातो, घराबाहेर पडत नाही. आता मीच तुम्हाला अविचल अशी उरले आहे; आणि तुम्ही मला!"

वासिली इवानोविच्‌नी आपल्या तोंडावरचे हात दूर करून आपल्या पत्नीला, जीवनसाथीला, बाहुपाशात ओढले; जणू तारुण्यातसुद्धा त्यांनी इतके दृढालिंगन कधी दिले नव्हते; त्यांचा दुःखभार तिच्यामुळे हलका झाला.

अनुक्रमणिका

२२

आपसात क्वचित् एखादा शब्द बोलत आपल्या या मित्रांनी फेडॉट्पर्यंत अगदी स्तब्धपणे प्रवास केला. बझारव् स्वतः काही खूष दिसत नव्हता. अर्कादी त्याच्यावर नाराज होता. केवळ तरुणांनाच जाणवणारी विमनस्कता तो अनुभवीत होता. कोचमनने घोडे बदलले आणि आपल्या जागेवर बसत त्याने विचारले, "उजवीकडे की डावीकडे?"

अर्कादी चमकला. उजवीकडे जाणारा रस्ता शहराकडे, व तिथून घराकडे जाणारा होता; डावीकडील रस्ता मादाम अदिन्त्सवाच्या घराकडे जाणारा होता.

त्याने बझारव्कडे पाहिले.

"एव्गेनी" त्याने विचारले; "डावीकडे?" बझारव् बाजूला वळला. "हा काय मूर्खपणा?" तो पुटपुटला.

"मूर्खपणा आहे हे मी जाणतो," अर्कादीने उत्तर दिले......"पण काय बिघडले त्यात? ही काही पहिलीच खेप नाही."

बझारव्ने आपली टोपी भुवयांवर ओढली. "तुझी मर्जी," तो शेवटी म्हणाला. "डावीकडे वळव," अर्कादी मोठ्याने म्हणाला.

निकल्स्कोच्या दिशेने कोच धावू लागला. पण एकदा मूर्खपणाबाबत एकमत झाल्यानंतर ते दोघे मित्र जास्तच आडमुठेपणाने स्तब्ध बसले; त्यांची मनःस्थिती निश्चितच गढूळली होती.

मादाम अदिन्त्सवाच्या घराच्या पायऱ्यावर उभा असलेला घरकारभारी पाहाताक्षणीच त्या दोघांना आपण एका क्षणैक ऊर्मीला बळी पडून अविवेकीपणाने वागल्याचे जाणवले. त्यांचे आगमन अनपेक्षित होते हे स्पष्ट होते. दिवाणखान्यात ते बराच वेळ काहीसे बावळटासारखे बसून होते. शेवटी एकदा मादाम अदिन्त्सवा आली. आपल्या स्वाभाविक शिष्टाचाराने तिने त्यांचे स्वागत केले; पण इतक्या तातडीने परतल्याचे तिला नवल वाटले; आणि तिच्या हालचाली व बोलण्यातील कृत्रिमपणावरून ती त्यांच्या आगमनाने विशेष खूष झाली होती असे म्हणता आले नसते. आपण जाताजाता वाटेत भेटण्यासाठी थांबलो आहोत, व पुढे शहराकडे चार तासात आपल्याला प्रयाण केले पाहिजे असे तत्परतेने त्यांनी तिला सांगितले. यावर किंचित विस्मय प्रकट करण्याइतपतच तिने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली; अर्कादीला तिने त्याच्या वडिलांना आपला क्षेमसमाचार कळविण्याची विनंती केली; आणि आपल्या काकीला बोलावणे पाठविले. प्रिन्सेस झोपेत असल्यासारखी दिसत होती; त्यामुळे तिच्या सुरकुतलेल्या चेहेऱ्यावर दुष्टपणाचा भाव अधिकच प्रतीत होत होता. कत्याला बरे वाटत नव्हते; ती आपल्या खोलीतून बाहेर पडली नाही. अर्कादीला तत्क्षणी उमगले की, तो अना सर्गेव्नाइतकाच कत्याला भेटण्यासाठी उत्सुक होता. या ना त्या विषयावर निरर्थक बडबड करण्यात ते चार तास निघून गेले; बोलताना अगर ऐकताना अना सर्गेव्नाच्या चेहेऱ्यावर एकसुद्धा स्मितरेषा उमटली नाही. शेवटी निरोप घेतानाच फक्त काय तो तिचा पूर्वीचा सुहृद्भाव पुन्हा जागृत झाला.

"आताच मला थोडा प्लीहाचा उपद्रव होतो आहे," ती म्हणाली; "पण तुम्ही त्याकडे लक्ष देऊ नका, आणि पुन्हा या-तुम्हा दोघानाही सांगते—लौकर या."

बझारव् आणि अर्कादी दोघांनीही किंचित वाकून अभिवादन केले आणि गाडीत आपल्या जागेवर जाऊन बसले; मग मात्र कुठेही न थांबता दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ते सुखरूपपणे मॅरिॲनोला आपल्या घरी पोचले. त्या संबंध प्रवासात दोघांपैकी एकानेही मादाम अदिन्त्सवाच्या नावाचा उल्लेखही केला नाही; विशेषतः बझारव्ने आपले तोंड अजिबात उघडले नाही; आणि रस्त्यापासून दूर अंतरावर एका बाजूला प्रक्षुब्ध तीव्रतेने पाहात बसला.

मॅरिॲनोत त्याना पाहून सर्वजण हर्षभरित झाले. आपल्या चिरंजीवाच्या प्रदीर्घ गैरहजेरीने निकालाय पित्रोविच् अस्वस्थ झाले होते; फिनिच्काने त्या "तरुण महाभागांचे" आगमन झाल्याची वार्ता त्यांना पळत जाऊन सांगितली; तिचे डोळे आनंदाने चमकत होते; ही वार्ता ऐकून निकालाय पित्रोविच् आनंदातिशयाने चित्कारले आणि आपले पाय लोंबकळत सोडून सोफ्यावर गडबडा लोळू लागले. पावेल पित्रोविच्नासुद्धा सुखद हर्षोत्फुल भावनेची अनुभूती जाणवली आणि त्यांनी परत आलेल्या त्या भटक्यांबरोबर हसत हस्तांदोलन करून त्यांचे स्वागत केले. बडबड, प्रश्न यांची सरबत्ती सुरू झाली. अर्कादीच बहुतेक बोलत होता. विशेषतः भोजनाचे वेळी; त्यामुळे मध्यरात्रीनंतरही भोजन चालूच होते. मॉस्कोहून नुकत्याच आणविलेल्या पोर्टरच्या काही बाटल्या निकालाय पित्रोविच्नी आणायला सांगितले आणि त्या उत्सवी पेयाचा आस्वाद घेता घेता त्यांचे गाल आरक्त झाले; आणि सर्व वेळ ते अर्धवट पोरकट आणि अर्धवट घाबरट असे हास्याचे चीत्कार काढत राहिले. त्या सर्वंकष जल्लोषाचा नोकरांवरही परिणाम झाला. दुन्याशा झपाटल्यासारखी खालीवर सारखी पळत होती आणि सारखी धाडकन दरवाजे बंद करत होती; आणि प्योत्र पहाटे तीन वाजता गितारवर कोसॅक पद्धतीचे वॅल्ट्झ वाजविण्याचा आटापिटा करत होता. त्या प्रशांत वातावरणात त्या तंतूवाद्याचे मंजुळ व विव्हल स्वर ऐकू येत होते; पण सुरवातीचे हे अवसान सोडले तर, त्या सुसंस्कृत नोकराच्या प्रयत्नातून काही विशेष निर्माण झाले नाही; निसर्गाने जगावेगळे असे काही संगीतगुण त्याला बहाल केलेले नव्हते.

पण मध्यंतरीच्या काळात मॅरिॲनोत सगळेच काही सुव्यवस्थित चालले नव्हते आणि बिचाऱ्या निकालाय पित्रोविच्ना काळ कठीण आला होता. शेतावर रोज निरर्थक आणि त्रासदायक कटकटी निर्माण होत होत्या—रोजंदारीने लावलेल्या नोकरांना पोसणे अवघड होत होते. काहींना त्यांच्या रोजगारीचा हिशेब चुकता करून हवे होते, तर काहींना मजुरीत वाढ हवी होती, आणि आधीच ज्यांना आगाऊ पगार मिळालेला होता, त्यांनी पोबारा केला होता; घोड्यांना रोगराईने पछाडले; त्यांची वेसणसामग्री जळाल्याप्रमाणे तुकडे होऊन पडली; कामे निष्काळजीपणाने केली जाऊ लागली; मळणीसाठी मॉस्कोहून मागविलेले एक यंत्र इतके अवजड निघाले की, ते कुचकामी ठरले; दुसरे एक यंत्र प्रथम वापरातच निकालात निघाले; एका आंधळ्या बाईच्या करणीमुळे अर्धा डझन गोठ्याच्या झोपड्या जळून खाक झाल्या; वादळी वाऱ्यात हातात दिवटी घेऊन ती एका गाईला धुरी द्यायला गेली होती; ......म्हातारीने मात्र या सगळ्या अनर्थाचे मूळ चक्का व दुधाचे इतर पदार्थ नव्या पद्धतीने तयार करण्याच्या मालकाच्या योजनेत आहे असा दावा केला. मुकादम एकदम आळशी बनला आणि परिणामतः तो लठ्ठ झाला; प्रत्येक रशियन असा सुखासीन झाला की लठ्ठ झालाच म्हणून समजा. दुरून निकालाय पित्रोविच् दृष्टीस पडले की, जवळून जाणाऱ्या डुकराला तो काठी हाणायचा, अगर अर्धनग्न अशा एखाद्या पोरावर खेकसायचा—अशा तऱ्हेने तो आपल्या कामाच्या उत्साहाचे प्रदर्शन करायचा; पण बहुतेक वेळ मात्र तो झोपा काढायचा. भाडे-पद्धतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी कधी वेळेवर पैसे भरले नाहीत; ते जंगलातील लाकूड मात्र चोरून

अनुक्रमणिका

न्यायचे; "फार्म" वरच्या कुरणात पहारेकरी जवळ जवळ रोज शेतकऱ्यांची घोडी पकडून ठेवत आणि काही वेळा धक्के मारून कोंडवाड्यात आणत. निकालाय पित्रोविच् नुकसान भरपाईदाखल दंड करत; पण बहुधा एक दोन दिवस धन्याचीच चंदी खायला घालून त्या घोड्यांना त्यांच्या मालकांकडे परत पाठविले जाई. यावर कळस म्हणजे शेतकरी आपापसात भांडू लागले; भाऊ भाऊ जमिनीची वाटणी मागू लागले; त्यांच्या बायका एका घरात गुण्यागोविंदाने नांदत नसत; आणि मग एकाएकी हे तंटेबखेडे जणू कसला तरी इशारा मिळाल्याप्रमाणे विकोपाला गेले; आणि सबंध वाडीच हिशेबतपासनीसाच्या घराच्या पायऱ्यावर मालकाकडे ओरबाडत आली; त्यांतले बरेचजण झिंगलेले होते, त्यांच्या चेहेऱ्यावर ओरखडे उठलेले होते आणि सारेचजण न्याय आणि निकाल यांची मागणी करीत होते; आणि मग एकच गदारोळ व गिल्ला उठला; बायकांचे कर्कश किंचाळणे आणि पुरुषांच्या शिव्या एकातएक मिसळून गेल्या. मग दोन्ही पक्षांचे म्हणणे समजून घेणे आले, आणि घसा सुजेपर्यंत ओरडणे आले—आणि इतकेही करून योग्य निर्णय देता येणे अशक्य कोटीतले आहे हे समजून यायचे......मळणीसाठी पुरेसे मजूर मिळत नव्हते; शेजारच्या एका छोट्या शेतकऱ्याने मोठ्या उपकारकर्त्यांचा आव आणून एकरी दोन रूबल्स दलाली घेऊन मळणीयंत्रे पुरविण्याचा करार केला; आणि अगदी निर्लज्ञपणे त्यांना तोंडघशी पाडले; शेतकऱ्यांच्या बायकांनी अव्वाच्या सव्वा मजुरीची मागणी केली आणि दरम्यान पिके वाया जाऊ लागली; इकडे कापणी खोळंबून पडली आणि तिकडे कौन्सिल ऑफ गार्डियन्सनी पूर्ण रकमेचा व्याजासह भरणा ताबडतोब करण्याची मागणी केली, धमक्या दिल्या......

"काय करायचे हेच समजत नाही," निकालाय पित्रोविच्नी अनेकदा हेच निराशोद्गार काढले, "त्यांना झोडपून काढणेही मला जमत नाही; आणि पोलिस अधिकाऱ्याला बोलवावे तर माझी तत्त्वे आड येतात; पण शिक्षेचा बडगा दाखविल्याखेरीज ते काहीच करीत नाहीत!"

"शांत व्हा, शांत व्हा," पावेल पित्रोविच् यावर त्यांची समजावणी करायचे; त्यांचीही मती गुंग झाली होती; कपाळावर आठ्या घालून ते मिशा कुरतडू लागत.

या सगळ्या कटकटीपासून बझारव्ने स्वतःला अलिप्त ठेवले; आणि अर्थातच् पाहुणा म्हणून दुसऱ्यांच्या व्यवहारात लुडबूड करणे चुकीचे होते. मॅरिॲनोला आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून बेडकं, इन्फ्यूसोरिया व इतर रसायने यांवर प्रयोग करण्यात त्याने स्वतःला सतत गुंतवून घेतले. अर्कादीला मात्र आपल्या वडिलांना प्रत्यक्ष जरी मदत करता आली नाही, तरी निदान मदत करण्याचा देखावा करणे आवश्यक वाटले. त्यांचे म्हणणे तो शांतपणे ऐकून घेत असे; आणि एकदा तर त्यांना आपला सल्लासुद्धा देऊ केला; अर्थात् त्या सल्ल्याप्रमाणे त्यांनी वागावे या अपक्षेने नव्हे, तर आपण त्यात रस घेतो हे दाखविण्यासाठी. शेतीसंबंधीचा तपशील ऐकताना तो नाखूष होता असे नाही. किंबहुना आपण शेतीवर आनंदाने काम करतो आहोत अशी स्वप्ने त्याला पडत; पण यावेळी मात्र दुसरेच विचार त्याच्या मनात रुंजी घालत होते. तो निकल्स्कोचा अव्याहत विचार करत बसे, याचे त्याचे त्यालाच नवल वाटले; बझारव्च्या संगतीत एके ठिकाणी राहाणे रूक्षपणाचे वाटेल—आणि तेही आपल्या वडिलांच्या घरात—असे कुणी त्याला यापूर्वी सांगितले नसते तर त्याने खांदे उडवून त्याचा सरळ इन्कार केला असता! पण तो खरोखरच कंटाळला होता आणि तिथून निघून जायला उतावीळ झाला होता. दमणूक होईपर्यंत दूरवर फिरायला जाण्याचा परिपाठ त्याने सुरू केला, पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. एके दिवशी वडिलांशी संभाषण करताना निकालाय पित्रोविच्कडे काही महत्त्वाची पत्रे असल्याचे त्याला समजले; मादाम अदिन्त्सवाच्या मातोश्रीने त्यांच्या पत्नीला लिहिलेली ती पत्रे होती; मग मात्र ती पत्रे मिळेपर्यंत त्याने त्यांना

उसंत मिळू दिली नाही. निकालाय पित्रोविच्ना मात्र त्यासाठी वीसएक ड्रॉवर्स व पेट्यांची उपसाउपशी करावी लागली. तुकडे पडण्याच्या अवस्थेतील ते कागद हाती लागल्यावर मात्र अर्कादीला स्वस्थता लाभली; जणू ज्या ध्येयाप्रत जायचे होते त्याचे ओझरते दर्शन त्याला झाले होते. "तुम्हा दोघांनाही उद्देशून मी म्हणते," तो स्वतःशीच कुजबुजत होता सारखा—ती स्वतःच तसे म्हणाली होती! "मी जाणार, जाणार; इतर कशाची पर्वा नाही!" पण मग ती मागची भेट आठवली—ते थंडे स्वागत आणि त्याची गुदमरलेली स्थिती; आणि त्याच्या भित्र्या स्वभावाने त्याच्यावर मात केली. शेवटी अर्थात त्याची तारुण्यसुलभ "आगे बढो" ची भावना, स्वतःच्या भवितव्याचा वेध घेण्याची सुप्त इच्छा, कुणाच्याही मदतीवाचून स्वत्व सिद्ध करण्याची आकांक्षा यांचा त्याच्यावर प्रभाव पडला. मॅरिॲनोला परतल्यानंतर दहा दिवससुद्धा लोटले नाहीत तोच, रविवारच्या शाळांची पाहाणी करण्याच्या मिषाने त्याने शहराकडे दौड मारली आणि तिथून मग निकल्स्कोकडे. एखादा तरुण सैनिकाधिकारी रणांगणाकडे दौड मारतो, त्याप्रमाणे ड्रायव्हरला उसंत न लाभू देता त्याने भरारी मारली; एकाच वेळी भीती आणि उल्हास त्याला जाणवला; उतावीळपणाने त्याची दमछाक झाली. "महत्त्वाची गोष्ट म्हणजे चिंतन करणे बंद केले पाहिजे," तो स्वतःशीच पुटपुटत राहिला. त्याचा पोरगेलासा ड्रायव्हर मोठा गुलहौशी होता; प्रत्येक गुत्त्यासमोर तो थांबायचा आणि म्हणायचा, "एक प्याला घ्यायचा का, नाही?" पण एकदा पिऊन झाल्यावर मात्र वेळेची भरपाई करण्यासाठी तो घोड्यांना ढिले सोडत नसे......शेवटी त्या परिचित घराचे उंच छप्पर दृष्टीपथात आले......"आता कसे करायचे?" अर्कादीच्या मनात विचार चमकून गेला. "पण आता माघार घेणे शक्य नाही!" तीनही घोडे एका तालात दौडत होते; ड्रायव्हर त्यांना चुचकारत होता, शीळ मारत होता. थोड्याच वेळात घोड्यांच्या टापांखाली आणि चाकांखाली पूल कुरकुरून गेला आणि काही वेळाने पाईनच्या कापलेल्या रांगा त्यांना भेटण्यासाठी जणू सामोरे येत आहेत असे वाटले......गर्द हिरवळीच्या पार्श्वभूमीवर एका स्त्रीच्या गुलाबी पोषाखाची पुसटशी झलक त्याच्या दृष्टीस पडली; छोट्या छत्रीच्या बारीक झिरमिळ्याआडून एका तरुणीचा चेहेरा डोकावत होता......कत्याला त्याने ओळखले आणि तिनेही त्याला ओळखले. घोड्यांना लगाम लावायला त्याने ड्रायव्हरला सांगितले, गाडीतून बाहेर उडी टाकली, आणि तो तिच्याकडे गेला. "तुम्ही!" ती मोठ्याने म्हणाली आणि तिचा चेहरा आरक्त झाला; "चला, आपण माझ्या बहिणीकडे जाऊ; ती इथेच आहे बागेत; तुम्हाला पाहून तिला फार आनंद होईल."

कत्याने अर्कादीला बागेत नेले. तिच्याशी झालेली भेट म्हणजे विशेष सुचिन्हच आहे असे त्याला वाटले; तिच्या भेटीने त्याला मनस्वी आनंद झाला, जणू ती त्याच्याच गोतावळ्यातील एक होती. सगळे कसे व्यवस्थित जमून आले होते; घरकारभारी नव्हता की, ते औपचारिक वर्दी देणे नव्हते. वाटेत एका वळणावर त्याला अना सर्गेव्ना दिसली. ती पाठमोरी उभी होती. पदरव कानावर पडताच ती हळुवारपणे मागे वळली.

अर्कादी पुन्हा बावरला; पण तिच्या पहिल्याच शब्दांनी त्याला स्वस्थता लाभली. "सुस्वागतम्, पळपुटे महाशय!" ती आपल्या नेहमीच्या सरळ, लाघवी स्वरात म्हणाली; डोळ्यांवर येणारे ऊन आणि वारा निवारण्यासाठी मान कलती करून, स्मितपूर्वक, स्वागतासाठी ती पुढे आली. "तुला हे कुठे सापडले, कत्या?"

"अना सर्गेव्ना, तुम्हाला निश्चितपणे अनपेक्षित वाटेल असे मी काही आणले आहे."

"तुम्ही स्वतःलाच आणलेले आहे; हेच इतर कुठल्याही गोष्टीपेक्षा चांगले आहे."

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

२३

बझारव्‌ने अर्कादीला प्रेमळपणे निरोप दिला; पण त्या प्रेमळपणात व्याजोक्ती होती; तो प्रवासाला निघण्याचे खरे कारण काय आहे याविषयी कुणीच फसणार नाही, याचीही जाणीव त्याने अर्कादीला दिली होती; नंतर मात्र त्याने स्वतःला एकांतवासात कोंडून घेतले; कामाच्या जिद्दीने जणू त्याला झपाटले होते. पावेल पित्रोविच्‌शी वाद घालण्याचे त्याने आता सोडून दिले, कारण आता तर त्याच्या हजेरीत त्यांनी सरंजामदारीचा मुखवटा अधिकच घट्ट बसवला होता; आणि आपली मते शब्दांपेक्षा अस्फुट आवाज करूनच ते व्यक्त करू लागले. फक्त एकदाच, त्याकाळी विशेष चर्चिला गेलेला बाल्टिक प्रांतातील उमरावांच्या हक्काबाबतच्या प्रश्नावर मात्र त्यांची या शून्यवाद्याशी जुंपली; पण अकस्मात ते स्वतः होऊनच थांबले आणि थंड शिष्टाचाराने म्हणाले, “अर्थात्‌ आपण एकमेकाला समजूच शकत नाही; निदान तुम्हाला समजण्याची माझी तरी पात्रता नाही.”

“नाही असे मलाही वाटते!” बझारव्‌ मोठ्याने म्हणाला. “कुठलीही गोष्ट समजून घेण्याचे माणसाजवळ सामर्थ्य असते—उदाहरणार्थ, ईथरचे आंदोलणे, सूर्यामध्ये घडून येणारे उत्पात; —फक्त एक गोष्ट सोडून—आणि ती म्हणजे एक मनुष्य दुसऱ्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने कसा नाक शिंकरतो हे मात्र त्याला समजू शकणार नाही ”

“तुम्ही कोटी केली वाटते?” पावेल पित्रोविच्‌नी विचारले आणि ते निघून गेले.

तरीही काही वेळा बझारव्‌ प्रयोग करीत असताना त्याच्या खोलीत येण्यासाठी ते अनुमती घेत; आणि एकदा तर त्यांनी आपला सर्वोत्कृष्ट साबणाने साफ केलेला सुगंधित चेहेरा सूक्ष्मदर्शक यंत्राजवळ नेला; आणि एक पारदर्शक इन्फ्यूसोरिया एक हरित कण कसा गिळंकृत करत होता व त्याच्या घशात असणाऱ्या दोन चिमट्यासारख्या वाटणाऱ्या साधनांनी त्याने तो घाईघाईने कसा चर्वण केला याचे निरीक्षण केले. निकालाय पित्रोविच्‌ आपल्या बंधूंपेक्षा अधिक वेळा बझारव्‌च्या खोलीला भेट देत; शेतीच्या कटकटींनी त्यांचे लक्ष वेधून घेतले नसते तर, “अभ्यासासाठी” दररोज आपण आलो असतो असे ते म्हणत. त्या तरुण माणसाच्या शास्त्रीय संशोधनात त्यांनी कधीच व्यत्यय आणला नाही; खोलीत एका कोपऱ्यात बसून ते लक्षपूर्वक पाहात बसत; आणि क्वचित प्रसंगी एखादा सावध प्रश्न विचारत. दुपारच्या आणि रात्रीच्या भोजनप्रसंगी ते संभाषणाचा ओघ पदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्र, किंवा रसायनशास्त्र यांकडे वळवत; कारण इतर सर्व विषय—शेतीसुद्धा, मग राजकारण तर दूरच—एकमेकात चकमक उडविणारे नसले तरी, एकमेकाविषयी अप्रियता निर्माण करणारे आहेत असे त्यांना वाटे. बझारव्‌ संबंधी आपल्या बंधूंची अप्रीती काही कमी नव्हती याचा निकालाय पित्रोविच्‌ना अंदाज होता. एका क्षुल्लक घटनेने इतर अनेक गोष्टींप्रमाणे त्यांची ही समजूत पक्की झाली होती. आजूबाजूला पटकीच्या साथीचा प्रादुर्भाव झाला होता, आणि खुद्द मॅरिॲनोतल्या दोन व्यक्ती ‘दगावल्या’ होत्या. रात्रीच्या वेळी पावेल पित्रोविच्‌ना काहीशी तीव्र लक्षणे आढळून आली. सकाळपर्यंत त्यांना वेदना होत होत्या; पण बझारव्‌च्या ज्ञानाचा आश्रय मात्र त्यांनी घेतला नाही. दुसऱ्या दिवशी त्याला भेटल्यावर त्याच्या ‘आपल्याला का बोलावले नाही ’ या प्रश्नाचे त्यांनी उत्तर दिले की, त्यांच्या ‘आठवणी’ प्रमाणे बझारव्‌च म्हणाला होता की, आपला औषधांवर विश्वास नाही; यावेळी ते निस्तेज दिसत होते; तरीही त्यांनी आपली दाढी घोटून केलेली होती आणि काळजीपूर्वक केस विंचरलेले होते. असे दिवस जात होते. बझारव्‌ हट्टाला पेटल्यासारखा आणि गंभीरपणे कामात व्यग्र झाला होता. आणि दरम्यान निकालाय्‌ पित्रोविच्‌च्या घरात एक व्यक्ती अशी होती की, त्या व्यक्तीसमोर

कदाचित त्याने आपले अंतःकरण मोकळे केले नसते, पण त्या व्यक्तीबरोबर बोलणे त्याला आवडले असते......ती व्यक्ती म्हणजे फिनिच्का.

त्याला ती बहुधा सुप्रभाती बागेत अथवा 'फार्म' मध्ये भेटत असे; तिला भेटण्यासाठी तो तिच्या खोलीकडे कधीच जात नसे; आणि ती सुद्धा त्याच्या दाराशी फक्त एकदाच मित्याला आंघोळ घालायची की नाही हे विचारण्यासाठी गेली होती. ती त्याला विश्वासाने सर्व सांगत असे; इतकेच नव्हे तर तिला त्याचे मुळीच भय वाटत नसे; त्याच्या सहवासात ती जितकी निर्भर व निःसंकोच वागत असे, तितकी ती निकालाय् पित्रोविच्च्या सहवासात देखील वागत नसे. हे कसे घडले हे सांगणे कठीण आहे; कदाचित, अजाणतेपणे तिला बझारव्च्या ठिकाणी कुलश्रेष्ठतेचा अगर उच्चभ्रूपणाचा अभाव जाणवला असेल; हा उच्चभ्रूपणा एकाचवेळी आकर्षित करणारा आणि त्याचवेळी भयचकित करणारा असतो. तिच्या दृष्टीने तो एक निष्णात डॉक्टर आणि भला माणूस होता. त्याच्या हजेरीत तिला आपल्या बाळाचे संगोपन निःसंकोचपणे करता येत असे; आणि एकदा तर तिला डोकेदुखीचा त्रास झाला व भोवळ आली, त्यावेळी त्याच्या हातचे चमचाभर औषध ती प्याली होती. निकालाय् पित्रोविच्समोर ती बझारव्शी परकेपणाने वागत असे; या तिच्या वागण्यात ढोंग नव्हते, तर शिष्टाचाराच्या भावनेतून ती तसे वागत असे. पावेल पित्रोविच्ची तिला पूर्वीपेक्षाही अधिक भीती वाटत असे; अलीकडे त्यांनी तिच्यावर नजर ठेवली होती; ते तिच्यापुढे एकदम दत्त म्हणून उभे राहायचे; त्यांचा तो इंग्लिश पद्धतीचा पेहेराव, दोन्ही हात खिशात खुपसलेले, तो निश्चल आणि वेधक चेहेरा—असे ते जणू भूगर्भातून वर येऊन एकदम तिच्या मागे उभे राहात. "अंगावर थंड पाण्याची बादलीच ओतल्यासारखे वाटते," दुन्याशाजवळ एकदा फिनिच्काने तक्रारीच्या स्वरात सांगितले होते, आणि दुन्याशाने उत्तरादाखल निःश्वास टाकला होता, आणि दुसऱ्या एका 'निर्दय' व्यक्तीबद्दलचा विचार तिच्या मनात आला होता. बझारव्ला किंचित्सुद्धा संशय आला नाही की, तो तिच्या हृदयसाम्राज्याचा 'क्रूर जुलमी' राजा होता.

फिनिच्काला बझारव् आवडत असे; त्यालाही ती आवडत होती. तिच्याशी संभाषण करताना त्याच्या मुद्रेवर निश्चित फरक दिसे; त्याची मुद्रा उजळ होई आणि त्यावर प्रायः प्रेमळपणाची छटा विलसे; त्याचा नेहमीचा बेदरकारपणा जाऊन त्याची जागा खेळकर एकाग्रचित्त भावनेने भरून निघे. दिवसेन्दिवस फिनिच्का अधिकच देखणी दिसत होती. तरुण स्त्रियांच्या जीवनात असा एक काळ येतो की, जेव्हा वसंतातल्या गुलाबाप्रमाणे त्या एकदम खुलू लागतात, उमलू लागतात; फिनिच्काच्या जीवनात ही वेळ आलेली होती. आपल्या नाजूक, शुभ्र पोषाखात तिला स्वतःलाच वाटे की, आपण अधिक कृशांगी, अधिक गोरे दिसतो आहोत; उन्हाने तिची त्वचा रापलेली नव्हती, पण बाहेरचा ऊष्मा तिला टाळता आला नाही; तिच्या गालांवर व कानांवर रक्तिमा पसरे; तिच्या सबंध शरीरावर जणू मधुर अशा सुस्तपणाचा शिडकावा होई; तिच्या सुंदर डोळ्यांत त्या स्वप्नाळू सुस्तपणाचा प्रत्यय येई. काही काम करणे प्रायः तिला अशक्य होई; तिचे हात सहजरीत्या तिच्या मांडीवर विसावत. ती सहसा चालण्याचे श्रम घेत नव्हती; आणि सदैव निःश्वास टाकत, गमतीदार आगतिकतेने कुरबूर करू लागे.

"तू वरचेवर आंघोळीला जात जा," निकालाय् पित्रोविच्नी तिला सांगितले. आपल्या अनेक तळ्यांपैकी एकात त्यांनी आंघोळीसाठी हौदा बांधून घेतला होता आणि त्यावर छताचे आवरण आच्छादले होते.

“निकालाय् पित्रोविच्! त्या तळ्यापर्यंत पोहोचायचे म्हणजे मरणच; आणि तिथून परतायचे म्हणजे पुन्हा एकदा मरण. बागेत निवाऱ्याची जागा अजिबात नाही.”

“खरे आहे; तिथे नाही निवाऱ्याची जागा,” निकालाय् पित्रोविच्नी कपाळावर बोटे चोळत उत्तर दिले.

एके दिवशी सकाळी सात वाजता बझारव् फिरून परत येत असता लिल्याकच्या कुजांत त्याला फिनिच्का बसलेली आढळली. फुलांचा बहर संपलेला होता, पण अजूनही कुंजातील वेली घनदाट आणि हिरव्यागार दिसत होत्या. बागेतल्या आपल्या बैठकीवर ती बसलेली होती आणि नेहमीप्रमाणे तिने डोक्यावर आपला पांढरा रुमाल टाकला होता; जवळच तांबड्या व पांढऱ्या गुलाबांचा, दंवबिंदूंनी डंवरलेला ढीग पडला होता. त्याने तिला ‘गुड मॉर्निंग’ म्हणून अभिवादन केले.

“कोण! एव्‌गेनी वासिलिइच्!” ती म्हणाली; बोलताना तिने त्याच्याकडे पाहाण्यासाठी रुमालाचे एक टोक वर उचलले; तसे करताना कोपरापर्यंतचा तिचा हात अनावृत झाला.

“इथे काय चाललय?” बझारव्‌ने विचारले; आणि तो तिच्या समीप बसला. “गुच्छ करताय वाटते?”

“होय, भोजनप्रसंगी टेबलावर ठेवण्यासाठी. निकालाय् पित्रोविच्‌ना ते आवडते.”

“पण भोजनाला तर अजून बराच अवधी आहे. किती फुले ही!”

“आताच मी वेचली ती; कारण नंतर ऊन होते आणि मग बाहेर पडायची सोय नाही. यावेळी फक्त श्वासोच्छ्वास करता येणे शक्य असते. उन्हाने मला अगदी गळून गेल्यासारखे होते. मी आजारी तर पडणार नाही ना, अशी भीती वाटते.”

“उगीच काहीतरी काय बोलता! मला तुमची नाडी तपासून पाहू दे.” बझारव्‌ने तिचा हात हातात धरला, संथपणे उडणाऱ्या नाडीच्या ठोक्यांचा कानोसा घेतला, पण ठोके मोजण्याच्या भरीस मात्र पडला नाही. “शंभर वर्षे आयुष्य आहे तुम्हाला!” तो म्हणाला, आणि तिचा हात सोडला.

“नको रे देवा!” ती म्हणाली.

“का? तुम्हाला दीर्घायुष्य नको?”

“नको असे नाही, पण शंभर वर्षे! आमच्या शेजारी एक पंच्याऐंशी वर्षांची म्हातारी होती—ती हुतात्माच झाली म्हणायची ! अस्वच्छ, बहिरी, वाकलेली आणि सारखी खोकत बसणारी; बिचारीला स्वतःचेच ओझे झाले होते. कसले भयंकर जीवन ते!”

“म्हणजे तरुण असणेच अधिक श्रेयस्कर, ना?”

अनुक्रमणिका

“खरेच, नाही का?”

“पण अधिक श्रेयस्कर कसे? सांगा पाहू!”

“कसे म्हणून काय विचारता? माझेच पाहा, मी तरुण आहे, मी काहीही करू शकते, कुठेही जाऊ शकते, येऊ शकते, काहीही वाहून नेऊ शकते, आणि कुणाचीही कशासाठी मनधरणी करायला नको......यापेक्षा अधिक चांगले काय असू शकेल?”

“माझ्या बाबतीत मात्र मी तरुण असणे वा वृद्ध असणे सारखेच.”
“म्हणजे काय? दोन्ही सारखेच कसे? तुम्ही म्हणता ते कसे शक्य आहे ?”

“फिदोस्या निकालाएव्ना, माझे तारुण्य मला कितपत उपयुक्त आहे याचा निर्णय तुम्हीच घ्या; मी एकटा बिचारा गरीब प्राणी आहे......”

“पण ते तुमच्यावरच अवलंबून आहे.”

“ते माझ्यावर मुळीच अवलंबून नाही! निदान कुणीतरी माझ्यावर दया केली पाहिजे.” फिनिच्काने बझारव्कडे एक तिरपा कटाक्ष टाकला, पण ती काहीच बोलली नाही. “कुठले पुस्तक आहे तुमच्या हातात?” थोड्या वेळानंतर तिने विचारले.

“हे? एक शास्त्रीय पुस्तक आहे, फारच क्लिष्ट.”

“तुम्ही अजून अभ्यास करता? रूक्ष वाटत नाही तुम्हाला? तुम्हाला अगोदरच खूप ज्ञान आहे, असे मला वाटते.”

“खूप नाही म्हणा. आपण थोडे वाचण्याचा प्रयत्न करतो इतकेच.”

“पण मला यातले काहीच कळत नाही. रशियन भाषेतच आहे ना?” दोन्ही हातात ते जाडजूड बांधणीचे पुस्तक घेत तिने विचारले. “किती जाड आहे हे!”

“होय, ते रशियन भाषेत आहे.”

“मला ते सारखेच, त्यातले काहीही कळणार नाही.”

“पण तुम्हाला ते समजण्यासाठी मी दिले नाही. तुम्ही वाचताना मला तुमच्याकडे पाहायचे आहे. तुम्ही वाचत असता तुमच्या छोट्या नासिकेचा शेंडा मजेशीर हलतो.”

अनुक्रमणिका

फिनिच्काने "क्रेओसोट " नाव असलेल्या लेखावर निर्हेतूकपणे पुस्तक उघडले होते, त्यातील अक्षरे हळुवार वाचण्याचा ती प्रयत्न करत होती; बझारव्चे शब्द ऐकून तिला हसू फुटले, आणि तिने पुस्तक बाजूला सारले......ते बैठकीवरून खाली जमिनीवर पडले.

"तुमचे हास्य सुद्धा फारच आकर्षक आहे," बझारव् म्हणाला.

"काही तरीच!"

"तुम्ही बोलतानासुद्धा किती छान वाटता. जणू लहानशा ओहोळाचे खळाळणे."

फिनिच्काने मान वळवली. "तुमच्याशी बोलणे किती अवघड वाटते!" तिने शेरा मारला; आणि बोटांनी फुले वेचून घेतली. "माझे बोलणे ऐकण्यात तुम्हाला काय रस वाटणार आहे? किती हुशार स्त्रियांशी तुम्ही संभाषण केले असेल."

"छे, छे फिदोस्या निकालाएव्ना, माझ्यावर विश्वास ठेवा; जगातल्या सगळ्या हुशार स्त्रियांची या नाजूक कोपराशीही तुलना करता येणार नाही."

"पुरे, हा आणखी एक शोध!" हाताची घडी करीत फिनिच्का पुटपुटली.

बझारव्ने खाली पडलेले पुस्तक उचलले.

"हे पुस्तक वैद्यकशास्त्राचे आहे; तुम्ही ते दूर का टाकले?"

"वैद्यकशास्त्रावरचे?" फिनिच्काने विचारले आणि ती त्याच्याकडे वळली. "तुम्ही ते थेंब थेंब द्यायचे औषध दिल्यापासून—आठवते का? मित्याला कशी छान झोप लागते! तुमचे आभार कसे मानावे हेच मला समजत नाही. किती चांगले आहात तुम्ही, खरेच !"

"पण डॉक्टरला मोबदला द्यावा लागतो," स्मितपूर्वक बझारव् म्हणाला, "तुम्हाला ठाऊक आहेच. डॉक्टर लोक लोभी असतात."

फिनिच्काने डोळे विस्फारले; तिच्या चेहेऱ्यावर पडलेल्या प्रकाशाने तिचे डोळे अधिकच काळेशार दिसत होते; तिने बझारव्कडे पाहिले. तो आपली थट्टा तर करत नाही ना असे तिला वाटले.

"तुम्ही सांगाल तर......आम्हाला आनंदच होईल......निकालाय् पित्रोविच्ना मला विचारावे लागेल."

"म्हणजे, मला पैसे हवेत असे तुम्हाला वाटते?" बझारव्ने मध्येच विचारले, "नाही; तुमच्याकडून मला पैशांची अपेक्षा नाही."

“मग काय?” फिनिच्काने विचारले.

“काय?” बझारव्ने तोच प्रश्न केला. “ओळखा पाहू!”

“असे ओळखायला मी हुशार थोडीच आहे?”

“बरे; मी सांगतो; मला......त्यातला एक गुलाब हवा आहे.”

बझारव्ची मागणी तिला इतकी गमतीची वाटली की, ती पुन्हा खळाळून हसली; आणि तिने टाळीसुद्धा वाजविली. ती हसली आणि तिला हुरळून गेल्यासारखे वाटले. बझारव् अनिमिष नेत्रांनी तिच्याकडे पाहात होता.

“आनंदाने” ती शेवटी म्हणाली. आणि जागेवर खाली वाकून गुलाबाच्या ढिगाऱ्यातून वेचायला सुरवात केली. “तुम्हाला कुठले हवे? ......तांबडे की पांढरे?”

“तांबडे......आणि फार मोठे असलेले नको.”

ती पुन्हा ताठ बसली. “हं, हे घ्या,” ती म्हणाली, पण पुढे केलेला हात तिने तात्काळ मागे घेतला; तिने ओठ चावले; लताकुंजाच्या प्रवेशद्वाराकडे नजर वळवली आणि कानोसा घेतला.

“कोण ते?” बझारव्ने विचारले. “निकालाय् पित्रोविच्?”

“नाही......किर्सानव्—शेतांकडे गेले आहेत......शिवाय, मला त्यांचे भय नाही......पण पावेल पित्रोविच्...... असावेत असे वाटले.”......

“काय?”

“ते इकडे येत असावेत असे वाटले. नाही......कुणीच नसावे. हे घ्या.” फिनिच्काने बझारव्ला गुलाबाचे फूल दिले.

“पावेल पित्रोविच्ची भीती वाटण्यासारखे काय आहे?”

“त्यांची मला नेहमीच धास्ती वाटते. आणि तुम्हाला ते आवडत नाहीत हे मला माहीत आहे. तुम्ही त्यांच्याशी नेहमी वितंडवाद करायचे, आठवते? तुमचा वाद कशाबद्दल असायचा कुणास ठाऊक......पण तुम्ही त्यांना उलथेपालथे करायचे हे बरीक ध्यानात यायचे.”

फिनिच्काने आपल्या हातांच्या हालचालीने बझारव् पावेल पित्रोविच्ना उलथेपालथे कसे करत असे हे दाखविले.

अनुक्रमणिका

बझारव्‌ने स्मित केले. “पण मला जर त्यांनी बडवून काढायचे ठरविले तर, तुम्ही माझ्या बाजूने उभे राहाल?”

“पण तुमची बाजू मी कशी घेऊ शकेन? पण त्याची जरुरीही नाही; तुमच्यावर कुणी मात करू शकणार नाही.”

“तुम्हाला तसे वाटते? पण असा एक हात आहे की, त्याने ठरविले तर तो सहज माझ्यावर मात करू शकेल.”

“कुठला हात?”

“काय, तुम्हाला खरेच ओळखत नाही का? तुम्ही दिलेल्या गुलाबाचा किती सुमधूर वास येतो, पाहा ना.”

फिनिच्‌काने आपली नाजूक मान ताठ केली व त्या फुलावर आपला चेहेरा झुकविला......तिच्या मस्तकावरचा रुमाल स्कंधावर ओघळला; तिचा मृदू, दाट, चमकणारा आणि काहीसा विस्कटलेला केशसंभार अनावृत झाला.

“थांबा; मलाही ते तुमच्याबरोबरच हुंगायचे आहे,” बझारव्‌ म्हणाला. तो खाली वाकला आणि तिच्या विलग ओठांचे आवेगाने त्याने चुंबन घेतले.

ती चमकली; त्याच्या छातीवर दोन्ही हातांनी जोर देऊन तिने त्याला ढकलले, पण दुबळेपणाने ढकलले; आणि बझारव्‌ला पुन्हा एकदा प्रदीर्घ चुंबन घेणे शक्य झाले.

लिल्याकच्या झुडपाआडून कोरडे खाकरणे ऐकू आले तत्क्षणी फिनिच्‌का बैठकीच्या दुसऱ्या टोकाला जाऊन बसली. पावेल पित्रोविच्‌ प्रकट झाले, किंचित मान वाकवून त्यानी अभिवादन केले आणि एक प्रकारच्या द्वेषमूलक नाराजीने ते म्हणाले, “तुम्ही इथे आहात तर,” आणि ते मागे फिरले. फिनिच्‌काने गुलाबाची फुले लगबगीने गोळा करून लताकुंजातून काढता पाय घेतला.

“एव्‌गेनी, वासिलिइच्‌, तुम्ही असं करायला नको होतं,” जाता जाता ती पुटपुटली. तिच्या कुजबुजण्यात मनस्वी निषेध होता.

बझारव्‌ला अलिकडचाच एक प्रसंग आठवला. त्याला शरम वाटली, पण त्याचवेळी तिरस्कारयुक्त घृणा वाटली; पण त्याने ताबडतोब मान झटकली; “रंगेल लोथारिओची भूमिका शेवटी धारण केली,” याबद्दल स्वतःचे व्याजोक्तिपूर्ण अभिनंदन केले, आणि तडक आपल्या खोलीकडे गेला.

पावेल पित्रोविच्‌ बागेतून बाहेर पडले आणि जणू मोजून पावले टाकत त्यानी वनाकडे आपला मोर्चा वळवला. तिथे ते काहीसे उशिरापर्यंत थांबले; आणि भोजनाच्या वेळी जेव्हा ते परत आले, तेव्हा त्यांचा चेहेरा एव्हढा विमनस्क होता की, निकालाय्‌ पित्रोविच्‌नी त्यांचे क्षेम विचारले.

अनुक्रमणिका

“मला काही वेळा पित्तप्रकोपाचा त्रास होतो हे तुम्हाला माहीत आहेच,” पावेल पित्रोविच्नी शांतपणे उत्तर दिले.

अनुक्रमणिका

२४

नंतर दोन तासांनी त्यांनी बझारव्च्या दारावर टकटक केली.

“तुमच्या शास्त्रीय संशोधनात व्यत्यय आणल्याबद्दल मी तुमची क्षमा मागतो,” खिडकीजवळच्या खुर्चीत स्थानापन्न होत ते म्हणाले; एका सुरेख काठीवर दोन्ही हातांनी रेलत ते बसून राहिले; काठीचा दांडा हस्तिदंती होता. (ते नेहमी काठीशिवाय चालत असत) “पण माझ्यासाठी तुम्ही पाच मिनिटे वेळ द्यावी ही याचना करताना मला वेदना होतात......फार नाही, पाचच मिनिटे.”

“माझा सगळा वेळ तुमच्या सेवेसाठी आहे,” बझारव् म्हणाला; पावेल पित्रोविच्नी दरवाजात प्रवेश करताक्षणीच त्याच्या चेहेऱ्यावरचा भाव पालटला होता.

“पाच मिनिटे पुरे होतील मला. मला तुम्हाला एकच प्रश्न विचारायचा आहे.”

“प्रश्न? कशाबद्दल ?”

“माझे सर्व ऐकून घेण्याची कृपा कराल तर सर्व सांगतो. आमच्या भाईसाहेबांच्या घरी तुम्हाला आल्यानंतर आणि तुमच्याशी बातचीत करण्याच्या आनंदाचा मी त्याग करण्यापूर्वी, निरनिराळ्या विषयावर तुमची मते ऐकण्याचे सद्‌भाग्य मला लाभले होते; पण माझ्या स्मृतीप्रमाणे आपणादोघांत अगर माझ्या हजेरीत, एकेरी चीतपट कुस्ती किंवा द्वंद्व हा विषय कधी चर्चिला गेला नव्हता. या विषयावरची आपली मते मला आपल्याकडून ऐकण्याची अनुज्ञा असावी.”

बझारव् पावेल पित्रोविच्च्या स्वागतासाठी उठला होता; तो टेबलाच्या कडेवर बसला आणि त्याने हात जोडले.

“माझे मत,” तो म्हणाला, “असे आहे की, द्वंद्व खेळणे हे तात्त्विक दृष्ट्या विपरीत आहे; आता व्यवहार्यतः बोलायचे असेल तर......गोष्ट निराळी.”

“म्हणजे, मला तुमच्या बोलण्याचे पूर्ण आकलन झाले आहे असे गृहीत धरून, तुम्हाला असेच म्हणायचे आहे ना की, तुमचे द्वंद्व खेळण्याबाबतचे विचार काहीही असले तरी व्यवहारात तुमचे समाधान होईपर्यंत तुमचा अवमान झालेला तुम्ही खपवून घेणार नाही?”

“माझ्या म्हणण्याचे तुम्हाला बरोबर आकलन झाले आहे.”

“फारच छान. तुमच्या या बोलण्याचा मला संतोष वाटतो. तुमच्या शब्दांनी माझ्या मनातील ‘निर्निश्चितता’ दूर झाली.”

“तुम्हाला ‘अनिश्चितता’ म्हणायचे असेल.”

अनुक्रमणिका

“दोन्ही एकच. माझे म्हणणे समजले की झाले; मी काही......पाठ शाळेतला उंदीर नाही. तुमच्या बोलण्याने माझे एक तिरस्करणीय काम वाचले. तुमच्याशी द्वंद्व करायचे मी निश्चित केले आहे.”

बझारव्‌ने डोळे विस्फारले. “माझ्याशी?”

“अलबत.”

“पण कशासाठी, कृपया ते सांगाल का?”

“त्याचे कारण मी समजाऊन देऊ शकेन,” पावेल पित्रोविच्‌ म्हणाले, “पण त्या बाबतीत मी मौन पाळायचे ठरविले आहे. तुमचे इथले वास्तव्य अनावश्यक आहे असे माझे मत आहे; मी ते सहन करू शकत नाही; मी तुमचा तिरस्कार करतो; आणि एव्हढे पुरेसे वाटत नसेल तर...... ”

पावेल पित्रोविच्‌चे डोळे चमकत होते......बझारव्‌चेसुद्धा ज्वाळा टाकत होते. “हरकत नाही,” त्याने मान्यता दिली. “अधिक स्पष्टीकरणाची गरज नाही......तुमची मध्ययुगीन सरदारकीची खुमखुमी माझ्यावर चालविण्याची तुमची लहर दिसते. तुम्हाला हे सुख मिळू द्यायचे नाही असे मी करू शकेन, पण......होऊन जाऊ दे !”

“माझ्यावरील तुमच्या उपकाराची मला जाण आहे.” पावेल पित्रोविच्‌ उत्तरले; “आणि मला हिंसक मार्गाचा अवलंब करायला भाग न पाडता तुम्ही माझे आव्हान स्वीकाराल असा मला भरंवसा वाटतो.”

“उत्प्रेक्षा सोडून देऊ आपण; म्हणजे त्या काठीचा अवलंब, असेच ना?” बझारव्‌ने थंडपणे विचारले. “अगदी बरोबर. तुम्ही माझा पाणउतारा करण्याची मुळीच गरज नाही. खरे म्हणजे ती पद्धती सोईचीही होणार नाही. तुम्ही सभ्य राहू शकता......मीही सभ्य माणसाप्रमाणे तुमचे आव्हान स्वीकारतो.”

“उत्तम,” कोपऱ्यात काठी ठेवत पावेल पित्रोविच्‌ म्हणाले. “तेव्हा आता आपण तडक द्वंद्व खेळण्याबाबतच्या अटीसंबंधी बोलू; पण मला प्रथम सांगा की, मी तुम्हाला द्वंद्वाचे आव्हान देण्यासाठी एखादे क्षुल्लक भांडण उकरून काढण्याच्या औपचारिक गोष्टीची गरज तुम्हाला वाटते का?”

“नाही; औपचारिकपणाला फाटा देणे अधिक बरे.!”

“मलाही तसेच वाटते. आपणा दोघांतील मतभेदाच्या खऱ्या कारणांची मीमांसा करणेही अनावश्यक आहे, असे मी गृहीत धरतो. आपण एकमेकाला सहन करू शकत नाही. यापेक्षा अधिक काय हवे? ”

“खरेच, आणखी काय हवे?” उपरोधाने बझारव्‌नेही पुनरुच्चार केला.

अनुक्रमणिका

“प्रत्यक्ष सामन्यासंबंधी बोलायचे तर, आपल्यासाठी कुणी साथीदार नको आहेत—कारण ते आणायचे कुठले?”

“अगदी बरोबर; ते आणायचे कुठले?”

“मग आता पुढील प्रस्ताव मी आपणापुढे सादर करतो; उद्या सकाळी, सहा वाजता वनराईच्या मागे; पिस्तुलाने, आणि दहा पावलांचे अंतर ठेवून......सामना होईल असे आपण ठरवू”

“दहा पाऊले? चालेल; तेव्हढ्या अंतरावरून आपण एकमेकाचा पुरेसा द्वेष करतो.”

“पाहिजे असेल तर आठ पावले ठेवू,” पावेल पित्रोविच्नी शेरा मारला.

“पाहिजे असेल तर तेवढे ठेव.”

“दोन गोळ्या झाडणे; आणि कुठल्याही परिणामाची तयारी ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या खिशात एक पत्र ठेवावे; त्यात आपल्या मृत्यूला स्वतःच जबाबदार असल्याचे लिहिलेले असेल.”

“त्या गोष्टीला मात्र माझा आक्षेप आहे,” बझारव्ने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. “त्याच्यामध्ये फ्रेंच कादंबरीचा आभास होतो; ते थोडे अविश्वसनीय वाटते.”

“कदाचित्. पण खून केल्याचा संशय निर्माण करणे हेही तितकेसे समाधानकारक नाही, हे तुम्हाला पटेल.”

“तेही खरे. पण तो निंदास्पद संशय टाळण्याचा एक मार्ग आहे. आपल्याला साक्षीदार नकोत, पण आपण एक साक्षीदार घेऊ.”

“आणि तो कोण? विचारायला हरकत नाही ना?”

“प्योत्र,”

“कोण प्योत्र?”

“तुमच्या बंधूंचा नोकर. सांप्रतकालीन संस्कृतीचे शिखर त्याने गाठले आहे; आणि आपले काम तो असल्या बाबतीत आवश्यक असणाऱ्या घरंदाजपणाने पार पाडील.”

“मला वाटले तुम्हाला विनोद सुचतो आहे, महाशय.”

अनुक्रमणिका

“मुळीच नाही. माझ्या सूचनेचा तुम्ही विचार करून पाहा म्हणजे तुम्हाला त्यातील व्यवहार्यता व साधेपणा समजून येईल; मापाखाली मेणबत्ती लपविण्यात हंशील नाही; पण प्योत्रला योग्य प्रकारे तयार करणे व सामन्याच्या ठिकाणी घेऊन येणे ही जबाबदारी माझी.”

“तुम्ही अजूनही गंमत चालविली आहे,” खुर्चीतून उठत पावेल पित्रोविच् म्हणाले. “पण तुम्ही ज्या चांगुलपणाने तयारी दर्शविली आहे, तिचा विचार करता, काही अटी लादण्याचा मला अधिकार आहे असा बहाणा मलाही करता येणार नाही...... तेव्हा, प्रत्येक गोष्ट ठरली......बरी आठवण झाली, तुमच्याकडे कदाचित पिस्तुले नसतीलच?”

“पावेल पित्रोविच्, माझ्याकडे पिस्तुले कशी असतील? मी काही सैन्यात नाही.”

“तसे असेल तर मी माझे देईन. या पिस्तुलांचा उपयोग मी या पाच वर्षांत केलेला नाही, याबद्दल निश्चिंत असा.”

“वा, हे वृत्त बराच आधार देणारे आहे.”

पावेल पित्रोविच्नी काठी उचलली......“आणि आता मात्र, महोदय, आपले आभार मानायचे व आपल्या संशोधनासाठी आपणाला मोकळे करायचे एव्हढेच राहिले......आता मी आपला निरोप घेतो.”

“आपल्या पुनर्भेटीचा आनंद मिळेपर्यंत, महाशय,” बझारव् आपल्या पाहुण्याला दरवाजापर्यंत पोचवत नेत म्हणाला.

पावेल पित्रोविच् बाहेर पडले; आणि बझारव् एक मिनिटभर दरवाजासमोर उभा राहिला, आणि एकदम उद्गारला, “शी, आपण अगदी खलास झालो! किती छान! किती खुळचटपणाचे! एक मजेदार प्रहसनच झाले आहे आमचे! मागच्या पायावर चालण्याची कसरत करणाऱ्या शिकाऊ कुत्र्याप्रमाणे. पण नकार देण्याचा प्रश्नच नव्हता; मला त्याने एक लगावले असते, याबद्दल माझी खात्रीच आहे. आणि मग मात्र......” (त्या विचारासरशी बझारव्चा चेहेरा पांढराफटक पडला; त्याचा स्वाभिमान तात्काळ फणा काढून उभा राहिला.) “आणि मग मात्र एखाद्या मांजरासारखे गळा घोटून त्याला मारणे मला भाग पडले असते.” तो आपल्या सूक्ष्मदर्शक यंत्राकडे वळला, पण त्याचे हृदय जोराने स्पंदन पावत होते आणि सूक्ष्मवलोकनासाठी लागणारी एकाग्रता नाहीशी झाली होती. “त्यानी आज आम्हाला पाहिले; केवळ आपल्या भावासाठी ते इतक्या थराला जातील? आणि बाब तर काय मोठी आहे—नुसते एक चुंबन? यात अधिक काही असले पाहिजे. बापरे! ते स्वतःच तर तिच्या प्रेमात पडले नसतील? शंकाच नको, ते प्रेमात पडले आहेत; सूर्यप्रकाशाइतके हे स्वच्छ आहे. काय गुंतवळा आहे! काय वैताग आहे!” शेवटी त्याने ठरविले, “कसेही पाहा, हे वाईट काम आहे; एक तर शिरच्छेद करणाऱ्या गोळीचा धोका पत्करला पाहिजे, आणि कुठल्याही परिस्थितीत इथून पलायन करायलाच पाहिजे; तो अर्कादी......आणि ते निष्पाप मांजर निकालाय पित्रोविच्; वाईट, फारच वाईट गोष्ट आहे.”

एका विशिष्ट संथपणाने आणि सुस्तपणाने तो दिवस पार पडला. फिनिच्काने आपल्या अस्तित्वाची निशाणीही दाखविली नाही; आपल्या लहानशा खोलीत ती बिळात लपलेल्या उंदरासारखी लपून राहिली.

अनुक्रमणिका

निकालाय पित्रोविच्चा चेहेरा चिंताक्रांत दिसत होता. गव्हाच्या पिकावर चिकटा रोग आला होता असे त्यानी नुकतेच ऐकलेले होते; आणि त्या पिकावर तर त्यांच्या साऱ्या आशा केंद्रित झाल्या होत्या. पावेल पित्रोविच्नी प्रत्येकाला, प्रकोफिच्लासुद्धा, आपल्या थंड्या शिष्ट वागणुकीने जेरीस आणले होते. बझारव्ने आपल्या वडिलांना पत्र लिहायला घेतले, पण ते फाडून टाकले आणि टेबलाखाली फेकून दिले.

"मी मेलोच तर," तो विचार करू लागला, "त्यांना कळेलच; पण मी मरणार नाही. नाही, या जगात आणखी काही काळ मी झगडा देत राहाणार आहे." प्योत्रला त्याने एका महत्त्वाच्या कामासाठी म्हणून दुसऱ्या दिवशी अगदी सकाळीच येण्यासाठी आज्ञा केली. प्योत्रला वाटले की, तो त्याला आपल्याबरोबर पिट्स्बर्गला घेऊन जाणार आहे. बझारव्ला झोप लागायला बराच वेळ लागला; रात्रभर विकृत स्वप्नांनी तो चक्रावला होता......मादाम अदिन्त्सवा सारखी स्वप्नात येत होती; एकदा ती त्याची आई होऊन आली; आणि तिच्यामागून एक मांजराचे पिलू काळ्या मिशा असलेले आले; आणि हे पिलू फिनिच्का सारखे दिसत होते. मग पावेल पित्रोविच्नी एका मोठ्या वृक्षाचा आकार धारण केला, त्याच्याशी त्याला अजून लढत द्यायची होती. प्योत्रने त्याला पहाटे चारला उठविले; त्याने ताबडतोब पोषाख चढवला व तो बाहेर पडला.

ती सकाळ सुंदर, टवटवीत होती; स्वच्छ निळसर आकाशाच्या पार्श्वभूमीवर ढगांचे लहान लहान ठिपके फेसाळ लहरींसारखे तरंगत होते. पर्णराजी व तृणांकुरावर छोटे दंवबिंदू आच्छादले होते आणि कोळीष्टकांच्या जाळ्यांवर चांदीसारखे चमकत होते; गुलाबी पहाटेचे अवशेष ओलसर, काळ्या पृथ्वीवर अजूनही दिसत होते; आकाशातून लार्क पक्ष्यांच्या गाण्याच्या सरीवर सरी खाली येत होत्या. बझारव् वनराईपर्यंत चालत गेला; सावलीत तिथेच बसला; आणि मग त्याने प्योत्रला त्याच्याकडून अपेक्षित असलेल्या कामाचा खुलासा केला. त्या सुधारलेल्या नोकराची भीतीने गाळण उडाली; पण बझारव्ने त्याची समजावणी केली; त्याला सांगितले की दूर अंतरावर उभे राहून त्याने फक्त पाहायचे; याखेरीज दुसरे काही करायचे नाही; आणि एव्हढे करण्यात तो कुठल्याही प्रकारे जबाबदार धरला जाणार नव्हता. "आणि विचार कर," तो पुढे म्हणाला, "किती महत्त्वाची भूमिका तुला करायची आहे!" प्योत्रने हात हवेत फेकले, खाली पाहिले, आणि एका बर्चच्या झाडाला रेलून तो उभा राहिला; भीतीने तो हिरवा पडला होता.

मॅरिॲनोकडून येणारा रस्ता त्या वनराईच्या बाजूने गेला होता; धुळीचा एक पातळ थर त्याच्यावर साचला होता; आधल्या दिवसापासून कुठल्याही चाकाच्या अगर पावलांच्या खुणा त्याच्यावर उमटल्या नव्हत्या. बझारव् अभावितपणे त्या रस्त्याकडे टक लावून पाहात होता; गवताचे एक पाते उचलून त्याने ते दाताने कुरतडले; आणि तो स्वतःशीच पुटपुटला. "काय मूर्खपणा आहे!" प्रातःकालच्या थंडीने तो दोनदा हिंव भरल्यासारखे कुडकुडला......प्योत्रने हताशपणे त्याच्याकडे पाहिले, पण बझारव्ने फक्त स्मित केले; तो भ्यायला नव्हता.

घोड्यांच्या टापांचा आवाज रस्त्याच्या बाजूने येऊ लागला......झाडामागून एक कुळवाडी येत असताना दिसला. दोन घोडे एकत्र जुंपलेले होते आणि तो त्यांना हाकीत होता; बझारव्जवळून जाताना त्याने त्याच्याकडे अनोळखी नजरेने पाहिले; त्याने त्याला अभिवादन केले नाही, त्यामुळे प्योत्र अस्वस्थ झाला; त्याला वाटले हा अपशकूनच. "इतक्या सकाळी लौकर उठणारा आणखी कुणीतरी आहे म्हणायचा," बझारव्ला वाटले; "पण तो कामासाठी लौकर उठला आहे; नाही तर आम्ही......"

अनुक्रमणिका

“ते गृहस्थ येत आहेत असे दिसते,” प्योत्र अडखळत म्हणाला.

बझारव्‌ने मान वर करून पावेल पित्रोविच् येत असलेले पाहिले. रेघारेघाचे जॅकेट व पांढरीशुभ्र पाटलोण त्यांनी पेहेरलेली होती; झपझप पावले टाकत ते रस्त्याच्या बाजूने येत होते; त्यांच्या काखोटीला हिरव्या कपड्यात गुंडाळलेली एक पेटी दिसत होती.

“माफ करा, तुम्हाला प्रतीक्षा करावी लागली असणार,” ते म्हणाले; त्यांनी प्रथम बझारव्‌ला व नंतर प्योत्रला अभिवादन केले; प्योत्रला त्यांनी त्यावेळी त्याचा प्रायः साथीदार असल्याचा विचार करून त्याला आदराने वागविले. “माझ्या नोकराला उठविण्याची माझी इच्छा नव्हती.”

“चिंता नको,” बझारव्‌ने उत्तर दिले; “आम्हीसुद्धा नुकतेच आलो आहोत.”

“वा! मग फारच छान!” पावेल पित्रोविच्‌नी आजूबाजूला नजर टाकली. “आजूबाजूला कुणी दिसत नाही; आपल्याला कुणाचा उपद्रव होणार नाही. आपण सुरू करू ?”

“करू सुरवात.”

“माझ्या समजुतीप्रमाणे तुम्हाला पुन्हा एकदा स्पष्टीकरण देण्याची गरज नसावी?”

“नाही.”

“तुम्हीच गोळ्या भरता?” त्यांनी पेटीतून पिस्तुले बाहेर काढली आणि विचारले.

“नको; तुम्हीच भरा; मी पावले मोजतो. माझी पावले लांब आहेत,” स्मितपूर्वक बझारव् म्हणाला. “एक, दोन, तीन.”

“एव्गेनी वासिलिइच्,” प्योत्र अडखळत, प्रयत्नपूर्वक म्हणाला, (हिंव भरलेल्या माणसासारखा तो लटलटत होता), “मी इथून दूर जाऊन राहाणार, मग तुम्ही काहीही म्हणा.”

“चार......पाच......छान. जा बाबा, दूर जाणार तर जा; झाडामागे जाऊन उभा राहिलास तरी चालेल; कान बंद करून घे; फक्त डोळे मात्र उघडे ठेव; आणि जर कुणी कोसळलाच, तर धावत जाऊन त्याला आधार दे. सहा......सात...... आठ......” बझारव् थांबला. “पुरे का?” पावेल पित्रोविच्‌कडे वळून त्याने विचारले; “की आणखी दोन पावले मोजू?”

“तुमची इच्छा,” दुसरी गोळी पिस्तुलात भरत त्यांनी उत्तर दिले.

“बरे आणखी दोन पावले जादा असू देत.” बझारव्‌ने बुटाच्या टोकाने एक रेघ ओढली. “ही शेवटची हद्द. बरे, या हद्दीपासून आपण प्रत्येकजण किती पावले मागे वळायचे? महत्त्वाचाच प्रश्न आहे हा सुद्धा. काल आपण हा मुद्दा चर्चेला घेतला नव्हता.”

अनुक्रमणिका

“मला वाटते, दहा पावले,” पावेल पित्रोविच् म्हणाले; आणि त्यांनी दोन्ही पिस्तुले बझारव्‌कडे दिली. “कृपा करून पिस्तुलाची निवड कराल का?”

“करीन. पण पावेल पित्रोविच्, आपली ही लढत मूर्खपणाचा कळस म्हणता येईल इतकी वैशिष्ट्यपूर्ण आहे, हे तुम्हाला मान्य व्हायला हरकत नसावी. आपल्या साक्षीदाराचे ध्यान तरी पाहा.”

“तुम्हाला प्रत्येक गोष्टीची गंमत वाटते,” पावेल पित्रोविच्‌नी उत्तर दिले. “आपल्या लढतीचे स्वरूप काहीसे विचित्र आहे हे मान्य, पण मी गंभीरपणे सामना देणार आहे याची जाणीव तुम्हाला करून देणे मी माझे कर्तव्य समजतो. आपले हित कशात आहे हे समजणे बरे.”

“अस्स! आपण एकमेकाला नष्ट करण्यासाठी बद्धपरिकर आहोत याबद्दल मला संशय नाही; पण आपण हसत हसत प्रेमाने एकत्र का येऊ नये? तुम्ही माझ्याशी फ्रेंचमध्ये बोला, आणि मी लॅटिनमध्ये बोलेन.”

“मी पूर्ण गांभीर्याने लढत देणार आहे,” पावेल पित्रोविच् पुन्हा म्हणाले; आणि आपल्या जागेकडे ते गेले. बझारव्‌ही आपल्या हद्दीपासून दहा पावले मोजून, आपल्या जागेवर उभा राहिला.

“तय्यार?” पावेल पित्रोविच्‌नी विचारले.

“पूर्णपणे.”

“आता आपण एकमेकांकडे वळून चालू.”

बझारव् सावकाश पुढे चालू लागला; आणि पावेल पित्रोविच् त्याच्या दिशेने चालू लागले; त्यांचा डावा हात खिशात होता; आणि ते पिस्तुलाचे तोंड हळूहळू वर उचलत होते...... “त्यांनी माझ्या नाकावरच नेम धरला आहे,” बझारव्‌ला वाटले, “आणि बदमाष काळजीपूर्वक नजर खाली तर आणत नाही! ही काही अनुकूल संवेदना नव्हे. मी मात्र त्याच्या घड्याळाच्या साखळीकडे पाहात राहाणार.”

काहीतरी वेगाने सूऽऽ असा आवाज करीत त्याच्या कानाला चाटून गेले; आणि त्याचवेळी गोळी झाडल्याचा आवाज झाला. “मी ऐकला तो आवाज, तेव्हा सर्व सुरक्षित असावे,” बझारव्‌च्या डोक्यात विचार चमकून गेला. त्याने आणखी एक पाऊल पुढे टाकले आणि नेम न धरता खटका ओढला.

पावेल पित्रोविच्‌नी क्षणभर चमकून पाहिले आणि दुसऱ्याच क्षणी त्यांनी आपल्या मांडीवर हात घट्ट दाबून धरला. रक्ताचा एक ओघळ त्यांच्या शुभ्र पाटलोणीवरून वाहात होता.

बझारव्‌ने पिस्तुल फेकून दिले आणि त्याने आपल्या प्रतिस्पर्ध्याकडे धाव घेतली. “तुम्ही जखमी झाला?” त्याने विचारले.

अनुक्रमणिका

“हद्दीपर्यंत मला ओरडून इशारा देण्याचा तुमचा हक्क होता,” पावेल पित्रोविच् म्हणाले, “पण आता त्याची जरुरी नाही. आपल्या ठरावाप्रमाणे प्रत्येकाला आणखी एक गोळी झाडण्याचा अधिकार आहे.”

“हरकत नाही; पण माफ करा, पुन्हा कधी तरी पाहू ते,” पावेल पित्रोविच्ना आधार देत बझारव् म्हणाला; ते निस्तेज पडत चालले होते. “मी काही द्वंद्व करणारा योद्धा नाही, मी प्रथम एक डॉक्टर आहे; आणि दुसऱ्या कुठल्याही गोष्टीपेक्षा मला तुमच्या जखमेकडे प्रथम लक्ष दिले पाहिजे. प्योत्र, इकडे ये; प्योत्र! कुठे पळालास रे?”

“हे सगळे मूर्खपणाचे आहे......मला कुणाची मदत नको आहे,” हिसके देत पावेल पित्रोविच् म्हणाले, “आणि...... आपण......पुन्हा......” त्यांनी मिशीला पीळ देण्याचा प्रयत्न केला; पण त्यांच्या हातांनी साथ दिली नाही; त्यांचे डोळे मिटू लागले आणि त्यांची शुद्ध हरपली.

“हे काय झाले! बेशुद्धीचा झटका! पुढे काय!” पावेल पित्रोविच्ना गवतावर अलगद ठेवत बझारव् अभावितपणे म्हणाला. “कुठे लागले ते तर पाहू.” त्याने खिशातून रुमाल काढला; रक्त पुसले आणि जखमेभोवती हळुवारपणे बोटे फिरवून अंदाज घेतला......“हाडाला धक्का लागलेला नाही,” तो पुटपुटला; “गोळी काही खोल गेलेली नाही; एक स्नायुपुंज, बाह्य स्नायुपुंज चाटून गेली आहे. तीन एक आठवड्यांत ते नाचू लागतील!......आणि बेशुद्ध पडणे! काय ही घाबरट माणसं; मला त्यांची घृणा येते! बापरे किती नाजूक कातडी आहे यांची!”

“मेले का ते?” प्योत्रचा थरथरता आवाज मागून आला.

बझारव्ने वळून पाहिले, “भल्या माणसा, लौकरात लौकर पाणी घेऊन ये; आणि ते अजून आपणा सर्वांपेक्षा जास्त दिवस जगतील.”

पण त्या आधुनिक नोकराला त्याचे शब्द समजले नसावेत; तो हलला नाही. पावेल पित्रोविच्नी मंदपणे डोळे उघडले. “ते मरणार आता!” प्योत्र कुजबुजला, आणि त्याने हाताने छातीवर क्रॉस केला.

“तुझे म्हणणे बरोबर आहे......काय नेभळट प्रकृती!” त्या जखमी गृहस्थाने बळेच हसत उद्‍गार काढले.

“बरे, पाणी आणायाला जा पाहू, मूर्खा!” बझारव् खेकसला.

“त्याची गरज नाही......थोडी चक्कर आली. इतकेच......मला बसायला मदत करा......हां......छान......हे खरचटलेले बांधण्यासाठी काहीतरी हवे, मग मी घरापर्यंत पायी चालत जाईन; किंवा फार तर गाडी पाठवून द्या. तुमची तशी इच्छा असेल तर द्वंद्व पुन्हा खेळू या नको. आजची तुमची वागणूक सन्माननीय झाली आहे......”

“भूतकाळ उकरून काढण्याची गरज नाही,” बझारव्ने उत्तर दिले; “आणि भविष्यकाळासंबंधी बोलायचे तर तुम्ही स्वतःला त्रास करून घेण्याची जरुरी नाही; कारण कुठल्याही प्रकारे दिरंगाई न करता

अनुक्रमणिका

इथून निघून जाण्याचे मी ठरविले आहे. मला तुमचा पाय बांधू दे; जखम काही फार गंभीर नाही; पण रक्तस्राव बंद करणे केव्हाही चांगले. पण त्याआधी मला या मढ्यात थोडी धुगधुगी भरली पाहिजे.”

बझारव्ने प्योत्रची मानगुटी पकडून त्याला हलवले; आणि गाडी आणायला त्याला पिटाळले.

“आमच्या भाईसाहेबांना घाबरून सोडू नका,” पावेल पित्रोविच् त्याला म्हणाले, “त्यांना कळविण्याचे मनातही आणू नका.”

प्योत्रने तिथून पळ काढला; आणि तो गाडी आणण्यासाठी पळत होता, त्या अवधीत ते दोघे प्रतिस्पर्धी एकमेकांशी काहीही न बोलता बसून राहिले. पावेल पित्रोविच्नी बझारव्कडे पाहाण्याचे टाळले; कुठल्याही परिस्थितीत त्याच्याशी दिलजमाई करण्याची त्यांची इच्छा नव्हती. स्वतःच्याच मग्रुरीची आणि नामुष्कीची त्यांना लाज वाटत होती; या सगळ्या प्रकरणाचा यापेक्षा अधिक अनुकूल शेवट झाला नसता हे जरी खरे असले तरी, ही सर्व परिस्थितीच आपल्यामुळे निर्माण झाली याचीही त्यांना शरम वाटत होती. “कुठल्याही परिस्थितीत बेअब्रू होणार नाही.” त्यांनी स्वतःचीच समजूत घातली, “हे काही कमी समाधानकारक नाही.” ती निःशब्दता—दुःखकारक अवघडलेली शांतता दीर्घकाळ टिकली. दोघेही अस्वस्थ होते. दोघेही दुसऱ्याला आपले इंगित समजले आहे या जाणिवेत होते. हा विचार मित्रामित्रांत सुखप्रद असतो; पण मित्र नसलेल्या दोन व्यक्तींना मात्र अतिशय क्लेशकारक असतो; विशेषतः जेव्हा गैरसमजाचे निराकरणही होत नाही अगर विभक्तही होता येत नाही.

“तुमचा पाय थोडा आवळ बांधला आहे का?” बझारव्ने शेवटी विचारले.

“नाही, अजिबात नाही; उत्तम आहे.” पावेल पित्रोविच्नी उत्तर दिले; आणि थोडा वेळ थांबून ते पुढे म्हणाले, “आमच्या भाईसाहेबांना फसविणे जमणार नाही; आपण राजकारणावर भांडलो असे आपल्याला सांगावे लागेल.”

“हरकत नाही,” बझारव्ने मान्यता दिली. “मी सगळ्या इंग्रजाळलेल्यांचा अपमान केला असे खुशाल सांगा.”

“हे मात्र अगदी ठीक होईल. त्या माणसाचा आपल्याबद्दल काय समज झाला असेल आता?” पावेल पित्रोविच्नी त्या मघाच्या कुळवाड्याकडे बोट दाखवून विचारले; द्वंद्व सुरू होण्यापूर्वी तो त्या दोन घोड्यांना पुढे हाकत बझारव्च्या बाजूने गेला होता; तो आता त्याच मार्गाने परतत होता; आणि यावेळी त्याने त्या “बड्या मंडळींना” पाहून आपली टोपी काढून अभिवादन केले.

“कुणास ठाऊक,” बझारव्ने उत्तर दिले. “बहुतेक त्याला काहीच वाटत नसेल. रशियन शेतकरी—मिसेस् रॅडक्लिफ् म्हणत असे त्याप्रमाणे एक अज्ञात गूढ आहे! त्याला स्वतःलाच ते समजत नाही !”

“अस्स! असे तुम्हाला वाटते ?” पावेल पित्रोविच् म्हणाले; आणि एकदम मोठ्याने ते म्हणाले, “तुमच्या त्या मूर्ख प्योत्रने काय केले पाहा! आमचे भाईसाहेब इकडेच दौडत येत आहेत!”

बझारव्ने वळून पाहिले, तो त्याला निकालाय् पित्रोविच्चा निस्तेज चेहेरा दिसला; ते गाडीत बसून येत होते. गाडी थांबायच्या आधीच त्यांनी बाहेर उडी टाकली आणि आपल्या बंधूकडे वेगाने धावले.

“काय झाले हे?” त्यांनी काळजीच्या स्वरात विचारले. “एव्गेनी वासिलिइच्, कृपा करून सांगा, हे कसे घडले?”

“काही नाही,” पावेल पित्रोविच् म्हणाले, “तुम्हाला उगीचच भीती वाटते आहे. मिस्टर बझारव् बरोबर थोडा वाद झाला; आणि मला त्याची किंमत द्यावी लागली.”

“पण हे सगळे कशावरून सुरू झाले? हाय रे देवा !”

“कसे सांगू तुम्हाला? सर रॅाबर्ट पीलबद्दल मिस्टर बझारव् अनादराने बोलले. पण यात माझाच दोष आहे हे मला सांगितले पाहिजे; मिस्टर बझारव् सन्मानाने वागले. मी त्यांना आव्हान दिले.”

“पण तुम्ही रक्ताने न्हालेले दिसता, अरे देवा!”

“मग, माझ्या धमन्यात काय पाणी वाहते असे तुम्हाला वाटले? पण हे रक्तस्त्रवण माझ्या पथ्यावरच पडले आहे. नाही का डॅाक्टर? गाडीत बसायला मला जरा हात द्या, आणि उगाच उदासवाण्या भावनेला थारा देऊ नका. मी उद्या ठीक होईन. छान; उत्तम. कोचमन, चल.”

निकालाय् पित्रोविच् गाडीमागून चालू लागले; बझारव् होता तिथेच बसून राहिला......

“तुम्हाला माझी विनंती आहे—माझ्या बंधूंना तुम्ही औषधपाणी करायला पाहिजे,” निकालाय् पित्रोविच् त्याला म्हणाले. “निदान शहरातून दुसरे डॅाक्टर येईपर्यंत.”

काही न बोलता बझारव्ने मान हलवली. तासभरातच पावेल पित्रोविच्च्या पायाला कौशल्यपूर्ण मलमपट्टी केली गेली; आणि ते आपल्या बिछान्यात पडून राहिले. सबंध घराने धसका घेतला होता; फिनिच्का चक्कर येऊन पडली. निकालाय् पित्रोविच् नकळत हात चोळत बसले होते; तर पावेल पित्रोविच् हसत होते, विनोद करत होते; विशेषतः बझारव्शी, त्यांनी अंगात तागाचा, तलम, रात्री वापरायचा अंगरखा पेहेरलेला होता; पातळशी दुलई पांघरलेली होती; डोक्यावर फेज घातली होती; आणि खिडकीचे पडदे खाली ओढायला प्रतिबंध केला होता; आणि खाण्याचे पथ्य पाळावे लागते म्हणून गंमतीने तक्रार केली.

रात्र होईल तशी मात्र त्यांचा ताप चढत गेला; डोके दुखू लागले. शहराकडून डॅाक्टर आले. (निकालाय् पित्रोविच्नी याबाबतीत आपल्या बंधूंचे ऐकले नाही; आणि खरे तर बझारव्लासुद्धा त्यांनी ऐकावे असे वाटले नाही; दिवसभर तो आपल्या खोलीत बसूनच होता; पिवळट, खुनशी असा तो दिसत होता; आणि आजाऱ्याच्या खोलीत तो कमीत कमी वेळ गेला. दोनदा फिनिच्काशी त्याची गाठ पडली; पण ती मात्र भयग्रस्त होऊन चपापून दूर पळाली.) नव्या डॅाक्टरने शीताहार घेण्यास सांगितले; भीतीचे कारण नाही या बझारव्च्या निदानाशी मात्र त्यांनी मतैक्य दाखविले. निकालाय् पित्रोविच्नी त्यांना आपले बंधू

अनुक्रमणिका

अपघातात जखमी झाले असे सांगितले; त्याला डॉक्टरनी फक्त "हं!" म्हणून प्रतिसाद दिला. पण पंचवीस रूबल्स हातात पडल्यावर तो इतकेच म्हणाला, "अस्स म्हणता? असं होतं कधी कधी; चालायचंच."

घरातले कुणीही झोपी गेले नाही की, कुणी कपडे बदलले नाहीत. निकालाय् पित्रोविच् आपल्या बंधूंच्या खोलीत चोरपावलांनी वरचेवर जात; आणि तसेच पुन्हा मागे फिरत; पावेल पित्रोविच् अर्धवट झोपेत पडून होते; कण्हत होते; त्यानी फ्रेंचमध्ये आपल्या बंधूंना "तुम्ही झोपायला जा" असे म्हटले आणि पिण्यास पाणी मागितले. निकालाय् पित्रोविच्नी लिंबू पाण्याचा प्याला घेऊन फिनिच्‌काला दोनदा पाठविले; पावेल पित्रोविच्नी तिच्याकडे एकटक नजर लावून शेवटच्या थेंबापर्यंत प्याला पिऊन टाकला. सकाळपर्यंत ताप बराच चढला होता; थोडा भ्रम झाल्याची चिन्हे दिसत होती. प्रथम पावेल पित्रोविच् असंबद्ध शब्द बडबडू लागले; नंतर एकाएकी त्यांनी डोळे विस्फारले, आणि चिंताग्रस्त चेहेऱ्याने त्यांच्यावर ओणवे होऊन पाहात असलेल्या आपल्या बंधूंना उद्देशून विचारले, "निकालाय्, फिनिच्‌का व नेल्ली या दोघीत काहीतरी साम्य आहे असे नाही वाटत?"

"पावेल, नेल्ली कोण?"

"माहीत नाही? प्रिन्सेस आर्......विशेषतः चेहेऱ्याचा वरचा भाग. त्या विशिष्ट प्रकारात मोडणारी."

निकालाय् पित्रोविच्नी उत्तर दिले नाही; मनातून मात्र त्यांना माणसाच्या मनावर जुन्या विकारांचा पगडा किती विलक्षण असतो, याचे आश्चर्य वाटले. "आणि मग ते विकार पृष्ठभागावर आले की, त्यांचा असा उद्रेक होतो," त्यांच्या मनात विचार आला.

"त्या चंचल स्त्रीवर किती प्रेम करतो मी!" पावेल पित्रोविच् विव्हळले; बोलताना त्यांनी विषादाने आपल्या हातांची मानेखाली घडी घातली "एखाद्या सोम्यागोम्याने तिला स्पर्श केलेला मला कधीही सहन......" काही मिनिटांनी ते अस्फुटपणे बोलले.

निकालाय् पित्रोविच् नुसते उसासे टाकत राहिले; हे शब्द कुणाच्या संदर्भात बोलले होते याचा त्यांना संदेहसुद्धा आला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता बझारव् त्यांच्यासमोर उभा ठाकला. त्यापूर्वीच त्याने आपले सामानसुमान आवरलेले होते; आणि बेडकं, कीटक, पक्षी यांना सोडून दिले होते.

"माझा निरोप घ्यायला आलात का?" निकालाय् पित्रोविच्नी उठून उभे राहात विचारले.

"होय."

"तुम्हाला काय वाटते ते मी समजू शकतो, आणि मला ते पटतेही. अर्थात्, माझ्या बंधूंचीच चूक आहे; आणि त्याची शिक्षा त्यांना मिळाली आहे. त्यांनी तुम्हाला पर्याय ठेवला नाही, असे त्यांनीच मला सांगितले. हे द्वंद्व तुम्हाला टाळता येणारे नव्हते यावर माझा विश्वास आहे......तुम्हा दोघांच्या विचारांतील तीव्र मतभेद विचारात घेतले म्हणजे हे स्पष्ट होते." (निकालाय पित्रोविच् आपल्या शब्द-जंजाळत

अनुक्रमणिका

अडकल्यासारखे दिसत होते.) “माझे बंधू जुन्या पठडीतले, आतताई आणि आडमुठे......याचा शेवट एवढ्यावर झाला ही परमेश्वराचीच कृपा. या गोष्टीची बाहेर वाच्यता होणार नाही याची मी खबरदारी घेतली आहे.”

“मी माझा पत्ता तुमच्याकडे ठेवून जातो; एखादेवेळी काही खुसपट निघालेच तर,” बझारव् सहजपणे म्हणून गेला.

“एव्गेनी वासिलिइच्, काही खुसपट उपस्थित होणार नाही अशी आशा आहे......माझ्या घरात राहिल्यानंतर अखेर असे होऊन तुम्हाला जावे लागते याचेच मला दुःख आहे......अर्कादीच्या......दृष्टिकोनातून विचार करता तर मला ते अधिक क्लेशकारक वाटते.”

“त्याची भेट होईल अशी अपेक्षा आहे,” बझारव्ने उत्तर दिले. “स्पष्टीकरणे” आणि “हरकती” यांमुळे तो अस्वस्थ होई; “पण मी जर भेटू शकलो नाही, तर कृपा करून माझ्यातर्फे माझा नमस्कार त्याला कळवा व माझ्या वतीने खेद व्यक्त करा.”

“मी तुमची......” निकालाय् पित्रोविच्नी उत्तर दिले. पण त्यांचे वाक्य पुरे व्हायच्या आधीच बझारव् पसार झाला.

पावेल पित्रोविच्नी बझारव्चे प्रयाण होणार असल्याचे ऐकल्यावर त्याला भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली; आणि त्याच्याशी हस्तांदोलन केले. पण तरीसुद्धा ते बर्फासारखे थंड राहिले; आपल्या बाबतीत पावेल पित्रोविच्ना दिलदारपणे वागून आपल्याला लाजवायचे आहे हे त्याने ताडले. फिनिच्काचा निरोप घ्यायला त्याला संधी मिळाली नाही; खिडकीजवळ ती उभी असता फक्त दृष्टीभेट झाली. त्याला तिच्या चेहेऱ्यावर उदासीनता आढळली. “तिच्या वाट्याला दुःखच येईल कदाचित,” तो स्वतःशीच म्हणाला......“पण कुणास ठाऊक! ती पार पडेल कशी तरी त्यातूनही, असे म्हणायला काय प्रत्यवाय आहे!” प्योत्रला तर न आवरून, त्याने त्याच्या खांद्यावर मान टाकून रडायला सुरवात केली; शेवटी त्याच्या डोळ्यांत अखंड पाणी पुरवठा तर नाही ना, अशी विचारणा करून त्याने त्याला थंड केले; दुन्याशाला आपल्या भावना आवरण्यासाठी वनराईतच जाऊन लपावे लागले. या आकांताला कारणीभूत झालेला बझारव् मग एका छोट्या गाडीत बसला; त्याने सिगार शिलगावली; मग तीन एक मैल गेल्यावर जिथे किर्सानव्चे शेत संपते, जिथून ती शेती आणि घरे एका रांगेत दिसतात, तिथे पोचल्यावर मात्र तो फक्त बाजूला तिटकाऱ्याने थुंकला आणि पुटपुटला, “बदमाष लेकाचे!” आणि त्याने स्वतःलाच आपल्या कोटात गुरफटून घेतले.

पावेल पित्रोविच्ची तब्येत लौकरच सुधारली; पण एक आठवडाभर तरी त्यांना बिछान्यावर पडूनच राहावे लागले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ‘तुरुंगवास’ त्यांनी मोठ्या सोशिकपणे सहन केला; आपल्या सौंदर्यप्रसाधनावर मात्र ते बरेच श्रम घेत आणि प्रत्येक वस्तू ऊ–द्–कोलोनने सुगंधित केलेली असे. निकालाय् पित्रोविच् त्यांना नियतकालिके वाचून दाखवत; नेहमीप्रमाणे फिनिच्का त्यांची सेवाशुश्रूषा करत होती; त्यांच्यासाठी लिंबूपाणी, सूप, उकडलेली अंडी, चहा घेऊन येत असे; पण ज्या ज्या वेळी ती त्यांच्या खोलीत प्रवेश करत असे त्या त्या वेळी सुप्त भीतीने तिचे मन दडपून जाई. पावेल पित्रोविच्च्या अनपेक्षित अशा वर्तणुकीने प्रत्येकालाच, विशेषतः फिनिच्काला आश्चर्याचा धक्का दिलेला होता; प्रकोफिच् ही एकच व्यक्ती मात्र त्यामुळे अस्वस्थ झालेली नव्हती. आपल्या काळात खानदानी माणसं कसे द्वंद्व खेळत—पण

खऱ्या खानदानी प्रतिस्पर्ध्यांशीच—यावर तो व्याख्यानबाजी करत असे; सामान्य कुत्र्यांना ते त्यांच्या धाष्टर्याबद्दल झोडपून काढण्याचा हुकूम देत.

फिनिच्काची सद्सद्विवेकबुद्धी तिला दोष देत नव्हती; पण द्वंद्वाच्या खऱ्या कारणांच्या विचाराने तिला मानसिक क्लेश भोगावे लागत होते; शिवाय पावेल पित्रोविच् तिच्याकडे अशा विचित्र नजरेने पाहात......की, तिची पाठ फिरली तरीसुद्धा त्यांची नजर तिला जाणवत असे. आंतरिक अस्वस्थतेने ती कृश होत चालली; आणि नेहमी घडते त्याप्रमाणे ती अधिकच आकर्षक दिसू लागली.

एके दिवशी—हा प्रसंग सकाळीच घडला—पावेल पित्रोविच्ना आता बरे वाटू लागल्याने, ते बिछान्यावरून उठून सोफ्यापर्यंत चालत गेले; त्याचवेळी त्यांच्या प्रकृतीत आता सुधारणा झाली आहे असे पाहून निकालाय् पित्रोविच् मळणी विभागाकडे गेले होते. चहाचा कप घेऊन फिनिच्का आत आली; एका लहान टेबलावर तिने कप ठेवला आणि ती परत जाऊ लागली. पावेल पित्रोविच्नी तिला थांबविले.

“फिदोस्या निकालाएव्ना, एवढ्या धांदलीने कुठे निघाली आहेस?” त्यानी सुरवात केली; “कामात आहेस का”

“नाही......चहा......सगळ्यांना द्यायचा आहे.”

“तुझ्या ऐवजी दुन्याशा करील ते काम; या बिचाऱ्या आजाऱ्याजवळ थोडा वेळ बैस ना खरे पाहाता, मला तुझ्याशी थोडे बोलायचे आहे.”

काहीही न बोलता फिनिच्का आराम खुर्चीच्या टोकावर बसून राहिली.

“ऐकून घे,” आपल्या मिशा कुरवाळत पावेल पित्रोविच् म्हणाले, “बरेच दिवस मला तुला विचारायचे होते; का कुणास ठाऊक पण माझी तुला भीती वाटते असे दिसते.”

“मला?”

“होय, तुला. तू माझ्या नजरेला नजर देत नाहीस; जणू तुझ्या सद्सद्विवेक बुद्धीला कसलीतरी बोचणी लागली आहे.”

फिनिच्का लालीलालच झाली, पण तिने पावेल पित्रोविच्कडे सरळ पाहिले. तो एक अनोळखी पुरुष असल्यासारखी तिच्या मनावर छाप पडली; आणि तिचे हृदय सौम्यपणे धडधडू लागले.

“तुझी सद्सद्विवेकबुद्धी स्वच्छ आहे का?” त्यानी तिला विचारले.

“का नसावी?” तिने अडखळत विचारले.

“परमेश्वराला ठाऊक! शिवाय तू कुणाला दुखवले असणे कसे शक्य आहे? मला? ते शक्य दिसत नाही. घरातल्या इथल्या कुणाला? तेही विश्वास बसायला कठीण आहे. आमच्या भाईसाहेबांना असेल? पण त्यांच्यावर तर तुझे प्रेम आहे, आहे ना?”

“माझे त्यांच्यावर प्रेम आहे.”

“पूर्ण आत्मीयतेने, अंतःकरणपूर्वक प्रेम करतेस?”

“निकालाय् पित्रोविच्वर माझे अंतःकरणपूर्वक प्रेम आहे.”

“खरे? फिनिच्का, माझ्याकडे पाहा.” (ते तिला प्रथमच या नावाने हाक मारत होते.) “खोटे बोलणे हे महत्पाप आहे, हे तू जाणतेस ना?”

“पावेल पित्रोविच्, मी खोटे सांगत नाही. निकालाय् पित्रोविच्वर प्रेम नसेल......तर जगण्यात मला काहीच स्वारस्य वाटणार नाही.”

“आणि दुसऱ्या कुणासाठी तू त्यांचा कदापि त्याग करणार नाहीस?”
“कुणासाठी मी त्यांचा त्याग करावा?”

“खरेच, कुणासाठी बरे! इथून नुकत्याच प्रयाण केलेल्या त्या गृहस्थाबद्दल तुझे काय म्हणणे आहे?”

फिनिच्का ताडकन उभी राहिली. “हायरे देवा! पावेल पित्रोविच्, मला तुम्ही असे का छळता आहात? मी तुमचे काय केले आहे ? अशा गोष्टी बोलवतात तरी कशा?”

“फिनिच्का,” पावेल पित्रोविच् म्हणाले; त्यांचा आवाज विषादपूर्ण होता, “तुला ठाऊक आहे की, मी पाहिले आहे......”

“काय पाहिले तुम्ही?”

“अस्स......त्या लताकुंजात.”

फिनिच्का अंगभर लालीलाल झाली. “त्यात माझा काय दोष होता?” तिच्या तोंडून प्रयत्नपूर्वक शब्द फुटले.

पावेल पित्रोविच् उठले. “तुझा दोष नव्हता? खरेच नव्हता? अजिबात नव्हता?”

“मी निकालाय पित्रोविच्वर प्रेम करते; जगातील इतर कुणावरही नाही; आणि सतत त्यांच्यावर प्रेम करीन!” फिनिच्का मोठ्याने म्हणाली; हुंदक्यांनी जणू तिचा घसा फुटत होता. “आणि तुम्ही जे

पाहिलंत त्यासंबंधी बोलायचे तर, कयामत होईल त्या दिवशी मी दोषी नाही, आणि दोषी नव्हतेच, असे म्हणेन; आणि माझ्या उपकारकर्त्या निकालाय पित्रोविच्संबंधी मी असे काही कृत्य केले आहे असा लोक संशय घेणार असतील तर, मी मरण पत्करीन.”

पण यावेळी तिला हुंदका आवरला नाही; त्याचवेळी पावेल पित्रोविच् तिचा हात आपल्या हातात घेऊन दाबत होते...... तिने त्यांच्याकडे पाहिले, आणि ती पूर्ण थिजून गेली. त्यांचा चेहेरा पूर्वीपेक्षाही निस्तेज पडला होता; त्यांचे डोळे चमकत होते आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे एक मोठा अश्रुबिंदू त्यांच्या गालावर ओघळत होता.

“फिनिच्का!” एका वेगळ्याच स्वरात ते कुजबुजत होते; “त्यांच्यावर प्रेम कर; माझ्या भावावर प्रेम कर! इतर कुणासाठी त्यांचा त्याग करू नको; कुणाचे काहीही ऐकू नको! कुणावर प्रेम करावे आणि त्याचा प्रतिसाद मात्र मिळू नये, ही गोष्ट किती भयंकर आहे, याची कल्पना कर! बिचाऱ्या निकालायला कधी अंतर देऊ नको!”

फिनिच्काचे डोळे कोरडे झाले होते; ती इतकी स्तिमित झाली होती की, तिच्या मनातील धास्ती पार निघून गेली. पण स्वतः पावेल पित्रोविच्नी तिचा हात आपल्या ओठावर टेकला. त्याचे चुंबन न घेताही ते जणू त्याचा भेद करत होते, आणि क्षणाक्षणाला क्षोभकारक उसासे टाकत होते; त्यावेळी तिच्या भावना काय असाव्यात......

“अरे देवा!” तिला वाटले, “त्यांना झटका तर येत नसेल?”

त्याक्षणी असफल गतायुष्याच्या विचाराने त्यांच्या मनात कल्लोळ माजला होता.

जिन्यावर कुणाची तरी झपझप पावले वाजली......त्यांनी तिचा हात सोडून दिला आणि उशीवर डोके टेकले. दरवाजा उघडला गेला आणि निकालाय पित्रोविच्नी प्रवेश केला—आनंदी, उत्साही आणि तजेलदार. आपल्या पित्याप्रमाणेच उत्साही आणि टवटवीत मित्या त्यांच्या खांद्यावर बागडत होता; त्याच्या अंगात अंगरख्याखेरीज काही नव्हते; पायाच्या चिमुकल्या बोटांनी तो त्यांच्या ओबडधोबड कोटाची मोठी बटने पकडण्याचा प्रयत्न करत होता.

फिनिच्काने त्यांच्यावर झेप घेतली; त्यांना व आपल्या बाळाला तिने आपल्या बाहुपाशात कवटाळले आणि त्यांच्या खांद्यावर आपले मस्तक विसावले. निकालाय पित्रोविच् विस्मित झाले; संकोची आणि धीम्या स्वभावाची फिनिच्का—तिसऱ्या व्यक्तीच्या समोर तिने त्यांना कधीच आलिंगन दिले नव्हते.

“काय झाले?” त्यांनी आपल्या बंधूंकडे नजर टाकत विचारले; व मित्याला तिच्या स्वाधीन केले. “तुमची तब्येत बिघडली तर नाही ना?” पावेल पित्रोविच्जवळ जात त्यांनी विचारले.

त्यांनी आपला चेहेरा तलम रुमालात लपविला. “नाही......तसे काही नाही......उलट मला खूपच बरे वाटत आहे...... ”

अनुक्रमणिका

"सोफ्यावर बसण्यासाठी चालत जाण्याची तुम्ही घाई केली. तू कुठे निघालीस?" फिनिच्काकडे वळत निकालाय पित्रोविच्नी विचारले; पण तिने आधीच आपल्या मागे दरवाजा लोटून घेतला होता. "मी माझ्या छोट्या जवानाला तुमच्याकडे घेऊन येत होतो; आपल्या काकांसाठी त्याने सारखा लकडा लावला आहे. काय म्हणून तिने त्याला पळवून नेले? पण तुमचे काही बिनसले आहे का? तुम्हा दोघांत काही घडले का?"

"भाईसाहेब!" पावेल पित्रोविच् गंभीरपणे म्हणाले.

निकालाय् पित्रोविच् चमकले. त्यांचा धीर खचला; त्याचे कारण त्यांनाही समजले नाही.

"भाईसाहेब," पावेल पित्रोविच् पुन्हा म्हणाले, "माझ्या विनंतीप्रमाणे वागण्याचे मला आश्वासन द्या."

"कसली विनंती? सांगा."

"फार महत्त्वाची गोष्ट आहे; माझ्या समजुतीप्रमाणे तुमच्या जीवनाचे सुख त्यावर अवलंबून आहे. मी तुम्हाला आता जे सांगणार आहे त्यावर मी सारखा विचार करतो आहे......भाई, तुमचे कर्तव्य पार पाडा; एका प्रामाणिक व उदार माणसाचे कर्तव्य. तुमच्यावर जो अपवाद येतो आहे, आणि तुमच्यासारखी श्रेष्ठ व्यक्ती जो पायंडा पाडत आहे, त्याचा शेवट करा! "

"पावेल, तुम्हाला काय म्हणायचे आहे?"

"फिनिच्काशी विवाह करा......तिचे तुमच्यावर प्रेम आहे; तुमच्या पुत्राची ती माता आहे."

निकालाय् पित्रोविच् एक पाऊल मागे सरले आणि त्यांनी हवेत हात उडविले. "पावेल, हे तुम्ही सांगता? अशा विवाहाला तुमचा कट्टर विरोध आहे हे मला माहीत असताना! तुम्हीच हे म्हणता? माझे कर्तव्य असे तुम्ही ज्याला उचितपणे म्हणता, ते मी केवळ तुमच्याविषयी वाटणाऱ्या आदरामुळेच पार पाडू शकलो नाही, हे तुम्ही जाणता ना?"

"तसे असेल तर माझ्याविषयी आदर बाळगणे ही तुमची चूक झाली," म्लान स्मित करत पावेल पित्रोविच्नी उत्तर दिले. "बझारव् माझ्यावर शिष्टपणाचा आरोप करायचा, ते मला आता पटते आहे. नाही, भाईसाहेब, बाह्यात्कारी दिखाऊपणा व इतरांची मते यांची आपण यापुढे फिकीर करण्याचे कारण नाही; आपण आता वृद्ध झालो आहोत, आपले गर्वहरण झाले आहे; सर्व प्रकारचा दांभिकपणा सोडून द्यायची वेळ आलेली आहे. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे आपण आपले कर्तव्य पार पाडू ; आणि या व्यवहारात आपण सुखीच होऊ याची खात्री बाळगा."

निकालाय पित्रोविच्नी आपल्या बंधूंना आलिंगन देण्यासाठी झेप घेतली.

अनुक्रमणिका

"तुम्ही माझे डोळे उघडलेत!" ते मोठ्याने म्हणाले, "तुम्ही सर्वांत प्रेमळ अंतःकरणाचे आणि सर्वांत सुज्ञ आहात याची मला नेहमीच खात्री होती; आणि तुम्ही जितके उदात्त अंतःकरणाचे तितकेच विचारी आहात, याचा मला प्रत्यय येतो आहे."

"आस्ते, आस्ते!" पावेल पित्रोविच्नी त्यांना थांबविले; "या तुमच्या समजूतदार बंधूच्या पायाला धक्का देऊ नका; हा तुमचा भाऊ वयाच्या पन्नासाव्या वर्षी एक क्षुद्र रंगरुटाप्रमाणे द्वंद्व खेळतो आहे. तेव्हा हे ठरले तर, फिनिच्का माझी......भावजय होणार."

"प्रिय पावेल! पण अर्कादी काय म्हणेल?"

"अर्कादी? तो हर्षोत्फुल्ल होईल; त्याबद्दल निर्धास्त असा! त्याच्या तत्त्वज्ञानात विवाहाला स्थान नाही; पण त्याच्यातील समान तत्त्वाची भावना मात्र शमेल. नाही तर या एकोणिसाव्या शतकात वर्गविग्रहांना काय अर्थ आहे?"

"पावेल, पावेल, मला पुन्हा एकदा तुमचे चुंबन घेऊ दे! घाबरू नका; मी काळजी घेईन."

त्या बंधुद्वयांनी एकमेकाला आलिंगन दिले.

"तुमचा हा बेत आता तिला कळवावा, असे नाही तुम्हाला वाटत?" पावेल पित्रोविच्नी विचारणा केली.

"लगेच कशाला?" निकालाय् पित्रोविच्नी प्रत्युत्तर दिले. "त्याबद्दल तुम्हा दोघांत काही बोलणे झाले आहे काय ?"

"बोलणे? आम्हा दोघांत? काय पण कल्पना!"

"छान, मग हरकत नाही. प्रथम तुम्ही पूर्ण बरे व्हा; दरम्यान आपल्याला खूप वेळ आहे. आपण त्यावर सांगोपांग विचार केला पाहिजे, आणि मग निर्णय......"

"पण तुमच्या मनाचा निर्णय झाला आहे ना?"

"अर्थातच माझा निश्चय झाला आहे; आणि त्याबद्दल मी तुमचा अंतःकरणपूर्वक ऋणी आहे. मी आता चलतो; तुम्ही विश्रांती घेणे अगत्याचे आहे; तुमच्या या स्थितीत मन प्रक्षुब्ध होऊ देणे अपायकारक आहे......पण आपण त्यावर बोलू पुन्हा. तुम्ही आता शांतपणे झोपा; परमेश्वराचा तुमच्यावर वरदहस्त राहो!"

"माझे असे आभार का मानतो आहे हा?" मागे एकटे राहिल्यावर पावेल पित्रोविच्च्या मनात विचार आला. "जणू ते त्याच्यावर अवलंबून नाही! त्यांचा विवाह झाल्याबरोबर मी इथून निघून जाईन दूर कुठेतरी......ड्रेस्डेन किंवा फ्लॉरेन्सला, आणि तिथे राहीन......"

अनुक्रमणिका

पावेल पित्रोविच्नी आपल्या कपाळावर ऊ-द्-कोलोन शिंपडले; आणि डोळे मिटून स्वस्थ पडून राहिले. भगभगीत सूर्यप्रकाश त्यांच्या सुरेख, कृश मस्तकावर प्रकाशत होता; पांढऱ्या शुभ्र उशीवर एखाद्या मृत माणसाच्या शिराप्रमाणे त्यांचे डोके विसावले होते......आणि खरेच ते मृतवत् झाले होते.

अनुक्रमणिका

२५

निकल्स्को येथे कत्या आणि अर्कादी बागेत एका उंच ॲश् वृक्षाच्या छायेत गवताळ बैठकीवर बसलेली होती; फिफी त्यांच्याजवळ जमिनीवर पडला होता; त्याने आपल्या निमूळत्या शरीराला सुरेख बांक दिला होता—श्वानप्रेमी लोकांत त्याला "सशाचा बांक" असे म्हटले जाते. अर्कादी आणि कत्या दोघेही शांत होते; त्याच्या हातात एक अर्धवट उघडलेले पुस्तक होते, तर ती आपल्या बटव्यात उरलेले पावाचे तुकडे वेचून एका चिमण्याच्या कुटुंबाकडे फेकत होती; ते पक्षी आपल्या विशिष्ट भयमिश्रित धाष्टर्याने तिच्या पायाजवळ उड्या मारत होते, किलबिलाट करत होते. वाऱ्याच्या सौम्य झुळुकीने ॲश्‌ची पाने हलत होती आणि त्यामुळे फिकट सुवर्ण रंगाचे उन्हाचे तुकडे फिफीच्या पिंगट पाठीवर खालीवर होत होते; सावलीच्या एका गडद पट्ट्यात अर्कादी व कत्या बसलेली होती; मधूनच एखादी उन्हाची झळझळीत रेषा तिच्या केसावर चमकून जात होती. ती दोघेही निःशब्द बसलेली होती; पण ती ज्याप्रकारे निःशब्द होती, ज्याप्रकारे एकमेकासमीप बसलेली होती, त्यावरून दोघांमधील निभ्रांत सलगीचा प्रत्यय यत होता; दोघेही आपल्या सहचाऱ्याचा विचारही करत नव्हते, आणि तरीही ती दोघे एकमेकांच्या सहवासाचा सुप्त आनंद अनुभवीत होती. आपण त्यांना मागे पाहिले होते, त्यापेक्षा त्यांचे चेहेरेही बदलेले होते; अर्कादी अधिक शांतचित्त, तर कत्या अधिक तजेलदार व धीट वाटत होती.

"तुला नाही का वाटत," अर्कादीने सुरवात केली, "की ॲश् वृक्षाचे रशियन भाषेतील नाव 'यासेन' अधिक प्रत्ययकारी आहे? या वृक्षाइतका इतर कुठलाही वृक्ष अशा वातावरणात इतका सूक्ष्म व चमकदारपणे पारदर्शक (यास्नो) वाटत नाही."

ते पाहाण्यासाठी कत्याची नजर वर वळली, आणि "होय," म्हणून तिने मान्यता दिली; अर्कादीला मात्र वाटले, "छान, म्हणजे माझ्या या 'गोंडस भाषेचा' तिला तिटकारा वाटत नाही असे दिसते."

"मला नाही हाईन आवडत," अर्कादीच्या हातातील पुस्तकाकडे कटाक्ष टाकत कत्या म्हणाली, "मग तो हसताना असो अगर रडताना असो; तो जेव्हा विमनस्क व उदास असेल तेव्हा मात्र मला तो आवडतो."

"आणि मला मात्र तो हसतो तेव्हाच आवडतो," अर्कादीने शेरा मारला.

"तुमच्या पूर्वीच्या उपरोधिक दृष्टिकोनाचे ते अवशेष आहेत."("अवशेष," अर्कादीच्या मनात विचार आला—"बझारव्‌ने हे ऐकले तर?") "थोडे थांबा, आम्ही तुमचा कायापालट करू."

"कोण करणार कायापालट माझा? तू?"

"कोण?—माझी बहीण; पोर्फिरी प्लतोनोविच्; त्यांच्याशी तुम्ही वाद घालायचे सोडून दिले आहे; आणि काकी—तिला परवा चर्चला नेले होते."

"होय, मला नकार देता आला नाही! आणि अना सर्गेव्‌नाच्या बाबतीत बोलायचे तर तुला ठाऊक आहेच की, एव्‌गेनी आणि ती या दोघांत बऱ्याच बाबतीत मतैक्य झाले होते."

अनुक्रमणिका

“होय, त्यावेळी माझ्या बहिणीवर तुमच्यावरही होता तसा त्यांचा प्रभाव होता.”

“माझ्यावरही होता? आणि आता विचारू का? त्याचा प्रभाव मी झिडकारून दिला आहे, असे तुला वाटते?”

कत्याने उत्तर दिले नाही.

“मला ठाऊक आहे,” अर्कादी पुढे म्हणाला, “तुला तो कधीच आवडला नाही.”

“मला त्यांच्यासंबंधी काहीच म्हणायचे नाही.”

“कतेरिना सर्गेव्ना, हे उत्तर मी जेव्हा जेव्हा ऐकतो, जेव्हा त्यावर माझा विश्वास बसत नाही......कुणीच असणार नाही की, ज्याच्याविषयी आपल्याला काहीच मत असणार नाही! असे बोलणे ही शुद्ध पळवाट आहे.”

“मग मला असे म्हणावेसे वाटते की,......मला नाही......मला ते आवडत नाहीत असेच काही नाही म्हणता येणार; पण मला इतकेच म्हणायचे आहे की, ते माझ्यापेक्षा निराळ्या प्रकारचे, आणि मी त्यांच्याहून निराळ्या प्रकारची......आणि तुम्हीम्ही त्यांच्याहून भिन्न आहात.”

“ते कसे काय?”

“तुम्हाला कसे सांगू? ......ते काहीसे रानटी पशूसारखे, तर तुम्ही आणि मी पाळीव प्राण्यासारखे आहोत.”

“मी सुद्धा पाळीव?”

कत्याने मान डोलवली.

अर्कादीने आपला कान खाजविला. “कतेरिना सर्गेव्ना, खरे म्हणजे हा माझा अपमान आहे असे तुला नाही वाटत?”

“का, तुम्हाला रानटी म्हटलेले आवडेल......”

“रानटी नाही; पण बलवान, शक्तिशाली.”

“नुसती तशी आकांक्षा असून उपयोगी नाही......तुमचा मित्र; तो नुसती इच्छा करून राहात नाही, तर त्याच्याजवळ शक्ती आहे.”

“हं! तर अना सर्गेव्नावर त्याचा प्रभाव पडला होता, असे तुला वाटते तर?”

अनुक्रमणिका

“होय. पण तिच्यावर फार काळ प्रभाव गाजविणे कुणालाही शक्य नाही,” हळू आवाजात कत्या म्हणाली.

“कशावरून म्हणतेस?”

“ती फार स्वाभिमानी आहे......म्हणजे तसे नाही म्हणायचे मला......आपले स्वातंत्र्य तिला बहुमोलाचे वाटते.”

“कुणाला वाटत नाही?” अर्कादीने विचारले; आणि एक विचार त्याच्या डोक्यात चमकून गेला, “काय उपयोग त्याचा?” “त्याचा काय उपयोग?” आश्चर्य म्हणजे कत्याच्याही मनात तोच विचार आला. जेव्हा तरुण मने एकमेकाशी जिव्हाळ्याच्या नात्याने एकत्र येतात, अशा वेळी ते सतत समान विचारांच्या पातळीवर येतात.

अर्कादीने स्मित केले; आणि किंचित तिच्याजवळ सरकत तो कुजबुजला, “तुला तिची काहीशी भीती वाटते हे खरे ना?”

“कुणाची?”

“तिची.” सूचकपणे अर्कादीने पुनरुच्चार केला.

“आणि तुमच्या बाबतीत काय?” हे विचारण्याची आता तिची पाळी होती.

“मला सुद्धा; लक्षात आले का, मला ‘सुद्धा’ असे मी म्हणालो.”

कत्याने त्याच्यावर बोट रोखले. “मला नवल वाटते ते याचे,” ती पुढे म्हणाली; “तुमच्या संबंधी माझ्या बहिणीला आता जितका स्नेहभाव वाटतो, तितका तो पूर्वी कधीच वाटला नव्हता; तुम्ही इथे प्रथम आला होता त्यावेळेपेक्षाही अधिक.”

“खरेच!”

“म्हणजे, तुमच्या ध्यानात नाही आले? तुम्हाला त्याचा आनंद नाही झाला?”

अर्कादी विचारात पडला.

“माझ्याबद्दल अना सर्गेव्नाचे अनुकूल मत कसे काय झाले आहे? तुमच्या मातोश्रीची पत्रे मी आणून दिली, हे तर कारण नसेल?”

“ते आणि इतरही कारणे आहेत, पण मी ती सांगणार नाही.”

अनुक्रमणिका

“का?”

“तेही नाही सांगणार.”

“अस्स! मला माहीत आहे; तू फार हट्टी आहेस.”

“होय, आहे.”

“आणि चाणाक्ष.”

कत्याने अर्कादीकडे एक तिरपा कटाक्ष टाकला. “तसेही असेल; तुम्हाला त्याचा उपद्रव वाटतो का? कसला विचार चालू आहे?”

“तू इतकी चाणक्ष कशी होऊ शकलीस याचाच विचार करतो आहे. तू किती लाजरी, संकोची आहेस; प्रत्येकाला चार हात दूर ठेवतेस तू.”

“माझे बरेच आयुष्य एकांतवासात गेले आहे; त्याचा परिणाम म्हणून माणूस अंतर्मुख बनतो. पण खरेच मी प्रत्येकाला दूर ठेवते?”

अर्कादीने कत्याकडे कृतज्ञ नजरेने पाहिले.

“ते सर्व ठीक आहे,” तो पुढे म्हणाला; “पण तुझ्यासारख्या उच्च स्थानातील लोकांमध्ये—म्हणजे तुझ्यासारखी परिस्थिती असलेल्या लोकांमध्ये हा गुण सहसा आढळत नाही. राजेलोकांप्रमाणे त्यांनाही सत्याचे आकलन होणे कठीण पडते.”

“पण मी काही श्रीमंत नाही, हे ध्यानात घ्या.”

अर्कादीला धक्काच बसला, आणि कत्याच्या बोलण्याचा अर्थच ताबडतोब त्याच्या ध्यानात आला नाही. “अरेच्या, अर्थातच ही सर्व संपत्ती तिच्या बहिणीची आहे!” हे त्याला तात्काळ उमगले; या विचाराने तो नाखुष झाला असे नव्हे. “किती चांगल्या प्रकारे तू ते सांगितलेस!” तो म्हणाला.

“काय?”

“त्याबद्दल शरमिंदे न होता अगर बढाई न मारता किती सुरेखपणे, साधेपणाने तू ते सांगितलेस. पण सहज विषय निघाला म्हणून बोलायचे तर, कुणीही ज्यावेळी आपण दरिद्री आहोत असे समजतो, आणि तसे सांगत सुटतो, तेव्हा त्या व्यक्तीला त्यात काही विशेष आहे किंवा एक प्रकारच्या अभिमानाची ती बाब आहे असे वाटत असावे, अशी माझी कल्पना आहे.”

अनुक्रमणिका

“तसे काही माझ्या अनुभवाला आले नाही, याचे श्रेय माझ्या बहिणीला आहे. मी माझ्या स्थितीचा एवढ्यासाठीच उल्लेख केला की, तो विषय सहज बोलण्यात आला होता म्हणून.”

“ठीक; पण मी म्हणतो ती अभिमानाची भावना अंशतः तरी तुझ्या ठिकाणी आहे हे तुला मान्य करावेच लागेल.”

“उदाहरणार्थ?”
“उदाहरणार्थ,—माफ कर मी विचारणार असलेल्या प्रश्नाबद्दल—पण माझ्या कल्पनेप्रमाणे श्रीमंत व्यक्तीशी तू विवाह करणार नसशील, होय ना?”

“माझे त्याच्यावर प्रेम असेल तरच......नाही, तरीही मला वाटते मी त्याच्याशी विवाह करणार नाही.”

“पाहा! मी नव्हतो म्हणालो !” अर्कादी मोठ्याने म्हणाला; आणि थोडे थांबून त्याने पुस्ती जोडली, “अशा व्यक्तीशी तू का बरे विवाहबद्ध होणार नाहीस?”

“कारण काव्यातसुद्धा असमान जोडपी दुर्दैवी ठरली आहेत.”

“तुला कदाचित अधिकार गाजवायचा असेल, किंवा......”

“नाही, मुळीच नाही! कशासाठी? उलट, आज्ञापालन करण्याची माझी तयारी आहे; मला फक्त असमानता दुसह्य वाटते. आपली प्रतिष्ठा राखून आज्ञापालन करणे मी समजू शकते; ते सुखकारक आहे; पण दुय्यम दर्जाचे स्थान......नको, मला त्याचा पुरेसा अनुभव आहे.”

“पुरेसा अनुभव आहे,” कत्याचेच शब्द अर्कादी पुन्हा पुटपुटला “होय,” तो पुढे म्हणाला, “अना सर्गेव्नाची तू बहीण उगीच नाहीस; तिच्यासारखीच तू स्वतंत्र वृत्तीची आहेस; पण तुझा स्वभाव अधिक संकोची आहे तुझी भावना कितीही प्रभावी आणि पवित्र असली तरी अशी भावना व्यक्त करण्याची पाळी तुझ्यावरच प्रथम आलेली आहे असे नाही, असे मी निश्चित म्हणू शकतो......”

“ठीक, मग तुमची काय अपेक्षा आहे?”

“तू तिच्याइतकीच हुशार आहेस; आणि तिच्याइतकेच, अधिक नसेल कदाचित, तुझेही व्यक्तिमत्व आहे.”

“कृपा करून माझी माझ्या बहिणीशी तुलना करू नका,” तत्परतेने कत्याने त्याला मध्येच थांबविले; “ते मला फार हानिकारक ठरेल. माझी बहीण सुंदर व हुशार आहे हे तुम्ही विसरता, आणि......विशेषतः तुम्ही, अर्कादी निकालाएविच्, असे बोलता कामा नये; तेही इतका गंभीर चेहेरा करून.”

"विशेषतः तुम्ही' या तुझ्या शब्दांचा अर्थ काय? आणि मी गंमतीने बोलतो आहे असे तुला का वाटावे?"

"अर्थातच तुम्ही गंमतीने बोलता आहात."

"तुला तसे वाटते? पण मी जे बोललो त्याबद्दल माझी खात्री असेल तर? किंबहुना मी ते विशेष ठामपणे म्हणालो नाही असेच मला वाटत असेल तर?"

"तुम्ही काय म्हणता ते माझ्या ध्यानात येत नाही."

"खरेच? ठीक, आता आले ध्यानात; तू आहेस त्यापेक्षा निश्चित अधिक चाणाक्ष असावीस असे मला वाटले होते."
"ते कसे?"

अर्कादीने उत्तर दिले नाही; तो बाजूला वळला; आणि कत्याने बटव्यातून पावाचे आणखी तुकडे शोधून चिमण्यांपुढे टाकण्यास सुरवात केली; पण यावेळी तिने आपला हात जोराने झटकला, त्यामुळे ते तुकडे टिपायला न थांबता ते पक्षी उडून गेले.

"कतेरिना सर्गेव्ना!" अर्कादीने एकदम बोलायला सुरवात केली; "तुला कदाचित त्याचे महत्त्व वाटणार नाही; पण मला हे सांगितलेच पाहिजे की, मी तुला तुझ्या भगिनीपेक्षाच काय, पण जगातील इतर कुणाहीपेक्षा अधिक मानतो."

तो उठला, आणि वेगाने चालू लागला; जणू आपल्या मुखातून बाहेर पडलेल्या शब्दांची त्याची त्यालाच धास्ती वाटत होती.

कत्याने आपले हात बटव्यासह आपल्या मांडीवर पडू दिले होते; आणि खाली मान करून अर्कादी गेलेल्या दिशेकडे ती पाहात होती. हळूहळू तिच्या गालावर आरक्तता उमटू लागली; तिच्या काळ्याशार डोळ्यांत तिची संभ्रांत अवस्था प्रतिबिंबित झालेली होती, आणि त्यांत आणखीही एक अनाकलनीय भावना तरळत होती.

"एकटीच?" अना सर्गेव्नाचा आवाज अगदी जवळून ऐकू आला; "मला वाटले तू अर्कादीबरोबर बागेत आली होतीस"

कत्याने सौम्यपणे आपली नजर आपल्या बहिणीवर खिळविली (तिने मोठ्या मेहेनतीने ऐटबाज पोषाख केल्यासारखे वाटत होते; ती वाटेत उभी होती आणि उघड्या छत्रीच्या टोकाने फिफीच्या कानाला गुदगुल्या करत होती); तिने हळुवार उत्तर दिले, "होय, एकटीच."

"ते दिसतेच आहे," स्मितपूर्वक ती म्हणाली; "आपल्या खोलीकडे तो गेला वाटते."
"होय"

"तुमचे दोघांचे एकत्र वाचन चालू होते का?"

"होय."

अना सर्गेव्नाने कत्याची हनुवटी वर उचलली.

"तुमचे भांडण तर झाले नाही ना?"

"नाही," कत्या म्हणाली, आणि शांतपणे तिने आपल्या बहिणीचा हात बाजूला केला.

"तुझे उत्तर किती गांभीर्यपूर्ण वाटते! तो इथे भेटेल व मग त्याला माझ्याबरोबर फिरायला नेण्याच्या विचाराने मी इथे आले होते. तो नेहमी फिरायला जाण्याविषयी विचारत असतो. शहरातून पादत्राणाचे नमुने आले आहेत; पाहा तुला कुठले बसतात ते; मी कालच पाहिले तुझे जुने जोडे अगदी भिकार दिसतात. तुझी लहान पावले किती सुरेख आहेत; तू त्याचा कधी फारसा विचारच करत नाहीस! तुझे हातसुद्धा सुरेख आहेत;......ते थोडे थोराड दिसतात हे खरे; म्हणून तुझी सुंदर पावले हेच तुझे भांडवल आहे असे समज. पण तू गर्विष्ठ नाहीस."

अना सर्गेव्ना त्याच वाटेने पुढे गेली; तिच्या सुंदर गाऊनची सौम्य सळसळ ऐकू आली; कत्याही गवतावरून उठून हाईन्‌ला बरोबर घेऊन दूर गेली—पण पादत्राणांचे नमुने पाहाण्यासाठी नव्हे.

"म्हणे सुरेख पावले!" तिच्या मनात आले. मंद गतीने आणि आस्तेआस्ते ती गच्चीच्या पायऱ्या चढून गेली; उन्हाने पायऱ्या भाजून निघाल्या होत्या; "सुरेख लहान पावले असे तू म्हणतेस काय—छान, मग त्यांवर लोटांगण घ्यायला लावीनच त्याला."

पण एकदम ती ओशाळली आणि झरझर वरच्या मजल्यावर गेली.

सलग वाटेने अर्कादीही आपल्या खोलीकडे गेला होता; पण एका घरकारभाऱ्याने आधीच त्याच्या पुढे जाऊन खोलीत बझारव् वाट पाहात असल्याचा निरोप दिला.

"एव्गेनी!" अर्कादी पुटपुटला; त्याच्या स्वरात नाराजी होती; "इथे येऊन बराच वेळ झाला काय?"

"मिस्टर बझारव् नुकतेच दाखल झाले आहेत; आणि अना सर्गेव्नाला आपण आल्याचे न सांगता प्रथम आपणाला भेटणार असल्याचे त्यांनी सांगितले."

"घरी काही अशुभ तर घडले नसेल?" या विचारासरशी तो वेगाने जिना चढून वर गेला व त्याने तडक खोलीचा दरवाजा उघडला. बझारव्‌च्या चेहेऱ्याकडे पाहिल्याबरोबर त्याला तात्काळ धीर आला; पण एखाद्याच्या अनुभवी नजरेला मात्र अनपेक्षितपणे आलेल्या त्या पाहुण्याच्या कृश पण तरीही ओजस्वी

चेहेऱ्यावर आंतरिक अस्वस्थतेचा प्रत्यय आला असता. अंगावर धुळीने माखलेला वरकोट, आणि डोक्यावर टोपी अशा अवतारात तो खिडकीजवळ बसला होता; अर्कादीने आश्चर्योद्गारांचा वर्षाव करत त्याला मिठी मारली तरीही तो जागचा हलला नाही.

"हे अनपेक्षित आहे! कुठले सद्‌भाग्य म्हणून येणे केले?" एखाद्याला मनांतून खूप आनंद होतो आणि तो आनंद प्रकट करण्याची इच्छाही होते अशा माणसाप्रमाणे तो खोलीभर येरझारा मारत सारखे हेच विचारत होता. "घराकडचे सगळे क्षेम आहे ना? सगळे खुशाल आहेत ना? "

"सगळे क्षेम आहे, पण सगळेच खुशाल नाहीत," बझारव् म्हणाला. "बडबड बंद कर; पण माझ्यासाठी 'क्वास' (बीअर) मागव; खाली बैस आणि जे काही थोडक्या पण स्पष्टपणे जोरदार शब्दांत सांगणार आहे ते लक्षपूर्वक ऐकून घे."

पावेल पित्रोविच्शी झालेले द्वंद्व बझारव् वर्णन करत असता अर्कादी शांत बसला होता. अर्कादीला महदाश्चर्य वाटले, आणि दुःखही वाटले; पण ते व्यक्त करण्याचे त्याला प्रयोजन वाटले नाही. आपल्या काकांची जखम खरोखरच गंभीर नाही ना, एवढे मात्र त्याने विचारले. वैद्यकीय दृष्ट्या नव्हे, तर इतर काही कारणांमुळे ती जखम 'लक्षणीय' होती, हे ऐकून मात्र तो बळेच हसला; पण मनातून तो दुखावला गेला होता आणि काहीसा शरमिंदाही झाला होता. त्याची ही स्थिती बझारव्‌ला समजली असावी.

"मित्रा, हे पाहा," तो पुढे म्हणाला, "सरंजामदारासमवेत राहाण्याचे काय परिणाम होतात पाहा. आपण स्वतःच सरंजामदारीचे घटक होतो आणि त्यांच्या खेळात सहभागी होतो. तेव्हा आता मी वडिलांकडे निघालो आहे," बझारव्‌ने शेवट केला, "आणि जाता जाता वाटेत थांबण्याचे कारण......तुला सर्व सांगावे म्हणून. कदाचित ते सर्व एक निरुपयोगी असत्य असेल किंवा निव्वळ मूर्खपणाच असेल!.......नाही, मी इथे आलो त्याचे कारण—सैतानच जाणे. वाफ्यातून आपण मुळा उपटतो तसे एखादे वेळी माणसाने स्वतःचीच मानगूट पकडून स्वतःलाच सावरणे हे चांगले; सांप्रत मी त्याच उद्योगात आहे......पण मी कशाचा त्याग करतो आहे, त्याकडे पुन्हा एकदा दृष्टिक्षेप टाकावा म्हटले—जिथे माझे रोपण झाले आहे त्या वाफ्याकडे."

"तुझ्या बोलण्याचा रोख माझ्यावर नसावा अशी अपेक्षा करतो," अर्कादीने किंचित भावनावश होऊन उत्तर दिले; "तू माझा त्याग करणार नाहीस अशी अपेक्षा करतो."

बझारव्‌ने त्याच्याकडे तीव्र भेदक नजरेने पाहिले.

"तुला त्याचे एव्हढे दुःख होईल? मला तर वाटते की, तू आधीच माझा त्याग केलेला आहेस; कसा तजेलदार आणि छानछोक दिसतो आहेस......अना सर्गेव्‌नाबरोबरची तुझी भानगड प्रगतीपथावर असली पाहिजे."

"अना सर्गेव्‌नाशी माझी भानगड?"

अनुक्रमणिका

“अरे बच्चाजी, तिच्यासाठी तर शहराकडून इकडच्या इकडेच तू आला नाहीस का? बरे, रविवारचे वर्ग कसे काय चालले आहेत? तिच्या प्रेमात आपण पडलो नाही असे तर तुला सुचवायचे नाही ना? की शहाजोगपणे वागण्यापर्यंत तुझी मजल इतक्या लवकर गेली आहे?”

“एव्गेनी, मी तुझ्याशी नेहमीच प्रांजळपणे वागत आलो आहे; मी तुला खात्री देतो—शपथेवर सांगतो—तुझी चूक होते आहे.”

“हं! मग गोष्ट निराळी; ” मंदपणे बझारव्ने शेरा मारला. “पण तू अस्वस्थ होऊ नको; मी त्या बाबतीत पूर्ण उदासीन आहे. एखादा भावविवश माणूस म्हणेल, “आपले मार्ग भिन्न होत आहेत,” पण मी मात्र आपल्याला एकमेकांचा वीट आला आहे, एवढेच म्हणेन.”

“एव्गेनी......”

“मित्रा, त्यात काही फारसे बिघडले नाही. जीवनात यापेक्षा अधिक महत्त्वाच्या गोष्टींचा आपल्याला वीट येतो. आणि मला वाटते आता आपण एकमेकांचा निरोप घ्यायला हरकत नाही, नाही का? इथे आल्यापासून मला किळसवाणे वाटते आहे; जणू गोगोलने कालौगाच्या राज्यपालाच्या पत्नीला लिहिलेली, भडभडून आलेली भावनापूर्ण पत्रेच मी वाचतो आहे. बरी आठवण झाली, मी त्यांना जुंपलेले घोडेही सोडायला सांगितले नाही.”

“हे मात्र फार झाले!”

“ते कसे?”

“माझ्याविषयी मी नाही काही म्हणत; पण अना सर्गेव्नाचा मात्र हेतुपुरस्सर अधिक्षेप केल्यासारखे होईल; तुला भेटण्याची तिची निश्चित इच्छा असेल.”

“चुकतोस तू.”

“उलट, मी म्हणतो तेच बरोबर आहे,” अर्कादीने प्रत्युत्तर दिले. “आणि एवढा मानभावीपणा कशासाठी? आणि तसाच विचार करायचा झाला तर तिला भेटण्यासाठीच तू इकडे आला नाहीस का!”

“असेलही; पण तुझी मात्र चूक होते आहे.”

पण अर्कादीचे बरोबर होते. अना सर्गेव्नाची बझारव्ला भेटण्याची इच्छा होती; आणि एका कारभाऱ्यामार्फत तिने त्याला बोलावणे पाठविले. तिच्याकडे जाण्यापूर्वी त्याने पोषाख बदलला; आपला नवा सूट बॅगेतून सहजासहजी काढून घेता येईल असाच त्याने बंद करून ठेवला होता.

अनुक्रमणिका

यावेळी मादाम अदिन्त्सवा, ज्या खोलीत त्याने आपले प्रेम अचानकपणे व्यक्त केले होते त्या खोलीत त्याला भेटली नाही; दिवाणखान्यात ती त्याला सामोरी गेली. अदबीने तिने आपली बोटे त्याच्यासमोर धरली; पण तिच्या मनातील तणाव मात्र अभावितपणे तिच्या चेहेऱ्यावर प्रकट झाला होता.

"अना सर्गेव्ना," बझारव् आवेगाने म्हणाला, "सर्वप्रथम मला तुमचे मन निर्धास्त करायचे आहे. तुमच्यापुढे उभा असलेला हा मर्त्य प्राणी पूर्वीच शुद्धीवर आलेला आहे; आणि त्याची अपेक्षा आहे की, इतरांनीही त्याच्या मूर्खपणाच्या गोष्टी विसरून जाव्यात. मी बराच काळ दूर जाणार आहे; आणि मला हे सांगितलेच पाहिजे की, मी जरी भावनाशील माणूस नसलो, तरीही तुमच्या मनात माझ्यासंबंधी तिरस्काराची भावना आहे ही कल्पना बाळगून इथून जाणे काही फारसे उत्साहजनक वाटत नाही. "

अना सर्गेव्नाने उंच डोंगरावर चढून गेलेल्या माणसाप्रमाणे दीर्घ उसासा टाकला, आणि स्मितहास्याने तिचा चेहेरा उजळला. तिने पुन्हा एकदा बझारव् पुढे हात धरला, आणि त्याचा हात दाबून त्याला प्रतिसाद दिला.

"झाले गेले विसरून जा," ती म्हणाली. "माझी स्वतःचीच विसरून जाण्याची अधिक तयारी आहे; कारण माझ्या सद्सद्विवेक बुद्धिप्रमाणे मीही त्यावेळी दोषी होते; छचोरपणे वागण्यात माझाही दोष होता. थोडक्यात, पूर्वी प्रमाणेच आपण मित्र राहू. ते एक स्वप्न होते, खरे ना? स्वप्ने कोण लक्षात ठेवते ?"

"कोण लक्षात ठेवते? आणि शिवाय प्रेम......ही एक कल्पित भावना आहे हे तुम्ही जाणताच."

"खरेच? हे ऐकून मला फार बरे वाटले."

अना सर्गेव्ना असेच बोलत राहिली; आणि बझारव्ही. आपण सत्यच बोलत आहोत अशी दोघांचीही समजूत होती. त्यांच्या शब्दांत सत्य, आणि केवळ सत्यच, सापडले असते का? ते त्यांनाही सांगता आले नसते; लेखकाला तर सांगता येणे त्याहीपेक्षा असंभवनीय. पण त्या दोघांचे संभाषण मात्र निर्वेधपणे चालू होते; जणू एकमेकांच्या बोलण्यावर त्या दोघांचा विश्वास बसत होता.

अना सर्गेव्नाने बझारव्ला अनेक प्रश्न विचारले; तसेच किर्सानव्च्या घरी तो काय करत होता हेही विचारले. पावेल पित्रोविच्शी लढलेल्या द्वंद्वासंबंधी बोलण्याचे त्याच्या ओठावर आले होते, पण त्याने स्वतःला आवरले; आपण स्वतःबद्दल काही तरी मनोरंजक सांगण्याचा प्रयत्न करतो आहो असे तिला वाटू नये म्हणून; आपण सतत उद्योगमग्न होतो, असे त्याने सांगितले.

"आणि मी," अना सर्गेव्ना म्हणाली, "की कुणास ठाऊक प्रथम मला उदासीनतेचा झटका आला; गंमत म्हणजे मी परदेशपर्यटनाची तयारी सुद्धा केली!......मग तेही संपले; तुमचा सुहृद अर्कादी निकालाएविच् आला, आणि पुन्हा एकदा मी नित्यक्रमात गर्क झाले, आणि माझी भूमिका पार पाडू लागले."

"कुठली भूमिका, विचारू शकतो का मी?"

अनुक्रमणिका

“काकीची, पालकाची, आईची—कुठलीही म्हणा. सहज आठवण झाली म्हणून म्हणायचे—तुम्हाला ठाऊक आहे का की, तुमची आणि अर्कादी निकालाएविच्ची मैत्री म्हणजे मला एक न उलगडलेले कोडे होते; मला तो काहीसा नगण्य वाटे. पण सांप्रत त्याच्याशी माझा परिचय वाढतो आहे, आणि तो हुशार आहे असे दिसते......शिवाय तो तरुण आहे, तो तरुण आहे......तीच महत्त्वाची गोष्ट आहे......तुमच्या माझ्याप्रमाणे नाही, एव्गेनी वासिलिइच्.”

“तुमच्या सहवासात तो अजूनही पूर्वीसारखा लाजाळू असतो का?” बझारव्ने विचारले.

“म्हणजे, पूर्वी होता?”......अना सर्गेव्ना म्हणाली, आणि किंचित थांबून पुढे म्हणाली; “तो अधिक निर्भरपणे बोलतो माझ्याशी. पूर्वी तो मला टाळायचा. अर्थात् मीही त्याच्या सहवासासाठी फारशी उत्सुक नसे. कत्याशी मात्र त्याचे छान जमते.”

बझारव् वैतागला. “बाष्कळ बडबड करणे बाईला टाळताच येत नाही हेच खरे!” बझारव्ला वाटले. “आपण त्याला टाळत होतो असे तुम्ही म्हणता,” कोरडे स्मित करत तो मोठ्याने म्हणाला; “पण तो तुमच्या प्रेमात पडला होता हे काही तुम्हाला गुपित नसावे.”

“म्हणजे? तो सुद्धा?” अना सर्गेव्नाच्या मुखातून शब्द बाहेर पडले.

“तो सुद्धा,” आदरपूर्वक मस्तक झुकवून बझारव्ने पुनरुच्चार केला. “पण तुम्हाला ते ठाऊक नव्हते, आणि मी काहीतरी नवीन सांगतो असे तर नाही ना?”

अना सर्गेव्ना अधोमुख झाली. “एव्गेनी वासिलिइच्. तुमची चूक होते आहे.”

“मला नाही तसे वाटत. पण कदाचित मी या गोष्टीचा उल्लेख करायला नको होता.” “आणि मला बनविण्याचा प्रयत्न अतःपर करू नको,” तो स्वतःशीच म्हणाला.

“का नको होता? याबाबतीत सुद्धा मला वाटते तुम्ही एका तात्कालिक समजुतीला फारच महत्त्व देता आहात. अतिशयोक्त बोलण्याकडे तुमचा कल असावा अशी शंका वाटते.”

“अना सर्गेव्ना, आपण त्याविषयी न बोलणेच बरे.”

“पण का नको?” तिने टोला दिला. पण तिने स्वतःच भाषणाचा ओघ दुसऱ्या दिशेकडे वळविला. आपण ते सर्व विसरून टाकले आहे असे तिने त्याला सांगितले असले आणि स्वतःलाही तसा भरवसा दिलेला असला तरीही बझारव्च्या सहवासात ती अस्वस्थ होत होती. त्याच्याशी साधी वाक्ये बोलत असताना, किंबहुना त्याच्याशी विनोद करताना सुद्धा तिला कुठेतरी सूक्ष्म धास्ती जाणवत होती. समुद्रप्रवासात जहाजावर माणसं अशीच निर्भरपणे बोलत असतात, हसत असतात, जणू त्यांचे सर्व व्यवहार कोरड्या जमिनीवरच चालू असतात; पण रोजच्यापेक्षा अगदी थोडासा जरी वांधा आला, काही विपरीत घडणार असल्याचे साधे चिन्ह जरी दिसले तरी, एकाएकी प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर भीतीची विशिष्ट जाणीव दिसू लागते, भीतीची अनिवार्य जाणीव प्रत्ययास येते.

अनुक्रमणिका

अना सर्गेव्नाचे बझारव्शी संभाषण फार वेळ चालले नव्हते. कुठल्यातरी विचारात मग्न असल्यासारखी ती दिसत होती; धूसरपणे उत्तरे देत होती; शेवटी तिने हॉलमध्ये चलण्याची सूचना केली; प्रिन्सेस आणि कत्या त्यांना हॉलमध्ये भेटली. “पण अर्कादी निकालाएविच् कुठे आहे?” घरधनिणीने चौकशी केली; एका तासाभरात त्याने तोंड दाखविले नसल्याचे ऐकून मग तिने त्याला बोलावणे धाडले. तो काही लगेच सापडला नाही; बागेतल्या घनदाट भागात त्याने स्वतःला लपवून घेतले होते; तिथे तो दोन्ही हातांच्या मुठीवर हनुवटी रेलून चिंतनात गर्क होऊन बसलेला होता. त्याचे विचार गूढ आणि गंभीर होते; पण विषादाचे नव्हते. अना सर्गेव्ना बझारव्च्या सांनिध्यात एकांतात बसली आहे हे त्याला माहीत होते; पण पूर्वीप्रमाणे यावेळी त्याला मत्सर वाटला नाही. उलट त्याचा चेहेरा सौम्यपणे उल्हसित झाला; तो जणू एकाचवेळी कुठल्यातरी गोष्टीबाबत निर्णय घेत होता, शंकित होत होता आणि आनंदून जात होता.

अनुक्रमणिका

दिवंगत अदिन्त्सवाना अभिनव सुधारणांची आवड नसावी; पण "एका मर्यादित क्षेत्रात ललित कलांचे स्थान" त्यांनी मान्य केले होते; आणि त्यामुळेच रोपांचे संगोपनगृह व तळे या दोहोमधील मोकळ्या जागेत ग्रीक देवळाचा आभास निर्माण करणारी, रशियन विटांनी बांधलेली एक रचनाकृती उभारून घेतली होती. या मंदिराच्या किंवा आकृतीबंधाच्या मागच्या अंधाऱ्या भिंतीच्या बाजूने पुतळे उभे करण्यासाठी सहा देवळ्या ठेवल्या होत्या; आणि हे पुतळे अदिन्त्सवा यांनी परदेशातून खास मागवून घेतले होते. या मूर्ती म्हणजे एकांत, शांतीचिंतन, नैराश्य, नम्रता आणि चैतन्य यांची प्रतीके होत. यांपैकी फक्त शांततादेवीचा—ओठावर बोट ठेवलेला पुतळा परदेशातून आला होता, आणि त्याची प्रतिष्ठापनाही झाली होती; पण त्याच दिवशी शेतावरील काही पोरांनी तिचे नाकच मोडून टाकले; त्यावर शेजारच्या भागातील मलमपट्टी करणाऱ्या कारागिराने तिला नवीन नाकाचे कलम करण्याची तयारी दर्शविली आणि "जुन्यापेक्षा दुपटीने चांगले" नाक करण्याचे अभिवचन दिले; पण अदिन्त्सवानी तो पुतळा तिथून हलविला; आणि खळ्यावरील कोठाराच्या एका कोपऱ्यात ती शांततादेवी अजूनही उभी आहे; आज अनेक वर्षे उभा असलेला तो पुतळा म्हणजे शेतकरी स्त्रियांच्या भोळसट भीतीचे मूळ होऊन राहिला आहे. देवळाचा पुढचा भाग घनदाट झुडपांनी दीर्घकाळ झाकळून गेला होता; घनदाट हिरवळीवर स्तंभ उभे करण्याचे त्रिकोणी चौथरे तेवढे दृष्टीस पडत. मंदिराच्या अंतर्भागात माध्यानसमयी सुद्धा गारवा असे. अना सर्गेव्नाला एकदा तिथे सर्प दिसला होता; तेव्हापासून तिकडे फिरकणे तिला आवडत नसे. पण कत्या मात्र तिथे येत असे व एका देवळीच्या खाली असलेल्या रुंद दगडावर बसत असे. इथे सावलीत आणि शीतल वातावरणात ती वाचन करीत अगर काम करीत बसत असे; किंवा कधी परिपूर्ण चित्शांतीच्या अनुभूतीचा आस्वाद घेण्यात ती स्वतःला विसरून जात असे; ही अनुभूती आपल्यापैकी प्रत्येकाला आलेलीच असते; आपणा भोवतालच्या वातावरणात आणि आपल्या अंतःकरणात अविरतपणे वाहात असणाऱ्या जीवनौघाचे संगीत शांतपणे व अर्धवट अभावितपणे ऐकण्यात या अनुभूतीचे सौंदर्य असते.

बझारव्च्या आगमनानंतर दुसऱ्या दिवशी कत्या आपल्या आवडत्या दगडी बैठकीवर बसली होती. आणि तिच्या समीप अर्कादीही बसला होता. 'मंदिराकडे' चलण्यासाठी त्याने तिचे मन वळविले होते.

दुपारच्या भोजनाला अजूनही तासाभराचा अवधी होता; दंवबिंदूंनी डंवरलेली प्रभात उलटून तिचे गदमदणाऱ्या दिवसात रूपांतर झाले होते. अर्कादीच्या चेहेऱ्यावर आधले दिवशीचाच भाव होता; कत्या विचारमग्न दिसत होती. सकाळचा चहा झाल्याबरोबर तिच्या बहिणीने तिला आपल्या खोलीत बोलावून घेतले होते; प्रथम मिठी मारून—या मिठ्यांची कत्याला काहीशी धास्तीच वाटे—तिने अर्कादीबरोबरच्या तिच्या संबंधाबाबत अधिक सावधगिरी बाळगण्याचा तिला सल्ला दिला होता; विशेषतः तिच्या काकीला व घरातील इतरांना संशय येईल इतपत त्याच्याशी एकांतवासात बोलणे टाळण्याचा तिला इशारा दिला होता. शिवाय अना सर्गेव्नाचे आधल्या दिवशीच्या संध्याकाळचे वागणेसुद्धा तिला काहीसे निराळेच भासले होते; आणि स्वतः कत्या आपल्या हातून काही अपराध घडलेला आहे या कल्पनेने अस्वस्थ झाली होती. अर्कादीच्या मिनतवारीला तिने मान्यता दिली, तेव्हा फक्त शेवटचीच भेट असे तिने स्वतःला बजावले.

"कतेरिना सर्गेव्ना," काहीशा लाजाळू सहजपणाने अर्कादीने सुरवात केली. "या घरात तुझ्याबरोबर राहाण्याचे सद्भाग्य मला लाभले, त्यामुळे मी तुझ्याशी काही गोष्टींवर चर्चा केली आहे; पण या अवधीत एक......एक महत्त्वाचा......माझ्या दृष्टीने......प्रश्न राहून गेला आहे. इथे आल्यापासून माझ्यात

बदल घडून आला आहे, असे तू कालच म्हणालीस," हे बोलत असताना एकाच वेळी तिच्या नजरेला नजर देण्याचा व त्यातील प्रश्नार्थक भाव टाळण्याचा तो प्रयत्न करीत होता; "माझ्यात निश्चितपणे खूपच बदल झाला आहे, आणि इतर कुणाहीपेक्षा तू ते अधिक जाणतेस—कारण माझ्यातला हा बदल घडविण्यास तूच कारणीभूत आहेस."

"मी? ......माझ्यामुळे?. ......" कत्या म्हणाली.

"मी इथे प्रथम आलो त्यावेळी एक दांभिक तरुण होतो; तो आता मी राहिलो नाही," अर्कादी पुढे म्हणाला. "वयाची तेविशी मी उगीचच नाही गाठली; मागच्याप्रमाणेच मला स्वतःला उपयुक्त असे करावयाचे आहे; माझ्या सर्व शक्तिनिशी मला सत्यान्वेषण करायचे आहे; मात्र माझे आदर्श मी पूर्वी ज्या ठिकाणी शोधत होतो, तिथे मात्र ते अतःपर नाही शोधणार; ते आदर्श स्वतःच माझ्यासमोर येऊन ठाकतात......अधिक जवळ हाताशी येतात. यावेळेपर्यंत मी स्वतःलाच समजू शकलो नव्हतो; माझ्या शक्तीबाहेरची अनेक कामे मी अंगावर घेतली होती......सांप्रत माझे डोळे उघडले आहेत, हा एका भावनेचा परिणाम......मला अधिक स्पष्टपणे सांगता येणार नाही, पण तू समजू शकशील असा मला भरवसा वाटतो."

कत्याने उत्तर दिले नाही; पण तिची नजर मात्र दुसरीकडे वळली.

"मला वाटते," त्याने पुन्हा सुरवात केली, पण यावेळी मात्र त्याच्या आवाजात चलबिचलता जाणवत होती; त्याचवेळी त्याच्या डोक्यावर बर्चच्या पानांत दडून एक चाफिंच पक्षी एकाग्रतेने गात होता;—"मला वाटते की, आपल्या जे......निकट......संबंधित आहेत......त्यांच्याशी मोकळेपणाने वागणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे......खरे म्हणजे......आणि म्हणून......मी......निश्चय केला आहे...... "

पण इथे मात्र अर्कादीची वाक्गंगा लुप्त झाली; त्याचा धागा तुटला तो त......त......त प......प......करू लागला, इतके की त्याला किंचित्काल स्तब्ध रहावे लागले. कत्याने तरीही वर मान करून पाहिले नाही. या सगळ्यात त्याला काय म्हणावयाचे आहे याचा सुगावा तिला लागला नसावा, आणि जणू ती कशाची तरी वाट पाहात होती.

"माझ्या बोलण्याचे तुला आश्चर्य वाटेल," पुन्हा एकदा प्रयत्नपूर्वक स्वतःला सावरत अर्कादीने सुरवात केली, "विशेषतः ह्या माझ्या भावनेचा......एका अर्थाने समजले का......तुझ्याशी संबंध आहे. माझ्यात गांभीर्याचा अभाव आहे अशी तू माझी कालच निर्भर्त्सना केली होतीस, हे तुला आठवत असेलच," अर्कादी पुढे म्हणाला; दलदलीत रुतलेला माणूस ज्याप्रमाणे प्रत्येक पावलागणिक खोल जातो, आणि तरीही धांदलीने ती पार करण्याचा प्रयत्न करतो, त्याप्रमाणे अर्कादी बोलत राहिला; "आणि......बहुधा......नेहमीच......अशी निर्भर्त्सना करण्याची आवश्यकता नसताना देखील बहुधा नेहमीच तरुणांची निर्भर्त्सना होते; आणि जर माझा आत्मविश्वास अधिक......" ("दया कर, कृपया मला सावरून घे!" हताशपणे अर्कादीच्या डोक्यात विचार घोळत होते; पण पूर्वीप्रमाणे कत्याने काही त्याच्याकडे मान वळवून पाहिले नाही.) "मला जर आशेचा किरण दिसला......"

“तुम्हाला काय म्हणायचे आहे हे मला समजले तर,” अना सर्गेव्नाचे शब्द स्पष्टपणे त्याक्षणी त्याला ऐकू आले. अर्कादी तत्क्षणीच सर्द पडला, आणि कत्याचा चेहेरा फटफटीत झाला. मंदिराला झाकून टाकणाऱ्या गर्द झाडीच्या बाजूने एक पायवाट पडली होती. अना सर्गेव्ना बझारव्‌बरोबर त्या बाजूने चालली होती. कत्या आणि अर्कादीला ते दिसू शकत नव्हते, पण त्यांचा प्रत्येक शब्द, त्यांच्या कपड्यांची सळसळ, त्यांचे श्वसनसुद्धा ऐकू येत होते. ती दोघे काही पावले चालून गेली, आणि जणू मुद्दाम मंदिरासमोर स्तब्ध राहिली.

“असे पाहा,” अना सर्गेव्ना पुढे म्हणाली, “तुम्ही आणि मी एक चूक केली आहे; आपण दोघांनीही तारुण्याचा पहिला बहर ओलांडला आहे; निदान मी तरी; आपण जीवन पाहिले आहे; आपण आता थकलो आहोत; आपण दोघेही चतुर आहोत—आणि आपल्याला ते ठाऊक नसल्याचे ढोंग कशाला? प्रथम प्रथम आपणाला एकमेकांत दिलचस्पी वाटत होती; औत्सुक्य जागृत झाले होते......आणि मग......”

“आणि मग मी शिळा वाटू लागलो,” बझारव् मध्येच म्हणाला.

“आपल्यातल्या गैरसमजाचे ते कारण नाही, आणि तुम्ही ते जाणता. पण ते कसेही असो, आपल्याला एकमेकांची गरज उरली नाही; एव्हढे खरे; तोच महत्त्वाचा मुद्दा; आपणा दोघांमध्ये—काय बरं म्हणू मी—काही तरी कमालीचा सारखेपणा होता. आपणाला ते सगळे एकदम कळलेच नाही. आता अर्कादी...... ”

“त्याची गरज वाटते का?” बझारव्‌ने विचारले.

“शूःऽ, एव्‌गेनी वासिलिइच्, तो माझ्यासंबंधी उदासीन नाही, हे तुम्ही मला सांगता, आणि मला तर नेहमीच वाटत आले आहे की, मी त्याला आवडते. मी खरे म्हणजे त्याची काकी शोभेन, पण मला तुमच्यापासून लपवून ठेवायचे नाही की, मी त्याच्यासंबंधी अधिक विचार करू लागले आहे. अशा यौवनात, उन्मेषात एक विशिष्ट सौंदर्य आहे......”

“अशा संदर्भात आकर्षण हा अधिक समर्पक शब्द आहे,” बझारव्‌ने मध्येच सुचविले; त्याच्या मनात फसफसणारा कडवटपणा त्याच्या रुद्ध पण स्थिर आवाजात स्पष्टपणे जाणवत होता. “काल माझ्याशी बोलताना अर्कादी गूढ वाटत होता; आणि तुमच्यासंबंधी अगर तुमच्या भगिनीसंबंधी तो मुळीच बोलत नव्हता......हे लक्षण गंभीर आहे.”

“कत्याला तो भावासारखा आहे,” अना सर्गेव्नाने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली, “आणि त्याच्या स्वभावातील ही गोष्ट मला आवडते, पण तरीही, अर्थात् त्या दोघांत मी इतकी सलगी वाढू द्यायला नको होती.”

“या कल्पनेमागची प्रेरणा म्हणजे तुम्हाला बहीण म्हणून वाटणारी काळजी, हेच ना?” बझारव्‌ने रेंकत विचारले.

अनुक्रमणिका

“अर्थात्……पण आपण असे स्तब्ध उभे का राहिलो? चला जाऊ या. काय विचित्र गोष्टी आपण बोलतो आहे, नाही? अशा तऱ्हेने मी तुमच्याशी बोलू शकेन यावर माझा कधीच विश्वास बसला नसता. मला तुमची भीती वाटते……आणि त्याचबरोबर तुमच्यावर माझा पूर्ण भरवसा आहे, कारण वस्तुतः तुम्ही फार चांगले आहात.”

“प्रथम म्हणजे, मी अजिबात चांगला मनुष्य नाही; आणि दुसरे, तुमच्या दृष्टीने मला काहीच महत्त्व उरलेले नाही; आणि तरीही तुम्ही म्हणता की, मी चांगला माणूस आहे……प्रेताच्या डोक्यावर पुष्पचक्र वाहिल्यासारखे आहे हे.”

“एव्गेनी वासिलीइच्, आपण याला जबाबदार नाही आहोत…… ” अना सर्गेव्नाने सुरवात केली; पण वाऱ्याची एक झुळूक आली, पानांची सळसळ झाली आणि त्याबरोबर तिचे शब्द विरून गेले. “अर्थात्, तुम्ही स्वतंत्र आहात……” किंचित्काल स्तब्धतेनंतर बझारव् म्हणाला. यापुढचे शब्द अस्पष्ट होत गेले; पावलांचा दूर जाणारा आवाज अस्पष्ट होत गेला……सगळीकडे स्तब्धता पसरली.

अर्कादी कत्याकडे वळला. ती तशीच बसून होती, पण तिची मान अधिकच खाली लवलेली होती. “कतेरिना सर्गेव्ना,” त्याच्या आवाजात कंप होता, त्याने आपले हात एकमेकांत पकडले, “माझे तुझ्यावर चिरंतन आणि अचल प्रेम आहे; तुझ्याखेरीज कुणावरही माझे प्रेम नाही, हेच तुला सांगायचे होते, माझ्याबद्दलचे तुझे मत विचारायचे होते, आणि तुला मागणी घालायची होती……मी श्रीमंत नसल्याने कुठलाही त्याग करायची माझी तयारी आहे……तू उत्तर देणार नाहीस? माझ्यावर विश्वास बसत नाही? तुला मी हे गंमतीने बोलतो आहे असे वाटते का? पण हे शेवटचे दिवस लक्षात ठेव ! गेल्या दीर्घ कालावधीत तुझ्या लक्षात आले असेल की, इतर कुठलीही गोष्ट, समजले का—इतर कुठलीही गोष्ट फार पूर्वीच नष्ट झालेली आहे आणि तिचा मागमूसही राहिलेला नाही? माझ्याकडे पाहा, एक शब्द तरी बोल……माझे तुझ्यावर प्रेम आहे……माझे प्रेम आहे…… माझ्यावर विश्वास ठेव.”

कत्याने अर्कादीकडे प्रफुल्ल व उत्कट नजरेने पाहिले; दीर्घकाळ अनिश्चित अवस्थेनंतर तिच्या चेहेऱ्यावर पुसट स्मित विलसले आणि ती म्हणाली. “होय.”

अर्कादीने आपल्या दगडाच्या बैठकीवरून उडी मारली. “होय! कतेरिना सर्गेव्ना, तू होय म्हणालीस! त्या शब्दाचा अर्थ काय? माझे तुझ्यावर प्रेम आहे, तुझा माझ्यावर विश्वास आहे……की……की……मला पुढे विचार करवत नाही.”

“होय.” कत्याने पुनरुच्चार केला, आणि यावेळी मात्र त्याला तिच्या शब्दाचा अर्थ उमगला. त्याने तिचे सुंदर, थोराड हात आपल्या हातात पकडले, आणि हर्षोत्फुल्ल होऊन, श्वास रोधून आपल्या छातीवर ते दाबले. आपल्या पायावर तो थरथरत उभा होता, आणि फक्त ‘कत्या, कत्या’ एवढेच पुनःपुन्हा पुटपुटत राहिला; त्याच वेळी तिच्या डोळ्यांतून निरागसपणे अश्रू ठिपकू लागले, आणि त्या अश्रूंतूनच तिचे मधुर स्मित विलसू लागले. आपल्या प्रेयसीच्या नेत्रांतील हे अश्रू ज्याने पाहिले नसतील, त्याला माणूस लज्जेने आणि कृतज्ञतेने भरून येऊन पृथ्वीतलावर सुखाचा कुठला बिंदू गाठू शकतो हे समजणार नाही.

अनुक्रमणिका

दुसऱ्या दिवशी सकाळी अना सर्गेव्नाने बझारव्ला आपल्या प्रसाधन खोलीत बोलावून घेतले, आणि तोंडावर बळेच हास्य आणत एक घडी केलेला कागद त्याच्या हातात दिला. अर्कादीकडून आलेले ते पत्र होते; त्यात त्याने तिच्या बहिणीला मागणी घातली होती.

बझारव्ने ते पत्र झरकन वाचले, आणि स्वतःला आवर घालण्याचा प्रयत्न केला; कारण त्याच्या अंतःकरणात तत्क्षणी उफाळलेला विषारी भावनेचा डोंब त्याला दाखवायचा नव्हता.

"असे आहे तर," त्याने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली; "आणि मला वाटते कालच तुम्ही तो कतेरिना सर्गेव्नावर भावाप्रमाणे प्रेम करतो अशा भ्रमात होता. आता काय करायचे योजले आहे?"

"तुमचा काय सल्ला आहे?" अना सर्गेव्नाने विचारले; ती अजूनही हसतच होती.

"ठीक, मला वाटते," बझारव्ने उत्तर दिले, तोही हसला; पण त्याला बिलकूल उत्साह वाटत नव्हता; आणि तिच्याप्रमाणेच हसण्याचे प्रयोजन वाटत नव्हते; "मला वाटते या तरुण लोकांना आशिर्वाद देणे तुमचे कर्तव्य आहे. कुठल्याही दृष्टीने ही जोडी सुयोग्य वाटते; किर्सानव्ची परिस्थिती माफक प्रमाणात बरी आहे; तो एकुलता एक मुलगा आहे; त्याचे वडील स्वभावाने चांगले आहेत आणि ते त्याच्या मार्गात आड येणार नाहीत."

मादाम अदिन्त्सवा खोलीत येरझारा घालत होती. आळीपाळीने तिचा चेहेरा फुलत होता नि निस्तेज होत होता. "तुम्हाला तसे वाटते," ती म्हणाली; "ठीक, मलाही काही अडचण दिसत नाही......मला कत्याबद्दल आनंद वाटतो......आणि अर्कादी निकालाएविच्बद्दलही. अर्थात्, त्याच्या वडिलांच्या उत्तराची मी वाट पाहीन. मी त्याला समक्षच त्यांच्याकडे पाठवीन. पण तुम्ही पाहाताच की, मी काल म्हटल्याप्रमाणे आपले मात्र आता वय झाले आहे हे खरे......माझ्या हे ध्यानात कसे आले नाही? याचेच मला नवल वाटते!" अना सर्गेव्ना पुन्हा हसली आणि तिने लगेच मान वळवली.

"तरुण पिढी मोठी लबाड बनली आहे," बझारव्ने शेरा मारला, आणि तोही हसला. "नमस्ते" काही क्षण शांततेत गेल्यावर त्याने म्हटले. "हे प्रकरण तुम्ही पूर्णपणे समाधानकारकरीतीने शेवटाला न्याल अशी मी अशा करतो, आणि दूर अंतरावरून मी त्यात आनंद मानीन."

मादाम अदिन्त्सवा तात्काळ त्याच्याकडे वळली. "तुम्ही जाणार तर नाही? इथे राहायला 'आता' काय हरकत आहे? राहा......तुमच्याशी चर्चा करणे उत्साहवर्धक असते......वाटते की, आपण एका उंच कड्यावरून चालतो आहोत. प्रथम थोडी धास्ती वाटते, पण पुढे जावे तसा धीर येतो. राहा ना."

"अना सर्गेव्ना, तुमच्या सूचनेबद्दल व माझ्या संभाषणचातुर्याबद्दलच्या आपल्या गौरवपूर्ण मतांबद्दल आभारी आहे. पण मला वाटते मी अनोळखी अशा क्षेत्रात आधीच खूप वेळ भटकंती करतो आहे. उडते मासे हवेत काही काळ तरंगतात, पण पाण्यात पुन्हा बुडी मारण्याखेरीज त्यांना गत्यंतर नसते. माझ्या क्षेत्रात मला पाय हलवू दे."

मादाम अदिन्त्सवाने बझारव्कडे पाहिले. त्याचा निस्तेज चेहेरा कडवट स्मिताने विरूप दिसत होता, “या माणसाने माझ्यावर प्रेम केले होते!” तिच्या मनात विचार आला, आणि तिला त्याची कींव आली; सहानुभूतीपूर्वक तिने आपला हात त्याच्यापुढे केला.

तिच्या मनातील विचार त्यालाही उमगला असावा. “नाही!” एक पाऊल मागे जात तो म्हणाला, “मी एक गरीब मनुष्य आहे, पण अद्याप मी कुणाच्या दयेचा स्वीकार केला नाही. नमस्ते, आणि तुमचे भले होवो.”

“आपली ही शेवटचीच भेट नसावी असेच मी मानते,” अभावितपणे हाताची हालचाल करत अना सर्गेव्ना म्हणाली.

“काहीही घडू शकेल!” बझारव्ने उत्तर दिले; त्याने तिला अभिवादन केले आणि तो चालता झाला.

“तर घरकूल बांधायचा तुझा विचार आहे? त्याच दिवशी आपल्या खोलीत जमिनीवर ओणवून पेटी बंद करता करता तो अर्कादीला म्हणाला. “छान, उत्तम गोष्ट आहे. पण एव्हढा भोंदूपणा करण्याची गरज नव्हती. दुसऱ्या दिशेने तू काही करशील अशी अपेक्षा होती. पण कदाचित त्याचे तुझे तुलाच आश्चर्य वाटले असेल?”

“मी तुझा निरोप घेतला तेव्हा असे काही घडेल याची मलाही कल्पना नव्हती,” अर्कादीने उत्तर दिले; “पण तू स्वतःच इतका भोंदू कसा; जणू तुझी विवाहाबाबतची मते मला माहीत नसल्यासारखे ‘उत्तम गोष्ट’ असे म्हणतोस.”

“वा, भल्या माणसा,” बझारव् म्हणाला, “असे कसे म्हणतोस! मी काय करतो आहे हे तू पाहतोसच; या पेटीत जणू पोकळ अवकाश आहे, आणि मी त्यात गवताचा पेंढा भरतो आहे; आपल्या जीवनपेटिकेचेही तसेच आहे; ती पोकळी नको असते म्हणून त्यात काहीही भरायची आपली तयारी असते. कृपा करून राग मानू नको; कतेरिना सर्गेव्नाबद्दल माझे मत काय आहे हे तू निःसंशय जाणतोस. चतुरपणे उसासे टाकू शकणाऱ्या अनेक स्त्रियांना हुशार म्हटले जाते; पण तुझी प्रेयसी मात्र आपली मान ताठ ठेवणारी आहे, आणि खरे म्हणजे, ती इतकी यशस्वीपणे आपली मान ताठ ठेवू शकेल की, तुला ती आपल्या बोटावर नाचवेल, शंकाच नको; पण ते तसेच होणे उचित आहे म्हणा.” त्याने पेटीचे झाकण घट्ट आपटले आणि तो उभा राहिला. “आणि पुन्हा एकदा गुड-बाय, कारण आपण स्वतःलाच फसविण्यात काही स्वारस्य नाही,—आपण कायमचाच निरोप घेतो आहोत, आणि तू ते जाणतोसच......तू शहाणपणानेच वागला आहेस; आमच्या सारख्यांचे एकलकोंडे, कडवट, धकाधकीचे जीवन जगण्याचा तुझा पिंड नाही; तुझ्यापाशी हिंमत, द्वेषभावना यांचा अभाव आहे, पण तारुण्यसुलभ धाडस आणि तेज आहे. तुझ्यासारखी घरंदाज माणसं शिष्टसंमत आज्ञापालन अगर शिष्टसंमत द्वेष यापलीकडे जाऊ शकत नाहीत, आणि ते कुचकामी आहे. तुम्ही झगडू शकत नाही—आणि तरीही तुम्ही स्वतःला शूर गडी म्हणवून घेता—पण आम्ही पोटतिडीकीने झगडतो. अच्छा! आमची धूळ तुमच्या डोळ्यांत उडेल, आमची चिखलराड तुमच्या अंगावर माखून जाईल, पण तरीही तुमची आमच्या पातळीवर यायची लायकी नाही; तुम्ही स्वतःचा अजाणतेपणाने गौरव करता आहात, स्वतःची निर्भर्त्सना करणेही तुम्हाला आवडते; पण आम्हाला या सर्वांचा आता वीट आहे—आम्हांला काही निराळे हवे आहे! आम्हांला इतरांचा चक्काचूर करायचा आहे! तुझे गड्या उत्तम आहे;

पण असे असले तरीही तू एक मिठ्ठास, उदारमतवादी शिष्ट आहेस; माझ्या वडिलांचा शब्द वापरायचा तर ‘बस्स एवढेच.’”

“एव्गेनी, तू मला कायमचा सोडून जाणार?” अर्कादी दुःखित होऊन म्हणाला; “आणि मला सांगण्यासारखे याखेरीज तुझ्याजवळ काहीही नाही?”

बझारव्ने मानेच्या मागे खाजविले. “आहेत, अर्कादी, आहेत, तुला सांगण्यासारख्या माझ्याजवळ इतर खूप गोष्टी आहेत; पण मी त्या बोलून दाखविणार नाही, कारण तसे करणे म्हणजे भाबडेपणाचे लक्षण आहे,—म्हणजेच बाष्कळपणा. तू लौकरात लौकर विवाहबद्ध हो; स्वतःचे घरटे बांध, आणि मन मानेल तितकी प्रजा उत्पन्न कर. तुझ्या आणि माझ्यापेक्षा अधिक चांगल्या काळात जन्माला येण्याची त्यांना अक्कल असेल. हाहा ! घोडे तयार ठेवलेले दिसतात. वेळ खलास ! सगळ्यांचा निरोप घेतलेलाच आहे......आता काय राहिले ? आलिंगन भेट, अं? ”

आपल्या जुन्या नेत्याच्या आणि मित्राच्या खांद्यावर अर्कादी आवेगाने झेपावला, आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रू घळघळ वाहू लागले.

“तारुण्य असल्यामुळे असे होते!” बझारव् शांतपणे म्हणाला. “पण कतेरिना सर्गेव्नावर माझ्या आशा विसंबून आहेत. ती तुझे किती झटकन सांत्वन करील हे तू पाहाशीलच! गुड-बाय, भाई!” त्या लहानशा गाडीत चढून बसल्यावर बझारव् अर्कादीला म्हणाला; आणि तबेल्याच्या छपरावर एकमेकांजवळ बसलेल्या डोमकावळ्यांच्या जोडप्याकडे बोट दाखवून तो पुढे म्हणाला, “ते पाहा! त्यांचे उदाहरण डोळ्यासमोर ठेव.”

“त्याचा अर्थ काय?” अर्कादीने विचारले.

“म्हणजे? प्रकृती विज्ञान विषयात तू इतका कच्चा आहेस की, डोमकावळा हा एक सन्माननीय कौटुंबिक पक्षी आहे, हे विसरलास? तुला तो आदर्शभूत आहे!......गुड-बाय!”

गाडीची करकर झाली आणि ती दूर दृष्टीआड झाली.

बझारव् जे म्हणाला ते खरेच होते. संध्याकाळी कत्याशी बोलताना आपल्या पूर्वीच्या गुरूला अर्कादी पूर्णपणे विसरून गेला. तो आधीपासूनच तिच्या तंत्राने वागू लागला; कत्याला त्याची जाणीव होती; तिला त्याचे काहीच आश्चर्य वाटले नाही. दुसऱ्याच दिवशी तो निकालाय् पित्रोविच्ना भेटण्यासाठी मॅरिॲनोकड प्रयाण करणार होता. त्या तरुण जोडप्यावर कुठल्याही प्रकारचे बंधन टाकण्याचा अना सर्गेव्नाचा इरादा नव्हता; आणि केवळ जनरीतीसाठीच त्या दोघांना फार वेळ एकत्र येण्यास तिने मनाई केली. औदार्याच्या भावनेने प्रिन्सेस्ला तिने त्यांच्या आड येऊ दिले नाही; प्रिन्सेस्ची अवस्था विवाह ठरल्याच्या वार्तेने केविलवाण्या भ्रमिष्टासारखी झाली होती. अना सर्गेव्नाला प्रथम वाटले की, त्या जोडप्याचे

सुख पाहाणे तिला जाचक होईल, पण झाले उलटच; त्यांचे सुख तिला जाचक तर वाटले नाहीच, पण ती त्यात रममाण झाली, आणि शेवटी तिचे मन हलके झाले. अना सर्गेव्नाला त्यामुळे आनंद आणि विषाद दोन्हींचाही अनुभव आला. “बझारव्वेच म्हणणे खरे होते हे स्पष्ट आहे,” तिला वाटले; “ते केवळ औत्सुक्यच होते; दुसरे काही नाही; आणि सुखलोलूपता, अहंमन्यता……”

“बाळांनो,” ती मोठ्याने म्हणाली, “तुमचे काय मत आहे; प्रेम ही केवळ काल्पनिक भावना आहे का?”

पण कत्या अगर अर्कादी यांपैकी कुणालाही तिच्या शब्दांचा अर्थ उमगला नाही. तिच्या सांनिध्यात ते लाजत; संभाषणाचा सहजगत्या ऐकलेला तुकडा त्यांच्या मनात घोळत होता. पण अना सर्गेव्नाने त्यांची मने लौकरच निर्भर केली; तिला ते मुळीच अवघड वाटले नाही,—तिने स्वतःचेच मन निर्भर केले होते.

अनुक्रमणिका

बझारव्च्या वृद्ध मातापित्यांना आपल्या पुत्राच्या आगमनाने आनंदाचे भरतेच आले, कारण ते अगदी अनपेक्षित होते. अरीना व्लास्येव्ना हर्षोत्फुल्ल होऊन गेली; ती घरात इकडून तिकडे सारखी पळत होती, इतकी की वासिली इवानोविच्नी तिची "कुक्कुट-कवड्याशी" तुलना केली; आणि खरेच तिच्या आखूड जाकिटाच्या शेपटीमुळे ती काहीशी पक्ष्यासारखी दिसत होती. ते स्वतः मात्र नुसतेच गुरगुरत होते, आणि आपल्या सुगंधी पाईपचे तोंड कुरतडत होते; किंवा बोटांनी आपली मान पकडून डोके इकडे तिकडे फिरवून पाहात होते, जणू ते धडावर बरोबर बसले आहे की नाही, हे आजमावत होते; आणि मग एकाएकी त्यांनी आपला रुंद जबडा उघडला आणि ते एकदम आवाज न करता गालातल्या गालात हसत सुटले. "अख्खे सहा आठवडे मी राहायला आलो आहे, गव्हर्नर," बझारव् त्यांना म्हणाला. "मला काम करायचे आहे, तेव्हा कृपा करून माझ्या आड येऊ नका."

"माझा चेहरा समोर दिसणे हाच अडथळा वाटत असेल, तर तो पूर्णपणे विसरून जा!" वासिली इवानोविच्नी उत्तर दिले.

त्यांनी आपला शब्द पाळला. आपल्या अभ्यासिकेत चिरंजीवाची प्रस्थापना एकदा केल्यानंतर, ते त्याच्यापासून शक्य तितके अलिप्त राहिले, आणि आपल्या पत्नीलाही प्रेमाच्या कळवळ्याचे अनावश्यक प्रदर्शन करण्यापासून परावृत्त केले "—एन्यूशाच्या मागच्या भेटीच्या वेळी," ते तिला म्हणाले, "आपण त्याला थोडा त्रास दिला; यावेळी आपण अधिक शहाणपणाने वागले पाहिजे." अरीना व्लास्येव्नाला नवऱ्याचे म्हणणे पटले; पण तेव्हढ्याने तिचे समाधान होणे शक्य नव्हते, कारण जेवणाचे वेळीच फक्त ती त्याला भेटत असे आणि आता तर त्याला उद्देशून बोलताना सुद्धा तिला धास्ती वाटे. "एन्युशेन्का," ती त्याला काहीवेळा हाक मारी.—आणि तो वळून पाहायच्या आधीच घाबरून जाऊन ती आपल्या बटव्याच्या गोंड्याशी चाळा करत पुटपुटत असे, "काही नाही, काही नाही, मी फक्त—" आणि मग वासिली इवानोविच्कडे जाऊन, आपल्या हातावर गाल टेकून त्यांचा सल्ला विचारी: "आज भोजनासाठी कोबीची कढी की, बीटच्या मुळाची आमटी चालेल, त्याला विचारून मला सांगाल का?"—"पण तूच त्याला का विचारलं नाहीस?" "छा: माझा त्याला कंटाळा येईल!" पण लौकरच बझारव्नेच स्वतःला खोलीत कोंडून घ्यायचे सोडून दिले; कामाची जिद्द ओसरून गेली, आणि त्याची जागा रूक्ष भकासपणाने अगर अस्पष्ट अस्वस्थतेने घेतली. एक विलक्षण थकवा त्याच्या सर्व हालचालींतून प्रतीत होऊ लागला; त्याची चालसुद्धा—निर्धारयुक्त, धिटाईची आणि जोमदार वाटे—ती सुद्धा बदलली. एकांतात दूरवर फिरायला जाणे त्याने सोडून दिले, आणि इतरांचा सहवास त्याला हवासा वाटू लागला; दिवाणखान्यात येऊन तो चहा घेऊ लागला, स्वैपाकघराजवळच्या बागेत तो वासिली इवानोविच्बरोबर फिरू लागला; आणि त्यांच्या सहवासात शांतपणे धूम्रपान करत बसू लागला; एकदा तर त्याने फादर ॲलेक्सीसंबंधी चौकशीसुद्धा केली. वासिली इवानोविच्ना या बदलाने प्रथम हर्ष झाला, पण हा त्यांचा आनंद फार काळ टिकला नाही. "एन्यूशाकडे पाहून माझे हृदय विदीर्ण होते," आपल्या पत्नीला एकांतात ते म्हणाले; "तो नाराज किंवा रागावलेला नाही—तसे असते तर काहीच बिघडले नसते; तो उदास, दुःखी आहे—तेच भयंकर आहे. तो सतत अबोल असतो. आमच्यावर तो भडकला तरी चालेल; तो कृश होत चालला आहे, त्याची कांती नाहीशी झाली आहे."—"प्रभो, दया कर आमच्यावर, दया कर!" म्हातारी कुजबुजली; "त्याच्या गळ्यात मंतरलेला ताईत घालावा म्हणते, पण अर्थात्च तो मान्यता देणार नाही." वासिली इवानोविच्नी अनेकवेळा त्याला त्याच्या कामाबद्दल, त्याच्या प्रकृतीबद्दल, आणि अर्कादीबद्दल आडवळणाने चौकशी करण्याचा

प्रयत्न केला......पण बझारव्ची उत्तरे टाळाटाळ करणारी आणि मामुली असत; एकदा संभाषणाचा ओघ आपले वडील एका विशिष्ट गोष्टीकडे वळवीत आहेत, हे ध्यानात आल्याबरोबर त्रासिक आवाजात तो त्यांना म्हणाला, "माझ्या भोवती भोवती असे चोरून घिरट्या का घालता? पूर्वीपेक्षा हे अधिक वाईट आहे."—"छे, छे, माझा तसा काहीच उद्देश नव्हता!" बिचाऱ्या वासिली इवानोविच्नी तातडीने उत्तर दिले. अशा तऱ्हेने त्यांचे युक्तिबाज बेत विफल झाले. एके दिवशी त्यांनी शेतमजुरांचा होणार असलेला उद्धार, प्रगती यासंबंधी बोलणे काढून त्याची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला; पण त्याने फारशी उत्साहाने उत्तरे दिली नाहीत. "कालच मी कुंपणाखालून जात होतो, तेव्हा शेतकऱ्यांची पोरे एखादे जुने गाथागीत गायचे सोडून कुठलेतरी एक सस्ते गीत तारस्वरात बरळत होती. आहे खरी प्रगती."

कधीमधी बझारव् खेड्यात जायचा, आणि आपल्या स्वभावाप्रमाणे थट्टेच्या स्वरात एखाद्या शेतकऱ्याशी बोलणे काढायचा: "सांग," तो त्याला म्हणायचा, "भय्या, जीवनाबद्दल तुझे मत मला स्पष्ट करून सांग; रशियाचे भवितव्य व शक्ती तुमच्या हातात आहे असे म्हणतात, इतिहासात तुम्ही एक नवीन पर्व सुरू करणार आहात—आमची अस्सल भाषा व कायदेकानूही तुम्हीच आम्हाला देता."

तो शेतकरी बहुधा उत्तर देत नसे, किंवा, "अस्से, प्रयत्न करू......कारण......असे पाहा......नि:संशय......" असे काही तरी बरळत असे.

"मला तुम्ही "रशियन समाज" म्हणजे काय ते सांगा," त्याला मध्येच थांबवून बझारव् विचारत असे; "हा "रशियन समाज" म्हणजे तीन माशांवर आधारित असतो असे म्हणतात, तोच का?"

"मायबाप, तीन माशांच्या आधारावर असते ती पृथ्वी," तो शेतकरी समजावणीच्या स्वरात, एखाद्या भविष्यवाणीप्रमाणे. वडिलधाऱ्या, साध्याभोळ्या स्वरांत गाणे गुणगुणल्यासारखे उत्तर देई; "आणि आमच्यावर, म्हणजेच—'रशियन समाजावर,' परमेश्वराची इच्छा; पर्यायाने तुम्हीच आमचे मायबाप. आणि मालकाचा दरारा जेव्हढा अधिक, तेव्हढे शेतकऱ्याचे भले."

एकदा असे उत्तर ऐकून बझारव्ने तिटकाऱ्याने खांदे उडविले आणि तो जाण्यासाठी वळला; आणि इकडे तो शेतकरी शांतपणे घराकडे चालता झाला.

"काय म्हणत होता तो?" मध्यम वयाच्या एका शेतकऱ्याने त्याला विचारले; त्याच्या चेहेऱ्यावर तुसडेपणाचा भाव होता; आपल्या झोपडीतून त्याने त्याचे बझारव्शी चाललेले संभाषण ऐकले होते.—"थकबाकी? होय ना?"

"थकबाकी नाही, दोस्त!" त्या पहिल्या शेतकऱ्याने उत्तर दिले, आणि यावेळी मात्र त्याच्या आवाजात तो वडिलधाऱ्या माणसाने गुणगुणल्यासारखा चढउतार नव्हता; उलट त्याच्या आवाजात एक प्रकारचा तिरसट आढ्यतेखोरपणा जाणवत होता. "काहीतरी वटवटत होता बुवा; त्याला थोडी जीभ ढिली करायची होती असे दिसते. अर्थात तो एक सद्गृहस्थ आहे, त्याला काय कळते?"

"त्याला काय कळायला हवे!" तो दुसरा शेतकरी उत्तरला; आणि मग आपल्या टोप्या मागे सारत आणि कमरेचे पट्टे खाली ढकलत ते आपली कामे, आपल्या गरजा या विषयावर बोलत राहिले. अरेरे !

अनुक्रमणिका

तिरस्काराने खांदे उडवून जाणारा, ज्याला शेतकऱ्यांशी कसे बोलावे हे ठाऊक होते (पावेल पित्रोविच्शी उडालेल्या खटक्यात त्याने बढाई मारली होती), अशा या बझारव्ला आपल्या कर्तृत्वाबद्दल इतका आत्मविश्वास होता की, या शेतमजुरांच्या लेखी आपण एक गमत्या विदूषक आहोत असा त्याला संशयही कधी आला नाही.

पण शेवटी त्याला उद्योग मिळाला. एके दिवशी वासिली इवानोविच् एका शेतकऱ्याच्या जखमी पायावर त्याच्यासमोर मलमपट्टी बांधत होते; पण त्या वृद्ध पित्याचे हात थरथरत होते आणि त्यांना व्यवस्थितपणे जखम बांधणे जमले नाही; त्यांच्या पुत्राने त्यांना सहाय्य केले, आणि मधून मधून त्यांच्या वैद्यकीय कामात तो सहभागी होऊ लागला; पण त्याचवेळी स्वतः सांगितलेल्या उपायांवर व वडिलांवरही तो उखडत होता; त्याचे वडील मात्र त्याने सुचविलेले उपाय तात्काळ अंमलात आणत होते. पण बझारव्च्या तिरस्कारयुक्त बोलण्याचा वासिली इवानोविच्वर काही परिणाम झाला नाही, किंबहुना त्याचे त्यांना समाधानच वाटत होते. आपला तेलकट ड्रेसिंगगाऊन आपल्या पोटावर दोन बोटांच्या चिमटीत धरून, तोंडातल्या पाईपचे झुरके घेत, ते बझारव्चे बोलणे उत्साहाने ऐकत; त्याचे शेरेताशेरे जितके कडवट असत, तितके त्याच्या आनंदी वडिलांचे खिदळणे अधिक प्रसन्न असे; आणि हसताना आपले काळे दात ते सर्वांना दाखवत. काही निरर्थक आणि निर्हेतूक प्रत्युत्तरे ते पुनःपुन्हा उच्चारत; उदाहरणार्थ, पुढे खूप दिवस ते एकच एक वाक्य असंबद्धपणे पुनःपुन्हा बडबडत, "ते कार्य काही प्रथम प्राधान्य देण्यासारखे नाही!" कारण काय, तर ते प्रातःकाळच्या प्रार्थनेला जाताना त्यांच्या चिरंजीवाने तो वाक्यप्रयोग केला होता. "प्रभूची कृपा, तो आपल्या विषादपूर्ण अवस्थेतून बाहेर पडला आहे!" ते आपल्या पत्नीजवळ कुजबुजले; "आज त्याने माझी अशी जिरवली, बस्स!" याशिवाय आपल्याला असा मदतनीस मिळाला या कल्पनेने त्यांच्या आनंदाला उधाण आले, अभिमानाने त्यांची छाती फुगली. "बघ, बघ," ते एखाद्या पुरुषी पोषाख केलेल्या शेतकरी स्त्रीला उद्देशून म्हणत; तिच्या माथ्यावर शिंगे लावल्यासारखी दिसणारी टोपी असे; तिच्या अशा अवतारात तिला गोलॅर्डच्या काढ्याची बाटली किंवा पांढऱ्या मलमाची डबी देत ते म्हणत, "म्हातारे, माझ्या मुलाच्या इथल्या वास्तव्यातील प्रत्येक मिनिटाबद्दल तू परमेश्वराचे ऋणी असले पाहिजेस; आता अगदी शास्त्रीय पद्धतीने अत्याधुनिक साधनांनी तुझ्यावर औषधोपचार केला जाईल. म्हणजे काय तुला समजते का? फ्रेंचाचा बादशहा तो नेपोलीयन—त्यालासुद्धा एव्हढा चांगला डॉक्टर मिळलेला नाही. ती शेतकरी बाई केवळ आपल्याला कसेसेच होते (या शब्दांचा निश्चित अर्थ काय हे अर्थात तिलाही स्पष्ट करता आले नसते.) हे सांगायला आलेली होती; ती फक्त अभिवादनार्थ वाकली आणि छातीशी बांधलेल्या टॉवेलच्या कोपऱ्यात चार अंडी बांधलेली होती. तेथे धुंडाळू लागली."

बझारव्ने एकदा एका फेरीवाल्या कापडविक्याचा दातसुद्धा उपटून दिला; आणि हा दात सर्वसामान्य दातासारखाच होता, तरीही वासिली इवानोविच्नी तो असाधारण कुतूहलाचा विषय असल्यासारखा जपून ठेवला होता, आणि फादर अलक्सीना तो दाखवून ते सारखे तेच तेच म्हणत होते, "काय सुळा आहे! काय एव्गेनीची ताकद! तो फेरिवाला हवेत उडतो की काय असे वाटले. तो ओकचा असता, तरी सुद्धा त्याने त्याला उपटून काढला असता!"

"मोठा होतकरू!" फादर अलेक्सी काहीतरी बोलायचे म्हणून म्हणायचे; त्या हर्षोन्माद झालेल्या वृद्धापासून कशी सुटका करून घ्यावी हे त्यांना समजत नसे.

एके दिवशी शेजारच्या खेड्यातील एका शेतकऱ्याने विषमज्वराने आजारी असलेल्या भावाला वासिली इवानोविच्‌कडे आणले. गवताच्या पेंढ्यावर टाकलेला तो दुर्दैवी मनुष्य मरणाच्या पंथाला लागला होता; त्याच्या शरीरावर काळे चट्टे पडले होते; त्याची शुद्ध हरपून बराच अवधी लोटला होता. रोग्याला वेळेवर औषधे न मिळवून दिल्याबद्दल वासिली इवानोविच्‌नी खेद व्यक्त केला आणि त्याच्या जगण्याची आशा नाही असे सांगून टाकले. आणि खरेच, त्या शेतकऱ्याला आपला भाऊ काही घरापर्यंत नेता आला नाही; तो गाडीतच मरण पावला.

तीन दिवसांनी बझारव्‌ने वडिलांच्या खोलीत येऊन त्यांच्याकडे क्षारक आहे का असे विचारले.

"आहे; कशासाठी तुला हवे आहे ते?"
"थोडे पाहिजे आहे......एक जखम भाजण्यासाठी."

"कुणासाठी?"

"माझ्यासाठी."

"काय, तुझ्यासाठी? काय झाले? कसली जखम? कुठे आहे जखम?"

"या इथे, माझ्या बोटावर. मी आज खेड्यात गेलो होतो; तिथे तो विषमज्वराचा रोगी त्यांनी आणला होता. कुठल्यातरी कारणासाठी ते त्याचे शवविच्छेदन करणार होते, आणि मला बऱ्याच दिवसांत असल्या प्रकारच्या कामाचा सराव नाही."

"मग?"

"मग काय, मी जिल्ह्याच्या डॉक्टरला त्याबद्दल विचारले; आणि नंतर शवविच्छेदन केले."

वासिली इवानोविच्‌ एकदम पांढरे फटक पडले, आणि एकही शब्द न बोलता ते तडक आपल्या अभ्यासिकेकडे धावले; तितक्याच वेगाने ते थोडे क्षारक घेऊन परत आले. बझारव्‌ ते घेऊन जायला निघाला.

"कृपा करून," वासिली इवानोविच्‌ म्हणाले, "मलाच ते करू दे." बझारव्‌ने स्मित केले, "किती सेवानिष्ठ डॉक्टर आहात!"

"हसू नको, बाबा. ते बोट दाखव. जखम काही फार मोठी नाही. दुखते का?"

"दाब द्या जोराने; घाबरू नका."

वासिली इवानोविच्‌ थांबले. "एव्गेनी, तुझे काय मत आहे; तापलेल्या सळीने ती जखन भाजून काढणेच अधिक बरे नव्हे का?"

अनुक्रमणिका

"ते अधिच करायला हवे होते; इतक्या उशिरा त्या क्षारकाचाही उपयोग नाही. मला लागण झालीच असेल तर, आता उपाय करायला ही फार उशीर झाला आहे."

"ते कसे...... उशीर......" वासिली इवानोविच्च्या तोंडून शब्द फुटत नव्हता.

"मला तसे वाटते! आता चार तास होऊन गेले आहेत."

वासिली इवानोविच्नी क्षारकाने जखम आणखी थोडी भाजली. "पण त्या जिल्ह्याच्या डॉक्टरकडे क्षारक नव्हते?"

"नव्हते,"

"हाय रे देवा, असे कसे नव्हते? इतकी अत्यावश्यक वस्तू डॉक्टरकडे नसावी!"

"तुम्ही त्याची विच्छेदनास्त्रे पाहायला हवी होतीत," बझारव् तिथून जाता जाता म्हणाला.

त्या रात्री खूप उशिरापर्यंत आणि दुसऱ्या दिवशी सबंध दिवसभर, वासिली इवानोविच् प्रत्येक क्षुल्लक सबबीवर आपल्या मुलाच्या खोलीत सारखे जात होते; आणि त्यांनी जखमेचा जरी प्रकट उल्लेख केला नाही—त्यांनी अगदी क्षुल्लक विषयावर सुद्धा बोलण्याचा प्रयत्न केला—तरी ते त्याच्या चेहेऱ्याकडे इतक्या अविचलित नजरेने पाहात आणि इतक्या धास्तीने ते त्याच्यावर लक्ष ठेवीत होते की, बझारव्च्या सहनशीलतेची मर्यादा संपली, आणि तिथून निघून जाण्याची त्याने धमकी दिली. वासिली इवानोविच्नी त्याला उपद्रव न देण्याचे आश्वासन दिले, अधिक तत्परतेने आश्वासन दिले, कारण अरीना व्लास्येव्नाने त्यांना झोप का येत नाही, अलीकडे त्यांना काय झाले आहे वगैरे प्रश्न विचारून त्यांना सतवायला सुरवात केली होती; तिच्यापासून अर्थात्च त्यांनी ते सर्व लपवून ठेवले होते. पुढे दोन पूर्ण दिवस त्यांनी संयम पाळला, तरीही आपल्या मुलावर त्यांनी गुप्तपणे सतत नजर ठेवली होती, पण त्याच्या चेहऱ्यावरची लक्षणे काही ठीक नव्हती......तिसऱ्या दिवशी भोजनाच्या वेळी मात्र त्यांना राहावले नाही. बझारव् मान खाली घालून बसला होता, त्याने अन्नाला स्पर्श केला नव्हता.

"एव्गेनी, तू काहीच खात नाहीस?" आपला चेहेरा शक्य तितका निर्विकार ठेवत त्यांनी विचारले. "स्वयंपाक चांगला झाला आहे असे मला वाटते."

"मला काही नको आहे, म्हणून खात नाही."

"भूक नाही का?" त्यांनी भीतभीत विचारले; "डोके दुखते का?"

"होय. अर्थातच, डोके ठणकते."
अरीना व्लास्येव्ना ताठ बसली आणि लक्षपूर्वक ऐकू लागली.

अनुक्रमणिका

“एव्गेनी, कृपा कर, रागावू नको,” वासिली इवानोविच् पुढे म्हणाले; “मला नाडी पाहू देशील?”

बझारव् उठला. “मी तुम्हाला नाडी न पाहता सांगू शकतो—मला ताप आहे.”

“हुडहुडी भरल्यासारखी वाटते का?”

“होय, हुडहुडी सुद्धा भरली आहे. मी जाऊन पडतो, माझ्यासाठी थोडा ईडलिंबूच्या फुलांचा काढा पाठवून द्या. मला हिंव भरले असले पाहिजे.”

“तरीच, काल रात्री तू खोकत असलेले ऐकू आले.” अरीना व्लास्येव्नाने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

“मला हिंव भरले आहे,” बझारव्ने पुनरुच्चार केला आणि तो निघून गेला.

अरीना व्लास्येव्ना लगेच ईडलिंबूच्या फुलांचा काढा करायच्या तयारीला लागली, तर वासिली इवानोविच् बाजूच्या खोलीत जाऊन हताशपणे आपले केस ओरबाडत बसले.

त्या दिवशीही बझारव् पुन्हा उठला नाही, आणि सबंध रात्र त्याने जडावलेल्या, अर्धवट बेशुद्धावस्थेत घालविली. रात्री एक वाजता त्याने प्रयत्नपूर्वक डोळे किलकिले केले आणि दिव्याच्या उजेडात त्याला आपल्या वडिलांचा निस्तेज चेहेरा दृष्टीस पडला; ते ओणवे उभे होते; त्याने त्यांना बाहेर जायला सांगितले. म्हाताऱ्याने दिलगिरी व्यक्त केली, पण ताबडतोब ते पायाच्या अंगठ्यावर चालत मागे फिरले, आणि कपाटाच्या दाराआड उभे राहून त्याच्याकडे निश्चल नजरेने पाहात राहिले. अरीना व्लास्येव्नाही झोपली नव्हती; अभ्यासिकेचा दरवाजा तिने थोडा किलकिला ठेवला होता. ‘एन्यूशाचा श्वासोच्छ्वास कसा चालला आहे, हे ऐकण्यासाठी, आणि वासिली इवानोविच्वरही नजर ठेवता यावी म्हणून ती वरचेवर तेथे येत राहिली. त्याच्या वाकलेल्या पाठीखेरीज तिला काहीच दिसत नव्हते, पण तेव्हढ्यानेही तिला अल्पसे समाधान मिळत असावे. सकाळी बझारव्ने उठण्याचा प्रयत्न केला; पण त्याला भोवळ आली, त्याच्या नाकातून रक्त ठिबकू लागले; तो पुन्हा पडून राहिला. काहीही न बोलता वासिली इवानोविच् त्याची सेवा करत होते; अरीना व्लास्येव्ना आत गेली व त्याचे कसे काय तिने विचारले. “बरे आहे,” त्याने उत्तर दिले, आणि भिंतीकडे तोंड वळविले. वासिली इवानोविच्नी हताशपणे तिच्यापुढे हात हलविले; रडणे आवरण्यासाठी तिने आपले ओठ दाबून धरले आणि ती बाहेर गेली. सबंध घर एकाएकी अंधःकारमय झाले; प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर काळजीची छटा पसरली; सर्वत्र एक विलक्षण शांतता भरून राहिली होती; कर्कशपणे ओरडणाऱ्या एक कोंबड्याची का कुणास ठाऊक परसातून खेड्याकडे रवानगी केली गेली. बझारव् तसाच भिंतीकडे तोंड करून पडला होता. वासिली इवानोविच्नी त्याला अनेक प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला; पण त्या प्रश्नांनीच त्याला थकवा आला; तो वृद्ध आपल्या आरामखुर्चीत, अधूनमधून बोटांचे सांधे मोडत, बसून राहिला. काही मिनिटे ते बागेत गेले आणि तिथे पुतळ्यासारखे निश्चल उभे राहिले, जणू अनिर्वचनीय विस्मयात ते बुडून गेले होते (हा सबंध वेळ त्यांच्या चेहेऱ्यावरील विस्मितभाव काही कमी झाला नव्हता), आणि मग पुन्हा ते आपल्या मुलाकडे गेले; वाटेत त्यांनी आपल्या पत्नीच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. शेवटी तिने त्यांचा दंड पकडला, आणि व्याकुळ होऊन जवळ जवळ धमकावणीच्या स्वरात विचारले, “त्याला काय झाले आहे तरी काय?” मग ते भानावर आले आणि उत्तरादाखल चेहेऱ्यावर त्यांनी बळेच स्मित आणले; पण स्मित करण्याऐवजी एकाएकी त्यांना खोखो

अनुक्रमणिका

हसण्याची उबळ आली, आणि त्याची त्यांना फार भीती वाटली. पहाटेच डॉक्टरला बोलवायला त्यांनी मनुष्य धाडला होता. आपल्या मुलाला ही गोष्ट कळविणे त्यांना आवश्यक वाटले, नाहीतर तो रागावला असता. बझारव् एकदम सोफ्यावर वळला, आणि आपल्या पित्यावर आपली खिन्न नजर रोखून त्याने पाणी मागितले.

वासिली इवानोविच्नी त्याला थोडे पाणी दिले. आणि त्याचवेळी त्यांनी त्याच्या कपाळावर हात ठेवून पाहिले. तिथे जणू विस्तव ठेवला होता.

“बाबा,” बझारव् मंद झोपाळू आवाजात म्हणाला; “माझे लक्षण काही ठीक नाही; मला लागण झालेली आहे, आणि काही दिवसांतच तुम्हाला मला पुरून टाकावे लागेल.”

वासिली इवानोविच् मागे कोलमडले, जणू त्यांच्या पायावर कुणीतरी जबरदस्त तडाखा हाणला होता.

“एव्गेनी!” ते अडखळत म्हणाले; “काय बोलतोस हे! ......प्रभू तुझ्यावर दया करो! तुला थंडी बाधली आहे!”

“शूऽ!” बझारव्ने त्यांना मुद्दाम थांबविले. “डॉक्टरने असे बोलता कामा नये. लागण झाल्याचे प्रत्येक लक्षण स्पष्ट दिसत आहे; तुम्हाला स्वतःला ती माहीत आहेत.”

“कुठे आहेत ती लक्षणे......लागण झाल्याची...... एव्गेनी? ......हाय रे देवा!”

“हे काय?” बझारव् म्हणाला, आणि त्याने आपल्या अंगरख्याची बाही वर ओढून सबंध हातावर उठत असलेले अनिष्ट सूचक तांबडे चट्टे त्यांना दाखविले.

वासिली इवानोविच्ना भीतीने हुडहुडी भरली होती आणि ते थरथरत होते.

“समजा,” शेवटी ते म्हणाले, “समजा, असे धरून चालू की......लागण झाल्यासारखे......”

“रक्तपिती असावी” बझारव्ने मध्येच सुचविले.

“असे, असे,......म्हणजे साथीच्या रोगाचा......”

“रक्तपिती”, कठोरपणे आणि स्पष्टपणे बझारव्ने पुनरुच्चार केला; “तुमची पाठ्यपुस्तके तुम्ही विसरलात काय?”

“बरे......तू म्हणतोस तसे का असेना...... काहीही करून आम्ही तुला बरे करू!”

“पुरे, ही भोंदूगिरी. तो काही मुद्दा नाही. इतक्या लौकर मी मरणार असे मला वाटत नव्हते; खरे सांगायचे म्हणजे, ही अतिशय खेदजनक घटना आहे. तुम्ही आणि आईने तुमच्या धार्मिक श्रध्दांचा पुरेपूर फायदा उठविला पाहिजे; त्या श्रद्धा कसोटीला लावण्याची हीच वेळ आहे.” त्याने पाण्याचा घुटका घेतला. “माझे डोके अजूनही माझ्या ताब्यात आहे तोवर......मला एका गोष्टीसंबंधी विचारायचे आहे. उद्या किंवा परवा माझा मेंदू आपला राजीनामा पाठवून देईल. आता सुद्धा मी सुसंबद्धपणे बोलत असेन याबद्दल मला खात्री नाही. इथे अशा पडलेल्या अवस्थेत मला सारखे वाटते आहे की, माझ्या-भोवती तांबडी कुत्री फेर धरून पळताहेत, आणि तुम्ही त्यांना मी एखाद्या शिकारीचा पक्षी असल्यासारखे माझ्याकडे बोट करून दाखविता आहात. दारू पिऊन झिंगल्यासारखा. मी बोलतो त्याचा अर्थबोध होतो ना?”

“तू अगदी सुस्पष्टपणे बोलतो आहेस, एव्गेनी, या विषयी खात्री बाळग.”

“मग हरकत नाही. डॉक्टरला बोलावणे पाठविते आहे असे तुम्ही म्हणालात. स्वतःला दिलासा देण्यासाठी तुम्ही तसे केले......मलाही दिलासा देण्यासाठी; एक निरोप्या पाठवा......”

“अर्कादी निकालाएविच्कडे?” त्या वृद्ध पित्याने मध्येच प्रश्न केला.

“कोण अर्कादी निकालाएविच्?” संभ्रमात पडल्यासारखे बझारव्ने विचारले...... “हो, हो! ते कोंबडीचे पिलू! नको, त्याला सोडून देऊ या; त्याचा आता डोमकावळा बनला आहे. चकित होऊ नका; अजून मला भ्रम झालेला नाही. मादाम अदिन्त्सवा—अना सर्गेव्नाकडे कुणीतरी माणूस पाठवा; तिची जमिनदारी आहे......तुम्हाला ठाऊक आहे?” (वासिली इवानोविच्नी मान डोलवली.) “निरोप सांगा की, एव्गेनी बझारव् आपल्याला सदिच्छा पाठवत आहे, आणि त्याचा निरोप असा आहे की, तो मरणाच्या पंथाला लागला आहे. एव्हढे कराल का?”

“होय, मी करीन ते......पण एव्गेनी, तू मृत्यू पावणे शक्य आहे का? ......विचार कर! असे झाले तर परमेश्वराच्या घरी न्याय आहे असे कोण म्हणेल?”

“मला त्यातले काही माहीत नाही; तुम्ही फक्त निरोप घेऊन माणूस पाठवा.”

“ताबडतोब, आणि मीच पत्र लिहितो.”

“नको, कशाला? मी फक्त शुभेच्छा पाठवत आहे एवढे सांगा; यापेक्षा अधिक काही नको. आणि आता मी माझ्या कुत्र्यांकडे वळतो. विलक्षण! मला माझे विचार मृत्यूवर स्थिर करायचे आहेत, पण त्यातून काहीच निष्पन्न होत नाही. मला काहीतरी अंधुक असे दिसते......बाकी काही नाही.”

तो पुन्हा कष्टाने भिंतीकडे वळला;......वासिली इवानोविच् अभ्यासिकेतून बाहेर पडले, आणि कसेतरी कडमडत आपल्या पत्नीच्या खोलीपर्यंत पोचल्यावर पवित्र तसबिरीसमोर आपल्या गुडघ्यावर मटकन बसले.

“अरीना, आपणा सर्वांसाठी प्रार्थना कर!” ते विव्हळत म्हणाले; “आपला मुलगा मृत्यूच्या वाटेवर आहे.”

अनुक्रमणिका

डॉक्टर आले; तेच जिल्हा डॉक्टर की ज्यांच्याकडे क्षारक उपलब्ध नव्हते; त्यांनी एकदा रूग्णाकडे नजर टाकली आणि शीतोपचार चालू ठेवण्याचा सल्ला दिला; त्याचवेळी त्यांनी रोगी बरा होण्याची शक्यता बोलून दाखविली.

"मी ज्या अवस्थेत आहे, त्या अवस्थेतला मनुष्य परधामाला गेला नाही असा एकतरी तुम्हाला आढळला आहे का?" बझारव्ने विचारले; आणि एकाएकी सोफ्याजवळच असलेल्या एका जाडजूड टेबलाचा पाय ओढून त्याने त्याला गिरकी दिली, आणि ते दूरवर ढकलून दिले; "ही ताकद पाहा, ताकद," तो पुटपुटला; "इथली प्रत्येक वस्तू जशीच्या तशी आहे, आणि मी मात्र मरणार आहे!......जराजर्जर माणसाला जीवनापासून विलग होण्यासाठी निदान वेळ मिळतो, पण मला मात्र ......बरे, मृत्यू खोटा ठरविण्याचा तुम्ही प्रयत्न करून पहा. मृत्यूच तुम्हाला खोटे ठरवील, एव्हढेच! कोण रडते आहे तिकडे?" किंचित थांबून त्याने विचारले :— "आई? बिचारी! तिने बनविलेले बीटचे उत्कृष्ट सूप आता ती कुणाला भरवील? तुम्ही, वासिली इवानोविच्, तुम्हीसुद्धा स्फुंदू लागलेले आहात, खात्रीने! खिश्चन धर्म जर तुमच्या मदतीला धावून येत नसेल तर, तत्त्वज्ञ बना, विरक्त बना नाहीतर आणखी कुणी बना! अरेच्या, आपण तत्त्वज्ञ आहोत अशी तुम्हीच नव्हती का बढाई मारली?"

"मी, आणि तत्त्वज्ञानी!" वासिली इवानोविच् कळवळून म्हणाले; त्यांच्या गालांवरून अश्रू ओघळू लागले.

तासागणिक बझारव्ची प्रकृती बिघडत चालली होती; रोगाची वाढ झपाट्याने होत होती, शल्यविषबाधेत नेहमीच असे होते. अजूनही त्याची शुद्ध हरपली नव्हती, त्याला उद्देशून बोललेले त्याला अजूनही कळत होते; तो अजूनही झगडत होता. "माझी जाणीव हरपता कामा नये," मुठी आवळत तो पुटपुटला; "किती सडले आहे सगळे!" आणि एकदम म्हणत सुटे, "आठातून दहा वजा केले, किती राहिले?" वासिली इवानोविच् झपाटल्यासारखे इकडून तिकडे भरकटत होते; एकदा हा उपाय करून पाहा, मग दुसरा असं म्हणायचे, आणि शेवटी काहीच न करता, फक्त आपल्या मुलाचे पाय त्यांनी झाकून टाकले. "थंड पट्टया ठेवा......वांतीचे औषध......पोटावर मोहरीचा लेप......रक्तविरेचन," असे काहीतरी प्रयत्नपूर्वक ते पुटपुटत होते. डॉक्टरना थांबण्यास त्यांनी विनविले; त्यांच्या विनंतीस संमती देऊन डॉक्टरनी रुग्णास लिंबाचे सरबत द्यायला सांगितले, आणि स्वतःसाठी पाईप आणि काहीतरी "दाहक व शक्तीवर्धक" म्हणजेच ब्रँडी आणण्यास सांगितले. अरीना व्लास्येवना दाराजवळ एका स्टुलावर बसली होती; मधून मधून प्रार्थना करायलाच तेव्हढी ती बाहेर जात होती. काही दिवसांपूर्वी तिच्या हातून एक आरसा खाली पडून फुटला होता, आणि ते अशुभ चिन्ह आहे असे तिला नेहमीच वाटले होते; अन्फिशुश्का सुद्धा तिला काही सांगू शकत नव्हती. टिमोफिच् मादाम अदिन्त्सवाकडे गेला होता.

ती रात्र बझारव्ला फार वाईट गेली......तापाने फणफणत तो वेदना भोगत होता. सकाळी त्याला किंचित आराम वाटला. अरीना व्लास्येवनाला त्याने आपले केस विंचरायला सांगितले; तिच्या हाताचे चुंबन घेतले; आणि चहाचे दोन घुटके घशाखाली घातले. वासिली इवानोविच् थोडे प्रफुल्लित झाले.

"प्रभूचे आभार!" ते म्हणत राहिले; "आता आणीबाणीची वेळ आली आहे; आणीबाणी अगदी जवळ येऊन ठेपली आहे!"

"माणूस कसा विचार करतो!" बझारव् पुटपुटला; "शब्द काय करणार आहे! त्यांना तो सापडला आहे; ते "आणीबाणी" म्हणाले, आणि त्यांना दिलासा वाटला. माणसाची शब्दावरील श्रद्धा ही एक थक्क करून सोडणारी गोष्ट आहे. एखाद्याला, उदाहरणार्थ, झोडपून काढण्याऐवजी 'तू मूर्ख आहेस' असे म्हटले तर, त्याची स्थिती केविलवाणी होईल; त्यालाच 'तू हुशार आहेस' असे म्हणा, मग तुम्ही त्याचे देणे जरी नाही दिले तरीसुद्धा तो हुरळून जाईल."

बझारव्च्या या छोट्या भाषणाने वासिली इवानोविच्ना त्याची पूर्वीची तशीच प्रत्युत्तरे आठवली आणि त्यांचे हृदय गदगदले.

"शाब्बास! छान, छान!" टाळ्या पिटत बोलावे तसे ते मोठ्याने म्हणाले.

बझारव्च्या चेहेऱ्यावर विषण्ण स्मित उमटले.

"मग तुम्हाला काय वाटते," तो म्हणाला; "आणीबाणीची वेळ येऊन गेली की, यायचीच आहे?"

"तुला बरे वाटत आहे, हे स्पष्ट आहे. त्याचाच मला आनंद होत आहे," वासिली इवानोविच्नी उत्तर दिले.

"छान, ठीक; आनंदीआनंद करणे केव्हाही चांगलेच. आणि आठवते का? तुम्ही तिला निरोप पाठविला आहे का?"

"मी अलबत निरोप पाठविला आहे."

त्याच्या प्रकृतीतली सुधारणा फार वेळ टिकली नाही. व्याधीचे हल्ले सुरूच होते. वासिली इवानोविच् बझारव्जवळ बसून होते. ते वृद्ध गृहस्थ कुठल्यातरी विशिष्ट मनोवेदनेने ग्रस्त झाले होते. कित्येक वेळा त्यांनी बोलण्यासाठी तोंड उघडले, पण ते बोलू शकले नाहीत.

"एव्‌गेनी!" शेवटी ते कसेतरी उद्‌गारले; "माझ्या प्रिय, एकुलत्या मुला!"

अशा अपरिचित शब्दांनी हाक मारल्याचा बझारव्वर फार परिणाम झाला. त्याने आपली मान किंचित वळवली, आणि विस्मृतीच्या प्रचंड दडपणाशी मुकाबला करत कसेतरी तो म्हणला, "काय, बाबा?"

"एव्‌गेनी," असे म्हणत वासिली इवानोविच्नी बझारव्समोर एकदम गुडघ्यावर बैठक मारली; पण बझारव्ने डोळे मिटले होते आणि तो ते पाहू शकत नव्हता. "एव्‌गेनी, तुला आता बरे वाटते; प्रभुकृपेने तू बरा होशील; पण या वेळेचा उपयोग कर, तुझ्या मातापित्यांचे सांत्वन कर; ख्रिस्ती माणसाचे कर्तव्य पार पाड! तुला हे सांगताना माझ्या मनात काय चालले आहे ते भयंकर आहे; पण अधिक भयंकर......अनंत कालपर्यंत,......एव्‌गेनी......थोडा विचार कर, किती......"

अनुक्रमणिका

म्हाताऱ्याचा आवाज हुंदक्याने पिचला; आणि त्याच्या मुलाचे डोळे मिटलेले होते तरी, त्याच्या चर्येवर एक विलक्षण छटा उमटली.

“तुम्हाला त्यामुळे दिलासा वाटणार असेल तर, मी नकार देणार नाही,” प्रयासपूर्वक तो शेवटी म्हणाला; “पण मला वाटते त्यासाठी इतकी त्वरा करण्याची गरज नाही. मला आता बरे वाटते असे तुम्हीच म्हणता ना?”

“होय, एव्गेनी, तुला खात्रीने आता बरे आहे; पण कुणास ठाऊक, दैवाधीन गोष्टी; आपण आपले कर्तव्य......”

“नाही, मी आणखी थोडी वाट पाहाणार आहे,” बझारव् मध्येच म्हणाला. “आणीबाणीची वेळ आलेली आहे हे खरे. आणि आपण चुकलो असलो तर......, ठीक! बेशुद्धावस्थेतील माणसावर ते अखेरचे संस्कारकर्म करतात, हे तुम्हाला ठाऊक आहेच.”

“एव्गेनी, मी तुझ्याजवळ एव्हढे मागणे मागतो.”

“मी थोडी वाट पाहाणार आहे. आणि आता मी झोपी जातो. मला त्रास देऊ नका.” आणि त्याने मागच्या उशीवर आपले मस्तक विसावले.

तो वृद्ध पिता उठला; आरामखुर्चीत बसून आपली दाढी कुरतडत ते आपलीच बोटे चावू लागले......

दूरवरून येणाऱ्या एका छोट्या, स्प्रिंगच्या वाहनाचा आवाज त्यांच्या कानावर पडला; ग्रामीण भागातील विजनवासात हा आवाज विशेष प्रकारे जाणवतो. त्या छोट्या चाकांचा आवाज आता अधिकाअधिक जवळ ऐकू येऊ लागला होता; घोड्यांचे खिंकाळणेसुद्धा आता ऐकू येऊ लागले...... वासिली इवानोविच् ताडकन उठले आणि लहानशा झरोक्याकडे धावले. त्याच्या लहान घरासमोरच्या अंगणात एक गाडी प्रवेश करत होती; त्यात दोन बैठकी होत्या, आणि गाडीचे चार घोंडे एका रांगेत जुंपलेले होते. औपचारिकदृष्ट्या शोभेल की, नाही याचा विचार न करता एक प्रकारच्या असमंजस हर्षोन्मादाची उबळ येऊन ते बाहेर पायऱ्यापर्यंत पळत गेले......गणवेश पेहेरलेला एक हुजऱ्या गाडीचा दरवाजा उघडत होता; तोंडावर काळा पडदा ओढलेली अंगावर काळी शाल पांघरलेली एक स्त्री त्यातून उतरत होती......

“मी मादाम अदिन्त्सवा,” ती म्हणाली. “एव्गेनी वासिलीइच् अजून जिवंत आहे का? तुम्ही त्यांचे वडील? माझ्याबरोबर एक डॉक्टर आले आहेत.”

“देवी!” वासिली इवानोविच् मोठ्याने म्हणाले; आणि तिचा हात पकडून भावविव्हलतेने त्यांनी आपल्या ओठांवर दाबला; दरम्यान अना सर्गेव्नाने आणलेला डॉक्टर काळजीपूर्वक, हळुवारपणे गाडीबाहेर येत होता; तो बुटका माणूस जर्मन चेहेरेपट्टीचा होता; आणि त्याने चष्मा लावलेला होता.

"अजून जिवंत आहे, माझा एव्गेनी अजून जिवंत आहे; आणि तो वाचेल! अरीना! अरीना!......स्वर्गातल्या देवतेचेच आपल्याकडे आगमन झाले आहे......"

"कोण रे, देवा!" दिवाणखान्यातून वेगाने येत म्हातारी अडखळत म्हणाली; आणि कशाचेच आकलन न होऊन अना सर्गेव्नाच्या पायाशी तिने लोटांगण घातले, आणि एखाद्या वेडगळ स्त्रीप्रमाणे तिच्या पोषाखाची चुंबने घेऊ लागली.

"हे काय करता!" अना सर्गेव्नाने हरकत घेत म्हटले; पण अरीना व्लास्येवनाचे तिकडे लक्ष नव्हते; आणि वासिली इवानोविच् फक्त "देवता! देवता!" एव्हढेच पुटपुटत होते.

"कुठे आहे रोगी? ......आणि रोगी कुठे आहे?" डॉक्टरने काहीशा अस्वस्थपणे प्रथम जर्मन व नंतर रशियन भाषेत शेवटी विचारले.

वासिली इवानोविच् भानावर आले.

"इकडे, इकडे या माझ्यामागून, आपल्यासारखे थोर सहव्यवसायी......" जुन्या सवयीने ते म्हणाले.

"वा!" आंबट चेहऱ्याने दात विचकत तो जर्मन म्हणाला.

वासिली इवानोविच् यांनी त्याला अभ्यासिकेत नेले. "अना सर्गेव्नाकडून आलेले डॉक्टर," आपल्या पुत्राच्या कानाजवळ अगदी वाकून ते म्हणाले, "आणि त्याही स्वतः इथे आल्या आहेत."

बझारव्ने तात्काळ डोळे उघडले. "काय म्हणालात?"

"मी म्हणालो की, अन सर्गेव्ना इथे आल्या आहेत, आणि त्यांनी या सद्गृहस्थाना, डॉक्टरना तुझ्यासाठी आणले आहे."

बझारव्ने सभोवार नजर फिरवली. "ती इथे आहे......मला तिला पाहायचे आहे."

"तुला त्या भेटतील, एव्गेनी; पण प्रथम या डॉक्टरांशी आपण थोडी बातचीत केली पाहिजे. सिडॉर सिडॉरिच इथून गेल्यापासूनची तुझ्या आजाराची सर्व माहिती मी यांना सांगतो" (सिडॉर सिडॉरिच हे त्या जिल्ह्याच्या डॉक्टरचे नाव), "आणि मग थोडी तपासणी करू."

बझारव्ने त्या जर्मन माणसाकडे दृष्टिक्षेप टाकला. "हं बोला झटपट; फक्त लॅटिनमध्ये बोलू नका; मला jam moritur चा 'तो, ती किंवा ते मरणोन्मुख आहे' असा अर्थ ठाऊक आहे, समजलं."

"गृहस्थाचे जर्मनवर प्रभुत्व दिसते." ॲस्कूलापीअसचा तो शिष्य वासिली इवानोविच् कडे वळून जर्मनमध्ये म्हणाला.

“आपली शरणागती; आपण रशियन भाषेतच बोलणे बरे,” ते वृद्ध गृहस्थ म्हणाले.

“अस्स! अस्स! असे आहे तर......चालेल......” मग तपासणी सुरू झाली.

अर्ध्या तासानंतर वासिली इवानोविच् समवेत अना सर्गेव्नाने अभ्यासिकेत प्रवेश केला. डॉक्टरने तेव्हढ्यातल्या तेव्हढ्यात रोग्याच्या बरे होण्याचा विचारसुद्धा करणे व्यर्थ आहे असे तिला सांगून टाकले.

तिने बझारव्कडे पाहिले......त्याचा तो सुजलेला, पण त्याचबरोबर मृतप्राय चेहरा आणि तिच्यावर रोखलेले किलकिले डोळे यांचा तिच्यावर इतका परिणाम झाला की, ती दरवाजातच थबकली. एकप्रकारच्या थंड आणि गुदमरून टाकणाऱ्या विषादाने तिचे धैर्यच खचले; त्याच्यावर तिने खरोखरच प्रेम केले असते तर तिला असे वाटलेच नसते, हा विचार तात्काळ तिच्या मनात चमकून गेला.

“आभारी आहे,” तो वेदनेने विव्हळत म्हणाला, “माझी अपेक्षा नव्हती. तुमचा हा अनुग्रह आहे. तुम्ही म्हटल्याप्रमाणे आपण पुन्हा भेटतो आहोत तर. ”

“अन सर्गेव्नाचे इतके उपकार आहेत,” वासिली इवानोविच् बोलले......

“बाबा, तुम्ही सर्वजण बाहेर जा. अना सर्गेव्ना, आता तुमची हरकत नसावी अशी कल्पना आहे.”

आपल्या मानेच्या हालचालीने त्याने आपले निश्चल आणि असहाय्य शरीर दर्शविले.

वासिली इवानोविच् बाहेर पडले.

“अच्छा, आभारी आहे मी तुमचा,” बझारव् पुन्हा एकदा म्हणाला. “हे अगदी राजेशाही थाटाचे झाले. असं म्हणतात की, राजेलोक मृत्युपंथाला लागलेल्या व्यक्तींनासुद्धा भेटतात.”

“एव्गेनी वासिलिइच्, मला वाटते......”

“आह, अना सर्गेव्ना, आपण आता थोडे सत्य बोलू या. मी तर आता संपलोच आहे. मी आता चक्राच्या फेऱ्यात सापडलो आहे. भविष्यकाळाविषयी विचार करणे व्यर्थ होते हेच सिद्ध झाले म्हणायचे. मृत्यू हा पुरातन विनोद आहे; पण प्रत्येकाला नव्यानेच त्याचा अनुभव येतो. अद्याप तरी मला भीती वाटत नाही......पण......शुद्ध हरपण्याची वेळ येते, आणि मग सगळेच संपते! —” त्याच्या हाताची क्षीण हालचाल झाली. “बरे, पण मला तुम्हाला काय सांगायचे होते......मी तुमच्यावर प्रेम केले! त्यात पूर्वीसुद्धा काही तथ्य नव्हते, आता तर मुळीच नाही. प्रेम हा एक आकृतीबंध आहे, आणि माझा आकृतीबंध खतम व्हायला सुरवात झाली आहे. तुम्ही किती रमणीय दिसता, एव्हढेच म्हणतो! आता तुम्ही इथे उभ्या आहात, किती सुंदर......”

अना सर्गेव्ना अभावितपणे थरारली.

“पण जाऊ दे, अस्वस्थ होऊ नका……बसा तिथे……समीप येऊ नका, माझा आजार संसर्गजन्य आहे.”

अना सर्गेव्ना वेगाने बझारव् पडलेला होता त्या सोफ्याजवळच्या आराम खुर्चीत जाऊन बसली.

"उदात्त—रमणी!” तो कुजबुजला. “किती जवळ……आणि किती तरुण……, तजेलदार, शुद्ध……या घृणास्पद खोलीत! ……अच्छा, नमस्ते! दीर्घायुषी व्हा; तेच सर्वांत उत्तम; आणि आयुष्य आहे तोपर्यंत त्याचा पुरेपूर उपभोग घ्या. किती किळसवाणे दृश्य हे; हा किडा जवळजवळ चिरडला गेला आहे, पण त्याची वळवळ अजून चालूच आहे. आणि पाहा ना, मलाही वाटले होते : मी अनेक शक्तींचा पाडाव करू शकेन; मला मृत्यू येणार नाही—आणि तो येईल तरी कसा; अनेक प्रश्न सोडवावयाचे होते, आणि मी विराट होतो! आणि आता त्या विराटापुढे समुचितपणे कसे मरावे, हाच फक्त प्रश्न आहे; पण त्यामुळे दोघांच्यात काहीच फरक पडणार आहे असे नाही……जाऊ दे; मी शेपूट घालणार नाही.”

बझारव् स्तब्ध झाला, आणि हाताने पाण्याचा प्याला चाचपडू लागला. अना सर्गेव्नाने त्याला थोडे पाणी दिले; तिने हातमोजे काढले नव्हते; आणि तिने श्वास रोधून धरला होता.

“मला विसरून जाल,” तो पुन्हा बोलू लागला; “मृत व्यक्ती काही जिवंत माणसाची साथी होऊ शकत नाही. माझ्या मृत्यूमुळे रशियाचे किती नुकसान होणार आहे, याबद्दल माझे वडील तुम्हाला सांगतील……ते सगळे मूर्खपणाचे आहे, पण म्हाताऱ्याला विरोध करू नका. बालकाला रिझविणारे कुठलेही खेळणे……चालते……तुम्हाला माहीत आहे. आईशी मायेने वागा. त्यांच्यासारखी माणसं तुमच्या त्या जगात दिवसाउजेडी मेणबत्तीच्या प्रकाशात शोधूनसुद्धा सापडणार नाहीत……रशियाला माझी गरज होती……नाही, गरज नव्हती हे स्पष्ट आहे. तशी कुणाची गरज आहे? चांभाराची गरज आहे, शिंप्याची आहे, खाटिकाची……तो मांस देतो……खाटीक……थांबा, माझा काहीतरी गोंधळ उडाला आहे……इथे एक अरण्य आहे……”

बझारव्ने आपला हात कपाळावर ठेवला.

अना सर्गेव्ना त्याच्यावर ओणवी होऊन म्हणाली, “एव्गेनी वासिलिइच्, मी इथे आहे……”

त्याने वेगाने हात झटकला, आणि तो बळेच उठू लागला.

“नमस्ते,” आकस्मिक आवेगाने तो म्हणाला, आणि त्याच्या डोळ्यांत अखेरची चमक दिसली. “नमस्ते,…… ऐका……आठवते, मी त्यावेळी तुमचे चुंबन घेतले नव्हते……विझत्या ज्योतीवर फुंकर घाला, आणि मग ती विलयाला जाऊ दे……”

अना सर्गेव्नाने आपले ओठ त्याच्या भालावर टेकले.

“बस्स!” तो पुटपुटला, आणि पुन्हा हळुवार उशीवर टेकला. “आता……अंधःकार……”

अनुक्रमणिका

अना सर्गेव्‌ना पाऊल न वाजवता बाहेर पडली. “कसे काय?” वासिली इवानोविच्‌नी हळू आवाजात विचारले.

“त्यांना झोप लागली आहे,” ती म्हणाली, पण ते कुणालाच ऐकू गेले नसावे. बझारव्‌ला पुन्हा जाग येणार नव्हती. संध्याकाळपर्यंत त्याची पूर्ण शुद्ध हरपली, आणि दुसऱ्या दिवशी त्याचे प्राणोत्क्रमण झाले. फादर अलेक्सीनी धार्मिक विधी पार पाडले. जे व्हात्यांनी त्याच्या शरीराला तेल माखले, जेव्हा ते पवित्र तेल त्याच्या छातीला लागले, तेव्हा एक डोळा उघडला; आणि जणू त्या धार्मिक वस्त्रातल्या पुजाऱ्याच्या दर्शनाने, धूपदाणीतून पसरणाऱ्या धुराकडे पाहून, पवित्र मूर्तीसमोरील दीप पाहून त्या मृत्यूची अवकळा पसरलेल्या चेहेऱ्यावर भीषण भीतीचा थरकाप जाणवत होता. आणि जेव्हा त्याने अखेरचा श्वास सोडला, आणि जेव्हा घरातल्या सर्वांनी शोक करायला एकदम सुरवात केली, तेव्हा मात्र वासिली इवानोविच्‌ना भ्रमाचा झटका आल्यासारखे ते घोगऱ्या आवाजात ओरडले. “मला बंड केले पाहिजे;” त्यांचा चेहरा जळजळीत, क्रुद्ध दिसत होता, आणि कुणालातरी धमकी देत असल्यासारखे ते हवेत हातवारे करत होते; “बंड करणार; मी बंड करणार!” पण अश्रूंच्या पुरात न्हालेली अरिना व्लास्येवना त्यांच्या मानेला धरून लोंबकळू लागली, आणि मग ते दोघे तोंडावर खाली पडले. “एकमेका शेजारी,” अन्फिशुश्का नंतर खोलीत नोकरांना सांगत होती, “दुपारच्या उन्हातल्या कोकरांप्रमाणे त्या गरीब बिचाऱ्यांच्या माना खाली गळल्या होत्या……”

पण दुपारची धगधग कमी होते, संध्याकाळ होते, रात्र होते, आणि मग मात्र जडावलेल्यांना आणि दमल्याभागलेल्यांना सुखद झोपेचा आधार पुन्हा एकदा लाभतो.

सहा महिने उलटून गेले. शुभ्र शिशिराचे आगमन झाले; आणि त्याबरोबर निरभ्र आकाशातून होणाऱ्या हिमसेकाने होणारी निष्ठुर सामसूम; पायाखाली खसखस वाजणारे बर्फाचे जाड थर; वृक्षांवरची गुलाबी बुरशी; फिकट पाचू रंगाचे आकाश; घरांच्या धुरांड्यातून बाहेर पडणारी धुराची वलये; घरांचे दरवाजे किंचित उघडले तरी, वाफेचे उफाळून बाहेर येणारे ढग; त्यांतून दिसणारे तजेलदार पण थंडीने गारठलेले चेहेरे; आणि गारठून गेलेल्या घोड्यांच्या टापांचे आवाज. जानेवारीतला एक दिवस अस्तंगत होत होता; निरव वातावरणातील त्या सायंकाळची थंडी अधिकच तीव्र भासत होती; आणि निस्तेज सूर्य वेगाने नाहीसा होत होता. मॅरिॲनोतील घराच्या खिडक्यांतून दिव्यांचा प्रकाश बाहेर दिसत होता; प्रकोफिच्ने काळा फ्रॉक—कोट आणि पांढरेशुभ्र हातमोजे पेहेरले होते; त्याच्या चेहेऱ्यावर काही विशेष गांभिर्य प्रतीत होत होते; आणि त्याने सात जणांसाठी पाने वाढण्याची तयारी केली होती. एक आठवड्यापूर्वी परगण्यातल्या प्रार्थनामंदिरात, गाजावाजा न करता आणि साक्षीदारांचीही गरज न भासता, दोन विवाह पार पडले होते—अर्कादी आणि कत्या, व निकालाय पित्रोविच् आणि फिनिच्का यांचे. आणि आज रात्री निकालाय पित्रोविच् आपल्या बंधूंना निरोप देण्याच्या निमित्ताने खाना देत होते; त्यांचे बंधू मॉस्कोला व्यावसायिक कारणासाठी निघाले होते. समारंभ संपल्याबरोबर अना सर्गेव्नासुद्धा तशीच तिकडे गेलेली होती; त्या तरूण जोडप्याला साजेलसे मोठे अहेर तिने त्यांना बहाल केले होते.

बरोबर तीन वाजता ते टेबलाशी एकत्र आले. मित्याचीही तिथेच स्थापना झालेली होती; त्याच्याबरोबर एक दाई होती; तिने चमकदार जडिबुट्टीची टोपी घातलेली होती. कत्या आणि फिनिच्का या दोघींमध्ये पावेल पित्रोविच् येऊन बसले; दोन्ही "वर" आपापल्या वधू-शेजारच्या जागेवर बसले. आपले हे मित्रगण अलीकडे बरेच बदललेले दिसत होते; ते सगळेच अधिक सुदृढ आणि देखणे दिसत होते; फक्त पावेल पित्रोविच् तेवढे पूर्वीपेक्षा कृश दिसत होते, त्यामुळे त्यांच्या आधीच लक्षणीय असलेल्या चेहेरेपट्टीवर अधिकच रेखीवपणा आणि "बाजीरावी" थाट दिसत होता......आणि फिनिच्काही निराळी दिसत होती. तिने नवा रेशमी गाऊन परिधान केला होता; केसावर व्हेल्व्हेटचे रुंद शिरोभूषण; मानेवर रुळणारी सोनसाखळी; तिच्या निश्चल बसण्यात कृतक् नापसंतीचा भास होत होता; स्वतःबद्दलच्या आणि आजूबाजूच्या प्रत्येक गोष्टीबद्दलच्या प्रतिष्ठेची जाणीव तिला होती; ती स्मित करी तेव्हा जणू तिला म्हणायचे होते, "माफ करा; माझा काय दोष." आणि तीच एकटी नव्हे तर, इतर सर्वजण हसत होते, आणि कुठल्या ना कुठल्या कारणास्तव दिलगीर दिसत होते; ते सर्वच काहीसे अवघडल्यासारखे, काहीसे दयनीय, पण वस्तुतः सुखी वाटत होते. ते सर्वजण एकमेकाला मजेने आगत्यपूर्वक वाढत होते, जणू त्या सर्वांनीच एका अकृत्रिम प्रहसनाची तालीम करण्याचे ठरविले होते. कत्या सर्वांत शांत वाटत होती; ती आत्मविश्वासाने स्वतःभोवती आजूबाजूला पाहात होती, आणि निकालाय् पित्रोविच् तिच्यावर बेहद खुष असल्याचे स्पष्ट दिसत होते. भोजन पार पडल्यानंतर हातात प्याला घेऊन ते उभे राहिले, आणि पावेल पित्रोविच्कडे वळले.

"भाईसाहेब, तुम्ही आम्हाला सोडून जात आहात......आम्हाला सोडून जात आहात," ते म्हणाले; "दीर्घकाळासाठी नाही, हे खरे; पण तरीही मला सांगितलेच पाहिजे......की, मी......आम्ही......मी किती......आम्ही किती......हेच......आम्हाला भाषण करणे जमत नाही इथेच सगळे बिघडते. अर्कादी, तू बोल."

“नाही, डॅडी, मी काही तयारी केलेली नाही.”

“जशी काही माझी तयारी आहे! अच्छा, भाईसाहेब, मी एव्हढेच म्हणतो की, आपण कडकडून भेटू या; तुम्हाला आमच्या शुभेच्छा आहेत; आणि शक्य तितक्या लौकर पुनरागमन करा!”

पावेल पित्रोविच्नी प्रत्येकाचे चुंबन घेतले; अर्थातच मित्याचेही. फिनिच्काच्या बाबतीत त्यांनी तिच्या हाताचे चुंबन घेतले; ती अजूनही आपला हात स्वतःहून योग्य प्रकारे पुढे करण्यास शिकलेली नव्हती; आणि पुन्हा भरलेला प्याला पिऊन टाकून, दीर्घ निश्वास सोडून ते म्हणाले, “मित्रहो, तुम्ही सर्वजण सुखी असा. फेअरवेल!” इंग्रजी पद्धतीने केलेला हा शेवट मात्र कुणाच्या ध्यानात आला नाही; पण प्रत्येकजण द्रवला होता.

“बझारवच्या स्मरणार्थ,” कत्या आपल्या पतीच्या कानात कुजबुजली; त्याच वेळी तिने आपला प्याला त्याच्या प्याल्याशी किणकिणला. अर्कादीने प्रत्युत्तरादाखल तिचा हात प्रेमाने दाबला, पण अशा तऱ्हेने शुभेच्छा प्रकटपणे व्यक्त करण्याचे मात्र त्याला धाडस झाले नाही.

आणि आता शेवट—शेवट झाला असे वाटते का? पण कदाचित एखाद्या वाचकाला, आम्ही ज्या व्यक्तींचा परिचय करून दिला, त्यांपैकी प्रत्येकजण वर्तमानकालात म्हणजे सांप्रतकाळी, काय करत असेल हे जाणून घेण्याची जिज्ञासा असेल तर ती जिज्ञासापूर्ती आम्ही जरूर करू.

अना सर्गेव्नाने अलीकडेच लग्न केले आहे, पण ते प्रेमाखातर नव्हे, तर व्यावहारिक गरजेसाठी; तिचा पती भविष्यकालीन रशियाचा नेता आहे; तो एक हुशार वकील, अत्यंत व्यवहारकुशल जबरदस्त इच्छाशक्ती असलेला आणि ओघवत्या वाणीचा माणूस आहे; अजूनही तरुण, सत्प्रवृत्त आणि वृत्तीने बर्फासारखा थंड. त्या दोघांचा छान मिलाफ जमला आहे, आणि आयुष्यात कदाचित त्यांना संपूर्ण सुख मिळेल......कदाचित त्यांना प्रीतीची अनुभूती देखील मिळेल. प्रिन्सेस के निवर्तली आहे—आणि त्याच दिवशी तिला सारेजण विसरले. किर्सानव् पितापुत्र मॅरिअॅनोत राहातात; आणि त्यांची परिस्थिती सुधारत आहे. मालमत्तेची देखरेख अर्कादी मोठ्या उत्साहाने पाहतो; आणि शेतीतही आता चांगली प्राप्ती होते आहे. निकालाय् पित्रोविच्ना लवादसमितीतील एक सदस्य नेमले आहे; ही समिती बंधविमोचनाच्या सुधारणा कार्यवाहीत करण्यासाठी नेमलेली आहे, आणि त्यात ते कार्यरत असतात; आपल्या भागात ते बहुधा फिरतीवरच असतात; लंबीचवडी भाषणे देतात (त्यांचे एक ठाम मत आहे की, “शेतकऱ्यांच्या गळी उतरविले पाहिजे;” म्हणजे काय तर, त्याच त्याच शब्दांचा त्यांच्यावर भडिमार झाल्यानंतर त्यांनी मान डोलावली पाहिजे); तरीही खरे सांगायचे म्हणजे त्यामुळे सुसंस्कृत उमरावांचेही पूर्ण समाधान होत नाही; हे उमराव ‘इमॉन्सिपेन्’ हा शब्द शैलीदार अथवा क्षीण स्वरात उच्चारतात (जणू तो शब्द फ्रेंच असल्यासारखे); आणि असंस्कृत शेतकऱ्यांचेही समाधान होत नाही; ते कुठलाही विधिनिषेध न ठेवता निंदाव्यंजक स्वरात “मॅन्सिपेशन्” म्हणतात. या दोन्ही गटांतील लोकांना ते फारच मवाळ वाटतात. कतेरीना सर्गेव्नाला लाभ झाला आहे; छोटा निकलाई; मित्या आनंदाने बागडत असतो, आणि तो आता अस्खलित बोलू लागला आहे. फिनिच्का, फिदोस्या निकालाएव्ना, आपला पती आणि मित्याखेरीज करून, आपल्या सुनेइतकी तारीफ कुणाचीही करत नसते; आणि सूनबाई जेव्हा पियानो वाजवत बसते तेव्हा तर सबंध दिवसभर तिच्या समवेत बसावे असे तिला वाटते. प्योत्रसंबंधीही जाताजाता थोडेसे. आपला दर्जा आणि बावळटपणा यामुळे तो भलताच ताठ झाला आहे, पण त्याचेही लग्न झाले आहे आणि बायकोबरोबर बराच हुंडाही त्याला मिळाला आहे. त्याची बायको ही शहरातल्या एका माळ्याची मुलगी.

तिने दोन चांगले वर नाकारले होते; का तर म्हणे, त्यांच्याजवळ घड्याळ नव्हते; आणि प्योत्रकडे नुसते मनगटी घड्याळच नव्हते तर, मऊ कातड्याची पादत्राणेही होती.

ड्रेस्डेनमधल्या ब्रूल टेरेस या भागात, दोन ते चारच्या दरम्यान—फिरायला बाहेर पडण्याची सर्वांत लोकप्रिय वेळ—पन्नाशीच्या घरात पोचलेले एक गृहस्थ त्यावेळी तुम्हाला भेटतील; त्यांचे केस पूर्ण पांढरे झालेले आहेत; संधिवायूच्या विकाराने ते आजारी होते, असे वाटावे; पण अजूनही त्यांचा वेष झोकदार आहे, अजूनही ते देखणे दिसतात; आणि समाजातल्या प्रतिष्ठित थरात दीर्घकाळ वावरलेल्या व्यक्तींच्याच ठिकाणी आढळून येणारी ती ठराविक छाप त्यांच्यात प्रतीत होते. हेच ते पावेल पित्रोविच्. प्रकृतीस्वास्थ्यासाठी मॉस्को सोडून ते ड्रेस्डेनला गेले होते; तिथेच कायमचे स्थाईक झाले आहेत; इंग्लिश आणि रशियन प्रवाशांतच ते अधिक मिसळून राहातात. इंग्लिश लोकांबरोबर ते साधेपणाने, प्रायः नम्रपणाने पण स्वतःची प्रतिष्ठा राखून वागतात; इंग्रजांना त्यांची ब्यादच वाटते, पण ते त्यांना "पक्का सभ्य माणूस" म्हणून मान देतात. रशियनांच्या सहवासात ते अधिक मोकळे व स्वाभाविकपणे वागतात; आपला द्वेष व्यक्त करतात; स्वतःची चेष्टा करतात. पण हे सर्व ते स्निग्धपणे निर्विकारपणे आणि औपचारिकतेच्या मर्यादेत करतात. स्लाव्होफिल मतप्रणाली ते मानतात; उच्च प्रतिष्ठित समाजात ती 'अति प्रगल्भ' मानली जाते हे सर्वश्रुत आहे. रशियन भाषेत ते काही वाचत नाहीत; पण त्यांच्या टेबलावर शेतकऱ्याच्या पट्ट्याच्या पादत्राणाच्या आकाराचे एक चांदीचे रक्षापात्र आहे. आमचे प्रवासी लोक त्यांचा पाठपुरावा करत असतात. सध्या विरोधी पक्षात असलेल्या मत्वी इलिच् कल्याझिन्ने एकदा इतमामाने भेट दिली. एतद्देशीयात ते क्वचितच दिसतात; पण ते मात्र त्यांच्यासमोर अगदी लोळण घेतात. दरबारी चॅपेलसाठी किंवा नाटकासाठी तात्काळ आणि सहजरीत्या तिकीट मिळविणे हेर बॅरन व्हॉन किरसानव्खेरीज कुणाला जमत नसते. शक्य असेल ते, ते सहजप्रवृत्तीने करतात; जगात त्यांचा अजूनही काहीसा दबदबा आहे; उच्च प्रतिष्ठित समाजातले शूर सिंह उगीच नव्हते ते एकेकाळी; —पण जीवनाचे त्यांना ओझे वाटते......त्यांना संशय येतो त्याहीपेक्षा अधिक बोजड ओझे. एखाद्या रशियन चर्चमध्ये त्यांना पाहावे; भिंतीला रेलून ते विचारमग्न असतात; आणि अचानक भानावर येऊन कुणाला दिसणार नाही अशा पद्धतीने छातीवर क्रॉस करतात.

मादाम कुक्झिन्ही परदेशी गेली. ती सध्या हैडेल्बर्गमध्ये आहे; आता ती प्राकृतिक विज्ञान अभ्यासत नाही तर, स्थापत्यशास्त्र; आणि तिच्या म्हणण्याप्रमाणे या शास्त्रात तिला नवीन तत्त्वांचा शोध लागला आहे. अजूनही ती तरुण विद्यार्थ्यांना जवळ करते; विशेषतः प्राकृतिक विज्ञान व रसायनशास्त्र अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांना; हैडेल्बर्गमध्ये या विद्यार्थ्यांचा मोठा भरणा आहे; हे विद्यार्थी तिथल्या भोळ्या जर्मन प्राध्यापकांना आपल्या ठाम मतांचे प्रदर्शन करून प्रथम चकित करतात; मग हेच विद्यार्थी परिणामी याच प्राध्यापकांना आपल्या संपूर्ण नालायकीने आणि कमालीच्या आळशीपणाने चकित करतात. रसायनशास्त्राच्या अशा दोन तीन विद्यार्थ्यांच्या सहवासात, त्या थोर इलिस्येविचच्या सहवासात पिट्स्बर्गमध्ये सितनिकोफ् भटकत असतो; या विद्यार्थ्यांना ऑक्सिजन आणि नायट्रोजन यांमधील फरकही कळत नाही; पण संशयवाद व आत्मप्रौढीने मात्र हे विद्यार्थी पछाडलेले असतात; सित्निकोफ् स्वतःही इलिस्येविच्प्रमाणे थोर होण्याच्या मार्गावर आहे; आणि बझारव्चे 'कार्य' आपण पुढे चालवित आहो अशी त्याची ठाम समजूत आहे. अलीकडे त्याला कुणीतरी तोबा मार दिला अशी वदंता आहे, पण त्याने त्याचा सूड घेतला आहे; एका अप्रसिद्ध नियतकालिकात लिहिलेल्या एका छोट्या दुर्बोध लेखात त्याने, त्याला मारणारा माणूस भ्याड असला पाहिजे, असे सूचित केले आहे. त्याला वाटते ही व्याजोक्ती आहे. त्याचे वडील नेहमीप्रमाणे त्याला धमकावतात आणि त्याची पत्नी त्याला मूर्ख आणि एक लेखकू समजते.

अनुक्रमणिका

रशियातल्या कुठल्याशा दूरच्या कोपऱ्यातील एका खेड्याजवळचे स्मशान; आपल्याकडच्या जवळजवळ सर्व स्मशानासारखे तेही बकाल दिसते; त्याच्या भोवतालचे खड्डे गवताने कधीच भरून बुजून गेले आहेत; काळपट पडलेले लाकडी क्रूस एके काळी रंगविलेल्या तिकोनी छताखाली मोडकळून कुजत पडलेले आहेत; दगडी फरशांचे तुकडे मागून कुणीतरी ढकलल्यासारखे इतःस्ततः पडलेले आहेत; दोन तीन बोडकी झाडे किरकोळ सावली देत उभी आहेत; थडग्यांमधून शेळ्यामेंढ्या अनिर्बंधपणे संचार करताहेत......पण त्यातही एक थडगे माणसाचा संपर्क न लागलेले, जनावरांनी न तुडवलेले असे राहिले आहे; प्रातःसमयी पक्षी तिथे येऊन बसतात व गातात. त्याच्याभोवती लोखंडी कुंपण केलेले आहे; दोन्ही बाजूला दोन अशी फरची झाडे लावलेली आहेत. एव्‌गेनी बझारव्‌ला या थडग्यात पुरलेले आहे. जवळच्याच लहानशा खेड्यातून दोन वृद्ध, दुर्बल व्यक्ती—पति-पत्नी—तिथे येत असतात. एकमेकाला आधार देत जड पावलांनी ते थडग्याजवळ येतात; कुंपणापर्यंत ते जातात, गुडघ्यावर टेकून बराच वेळ दुखाश्रू ढाळत बसतात; शोकाकुल होऊन त्या थडग्याकडे एकाग्र दृष्टीने पाहात राहतात; त्या थडग्यात त्यांचा मुलगा चिरनिद्रा घेत आहे; एखाद दुसऱ्या शब्दाची देवाणघेवाण करतात; समाधी प्रस्तरावरील माती पुसतात; फर्‌ची एखादी फांदी सरळ करतात; पुन्हा प्रार्थना करतात; या जागेपासून दूर होणे त्यांना क्लेशकारक होते; इथे आपल्या मुलाच्या आणि त्याच्या आठवणींच्या अधिक जवळ आल्यासारखे जणू त्यांना वाटते......त्यांच्या प्रार्थना, त्यांचे अश्रू निष्फळ ठरतील का? प्रेम, पवित्र प्रेम, समर्पित प्रेम हे सर्वशक्तिमान नसेल का? छे, नाही! त्या थडग्यात पुरलेले हृदय कितीही भावविवश होणारे, पापाकडे झुकणारे, आणि बंडखोर असले, तरी त्यावर उगवलेली फुले शांतगंभीरपणे, निरागसपणे आपणांकडे डोकावून पाहातात; ती आपल्याला केवळ चिरशांतीचा, त्या ‘उदासीन’ निसर्गाच्या बृहत्‌शांतीचाच संदेश देतात असे नसून चिर समन्वयाचा व अंत नसलेल्या जीवनाचाही संदेश ती देतात.

अनुक्रमणिका